# सहा ग्रामीण विभागांची जनसांख्यिकीय पाहणी

कुमुदिनी दांडेकर

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४

गोखले अर्थशास्त्र संस्था मराठी प्रकाशन ११ वें

© गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४

१९६४

किंमत रु. ६·००

प्रकाशक : ध. रा. गाडगीळ, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४.

मुद्रक : श्री. वि. बा. गांगल, एम्. एस्सी., लोकसंग्रह छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

वितरक : दि बुक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड, रानडे रोड, मुंबई २८.

# प्राक्कथन

हें प्रकाशन म्हणजे १९५१ व १९५६ या सालांच्या दरम्यान या संस्थेतर्फे ग्रामीण विभागांत ज्या जनसांख्यिकीय पाहण्यांची मालिका सुरू केली गेली, त्या मालिकेंतील तिसरें व शेवटचें प्रतिवृत्त होय. या सर्व पाहणी-कार्यांत पाहणीच्या प्रारंभीचा कार्यप्रवेश व कार्यपद्धति हीं प्रामुख्यानें सारखींच होतीं. तरीहि या पुस्तकांत ज्या पाहणीकार्याचें प्रतिवृत्त ग्रथित झालें आहे, त्या पाहणीची योजना इतरांपेक्षा कांहींशी वेगळी आखली होती. उदाहरणार्थ, या पाहणी-योजनेसाठी, पाहणी करावयाच्या विभागांची निवड वेगळ्या विचारानें केली होती. पूर्वीच्या पाहणीप्रमाणे साधारणपणे लहान क्षेत्रांतून नमुन्यादाखल लहान लहान विभाग निवडून त्यांची पाहणी करण्यापेक्षा या पाहणीच्या योजनेंत मुद्दामच एका विस्तीर्ण विभागांतील दूरदूरचीं केंद्रें निवडण्यांत आलीं होतीं. यामुळे या पाहणीच्या प्रतिवृत्तांत निवडलेल्या केंद्रांतील भौगोलिक, आर्थिक इत्यादि घटकांतील भिन्नता स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. त्याचबरोबर पाहणी केलेल्या केंद्रांच्या विविध प्रकारच्या पार्श्वभूमींतून व परिस्थितींतून देशांतील जनसांख्यिकीय स्थितीचीं जीं सर्वसामान्य वैशिष्ट्यें आहेत, तीं अधिक ठळकपणें उठून दिसतात.

या पाहणीचें भौगोलिक क्षेत्र जसें विस्तीर्ण निवडलें होतें, तसेंच पाहणींत समाविष्ट होणाऱ्या विषयांचें क्षेत्रहि पूर्वीच्या पाहणीपेक्षा अधिक विस्तृत केलें होतें. केवळ जनसंख्येशी संबंधित असणाऱ्या विषयांपुरतीच ही पाहणी मर्यादित न करतां, तिच्यांत आनुषंगिक अशा अनेक सामाजिक व आर्थिक विषयांचाहि समावेश करण्यांत आला होता. या पुस्तकांत जनसांख्यिकीय स्वरूपाची जी माहिती आहे, ती सामान्यत: पूर्वीच्या दोन पाहण्यांप्रमाणेच आहे. या पाहणींतून निघालेले निष्कर्षहि जवळ जवळ पूर्वीप्रमाणेच आहेत. उदाहरणार्थ, गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेची पातळी साधारणपणें पूर्वीसारखीच राहिली आहे, हा जो जननक्षमतेबद्दलचा निष्कर्ष या पाहणींत निघाला आहे, तो पूर्वीच्या पाहण्यांतहि निघाला होता. तसेंच पूर्वीच्या पाहण्यांप्रमाणे याहि पाहणींत कांही ग्रामीण केंद्रांत जननक्षमतेच्या पातळींत थोडी घट झाल्याचा पुरावा आढळला.

पूर्वीच्या पाहणींत निघालेल्या आणखी एका महत्त्वाच्या निष्कर्षाला, या पाहणींतील निष्कर्षामुळे बळकटी मिळाली आहे. हा निष्कर्ष कुटुंबनियोजनाबाबतच्या दृष्टिकोनासंबंधीचा आहे कुटुंबनियोजनाच्या कल्पनेला किंवा त्यासंबंधीच्या पद्धतींना जनमनांत खोल रुजलेला असा विरोध मुळीच नाही, ही आश्चर्यकारक गोष्ट याहि पाहणींत पुन्हा आढळून आली. या पाहणींत हेंहि दिसून आलें की, भिल्लांसारख्या एखाद्या तथाकथित मागासलेल्या जमातीच्या किंवा त्यांच्या विभागाच्या मागासलेपणाचा एकंदर कुटुंबनियोजनाबद्दलच्या दृष्टिकोनावर लक्षणीय असा कांही परिणाम झालेला नाही. पूर्वीच्या पाहणींत अनुभवास आलेल्या अडचणींमुळे या पाहणीच्या वेळी कुटुंबनियोजनासंबंधीचा दृष्टिकोन अजमावतांना आम्ही विशेष प्रकारची पूर्वतयारी केली होती. या कामासाठी कुटुंबनियोजनाच्या पद्धतीचें प्रशिक्षिण घेतलेल्या अशा प्रशिक्षित परिचारिका ( ट्रेण्ड नर्सेस ) आरोग्य प्रचारिका ( हेल्थ व्हिजिटर्स ) यांचीच अन्वेषिका म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. या अन्वेषिकांना पाहणींतील खेड्यांत बाळंतपणें करण्याची व लहान लहान दुखण्यांवर इलाज करण्याचीहि परवानगी दिली होती. हेतु हा की, या उपायानें लोकांचा विश्वास संपादन करतां यावा व कुटुंबनियोजनासंबंधी लोकांचा, विशेषत: स्त्रियांचा दृष्टिकोन काय आहे हें अजमावण्याची सोइस्कर संधि मिळावी. या विषयासंबंधी लोकांचा दृष्टिकोन व वृत्ति यासंबंधी जी विश्वसनीय व या विषयावर विशेष प्रकाश पाडणारी अशी माहिती या पाहणींत मिळाली तिच्यावरून आमचें हें धोरण यशस्वी ठरलें असें म्हणतां येईल. या कार्यासाठी विशिष्ट प्रकारच्या अन्वेषिकांची

निवड केल्यामुळे, पाहणीकार्याच्या अनुषंगाने किंवा आकस्मिक रीतीने या कार्यक्षेत्रांतील एक विशेष महत्त्वाची गोष्ट आढळून आली. कुटुंबनियोजनाबद्दलचा व त्यासंबंधीच्या कार्यक्रमाबद्दलचा लोकांचा दृष्टिकोन हा अन्वेषिकेच्या व्यक्तिमत्वावर व पूर्वग्रहांवर, तसेंच खेडयांतील पुढाऱ्यांवर बराच अवलंबून असतो, ही आढळून आलेली महत्त्वाची गोष्ट या पुस्तकांत नमूद करण्यांत आली आहे. अन्वेषिका उत्साही व कार्योन्मुख असेल तर, तिला लोकांकडून विधायक स्वरूपाची प्रतिसाद मिळते व ती लोकांवर प्रभावहि पाडू शकते असें आम्हांला आढळून आलें. तसेंच कुटुंबनियोजनाचा स्वीकार करण्याच्या मार्गांत कांही बद्धमूल किंवा अनुल्लंघ्य असा अडथळा भारतीय समाजांत मुळीच नाही, हीहि गोष्ट या पाहणींत स्पष्ट दिसून आली. अन्वेषकाच्या किंवा बाहेरून येऊन काम करणाऱ्याच्या व्यक्तिमत्वाचें महत्त्व किती असतें यासंबंधी आम्हांला आलेल्या अनुभवावरून, कार्यपद्धतीमधील एका महत्त्वाच्या प्रश्नावर जसा प्रकाश पडू शकेल, त्याचप्रमाणे या कार्यक्षेत्रांत काम करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना महत्त्वाचा धडाहि मिळू शकेल असें वाटतें.

या पाहणींत बऱ्याच नव्या प्रश्नांसंबंधीची माहिती मिळविण्यांत आली. वैवाहिक स्थिति, विवाहासंबंधीच्या चालीरीती व विवाहावर होणारा खर्च या गोष्टींसंबंधी आम्ही माहिती मिळवली. तसेंच सामान्यत: गोळा न केलेली अशी शरीरशास्त्रीय माहितीहि आम्ही या पाहणींत मिळविली. त्याचप्रमाणे या पाहणींत विवाहासंबंधी सामाजिक व आर्थिक स्वरूपाची अशी मनोरंजक माहितीहि एकत्रित झाली. या माहितींतील द्विपत्नीकत्वाच्या उदाहरणांचा, दुसरी पत्नी करण्याच्या कारणांचा, तसेंच विवाहावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा आणि वेगवेगळ्या संदर्भांत या खर्चांत होणाऱ्या फरकांचा उल्लेख करण्यासारखा आहे.

सार्वजनिक आरोग्य व आहारासंबंधीच्या संवयी यांच्या बाबतींत केलेल्या पाहणींतून निघालेले निष्कर्षहि या पुस्तकांत शेवटीं समाविष्ट केले आहेत. लोकांची राहणी व सार्वजनिक आरोग्य यांच्या बाबतींत वेगवेगळ्या ठिकाणीं जे फरक आढळून आले, ते बरेच मोठे होते. पण असे फरक असतांहि एकंदर सगळ्या खेडयांच्या पाहणींतील निष्कर्षांवरून मनावर कोणता ठसा उमटत असेल, तर तो सर्व ठिकाणच्या आरोग्यरक्षणाच्या अनवस्थेचा, बऱ्याच मोठ्या रोगग्रस्ततेचा, वैद्यकीय सोयींच्या अभावाचा आणि रोगप्रतिबंधक उपायांच्या माहितीच्या अभावाचा. आहारामधील दिसून येणारे फरक हे मुख्यत: खाण्यांत येणाऱ्या मुख्य धान्याबाबतचेच आहेत. धान्य कोणतेंहि असलें तरी एकंदर आहारांत फार मोठें प्रमाण हें केवळ धान्याचेंच असल्याचें व आहारांत विविधतेचा अभाव असल्याचें दिसून येतें. या पुस्तकांत 'उपासमारीसंबंधी' कांही मनोरंजक विधानें आढळतात. या ठिकाणीं 'उपासमार' या शब्दाचा अर्थ एवढाच की, वर्षांतील कांही कांही महिन्यांत किंवा सबंध वर्षभरच आपणांस पुरेसें खाण्यास मिळत नाही, असें सांगणाऱ्या लोकांची होणारी 'उपासमार'. ही कांही अंशीं मानसिक उपासमार असावी. परंतु पाहणींत आढळून आलेलें आहारांतील धान्याचें व इतर खाद्यपदार्थांचें प्रमाण पाहिलें की, शारीरिक दृष्टयाहि पुरेशा प्रमाणांत अन्न खाण्यांत येत नाही, ही वस्तुस्थिति असल्याचें दिसून येतें. पूर्वीच्या पाहणीप्रमाणे याहि पाहणीच्या प्रतिवृत्तावरून हेंच स्पष्ट दिसून येतें की, भारताच्या खेडयांत किंवा ज्या विभागांतून पाहणीसाठी केंद्रें निवडलीं, त्या विभागांतील खेडयांत आर्थिक दारिद्र्य व सर्व प्रकारच्या साधनांच्या बाबतींतील दारिद्र्य वसत आहे. हें मूलभूत दारिद्र्य आदिवासी जमातीच्या जंगलाजवळच्या खेडयांत जितकें स्पष्ट दिसून येतें, तितकेंच तें मुंबई शहराचीं दूरचीं कंगाल उपनगरें या शब्दानें वर्णन करतां येण्यासारख्या कोकणांतल्या खेडयांतहि स्पष्ट दिसते, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

६ एप्रिल १९५९
पुणें ४

**ध. रा. गाडगीळ**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | | प्राक्कथन | |
| | | तक्त्यांची सूचि | |
| प्रकरण | १ | प्रास्ताविक | १– १२ |
| प्रकरण | २ | निवडलेल्या खेड्यांवरील टिपणें | १३– १९ |
| प्रकरण | ३ | लोकसंख्या | २०– ३१ |
| प्रकरण | ४ | वैवाहिक स्थिति | ३२– ५२ |
| प्रकरण | ५ | विवाह | ५३– ५८ |
| प्रकरण | ६ | जननक्षमतेशी संबद्ध शारीरिक घटक | ५९– ६३ |
| प्रकरण | ७ | जननक्षमता | ६४– ७१ |
| प्रकरण | ८ | जननक्षमतेशी संबद्ध सामाजिक व आर्थिक घटक | ७२– ७८ |
| प्रकरण | ९ | जननक्षमता—पूर्वीची व सध्याची | ७९– ९० |
| प्रकरण | १० | कुटुंबनियोजनासंबंधीचे दृष्टिकोन | ९१–१०७ |
| प्रकरण | ११ | सार्वजनिक आरोग्य | १०८–१३२ |
| प्रकरण | १२ | आहारविषयक संवयी | १३३–१४६ |

# तक्त्यांची सूचि


| तक्ता क्रमांक | | पान |
|---|---|---|
| १.१ | पाहणीसाठी निवडलेल्या केंद्रांसंबंधीचा तपशील ... | २ |
| २.१ | अहमदनगर जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील ... | १३ |
| २.२ | पश्चिम खानदेश जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील ... | १५ |
| २.३ | परभणी जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील ... | १७ |
| २.४ | गुलबर्गा जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील ... | १९ |
| ३.१ | पाहणीच्या क्षेत्रांतील स्त्री व पुरुष लोकसंख्येची वयाच्या एकेका वर्षाप्रमाणे विभागणी ... | २१ |
| ३.२ | पांचापांचाच्या वयाच्या गटांत स्त्री-पुरुषांच्या लोकसंख्येचें विभाजन—विशिष्ट आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांबद्दलची आवड दाखविणारें ... | २२ |
| ३.३ | पाहणी केलेल्या केंद्रांतील स्त्री-पुरुष लोकसंख्येची वयाप्रमाणे विभागणी ... | २३ |
| ३.४ | ५ ते १७ या वयांतील मुलांची व मुलींची काम करण्याच्या स्थितीप्रमाणे विभागणी (सर्व केंद्रांची) ... | २६ |
| ३.५ | काम करण्याच्या स्थितीप्रमाणे अ-प्रौढ (१८ वर्षांखालील) पुरुष-लोकसंख्येची विभागणी ... | २७ |
| ३.६ | काम करण्याच्या स्थितीप्रमाणे अ-प्रौढ (१८ वर्षांखालील) स्त्री-लोकसंख्येची विभागणी ... | २८ |
| ३.७ | एकूण लोकसंख्येंत काम करणाऱ्यांचें प्रमाण ... | ३० |
| ३.८ | अवलंबनाच्या प्रकारानुसार अवलंबणाऱ्यांची विभागणी ... | ३० |
| ४.१ | वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित मुलींचें व स्त्रियांचें शेकडा प्रमाण ... | ३३ |
| ४.२ | वेगवेगळ्या वय-गटांतील विवाहित स्त्रियांचें पहिल्या लग्नाच्या वेळच्या वयाप्रमाणे विभाजन ... | ३५ |
| ४.३ | एकूण झालेल्या विवाहांमध्ये बालविवाहांचें शेकडा प्रमाण ... | ३६ |
| ४.४ | किमान एक विवाह झालेल्या स्त्रियांशी किमान एक वैधव्य आलेल्या स्त्रियांचें प्रमाण ... | ३८ |
| ४.५ | किमान एकदा विधवा झालेल्यांमध्ये पुर्नविवाहितांची शेकडेवारी ... | ३९ |
| ४.६ | वेगवेगळ्या जातींतील किमान एकदा विधवा झालेल्या स्त्रियांमध्ये पुर्नविवाहितांची शेकडेवारी ... | ४१ |
| ४.७ | सर्व विवाहित व पुर्नविवाहित स्त्रियांमध्ये घटस्फोट घेतलेल्या, विभक्त झालेल्या वगैरे स्त्रियांची शेकडेवारी ... | ४२ |
| ४.८ | वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण ... | ४३ |
| ४.९ | किमान एकदा लग्न झालेल्या पुरुषांमध्ये किमान एकदा विधुर झालेल्यांचें शेकड्यांत प्रमाण ... | ४५ |
| ४.१० | किमान एकदा विधुर झालेल्यांमध्ये पुर्नविवाहित पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण ... | ४६ |
| ४.११ | विवाहित व पुर्नविवाहित पुरुषांमध्ये घटस्फोटित व विभक्त झालेल्या पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण ... | ४७ |

## तक्त्यांची सूचि

तक्ता क्रमांक

४.१२ एकूण विवाहित पुरुषांमध्ये द्विपत्नीक पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण ..
४.१३ सांगितलेल्या कारणानुसार द्विपत्नीकांचें विभाजन ..
४.१४ जातीप्रमाणे द्विपत्नीकांचें विभाजन ..
४.१५ दांपत्याच्या वयांतील अंतराप्रमाणे किमान एकदा विवाहित स्त्रियांच्या शेकडेवारीची वेगवेगळ्या वय-गटांत विभागणी ..
४.१६ दांपत्याच्या वयांमध्ये १५ किंवा अधिक वर्षांचें अंतर असलेल्या स्त्रियांचें प्रमाण ..
५.१ खास पाहणींत समाविष्ट झालेल्या विवाहितांची संख्या ..
५.२ वधूवरांच्या खेड्यांतील अंतराप्रमाणे विवाहांचें विभाजन ..
५.३ वधूवरांमधील पूर्वीचा आप्तसंबंध व वधूवरांची जात याप्रमाणे केलेलें विवाहांचें विभाजन ..
५.४ वधूपक्षाकडून विवाहाची सूचना आलेल्या विवाहांचें शेकडा प्रमाण ..
५.५ वरासाठी किंवा वधूसाठी हुंडा दिलेल्या विवाहांचें प्रमाण व दिलेला सरासरी हुंडा ...
५.६ वेगवेगळ्या खेड्यांत विवाहांवर होणारा सरासरी खर्च ..
५.७ कर्ज काढून केलेल्या विवाहांचें प्रमाण ...
६.१ मासिक पाळीच्या प्रारंभाच्या वयाप्रमाणे स्त्रियांची विभागणी ...
६.२ प्रत्येक वय-गटांतील मासिक पाळी संपलेल्या स्त्रियांचें प्रमाण ...
६.३ प्रसूतीनंतरची मासिक पाळी तात्पुरती थांबण्याच्या काळाप्रमाणे स्त्रियांची विभागणी ...
६.४ नियमित व अनियमित मासिक पाळी असणाऱ्या स्त्रियांची शेकडेवारी ...
६.५ लग्नाला ठराविक वर्षें झालेल्या स्त्रियांमध्ये मूल नसणाऱ्यांचें प्रमाण ...
७.१ पाहणींत नोंदलेल्या जन्मसंख्या व पाहणीबाहेरच्या खेड्यांतील जन्मसंख्या ...
७.२ खेड्यांत झालेल्या जन्मांपैकीं खेड्याच्या नोंदवहींत न नोंदलेल्या जन्मांचें प्रमाण ...
७.३ पाहणीच्या सहा केंद्रांतील प्रत्येकीं हजार विवाहित स्त्रियांच्या जननक्षमतेचे दर ...
७.४ वेगवेगळ्या वयाच्या प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे जननक्षमतेचे वैवाहिक स्थितीनिरपेक्ष दर ...
७.५ सहा केंद्रांमधील एकूण ठोक जननक्षमतेचे दर ...
७.६ निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण आणि स्त्रियांच्या पिढीचें वयोमान ...
७.७ निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण आणि पुरुषांच्या पिढीचें वयोमान ...
८.१ लग्नाच्या वेळच्या वयाचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम ...
८.२ नवराबायकोच्या वयांतील अंतराचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम
८.३ पाहणीपूर्वीच्या काळांतील एकूण जन्मसंख्येचा वैवाहिक जननक्षमतेवर झालेला परिणाम ...
८.४ कुटुंबाच्या उत्पन्नाचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम ...
८.५ जातीचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम ...

| तक्ता क्रमांक | | पान |
|---|---|---|
| ८.६ | मिठबाव येथील पुरुषांच्या स्थलान्तराचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम | ... ७८ |
| ९.१ | विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर (प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे) | ... ८० |
| ९.२ | (१) विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व (२) झालेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना (प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे) | ८१ – ८२ |
| ९.३ | वेगवेगळया वय-गटांतील स्त्रियांना झालेल्या मुलांपैकीं मृत मुलांचें शेकडयांत प्रमाण | ... ८९ |
| १०.१ | कुटुंबनियोजन पाहणीसाठी निवडलेल्या स्त्रियांची संख्या व प्रत्यक्ष भेटी दिल्या गेलेल्या स्त्रियांची संख्या | ... ९२ |
| १०.२ | गेल्या प्रसूतीच्या वेळीं व नंतरच्या बाळंतपणाच्या दिवसांत मदत करणाऱ्यांच्या नात्याप्रमाणे स्त्रियांची विभागणी | ... ९३ |
| १०.३ | गेल्या प्रसूतीवरील खर्चाप्रमाणे स्त्रियांची विभागणी | ... ९३ |
| १०.४ | वेगवेगळ्या गटांतील स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ... ९४ |
| १०.५ | एकूण झालेल्या मुलांप्रमाणे स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ... ९४ |
| १०.६ | जिवंत असणाऱ्या मुलग्यांप्रमाणे स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ... ९५ |
| १०.७ | वेगवेगळया जातींतील स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ... ९५ |
| १०.८ | नवऱ्याच्या शैक्षणिक दर्जाप्रमाणे स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ... ९५ |
| १०.९ | संततिप्रतिबंधाला अनुकूल स्त्रियांची त्यांच्या उत्सुकतेप्रमाणे विभागणी | ... ९६ |
| १०.१० | स्त्रियांच्या संततिप्रतिबंधाच्या पद्धतीच्या निवडीप्रमाणे विभागणी | ... १०१ |
| १०.११ | संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यास तयार असलेल्या पुरुषांचें त्यांच्या वयाप्रमाणे व त्यांच्या बायकांच्या वयाप्रमाणे विभाजन | ... १०३ |
| १०.१२ | संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार असलेल्यांची (१) एकूण झालेलीं मुलें, (२) जिवंत मुलें व (३) जिवंत मुलग्यांची संख्या यांच्याप्रमाणे विभागणी | ... १०३ |
| १०.१३ | संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेस तयार असलेल्यांची जातीप्रमाणे विभागणी | ... १०४ |
| १०.१४ | संततिप्रतिबंध नापसंत असणाऱ्या स्त्रियांची, नापसंतीच्या कारणाप्रमाणे विभागणी | ... १०४ |
| १०.१५ | जास्त मुलें हवीं असल्यामुळे संततिप्रतिबंध नापसंत असणाऱ्या स्त्रियांची (१) झालेलीं मुलें (२) जिवंत मुलगे यांच्याप्रमाणे विभागणी | ... १०५ |
| ११.१ | पाहणीच्या वर्षांतील जन्मांपैकी मृत्यूंची संख्या आणि दर हजार जन्मांमागे मृत्यूचें प्रमाण | ... १०९ |
| ११.२ | पाहणीच्या वर्षांत जन्मलेल्या दर हजार मुलांतील मृत्युसंख्येची आईच्या वयाप्रमाणे विभागणी | ... ११० |
| ११.३ | १ वर्षापर्यंतच्या मुलांची वजनाप्रमाणे विभागणी | ... १११ |
| ११.४ | प्रत्येक केंद्रांतील दर १०० मुलांमागे मुलगे व मुली यांच्या दुखण्यांची संख्या | ... ११२ |
| ११.५ | दुखण्यांच्या प्रकाराप्रमाणे मुलगे व मुली यांची विभागणी | ... ११३ |
| ११.६ | प्रत्येकी १०० प्रौढ स्त्रीपुरुषांमागे आजाऱ्यांचें प्रमाण | ... ११४ |
| ११.७ | आजारांच्या प्रकाराप्रमाणे प्रौढ स्त्रीपुरुषांची विभागणी | ... ११५ |

तक्ता क्रमांक


११.८ ताप आलेल्या प्रौढांची तापाच्या कालावधीप्रमाणे विभागणी ..
११.९ तापाच्या उद्‌भवाची ऋतूप्रमाणे विभागणी ..
११.१० पचनक्रियेच्या आजारांची ऋतूप्रमाणे विभागणी ..
११.११ दमेकरी स्त्रीपुरुषांची वयाप्रमाणे विभागणी ..
११.१२ आजारामुळे वाया गेलेल्या कामाच्या दिवसांची संख्या ..
११.१३ एकूण पंगूंची संख्या व जन्मापासून पंगु असलेल्या प्रौढ स्त्रीपुरुषांची संख्या ..
११.१४ पंगुत्वाच्या प्रकाराप्रमाणे प्रौढांची व अप्रौढांची विभागणी ..
११.१५ पाहणी केलेल्या केंद्रांत दृष्टि जाण्याचीं दिलेलीं कारणें ..
११.१६ सहा केंद्रांतील प्रौढ बहिऱ्यांची वयाप्रमाणे विभागणी ..
११.१७ दुखण्यांवर केलेल्या उपायांप्रमाणे प्रौढ स्त्रीपुरुषांचें शेकडेवारींत विभाजन ..
११.१८ दुखण्यांच्या उपायांवरील खर्चाप्रमाणे आजारी प्रौढ स्त्री-पुरुषांची शेकडेवारींत विभागणी ..
११.१९ आजार निवारण्यासाठी झालेल्या खर्चाप्रमाणे आजारी मुलगे व मुली यांची शेकडेवारींत विभागणी ..
१२.१ आहाराच्या पाहणीसाठी निवडलेल्या कुटुंबांची संख्या व पाहणी करूं दिलेल्या कुटुंबांची संख्या ..
१२.२ दर प्रौढामागे वेगवेगळे खाद्यपदार्थ वापरण्याचें औंसांमध्ये प्रमाण ..
१२.३ प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत आलेल्या एकूण धान्याप्रमाणे पाहणींतील कुटुंबांची विभागणी ..
१२.४ पाहणी केलेल्या केंद्रांतील मांसाहारी म्हणविणाऱ्या कुटुंबांची शेकडेवारी ..
१२.५ मिठबावखेरीज पाहणी केलेल्या इतर केंद्रांतील भाज्या खाणारीं व मांसाहार करणारीं कुटुंबें ..
१२.६ पाहणी केलेल्या केंद्रांत प्रत्येक कुटुंबामागे दूध वापरण्याचें प्रमाण ..
१२.७ पाहणी केलेल्या क्षेत्रांतील पिण्यासाठी किंवा चहासाठीं दूध वापरणारीं कुटुंबें
१२.८ पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक कुटुंबामागे तूप, लोणी व वनस्पति तूप वापरण्याचें प्रमाण ..
१२.९ पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक कुटुंबामागे गोडें तेल वापरण्याचें प्रमाण ..
१२.१० पाहणी केलेल्या कुटुंबांतील प्रत्येक कुटुंबामागे साखर वापरण्याचें प्रमाण ...
१२.११ पाहणी केलेल्या केंद्रांत कुटुंबामागे खाण्यांत येणारीं अंडीं व कोंबड्या ...
१२.१२ विविध खाद्य पदार्थांमधील कॅलरी व प्रोटीन यांचें प्रमाण ...
१२.१३ पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत येणाऱ्या विविध पदार्थांची कॅलरींत किंमत ...
१२.१४ पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक प्रौढामागे प्रोटीनचें प्रमाण ...

११७
११८
११९
१२०
१२२
१२३
१२४
१२६
१२७
१२९
१३०
१३१
१३४
१३५
१३७
१३७
१३८
१३९
१४०
१४०
१४१
१४२
१४२
१४३
१४४
१४४


# १

# प्रास्ताविक

भारत सरकारच्या राष्ट्रीय संयोजन समितीच्या (प्लॅनिंग कमिशनच्या) कुटुंब-नियोजन-संशोधन समितीची लोकसंख्या-अभ्यास उपसमिति आहे. तिच्या २३ व २४ मे १९५४ रोजीं भरलेल्या बैठकींत लोकसंख्येसंबंधी संशोधन करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा योजना मागविण्या-संबंधीचा निर्णय घेण्यांत आला. या निर्णयानुसार या संस्थेच्या लोकसंख्याविषयक विभागानें पाहणी करण्याची एक योजना वरील उपसमितीला सादर केली. या योजनेप्रमाणे पुढील उद्दिष्टें डोळ्यांसमोर ठेवलीं होतीं :

(१) नमुना म्हणून घेतलेल्या कांहीं ग्रामीण क्षेत्रांपुरते जननसंख्येचे व शक्य तर मृत्युसंख्येचे दर मोजतां येण्यासाठी आवश्यक व आधारभूत अशी लोकसंख्येविषयी माहिती गोळा करणें, (२) या दरांवर निर्णायक परिणाम करणाऱ्या कांहीं सामाजिक व आर्थिक बाबी असतील तर त्यांच्याविषयी माहिती मिळविणें आणि (३) कुटुंबनियोजनाबाबत लोकांचें एकंदर मत अजमाविणें आणि संततिप्रतिबंधाच्या वेगवेगळ्या पद्धति व साधनें यांच्या स्वीकाराबाबत व उपयुक्ततेसंबंधी लोकांची मतें अजमाविण्यास अनुकूल परिस्थिति दिसेल तेथें तीं मतें अजमाविणें. मुंबई राज्यांतील चार जिल्ह्यांतून व हैद्राबाद राज्यांतील दोन जिल्ह्यांतून असे एकंदर सहा ग्रामीण परिसर निवडून तेथे ही पाहणी करावी, असें योजनेमध्ये सुचविलें होतें.

या पाहणीसाठी निवडण्यांत आलेले जिल्हे म्हणजे भाषावार प्रांतरचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांतील पश्चिम खानदेश, अहमदनगर, रत्नागिरी, आणि बेळगांव हे जिल्हे आणि जुन्या हैद्राबाद राज्यांतील परभणी व गुलबर्गा हे जिल्हे आहेत. या सहा जिल्ह्यांपैकी पश्चिम खानदेश, अहमदनगर, रत्नागिरी व परभणी हे जिल्हे पुनर्रचित अशा मुंबई राज्यांत समाविष्ट झाले आणि बेळगांव व गुलबर्गा हे जिल्हे पुनर्रचित अशा म्हैसूर राज्यांत समाविष्ट झाले. लोकसंख्येच्या संकल्पित पाहणीसाठी या प्रत्येक जिल्ह्यांत एक मोठें मध्यवर्ती खेडें व आसपासचीं लहान खेडीं यांचें ग्रामीण केंद्र निवडण्यांत आलें होतें. या संस्थेच्या कृषि-अर्थशास्त्रीय विभागातर्फे ज्या ग्रामीण परिसरांत त्या वर्षी पाहणी चालू होती, तीच खेडीं या पाहणीसाठी नियुक्त केलीं होतीं. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या भिन्न अशा लोकसमूहांचे नमुने पाहणींत समाविष्ट व्हावेत या हेतूनें हे ग्रामीण परिसर कृषि-अर्थशास्त्रीय विभागातर्फे निवडण्यांत आले होते. जनसांख्यिकीय दृष्टीनें करावयाच्या संकल्पित पाहणीसाठीहि तेच योग्य होते. शिवाय असें ठरविल्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि जनसांख्यिकीय अशा या दोन पाहणींचीं कार्यें परस्परांना पूरक पद्धतीनें करणेंहि शक्य झालें. तक्ता क्रमांक १·१ मध्ये या पाहणींत कोणकोणतीं केंद्रें समाविष्ट केलीं आहेत त्यांचीं नांवें व त्यांच्या-बद्दलचा तपशील दिला आहे. या सहा केंद्रांत एकूण २६ खेडीं व एकूण ३७,९३५ माणसें यांचा समावेश झाला आहे हें दिसून येईल. प्रत्येक परिसरांत १२०० ते १५०० कुटुंबांची पाहणी केली

तक्ता क्रमांक १·१

पाहणीसाठी निवडलेल्या केंद्रांसंबंधीचा तपशील

| जिल्हा | खेड्याचें नांव | कुटुंबांची संख्या | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | पुरुष | स्त्रिया |
| परभणी | १ बोरी | ७१० | ३३९७ | १६८७ | १७१० |
| | २ धानोरा | ९१ | ३८३ | २०४ | १७९ |
| | ३ नागापूर | २७ | १०६ | ५३ | ५३ |
| | ४ देवगांव | ७० | २९४ | १४३ | १५१ |
| | ५ मुढा | ६७ | ३०९ | १५५ | १५४ |
| | ६ नागठाणा | २१ | १२४ | ५८ | ६६ |
| | ७ गणपूर | ३४ | १५० | ७० | ८० |
| | ८ दोहारा | ११४ | ५६३ | ३०० | २६३ |
| | ९ चांदज | १५१ | ७४६ | ३८८ | ३५८ |
| | एकूण | १२८५ | ६०७२ | ३०५८ | ३०१४ |
| पश्चिम खानदेश | १ धानोरें | ६९० | ३९६३ | १९५० | २०१३ |
| | २ मंगरूळ | ५० | २८१ | १४१ | १४० |
| | ३ करंजी | ४४ | २४७ | १४२ | १०५ |
| | ४ लखमीखेडें | १११ | ६४४ | ३०६ | ३३८ |
| | ५ खोडाडें | १३३ | ७७९ | ३८५ | ३९४ |
| | ६ आर्दितारा | ८६ | ४७१ | २३२ | २३९ |
| | ७ बोराडें | १०६ | ५९२ | ३०२ | २९० |
| | ८ अडावें | ९७ | ५४२ | २८१ | २६१ |
| | एकूण | १३१७ | ७५१९ | ३७३९ | ३७८० |
| अहमदनगर | १ मिरजगांव | ८०६ | ४४६७ | २२१८ | २२४९ |
| | २ गोंदारडी | २३ | १२८ | ६७ | ६१ |
| | ३ डिकसळ | ८६ | ५४३ | २८३ | २६० |
| | ४ गुरवपिंपरी | २९७ | १५५५ | ७९२ | ७६३ |
| | एकूण | १२१२ | ६६९३ | ३३६० | ३३३३ |
| रत्नागिरी | १ मिठबाव | ११३० | ५१४० | २२४३ | २८९७ |
| बेळगांव | १ मुदलगी | ८४० | ४५३० | २२५६ | २२७४ |
| गुलबर्गा | १ नालवार | १३२१ | ६३६३ | ३११२ | ३२५१ |
| | २ सुगुरी | २४९ | १०९६ | ५४३ | ५५३ |
| | ३ कालकंडा | १०९ | ५२२ | २४६ | २७६ |
| | एकूण | १६७९ | ७९८१ | ३९०१ | ४०८० |
| एकूण | | ७४६३ | ३७९३५ | १८५५७ | १९३७८ |

जावी अशी योजना केली होती. त्यासाठी मोठ्या मध्यवर्ती खेड्यांना भोवतालच्या लहान खेड्यांची जोड देण्यांत आली होती. रत्नागिरी जिल्ह्यांतील मध्यवर्ती खेडें हें पाहणीच्या दृष्टीनें पुरेसें मोठें होतें, म्हणून त्याला लहान खेड्यांची जोड देण्याची गरज नव्हती. बेळगांव जिल्ह्यांतील पाहणी करणाऱ्या अन्वेषिकेला प्रकृतीच्या कारणासाठी पाहणी चालू असतांच रजा द्यावी लागली. त्यामुळे तेथील पाहणी मध्यवर्ती खेड्यापुरतीच मर्यादित करून आसपासचीं खेडीं वगळावीं लागलीं.

ही पाहणी करण्याचें काम, मुद्दाम या कामासाठी नेमलेल्या अन्वेषिकांनी केले. त्या सर्व प्रशिक्षित परिचारिका (ट्रेण्ड नर्सेस) किंवा आरोग्य प्रचारिका (हेल्थ व्हिजिटर्स) होत्या.

पाहणी करण्याच्या पद्धति व पाहणी करतांना उपयोगांत आणावयाचें विशिष्ट तंत्र, यांचें एक महिन्याचें प्रशिक्षण या कार्यकर्त्यांना देण्यांत आलें. त्याचप्रमाणे पुणें महानगरपालिकेच्या कुटुंबनियोजन केंद्रांतून दोन आठवड्यांचें प्रशिक्षणहि त्यांना देण्यांत आलें. पाहणीच्या वर्षाच्या जवळ जवळ पूर्ण काळांत या कार्यकर्त्या-अन्वेषिका आपापल्या केंद्राच्या मध्यवर्ती खेड्यांतच राहिल्या. कृषि-अर्थशास्त्रीय विभागाने निवडलेलीं केंद्रेंच याहि पाहणीसाठी निवडण्याचें एक कारण असेंहि होतें की, त्या प्रत्येक केंद्रांत त्या विभागाचा एक कार्यकर्ता वर्षभर राहतच होता. अन्वेषिकांच्या सुरक्षिततेच्या व सोयीच्याहि दृष्टीने ही योजना फार उपयुक्त ठरली. या अन्वेषिकांना प्रत्येक केंद्रांत त्या ठिकाणचे सहायकहि मदतीसाठी देण्यांत आले. हे सहायक मराठी सात इयत्ता पास झालेले उत्साही तरुण होते. खेड्यांतील लोकांच्या ओळखी करून घेतांना, घरोघर भेटी देतांना अन्वेषिकांबरोबर जाणें आणि शेजारच्या खेड्यांत जातांना त्यांना सोबत करणें या कामांत या सहायकांची मदत झाली. त्याचप्रमाणे छापील प्रश्नावलींतील पुरुषांनी भरावयाचा तपशील भरून देण्याच्या कामीं या सहायकांची विशेष मदत झाली.

ही पाहणी सामान्यत: दोन अवस्थांत विभागली होती. पहिल्या अवस्थेंत सर्वसामान्य माहिती गोळा करण्यासाठी तयार केलेली कुटुंब-प्रश्नावलि (जनरल फॅमिली शेडयूल) मध्यवर्ती खेड्यांतील व भोवतालच्या कांही खेड्यांतील प्रत्येक कुटुंबाकडून भरून घेण्यांत आली. कुटुंबांतील व्यक्तींची संख्या, प्रत्येकाचें वय, शिक्षण, वैवाहिक स्थिति, आर्थिक स्थिति, व्यवसाय व कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीची मिळकत इत्यादींबद्दल सर्व तपशील यांत भरून घेण्यांत आला. त्याचप्रमाणे एका वर्षाच्या काळांत कुटुंबांत झालेले आजार व इतर कांही आपत्ति यांच्यासंबंधीची सर्व माहिती भरून घेण्यांत आली. या प्रकरणाच्या शेवटीं ही संपूर्ण प्रश्नावलि देण्यांत आली आहे.

हा सामान्य-माहितीचा कुटुंब तक्ता भरून घेतांना पाहणीसाठी लागणारी आवश्यक ती सर्व-सामान्य माहिती ज्याप्रमाणे मिळाली, त्याचप्रमाणे या निमित्तानें सगळ्या कुटुंबांशी चांगल्या ओळखी होण्यास मदत झाली. एवढ्या कामाला सहा महिने लागले. अन्वेषिका या प्रशिक्षित परिचारिका असल्यामुळे या काळांत त्यांना भोवतालच्या खेड्यांतून बाळंतपणाचीं कामें घेण्यास परवानगी देण्यांत आली. किंबहुना, तसें करण्यास त्यांना उत्तेजनहि देण्यांत आलें. यामुळे परिसरांतील लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित होण्यास मदतच झाली. तसेंच पाहणी-कार्याच्या पुढील अवस्थेंत जी अधिक तपशीलवार माहिती गोळा करावयाची होती, ती गोळा करणें अन्वेषिकांना यामुळे अधिक सुलभ झालें. परंतु आसपासच्या खेड्यांतील कुटुंबांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी लागलेल्या वेळामुळे पाहणीच्या दुसऱ्या अवस्थेंत जी माहिती गोळा करावयाची होती, तिचें क्षेत्र मध्यवर्ती खेड्यापुरतेंच मर्यादित करण्यांत आलें. पाहणीच्या या दुसऱ्या अवस्थेंत तीन स्वतंत्र प्रश्नांसंबंधीच्या माहितीचा समावेश करण्यांत आला होता. पहिला प्रश्न विवाह-संस्थेसंबंधीचा होता. लग्नें कशा पद्धतीनें जुळविलीं जातात, लग्नासाठी कोणकोणता खर्च केला जातो आणि लग्नाचें वय कोणतें असावें यासंबंधी कोणतीं

वेगवेगळीं मतें आहेत, या सर्व तपशिलाचा समावेश या पहिल्या प्रश्नांत केला होता. पाहणीपूर्वीच्या तीन वर्षांत जीं जीं लग्नें झाल्याची माहिती होती, त्या लग्नांपुरतीच ही माहिती मर्यादित करण्यांत आली होती. एकूण ४५९ लग्नांसंबंधीची वरील स्वरूपाची माहिती गोळा करण्यांत आली आहे. पाहणीच्या दुसऱ्या प्रश्नांत कुटुंबाची मर्यादा व कुटुंबनियोजन यांच्यासंबंधीचीं मतें व वृत्ति यांचा समावेश करण्यांत आला होता. गेल्या पांच वर्षांत निदान एका तरी गरोदरपणाचा अनुभव ज्यांनी घेतला होता, अशा २५ ते ४० वर्षें वयाच्या विवाहित स्त्रियांपुरतीच ही पाहणी मर्यादित केली होती. ही पाहणी एक वगळून इतर सर्व ग्रामकेंद्रांत करण्यांत आली होती. यापूर्वीच निवेदन केल्याप्रमाणें बेळगांव जिल्ह्यांतील मुदलगी या ग्रामकेंद्रांत जी अन्वेषिका नियुक्त केली होती, तिला वैद्यकीय कारणांसाठी रजा घ्यावी लागली होती व त्यामुळे या केंद्रांतील पाहणीचें काम पुष्कळच संकुचित करावें लागलें होतें. उरलेल्या पांच केंद्रांत ६३४ स्त्रियांबद्दल कुटुंब-नियोजन प्रश्नावलींतील माहिती मिळवितां आली. आहाराबद्दलची वेगळी अशी तिसरी पाहणी ३७३ कुटुंबांची करण्यांत आली. या प्रकरणाच्या शेवटीं जीं परिशिष्टें जोडलीं आहेत, त्यांत या तीन पाहणींसाठी उपयोगांत आणलेल्या प्रश्नावलि दिल्या आहेत. तसेंच या विशिष्ट पाहणींच्या अनुषंगाने जी अधिक माहिती मिळवितां आली, ती त्या त्या प्रकरणांत नमूद केली आहे.

प्रत्येक केंद्रांतील पाहणीसाठी एक संपूर्ण वर्ष लागलें. एकाच भेटींत अवश्य ती माहिती न मिळाल्यामुळे किंवा अपुरी माहिती मिळाल्यामुळे प्रत्येक कुटुंबाला एकापेक्षा अधिक भेटी द्याव्या लागल्या. विशेषत: कुटुंबनियोजनाबद्दलचे दृष्टिकोन व वृत्ति यासंबंधीच्या प्रश्नावलींतील आणि आहारासंबंधीच्या प्रश्नावलींतील उत्तरें मिळविण्यासाठी अधिक वेळां भेटी द्याव्या लागल्या. एकंदरींत लोकांकडून उत्तरें काढण्याचें काम कुशलपणाने व लोकांचीं मनें वळवून केलें गेलें. आणि मिळालेलीं उत्तरें साधारणत: मनापासून दिलीं गेलेलीं आणि विश्वसनीय अशीं आहेत असेंहि म्हणतां येईल. प्रश्नावलींच्या तक्त्यांना अन्वेषिकांनी ज्या विस्तृत टीपा जोडल्या आहेत त्यांच्यावरून हें अनुमान साधार आहे असें म्हणतां येतें. पाहणी करतांना अन्वेषिकांना आलेले अनुभव, त्यांना मिळणाऱ्या उत्तरांचें स्वरूप, आणि कुटुंबांना भेटी देत असतां कांही विशिष्ट गोष्टींसंबंधी त्यांचें बनलेलें मत या सर्वांचा समावेश या टीपांमध्यें झाला आहे. या टीपांमधील मुद्दे सारांशरूपाने एका पुढील प्रकरणांत दिले आहेत.

या पाहणींतून निघालेले प्रमुख निष्कर्ष पुढील प्रकरणांतून देण्यांत येतील.

परिशिष्ट

# कुटुंबाची सामान्य प्रश्नावलि

| | | |
|---|---|---|
| गांव | कुटुंबप्रमुखाचें नांव | |
| तालुका | पु./स्त्री–वय | अनुक्रमांक |
| जिल्हा | धर्म | तारीख |
| राज्य | जात | अन्वेषिका |
| मुख्य धंदा | दुय्यम धंदा | |

**कुटुंबांतील मंडळी—**

(अ) १३ वर्षें व त्यावरील वयाचे पुरुष– (अि) १३ वर्षांखालील मुलगे–
(आ) १३ वर्षें व त्यावरील वयाच्या स्त्रिया– (अी) १३ वर्षांखालील मुली–

**कुटुंबांतील सर्व मुलगे व पुरुष यांच्यासाठी**

१ नांव
२ वय
३ कुटुंबप्रमुखाशी नातें

**शिक्षण—**

४ वाचतां येतें कां ?
५ लिहितां येतें कां ?
शाळेंत जात असल्यास—
६ कोणत्या इयत्तेंत शिकत आहे ?
७ किती वर्षें शाळेंत जात आहे ?
शाळेचें शिक्षण सोडलें असल्यास—
८ शिक्षण किती इयत्तांपर्यंत झालें आहे ?
९ लिहिण्या-वाचण्याचा सराव आहे का ?
१० कोणत्या निमित्तानें ?
(दररोजचीं वर्तमानपत्रें, पत्र लिहिणें, वाचणें, इ.)
निरक्षर असल्यास—
११ किती आंकडे ओळीनें मोजतां येतात ?
१२ घडयाळ समजतें काय ?
१३ आजची तारीख, तिथि, वार कोणता ?

**उद्योग—**

१४ मिळविता अगर न मिळविता
१५ मिळविता असल्यास—
(अ) कुटुंबाचें धंद्यांत समाईक काम असल्यास समाईक धंद्याचें नांव
(आ) स्वतंत्र धंदा असल्यास, कोणता ? त्याचें वार्षिक उत्पन्न काय ?
१६ न मिळविता असल्यास—कारण ?
१७ गेले वर्षभर गांवीं होतां काय ?
१८ नसल्यास, कोठे गेला होतां ?
१९ केव्हां ?
२० काय निमित्तानें ?
२१ किती दिवस ?

**परगांवाशी संबंध—**

२२ गेल्या वर्षीं तालुक्याचे ठिकाणीं किती वेळां गेलांत ?
२३ काय निमित्तानें ?
२४ गेल्या वर्षीं जिल्ह्याचे ठिकाणीं किती वेळां गेलांत ?
२५ काय निमित्तानें ?
२६ आजपर्यंत मोठीं शहरें कोणतीं पाहिलीं आहेत ?
२७ काय निमित्तानें ?

**वैवाहिक स्थिति—**

२८ विवाहित, अविवाहित की, विधुर ?
२९ चालू लग्न प्रथम, द्वितीय किंवा कितवें ?
३० द्वितीय किंवा पुढील लग्नाचें कारण
३१ लग्नाच्या (पुनर्विवाहाच्या धरून) हयात बायका किती ?
३२ प्रथम लग्नाच्या वेळचें वय
३३ चालू लग्नाच्या वेळचें वय
३४ बायकोचें नांव
३५ बायकोचें वय

३६ मुलाचे आई/बाप व मुलीचे आई/बाप यांचें या लग्नापूर्वीचें नातें
३७ बायको आज कुटुंबांत आहे कां ?
३८ नसल्यास कोठे आहे ?
३९ कोणत्या कारणाने ?
४० तिकडे जाऊन किती दिवस झाले ?
विधुर असल्यास—
४१ वयाचे कोणते वर्षी विधुर झालां ?
४२ त्यावेळीं बायकोचें वय
४३ पुन्हा लग्न कां केलें नाही ?
अविवाहित असल्यास—
४४ लग्नाचा बेत आहे कां ?
**आरोग्य--**
४५ गेल्या वर्षांत केव्हां आजारी होतां कां ?
४६ असल्यास, दुखणें काय होतें ?
४७ दुखण्याने किती दिवस पडून होतां ?
४८ केव्हां (महिना देणें)
४९ औषध घेतलें असल्यास, कोणाचें ?
५० कोणत्या गांवचें ?
५१ खर्च किती आला ?
५२ घरगुती उपाय केले असल्यास, कोणते ?
५३ दमा, क्षय इ० कायमचें दुखणें आहे कां ?
५४ कोणतेंहि शारीरिक व्यंग आहे कां ?
५५ कोणतें ?
५६ अर्धवटपणा, वेडसरपणा असें कांही आहे कां ?
५७ वरील व्यंग जन्मतः किंवा नंतर झालेलें?
५८ नंतर झालेलें असल्यास, केव्हां ?
५९ कोणत्या कारणाने ?
६० त्यासाठी कांही उपाय केले कां ?
६१ कोणते ?
६२ खर्च काय आला ?

## कुटुंबांतील सर्व मुली व स्त्रिया यांच्यासाठी

१ ते २७—मुलगे व पुरुष यांच्याप्रमाणें
**वैवाहिक स्थिति—**
२८ विवाहित, अविवाहित की, विधवा ?
अविवाहित असल्यास—
२९ लग्न ठरलें आहे कां ?
३० ठरलें असल्यास मुलीच्या आई/बापाचे मुलाचे आई/बापाशी नातें
३१ ठरलें नसल्यास—लग्नाचा बेत आहे कां ?
३२ वर पाहतां कां ?
३३ किती दिवस वर पाहत आहांत ?
विवाहित असल्यास—
३४ चालू लग्न प्रथम, द्वितीय किंवा कितवें ?
३५ द्वितीय किंवा पुढील लग्नाचें कारण
३६ वैधव्यामुळें दुसरें लग्न झालें असल्यास वैधव्यांत गेलेला काल
३७ नवऱ्याने टाकल्यामुळे दुसरें लग्न केलें असल्यास त्या परिस्थितींत किती वर्ष गेलीं ?
३८ तुम्हीं नवऱ्यास सोडलें की नवऱ्याने तुम्हांस सोडलें ?
३९ काय कारणाने ?
४० प्रथम लग्नाचे वेळीं वय
४१ चालू लग्नाचे वेळीं वय
४२ मुलीच्या आई/बापाचें, मुलाचे आई/बापाशी या लग्नापूर्वीचें नातें
४३ नवऱ्याचें नांव
४४ नवऱ्याचें वय
४५ नवरा आज कुटुंबांत आहे कां ?
४६ नसल्यास कोठे आहे ?
४७ काय निमित्ताने ?
४८ किती दिवस झाले ?
४९ वर्षाचे किती दिवस तिकडे असतो ?
विधवा असल्यास—
५० वयाचे कोणत्या वर्षी विधवा झालांत ?
५१ नवरा-बायकोंतील वयाचें अंतर
५२ पुन्हां लग्न कां केलें नाही ?
५३ विधवा झाल्यावर उदरनिर्वाहाकरितां कोणावर अवलंबून आहांत ?
**आरोग्य—**
५४ पदर आला आहे कां ?

५५ असल्यास केव्हां ?
५६ विटाळ नियमित येतो कां ?
५७ किती दिवसांनी येतो ?
५८ त्यासंबंधी कांही तक्रारी आहेत कां ?
५९ असल्यास कोणत्या ?
६० ते ७७ मुलगे व पुरुष यांच्यासाठी ४५ ते ६२ मधील विचारलेली माहिती

## १३ वर्षांच्या व १३ वर्षांवरील सर्व मुली व स्त्रियांसाठी

विवाहित / विधवा स्त्रीचें नांव    वय    कुटुंबप्रमुखाशी नातें

प्रसूतींची संपूर्ण नोंद : ( प्रत्येक लग्नापासून झालेल्या मुलांची नोंद लग्नांच्या क्रमाने व मुलांच्या जन्माच्या क्रमाने करणें. )

**आजपर्यंत झालेल्या हयात व मयत मुलांमुलींसंबंधी :**

१ कोणत्या लग्नापासून ?
२ मुलाचें नांव
३ पुरुष-स्त्री
४ हयात अगर मयत
५ हयात असल्यास वय
६ वैवाहिक स्थिति
७ राहण्याचें ठिकाण
८ मयत असल्यास मृत्युसमयी वय
९ इतर

**गेल्या वर्षात जन्मलेल्या मुलांसंबंधी :**

१ मुलाच्या आईचें नांव
२ जन्मलेल्या मुलाचें नांव
३ मुलगा अगर मुलगी
४ जन्मठिकाण
५ जन्मतारीख
६ हयात आहे कां ?
७ हयात मुलाचें वय
८ हयात नसल्यास मृत्युसमयी वय
९ मृत्यूचें ठिकाण
आजारीपणानें मृत्यु आला असल्यास
१० औषधोपचार केला कां ?
११ औषध कोणाचें ?
१२ कोणत्या गांवचें ?
१३ खर्च काय आला ?
१४ घरगुती उपाय केले असल्यास कोणते ?

## गेल्या बारा महिन्यांतील कुटुंबातील मृत्यूंची नोंद

१ नांव
२ पुरुष-स्त्री
३ मृत्युसमयी वय
४ कुटुंबप्रमुखाशी नातें
५ मृत्यूची तारीख
६ मृत्यूचें ठिकाण
७ मृत्यूचें कारण
आजारीपणामुळे मृत्यु आला असल्यास—
८ आजार कोणता ?
९ किती दिवस आजारी होते ?
१० औषध कोणाचें घेतलें ?
११ कोणत्या गांवचें ?
१२ खर्च किती आला ?
१३ कांही घरगुती उपाय केले असल्यास कोणते ?

## कुटुंबनियोजनासंबंधीचे विचार अजमावण्यासाठी प्रश्नावलि

१ जिल्हा
२ तालुका
३ गांव
४ तारीख
५ कुटुंबप्रमुखाचें नांव
६ कुटुंबक्रमांक
७ स्त्रीचें नांव
८ संशोधकाचें नांव

### गेल्या पांच वर्षांत गरोदरपण आलेल्या २५ ते ४० वयाच्या स्त्रियांसाठी

९ तुमचें शेवटचें बाळंतपण (ज्यांत जिवंत मूल जन्मलें असेल) गेल्या पांच वर्षांत झालें काय ?
१० केव्हां झालें ?
११ झालें असल्यास मूल आज हयात आहे कां ?
१२ हयात असल्यास त्याचें वय
१३ हयात नसल्यास मृत्युसमयी वय
१४ मृत्यूचें कारण

**वरील खेपेच्या गरोदरपणासंबंधी—**

१५ गरोदरपणांत कांही त्रास झाला कां ? (अंगावर जाणें, सूज येणें इ०)
१६ कशा तऱ्हेचा ?
१७ केव्हां ? किती दिवस ?
१८ गरोदरपणांत खाणें-पिणें, औषधोपचार इ० विशेष काळजी घेतली कां ?
१९ कशा तऱ्हेची ?
२० गरोदरपणीं आधीचें मूल अंगावर पीत होतें कां ?
२१ गरोदरपणाच्या कितव्या महिन्यापर्यंत ?
२२ पिणाऱ्या मुलाचें त्यावेळचें वय

**बाळंतपणासंबंधी—**

२३ बाळंतपणाच्या पहिल्या दहा दिवसांत antiseptic म्हणून काय वापरलें ?
२४ केवळ बाळंतपणासाठी किती खर्च आला? (१) सुईण, (२) खाणेंपिणें, (३) औषधपाणी, (४) इतर
२५ बाळंतपणाच्या पहिल्या दहा दिवसांत घरांत दुसरें बाईमाणूस होतें कां ? नसल्यास स्वयंपाकपाणी कोणी केलें ?
२६ बाळंतपणांत अंगाला लावून घेतलें कां ? किती दिवस ?
२७ शेकशेगडी घेतली कां ?
२८ बाळंतपणाचे दहा दिवसांत रोज स्नान केलें कां ?
२९ केलें नसल्यास, केव्हां केलें ?
३० बाळंतपण येथेच झालें कां ?
३१ नसल्यास कोठे झालें ?
३२ कारण ?
३३ माहेरीं झालें असल्यास कारण ?
३४ ह्या बाळंतपणांत कांही त्रास झाला कां ?
३५ कशा तऱ्हेचा ?
३६ किती दिवस ?
३७ खालीं दिलेल्या कोणत्या कारणांनी त्रास झाला ?
(अ) अशक्तपणा, (आ) वरींच बाळंतपणें, (इ) कमी मुदतीचा पाळणा, (ई) कांही कायमचें दुखणें, (उ) दिवस गेल्यानंतरचें दुखणें, (ऊ) शारीरिक कष्ट, (ए) पौष्टिक अन्नाची कमतरता, (ऐ) इतर
३८ बाळंतपणानंतर किती दिवस अंगावर गेलें ?
३९ बाळंतपणांत खालीलपैकी कांही विशेष व्यवस्था केली होती कां ? (अ) विशेष तऱ्हेचें खाणें-पिणें, (आ) शक्तिवर्धक औषधें
४० मूल सर्वस्वी अंगावर किती दिवस पीत होतें ?
४१ अंगावरून तोडलें केव्हां ?
४२ दूध पुरेसें येण्याकरितां खाण्यापिण्यांत कांही बदल केला होता कां ?
४३ बाळंतपणानंतर बाहेरच्या केव्हां होऊं लागला ?
४४ ह्या बाळंतपणानंतर पुन्हा केव्हां दिवस गेले होते कां ?

४५ असल्यास, आज गरोदर आहांत कां ?
४६ गरोदर असल्यास, कितवा महिना ?
४७ आज गरोदर नसल्यास, मध्यंतरी दिवस गेले त्यासंबंधी हकीगत—[केव्हां, किती महिन्यांचे, कारण, इ०]
४८ त्यानंतर पाळी केव्हां येऊं लागली ?
४९ आज पाळी येते कां ?
५० मागील पाळी केव्हां आली होती ?
५१ पुढील पाळी केव्हां येईल अशी अपेक्षा आहे ?
५२ मागील पाळी होऊन एक महिन्यापेक्षा अधिक काळ गेला असल्यास, किंवा पुढील पाळी येईल तें सांगतां यत नसल्यास खालीलपैकी कोणत्या वर्गात ह्या बाई पडतात ? (अ) अडाणी-पणामुळे सांगतां येत नाही, (आ) पाळी अनियमित आहे, (इ) पाळी चुकल्याची शंका आहे
५३ पाळी अनियमित झाल्यास किंवा चुकल्यास ती पुन्हा येण्याकरितां कांही उपाय माहीत आहे कां ?
५४ हे उपाय कोणते ?
५५ मासिकपाळी व गरोदरपण यांचे परस्पर संबंध माहीत आहेत कां ? (नसल्यास माहिती देणें)
५६ मासिकचक्रांत कांही दिवसच गर्भ राहण्याची शक्यता असते व कांही दिवस शक्यता नसते हें लक्षांत आलें आहे कां ?
५७ मूल हवेसें वाटत असेल तर संबंध केव्हां येण्यास हवा ?
५८ मूल नको असल्यास कोणते दिवस टाळावयास हवे ?
५९ तुम्हांला आणखी मूल व्हावें असें वाटतें कां ?
६० वर दिलेले नियम तुम्हांला कितपत पाळतां येतील ?
६१ ह्या संबंधांत तुमच्या मालकाशी बोलूं कां ?

**विवाहपद्धतिविषयक पाहणी ( गेल्या तीन वर्षांत लग्न झालेल्या मुलींसाठी व स्त्रियांसाठी )**

अनुक्रमांक तारीख

गांव अन्वेषिका

कुटुंबप्रमुखाचें नांव विवाहित मुलीचें नांव

माहिती देणाराचें नांव

माहिती देणाऱ्याचें विवाहित मुलीशीं नातें : (अ) आजचें

(आ) लग्नापूर्वीचें

लग्नाची तारीख

१ मुलीचें आजचें वय

२ मुलीचें लग्नसमयी वय

३ नवऱ्याचें आजचें वय

४ नवऱ्याचें लग्नसमयी वय

५ मुलीचें माहेर कोठे ?

६ मुलगी त्याच गांवीं होती कां ?

७ मुला-मुलीचें गांवांतील अंतर

८ कोण कोणाला सांगून गेलें ?

९ कोणामार्फत सांगून गेले ?
१ आई, २ बाप, ३ भाऊ-भावजय,
४ इतर नात्याचे, ५ इतर ओळखीचे

१० कोणाच्या पसंतीने लग्न ठरलें ?

११ ह्यापूर्वी कोणी सांगून आले होते कां ?

१२ असल्यास, कितीजण ? त्यांची माहिती
शिक्षण
धंदा
उत्पन्न
राहण्याचें ठिकाण
नाकारण्याचीं कारणें

१३ हाच मुलगा पसंत कां केला ?
१ शिक्षण
२ धंदा
३ शेतवाडी
४ घरची स्थिति चांगली
५ चांगलें कुटुंब
६ मुलगा मिळवतो
७ पैसा जास्त दिला
८ इतर

१४ साखरपुडा केव्हां झाला ?

१५ लग्न किती दिवसानंतर झालें ?

१६ इतकें अंतर पडण्याचें कारण ?

१७ मुलाकडच्या–मुलीकडच्या बाजूस खर्चाची तरतूद करण्यास इतका वेळ लागला म्हणून कां ?

१८ लग्नाकरितां झालेला खर्च
कपडालत्त्यावर
दागदागिन्यांवर
भोजनावर
हुंड्यावर
इतर

१९ खर्चाची तरतूद कशी केली ?
कर्ज काढून
धान्य विकून
बैल-जनावरें विकून
जमीन किंवा इतर कांही विकून

२० कर्ज काढलें असल्यास
किती काढलें ?
कोणाकडून काढलें ?
तारण काय ठेवलें ?
गेल्या तीन वर्षांत त्यांतलें किती फिटलें ?

२१ आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल काय वाटतें ?
लहानपणीं झालें
योग्य वयाला झालें
मोठ्या वयाला झालें

२२ लहानपणीं झालें असल्यास कारण
चांगला जोड मिळाला
पैसा मिळाला
माहेरची गरीबी
सासरीं घरांत कामाला माणसाची जरुरी होती
इतर

२३ मोठ्या वयाला झालें असल्यास कारण
चांगला जोड मिळत नव्हता
लग्नाला जरूर असलेला पैसा नव्हता
माहेरीं कामाला माणूस हवें होतें
शारीरिक व्यंग
इतर

२४ योग्य वयाला लग्न झालें असल्यास मोठ्या वयाला लग्न होण्यांतल्या अडचणी अगर तोटे कोणते ?

## आहारविषयक पाहणी

अनुक्रमांक तारीख

गांव

कुटुंबप्रमुखाचें नांव

कुटुंब शाकाहारी की मांसाहारी ?

कुटुंबांतील एकूण माणसें : शाकाहारी :
मांसाहारी :

कांही विशिष्ट लोक मांसाहार करीत नसल्यास कोणकोण करीत नाहीत ? कां ?

मांसाहार वर्षांतून कांही दिवस वर्ज्य असतो कां ? केव्हां ?

### कांही खाद्यपदार्थांच्या वापरासंबंधी

| पदार्थ | रोजच्या खाण्यांत आहेत कां ? | | गेल्या आठवड्यांत खाल्लें असल्यास | | गेल्या महिन्यांत खाल्लें असल्यास | | गेल्या महिन्यांत खाल्लें नसल्यास गेल्या सबंध वर्षांत खाल्लें नाही कां ? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | किती | किंमत | किती | किंमत | किती | किंमत | खाल्लें असल्यास काय निमित्तानें ? |
| दूध | | | | | | | |
| तूप-लोणी | | | | | | | |
| तेल | | | | | | | |
| वनस्पति | | | | | | | |
| साखर | | | | | | | |
| गूळ | | | | | | | |
| फळें | | | | | | | |
| भाजीपाला | | | | | | | |
| अंडीं | | | | | | | |
| मटन-बशट | | | | | | | |
| सुकट | | | | | | | |
| कोंबडी | | | | | | | |
| मासे | | | | | | | |

रोज दूध किती खातां ?

विकत किती घेतां ? त्याचा खर्च

त्याचा विनियोग कसा करतां ?

(अ) पिण्याकरितां

(आ) चहासाठी

(इ) इतर

दूध पिणारांचीं नांवें व वयें

किती पितात ?

ऋतुमानाप्रमाणें जेवणांत होणाऱ्या बदलाविषयी

| तारीख | वार | तिथि |
|---|---|---|

( माप स्टॅन्डर्ड नसल्यास तशी नोंद करावी )

बाजरी
ज्वारी
नाचणी
गहूं
तांदूळ
डाळी
कडधान्यें
भाजीपाला
मटण-वशट
इतर

| माहिती दिल्याची तारीख | दुपारच्या जेवणांतल्या पदार्थांची यादी | रात्रीच्या जेवणांतल्या पदार्थांची यादी |
|---|---|---|
| रविवार | | |
| सोमवार | | |
| मंगळवार | | |
| बुधवार | | |
| गुरुवार | | |
| शुक्रवार | | |
| शनिवार | | |

टिपणें

# २

# निवडलेल्या खेड्यांवरील टिपणें

पाहणीसाठी जीं ग्रामकेंद्रें निवडण्यांत आलीं होतीं, त्यांचें थोडक्यांत वर्णन करणारीं टिपणें पुढें देत आहोंत :—

अहमदनगर जिल्ह्यांतून जें केंद्र निवडलें गेलें होतें, त्यांत मध्यवर्ती खेडें मिरजगांव आणि गोंदारडी, डिकसळ आणि गुरवपिंपरी हीं आसपासचीं खेडीं यांचा समावेश केला होता. मिरजगांव हें अहमदनगर-कर्माळा रस्त्यावर अहमदनगर या जिल्ह्याच्या शहरापासून ३२ मैलांवर वसलेलें खेडें आहे. कर्जत या तालुक्याच्या गांवापासून तें १० मैल दूर आहे. शेजारचीं तीन खेडीं मिरजगांवपासून ४ मैलांच्या आंत आहेत. क्रमांक २·१ या तक्त्यांत, या खेड्यांची १९४१ व १९५१ या खानेसुमारीच्या वेळची व आमच्या १९५५ सालच्या पाहणीच्या वेळची लोकसंख्या आणि १९५१ व १९५५ या सालांतील कुटुंबांची संख्या दिली आहे.

**तक्ता क्रमांक २·१**

**अहमदनगर जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील**

| खेड्याचें नांव | १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५५ सालीं पाहणीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ सालची कुटुंब संख्या | १९५५ सालची कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|
| मिरजगांव | ३४१५ | ४३४६ | ४४६७ | ७०३ | ८०६ |
| गोंदारडी | ९२ | १२० | १२८ | २० | २३ |
| डिकसळ | ४७६ | ५१२ | ५४३ | ८३ | ८६ |
| गुरवपिंपरी | १०९० | १२६३ | १५५५ | २१७ | २९७ |
| एकूण संख्या | ५०७३ | ६२४१ | ६६९३ | १०२३ | १२१२ |

मुंबई प्रांताच्या दक्षिणेस जो दुष्काळी व अवर्षणाचा असा विभाग आहे, त्यांत हें केंद्र वसलें आहे. या भागांत शेतीशिवाय मेंढ्या पाळण्याचा एक महत्त्वाचा उद्योग आहे. खुद्द मिरजगांवांत चामडीं कमावण्याचा व्यवसाय करणाऱ्या ढोर जातीच्या बऱ्याच लोकांची वस्ती आहे. आपल्या कामाच्या वाढीसाठी सहकारी संस्था काढून त्यांनी मोठ्या प्रमाणांत हा व्यवसाय चालविला आहे. या विभागांतील आमच्या पाहणीच्या वेळीं शेतीला पाणी पुरविण्यासाठी गुरवपिंपरी येथें एका लहान तलावाचें काम चालू होतें. आम्ही निवडलेल्या खेड्यांतील व आसपासच्या भागांतील बरींचशीं माणसें या कामावर लागलेलीं आढळलीं.

या खेड्यांतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा फारच अपुरा होता. सर्वसामान्य खेडेगांवांच्या तुलनेनेहि या खेड्यांतील, विशेषत: मिरजगांवांतील आरोग्यरक्षणाची व्यवस्था अतिशय असमाधानकारक आहे असें दिसून आलें. त्याच्यासारख्या मोठ्या खेड्यांत माणसांच्या मलमूत्र विसर्जनासाठी अधिक चांगली व्यवस्था असणें आवश्यक आहे. तसें कांही नसल्यामुळे रस्ते व पडकीं घरें यांचाच यासाठी वापर केला जात होता. तेथे मलेरिया बऱ्याच प्रमाणांत आहे असें ऐकलें होतें. पण आमच्या पाहणींत या समजाला कांही आधार असल्याचें आढळून आलें नाहीं. मिरजगांवांत महारोग्यांची बरीच वस्ती आढळली आणि मिरजगांवचा उल्लेख ' महारोग्यांचें मिरजगांव ' अशा शब्दांत तेथे केला जातो असें दिसलें. १८८४ सालच्या डिस्ट्रिक्ट गॅझेटियरमध्येहि या विषयीचा उल्लेख असलेला आढळून येतो. सुमारें १५ वर्षांपूर्वी एका वैद्यकीय समाजकार्यकर्त्याने महारोग्यांसाठी येथे एक चिकित्सा केंद्र सुरू केलें होतें; पण आपला रोग उघडकीस येईल या भीतीने महारोगी त्या केंद्रांत जाण्यास तयार होईनात, असें त्याला आढळून आलें. आमचें पाहणीकाम चालू असतांना या भागांत महारोगाचा प्रसार किती प्रमाणांत आहे, हें अजमावण्यासाठी, मिरजगांवच्या रहिवाशांची वैद्यकीय तपासणी करण्याची आम्ही व्यवस्था केली होती. तेथील रहिवाशांकडून या कामांत आम्हांला पूर्ण सहकार्य मिळालें. सर्व रहिवाशांच्या प्राथमिक वैद्यकीय तपासणीनंतर, संशयित लोकांची अधिक कसून तपासणी केली गेली. आणि या विशिष्ट वैद्यकीय शाखेंतील तज्ज्ञांकडून ही तपासणी करण्यांत आली. या तपासणींत असें आढळून आलें की, ४३४६ एवढ्या लोकसंख्येंत ३७ महारोगी होते. हें प्रमाण हजाराला नऊ असें पडतें. महारोगाचें बरेंच अधिक प्रमाण आपल्या खेड्यांत असावें, अशी तेथील रहिवाशांना शंका वाटत होती. त्यामुळे वैद्यकीय तपासणीच्या निकालानंतर आपलें खेडें समजलें जातें तेवढ्या मोठ्या प्रमाणांत महारोगपीडित नाही, हें कळून आल्यामुळे गांवकऱ्यांना समाधान वाटलें, असें दिसून आलें. मिरजगांवांत डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाच्या तर्फे एक मोफत दवाखाना व हॉस्पिटल चालविलेलें होतें. आणि तेथे महारोग्यांसाठी एक वेगळी खोलीहि होती. मिरजगांवांत दोन खासगी डॉक्टर होते; पण त्यांच्यापैकी खरा वैद्यकीय व्यवसाय करणारा एकच होता. दुसरा, देवतांचा कोप शमन करून रोग बरे करणारा मांत्रिक होता. खेड्यांत प्रशिक्षित सुईण नव्हती. अडल्या प्रसंगीं ३२ मैलांवर असलेल्या अहमदनगराकडेच लोकांना धांव घ्यावी लागत असे. त्या खेड्यांत काम करीत असतांना आमच्या अन्वेषिकेने आठ बाळंतपणें केलीं. त्यामुळे लोकांना फार कृतज्ञता वाटली. मूल न झालेल्या तीन स्त्रियांना वांझपणावर इलाज पाहिजे होता, तेव्हां योग्य त्या डॉक्टरांकडे त्यांना पाठविण्याचें कामहि अन्वेषिकेने केलें.

मिरजगांव हें एक महत्त्वाचें बाजाराचें केंद्र आहे. शेतमालाचा व्यापार करणारे बरेच व्यापारी तेथे आहेत. मिरजगांवांत तीन व गुरवपिंपरी येथे एक सहकारी पतपेढी आहे व दोन्ही खेड्यांत ग्रामपंचायती आहेत. मिरजगांवची पंचायत मोफत ग्रंथालय व वाचनालयहि चालविते. या पंचायतीने एक करमणूक केंद्रहि चालविलें आहे. तेथे रेडिओ व कांही वाद्येंहि ठेवलीं आहेत. या केंद्रांत शिकविण्याची सोयहि चांगली आहे. मिरजगांवला ५, गुरवपिंपरीला २ आणि डिकसळला एक प्राथमिक शाळा आहे. याशिवाय मिरजगांवला एक हायस्कूल व ५० विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृहहि आहे. आसपासच्या खेड्यांतील विद्यार्थ्यांना या सोयीमुळे हायस्कूलचा फायदा घेतां येतो. मिरजगांवला पोस्ट ऑफिस आहे. तसेंच तेथे नियमित जाणारी येणारी बसहि आहे.

पश्चिम खानदेशांतील ग्रामकेंद्रांत धानोरें हें मध्यवर्ती खेडें व आसपासचीं ७ खेडीं यांचा समावेश होता. धानोरें हें नंदुरबार-रायगड रस्त्यावर नंदुरबार या तालुक्याच्या गांवाहून व रेल्वे स्टेशनाहून १४ मैलांवर आहे. धानोऱ्यांत खुद्द धानोरें हें खेडें व २ मैलांच्या टापूंत असणारीं ७ लहान खेडीं, एवढ्यांचा समावेश होतो. निवडलेलीं इतर खेडीं हीं धानोऱ्यापासून ४ मैलांच्या

आंत आहेत. क्रमांक २·२ या तक्त्यांत या ग्रामकेंद्राची १९४१, १९५१ या खानेसुमारीच्या वर्षीची व १९५५ सालांतील आमच्या पाहणीच्या वेळची लोकसंख्या आणि १९५१ व १९५५ सालांतील कुटुंबांची संख्या दिली आहे.

तक्ता क्रमांक २·२

पश्चिम खानदेश जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील

| खेड्याचें नांव | १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५५ सालची पाहणीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ सालची कुटुंब संख्या | १९५५ सालची कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|
| धानोरें | ३१८५ | ३९३४ | ३९६३ | ११०२ | ६९० |
| मंगरूळ | १७७ | २६२ | २८१ | ४३ | ५० |
| करंजी | २७७ | ३०१ | २४७ | ३८ | ४४ |
| लखमी खेडें | ४६० | ६३१ | ६४४ | १०५ | १११ |
| खडादें | ९९० | ९३६ | ७७९ | १२० | १३३ |
| आदितारा | ४१२ | ४६७ | ४७१ | ७६ | ८६ |
| बोराडें | ५५१ | ५६० | ५९२ | ९४ | १०६ |
| अडादें | ४६३ | ५१९ | ५४२ | ७५ | ९७ |
| एकूण संख्या | ६५१५ | ७६१० | ७५१९ | १६५३ | १३१७ |

आमच्या पाहणीच्या वेळीं एकूण १३१७ कुटुंबें व ७५१९ एवढी लोकसंख्या या ग्रामकेंद्रांत होती. लोकसंख्या व कुटुंबांची संख्या यांचे आमच्या पाहणींत आढळून आलेले आंकडे व १९५१ च्या खानेसुमारीचे आंकडे यांची तुलना केली असतां विसंगति आढळून आली. धानोऱ्याच्या लोकसंख्येच्या बाबत दोन्ही वेळचे आंकडे जरी जवळजवळ जुळत असले तरी १९५१ सालच्या खानेसुमारींत नमूद केलेल्या कुटुंबांपैकी फक्त शेकडा ६० कुटुंबेंच असलेलीं आमच्या पाहणींत दिसून आलीं. इतर खेड्यांच्या बाबतींतहि अशीच विसंगति आढळून आली. दोन वेळच्या आंकड्यांतील या फरकाचा समाधानकारक खुलासा झाला नाही.

या केंद्रांतील लोकसंख्येंत भिल्ल जमात बहुसंख्य आहे. वस्तुत: भिल्ल हे टोळ्या करून राहणारे असले, तरी येथे ते शेतीच्या व्यवसायांत स्थिर झालेले आहेत. तरीहि त्यांच्या समाज-व्यवस्थेंत व रीतिरिवाजांत अजूनहि जुन्यापैकी कांही ठळक विशेष प्रचलित असलेले आढळतात. विवाहासंबंधीचे त्यांचे रीतिरिवाज सर्वसामान्य शेतकरी समाजापेक्षा भिन्न आहेत आणि विशेषत: त्यांच्यांतील स्त्रियांना शेतकरी स्त्रियांपेक्षा अधिक स्वातंत्र्य आहे. याबद्दल विस्ताराने पुढे येणारच आहे.

तापीच्या एका उपनदीचें पाणी धानोऱ्याचे लोक पिण्यासाठी वापरतात. शेजारच्या खेड्यांत पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी आहेत. एकंदरीने या केंद्रांत पिण्याच्या पाण्याची सोय समाधान-कारक दिसून आली. खेड्यांची एकंदर आरोग्य रक्षणाची सोयहि चांगली दिसली. इतर केंद्रांच्या तुलनेंत या केंद्रांतील खेडीं पुष्कळच अधिक स्वच्छ आढळलीं. या खेड्यांच्या जवळच मोठें जंगल आहे. त्यामुळे अगदी आतांपर्यंत हा सगळा विभाग मलेरियाने पीडलेला होता. परंतु राज्य-सरकारच्या सार्वजनिक स्वास्थ्य खात्याने डी. डी. टी. चा मलेरिया-प्रतिबंधक उपाय योजल्यामुळे

आतां येथील मलेरियाचें प्रमाण बरेंच कमी झालें आहे. आमच्या पाहणीच्या काळांत मुलमध्ये खरजेचा प्रादुर्भाव झालेला आढळला. तसेंच कांही ठराविक ऋतूंत येथे हगवणीचाहि विकार नेहमी बळावत असल्याचें आढळलें. परंतु एकंदरीने सर्व लोकांचें स्वास्थ्य विशेष चांगलें असल्याचें दिसून आलें.

या केंद्रांत एकहि धंदेवाईक डॉक्टर नव्हता. परंतु स्वीडिश मिशनने चालविलेला एक दवाखाना होता. धानोऱ्याला या मिशनने एक हॉस्पिटलहि चालवलें होतें. पण तेथील लोक त्याचा पुरेसा फायदा करून घेईनात म्हणून तें बंद केलें गेलें असें कळलें. सध्या अगदी जवळचें हॉस्पिटल १४ मैलांवर नंदुरबार येथे आहे.

धानोरें ही एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथे एक ब्रँच-पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत व दोन सहकारी पतपेढचा आहेत. या ग्रामकेंद्रांतील इतर दोन खेडचांतहि दोन सहकारी पतपेढचा आहेत. या केंद्रांतील एकाशिवाय इतर सर्व खेडचांत प्राथमिक शाळा आहेत; परंतु त्यांतील मुलांची उपस्थिति मात्र अनियमित व असमाधानकारक आहे. येथे दारू पिण्याची संवय पुरुषांमध्ये सर्वसामान्य आहे. त्यामुळे आमच्या अन्वेषिकेला अनेकदा त्रास झाला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील ग्रामकेंद्रांत मिठबाव या एकाच खेडचाचा समावेश होतो. मिठबाव हें देवगड या तालुक्याच्या गांवापासून २० मैलांवर समुद्रकिनाऱ्यावर वसलें आहे. आमच्या पाहणीच्या वेळीं तेथे ११३० कुटुंबें व ५१४० एवढी लोकसंख्या होती. १९५१ सालच्या खानेसुमारीप्रमाणें तेथील कुटुंबांची संख्या ११५५ व लोकसंख्या ५४४० एवढी होती. पण या खेडचाचें मुंबई शहरावरील अवलंबन केवढें मोठें आहे हें लक्षांत घेतलें की, आणि या अवलंबनामुळे येथून मुंबईला कामधंद्यासाठी सतत जाणाऱ्या लोकांचें प्रमाण ध्यानांत घेतलें की, १९५१ सालच्या खानेसुमारीपासून आमच्या पाहणीपर्यंतच्या ४ वर्षांत कुटुंबांच्या संख्येंतील व लोकसंख्येंतील ही घट वस्तुस्थितीला धरून असावी असें वाटतें. या अवलंबनासंबंधी पुढे पुन्हा उल्लेख येणारच आहे.

आपल्या उदरनिर्वाहासाठी हें खेडें मुंबई शहरावर फार मोठचा प्रमाणांत अवलंबून आहे, याबद्दल उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. सगळचाच रत्नागिरी जिल्ह्याचें हें वैशिष्टच आहे. या जिल्ह्यांतील बऱ्याच माणसांना मुंबईला हंगामी किंवा कायम स्वरूपाचा धंदारोजगार मिळतो. त्यामुळे खेडचांत राहणाऱ्या आपल्या कुटुंबियांना ते नियमित पैसे पाठवितात. या जिल्ह्यांतील शेती व्यवसाय हा मुख्यतः तांदुळाच्या एका पिकापुरताच आहे. मिठबाव हें खेडें किनाऱ्यावर असल्यामुळे तेथे शेतीला विशेष महत्त्व नाही. या खेडचांतील केवळ शेकडा ४० कुटुंबेंच शेतीवर अवलंबून असलेलीं आढळलीं. उलटपक्षीं येथे मच्छीमारी हा एक महत्त्वाचा व्यवसाय असल्यामुळे शेकडा २० कुटुंबें या व्यवसायावर अवलंबून असलेलीं दिसलीं व येथील लोकांच्या आहारांत मासोळी हा एक महत्त्वाचा घटक असलेला आढळला.

साक्षरतेचें फार मोठें प्रमाण हें या खेडचाचें लक्षांत घेण्यासारखे वैशिष्टच म्हणतां येईल. मुंबई शहराशी असणारा या खेडचाचा संबंध हें या साक्षरतेच्या मोठचा प्रमाणाचें एक कारण असावें. आमच्या येथील पाहणींत शेकडा ६१ पुरुष व शेकडा २७ स्त्रिया साक्षर असल्याचें दिसून आलें. या खेडचांत पांच प्राथमिक शाळा, एक उच्च माध्यमिक शाळा, एक मत्स्य-संवर्धनाची शाळा व एक प्राथमिक-शिक्षक-प्रशिक्षणाची शाळा एवढचा संस्था आहेत. या शाळांतील ग्रंथालयें चांगलीं आढळलीं. येथल्या वाचनालयांत मासिकें व वृत्तपत्रें येत असलेलीं दिसलीं. वाचनाची संवय येथे सर्वसामान्य असलेली दिसली. या दृष्टीने हें ग्रामकेंद्र इतर सर्व ग्रामकेंद्रांपेक्षा सर्वस्वी वेगळें असलेलें दिसलें.

या खेड्यांत पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत व सहकारी पतपेढी आहे. येथे दोन डॉक्टर आहेत. विशेष मोठ्या आजारांवरील उपचारासाठी लोक २० मैलांवर असणाऱ्या देवगडला जातात.

परभणी जिल्ह्यांतील ग्रामकेंद्रांत बोरी हें मध्यवर्ती खेडें व शेजारचीं आठ खेडीं यांचा समावेश होतो. बोरी हें खेडें परभणी-जितुर या बसच्या रस्त्यावर परभणीपासून १८ मैलांवर आहे. जितुर हें तालुक्याचें ठिकाण आहे. क्रमांक २·३ या तक्त्यांत या ग्रामीण केंद्रांतील सर्व खेड्यांची १९४१ व १९५१ या खानेसुमारीच्या वर्षांतील आणि १९५५ सालची आमच्या पाहणीच्या वेळची लोकसंख्या आणि १९५१ व १९५५ या सालांतील कुटुंबांची संख्या दिली आहे. या तक्त्यावरून येथील लोकसंख्येंत अगदी थोडी वाढ झाली आहे हें दिसून येईल.

**तक्ता क्रमांक २·३**

**परभणी जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील**

| खेड्याचें नांव | १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५५ सालची पाहणीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ सालची कुटुंब संख्या | १९५५ सालची कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|
| बोरी | ३२३४ | ३२४६ | ३३९७ | ५९० | ७१० |
| धानोरें | ४०८ | ३८२ | ३८३ | ७० | ९१ |
| नागापूर | १०६ | ११२ | १०६ | ३० | २७ |
| देवगांव | २८० | २९२ | २९४ | १५७ | ७० |
| मुढा | ३२६ | २७६ | ३०९ | ५८ | ६७ |
| नागठाणा | १७३ | १३५ | १२४ | २६ | २१ |
| गणपूर | १४४ | २०० | १५० | ३४ | ३४ |
| दोहोरा | ५२३ | ५४८ | ५६३ | १०७ | ११४ |
| चांदज | ७२५ | ७३४ | ७४६ | १४३ | १५१ |
| एकूण संख्या | ५९१९ | ५९२५ | ६०७२ | १२१५ | १२८५ |

बोरी येथे पिण्याच्या पाण्याच्या बऱ्याच विहिरी आहेत. इतर खेड्यांमधून कर्पारा ही नदी वाहत असल्यामुळे तिचेंच पाणी वर्षांतील कांही महिने पिण्यासाठी मिळतें. उरलेल्या महिन्यांत पिण्याच्या पाण्यासाठी या खेड्यांत पुरेशा विहिरी आहेत. एका खेड्यांतील एक पिण्याच्या पाण्याची विहीर मात्र नारूच्या जंतूंनी दूषित झाली आहे, असें सांगण्यांत आलें; परंतु एकंदरीने येथील पिण्याच्या पाण्याची सोय पुरेशी व समाधानकारक असलेली आढळली. या खेड्यांतील सर्वसाधारण आरोग्यरक्षणाची स्थिति मात्र अतिशय असमाधानकारक असलेली दिसून आली. येथील लोकांचें अज्ञान व निरक्षरता हींच या परिस्थितीचीं कारणें असावींत.

बोरीमध्यें किंवा या ग्रामकेंद्रांतील इतर खेड्यांत एकहि डॉक्टर नव्हता. तेथील ग्रामपंचायतीनें क्विनीन, आयोडीन व ॲंटीबायोटिक्स अशांसारखीं आवश्यक तीं औषधें एका लहान स्टोअरच्या द्वारां मिळण्याची व्यवस्था केली होती. परंतु वैद्यकीय सल्ला मिळत नसल्यामुळे या

औषधांचा फारसा उपयोग होऊं शकत नव्हता. नेहमीच्या वैद्यकीय उपचारांसाठी लोक ६ मैलांवरच्या जिंतुरला किंवा १८ मैलांवरच्या परभणीला जात.

बोरी ही महत्त्वाची बाजारपेठ आहे व बसच्या रस्त्यावरहि आहे. तेथे पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत, सहकारी पतपेढी व ग्रेन बँक हींहि आहेत. परंतु एकंदरीने तेथील बहुतेक लोक अगदी निरक्षर असेच आहेत. बोरीला मुलांसाठी व मुलींसाठी अशा वेगळ्या प्राथमिक शाळा आहेत. केंद्रांतील आणखी दोन खेड्यांतहि प्राथमिक शाळा आहेत. परंतु शाळांतील मुलांची उपस्थिति अतिशय असमाधानकारक होती व लोकांतहि या बाबतींत उदासीनताच दिसली. ज्या सहा वेगवेगळ्या ग्रामकेंद्रांत आम्ही पाहणी केली, त्यांत बोरीच्या ग्रामकेंद्रांतील लोकांत साक्षरतेचें प्रमाण सर्वांत कमी आढळलें.

या पाहणींत ज्या दोन कानडीभाषी ग्रामकेंद्रांचा अंतर्भाव केला होता, त्यांपैकी बेळगांव जिल्ह्यांतील मुदलगी हें एक ग्रामकेंद्र होतें. गोकाक या तालुक्याच्या गांवापासून १५ मैलांवर तें वसलेलें आहे. आमच्या पाहणीच्या वेळीं तेथे ८४० कुटुंबें व ४५३० एवढी लोकसंख्या होती. परंतु १९५१ सालच्या खानेसुमारींत येथील कुटुंबांची संख्या ८७२ व लोकसंख्या ४६९१ एवढी नोंदलेली होती. आमच्या पाहणीच्या वेळची ही संख्येंतील घट कदाचित् बरोबर नसावी. कारण या ग्रामकेंद्रांतील आम्ही सुरू केलेल्या लोकगणनेचें काम पूर्ण झालें किंवा नाही, याविषयी आमची खात्री नाही. या पाहणीच्या अखेरच्या दिवसांत आमच्या अन्वेषिकेच्या आकस्मिक आजारामुळे पाहणीचें काम मध्येच सोडून द्यावें लागलें, हा उल्लेख मागे येऊन गेलेलाच आहे.

मुदलगी येथे पिण्याच्या पाण्यासाठी दोन विहिरी होत्या व त्यांचें पाणी उन्हाळा सोडून इतर महिन्यांत पुरेसें होत होतें. सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांच्या बाबतींत येथील लोक विशेष जागरूक दिसले. प्रातर्विधीसाठी खेड्याचा एक भाग राखून ठेवलेला होता व ग्रामपंचायतीने नेमलेला एक मेहतर दररोज हा भाग स्वच्छ करीत असे. देवीची लस टोचवून घेण्याच्या बाबतींत येथील ग्रामपंचायत तत्पर असे व जिल्हा-सार्वजनिक-आरोग्य-विभागाकडून मलेरियाच्या प्रतिबंधासाठी व कुत्रे आणि उंदीर यांचा उपद्रव थांबविण्यासाठी जे जे उपाय योजिले जात ते अंमलांत आणण्याच्या कार्यांत ही ग्रामपंचायत सक्रिय सहकार्य देत असे. या खेड्यांत कोणतेच खास रोग आढळले नाहीत. परंतु येथे थोड्या प्रमाणांत क्षयरोग असावा, अशी आमच्या अन्वेषिकेला शंका आली. आमच्या पाहणींतल्या इतर बहुतेक ग्रामीण केंद्रांपेक्षा येथील वैद्यकीय उपचारांची सोय अधिक चांगली असलेली आढळली. डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाकडून येथे एक योग्य (क्वॉलिफाईड) डॉक्टर नेमण्यांत आला होता. येथील वैद्यकीय सल्ला व उपचार मोफत होते. याशिवाय कम्युनिटी प्रोजेक्ट शासनाकडून नेमण्यांत आलेला एक डॉक्टर, एक आरोग्य-प्रचारिका (हेल्थ व्हिजिटर) व एक प्रसाविका (मिडवाइफ) हे सर्व या खेड्याला नियमित भेटी देत होते. अधिक कठिण रोगांच्या उपचारासाठी लोक १५ मैलांवरच्या गोकाक येथील हॉस्पिटलमध्ये जात.

मुदलगी ही महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथे पोस्ट ऑफिस आहे. चिकोडी रोड हें रेल्वे स्टेशन येथून फक्त १८ मैलांवर आहे. आणि या खेड्याचे इतर ठिकाणांना जोडणारे एकंदर दळणवळणाचे मार्ग चांगले आहेत. येथे ग्रामपंचायत आहे व वर नमूद केल्याप्रमाणे ती आपल्या कार्यांत दक्ष आहे. तिचे बहुतेक सदस्य सुशिक्षित व बहुश्रुत आहेत. या खेड्यांत विणकरांची एक लहानशी जमात आहे आणि त्यांची वेगळी सहकारी समितिहि आहे.

गुलबर्गा जिल्ह्यांतील ग्रामकेंद्रांत मध्यवर्ती नालवार हें खेडें व शेजारचीं दोन खेडीं एवढ्यांचा समावेश होतो. या पाहणीसाठी निवडलेलें हें दुसरें कानडीभाषी केंद्र होतें. नालवार हें मध्य रेल्वे-

वरचें रेल्वे स्टेशन असून, वाडी या महत्त्वाच्या रेल्वे जंक्शनपासून ९ मैलांवर आहे. या खेड्याची वस्ती रेल्वे स्टेशनपासून २ मैलांवर आहे. त्याची लोकसंख्या पांच हजारांवर असून तें एक लहानसें नगरच आहे. क्रमांक २·४ या तक्त्यांत या ग्रामकेंद्रांतील १९५१ च्या खानेसुमारीच्या वेळची आणि या पाहणीच्या वेळची कुटुंबांची संख्या व लोकसंख्या दिली आहे.

### तक्ता क्रमांक २·४

### गुलबर्गा जिल्हा ग्रामकेंद्रांतील खेडेगांवांचा तपशील

| खेड्याचें नांव | १९५१ च्या खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या | १९५५ सालची पाहणीच्या वेळची लोकसंख्या | १९५१ सालची कुटुंब संख्या | १९५५ सालची कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|
| नालवार | ५७८९ | ६३६३ | १०८८ | १३२१ |
| सुगुरू | १०६३ | १०९६ | २०९ | २४९ |
| कालकंडा | ५८० | ५२२ | १०२ | १०९ |
| एकूण संख्या | ६५७५ | ७९८१ | १४०६ | १६७९ |

नालवार हें लहानसें नगर असूनहि येथील भिन्नभिन्न जातीयांमधील प्रमाण हें इतर सर्व-सामान्य शहरांपेक्षा अगदी वेगळें असल्यामुळे, तसेंच साक्षरता व शिक्षण यांच्या अल्प प्रमाणामुळे आणि सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता यांच्यासंबंधीच्या असमाधानकारक परिस्थितीमुळे एखाद्या मागासलेल्या भागासारखें दिसतें. या गांवच्या लोकसंख्येंत मागासलेल्या व वर्गीकृत जातींचें फार मोठें प्रमाण आढळलें. येथे २५ टक्के लोक लमाण या आदिवासी जमातीचे होते. या जमातीचे लोक ९ टोळ्यांत विभागले गेले असून प्रत्येक टोळीचा स्वतंत्र प्रमुख आहे. येथील लोकसंख्येंत २० टक्के मुसलमान आहेत.

येथील लोकांचा शेतीशिवाय दुसरा महत्त्वाचा व्यवसाय म्हणजे जवळच्या दगडांच्या खाणींत व ६ मैलांवरील शहाबादमध्ये असलेल्या सीमेंटच्या कारखान्यांत मजुरी करणें, हा होय. हातमागांवर विणणाऱ्या विणकरांचाहि येथे एक वर्ग आहे.

या गांवच्या लोकसंख्येच्या मानानें पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय येथे नव्हती आणि गांवांतील आरोग्यरक्षणाची सोयहि अतिशय असमाधानकारक होती. गांवांत दोन डॉक्टर होते, परंतु त्यांचा उपयोग करून घेण्याऐवजी लोक आपले स्वतःचेच अडाणी उपचार रोगांवर करीत होते. गांवांतील बहुतेक लोक निरक्षर होते. मुलांची एक व मुलींची एक अशा दोनच प्राथमिक शाळा तेथे होत्या. या शाळांतील मुलांमुलींची उपस्थिति असमाधानकारक होती. दारू पिण्याचें व्यसन व वेश्याव्यवसाय हीं दोन्ही फार मोठ्या प्रमाणांत येथे असलेलीं आढळलीं.

# ३

# लोकसंख्या

वेगवेगळ्या वयाच्या व आर्थिक परिस्थितीच्या लोकांमध्ये लोकसंख्या कशा प्रमाणांत विभागली गेली आहे, याची माहिती या प्रकरणांत दिली आहे. आमच्या पाहणींतील सहा ग्रामकेंद्रांत वयाच्या प्रत्येक वर्षांत स्त्रियांच्या व पुरुषांच्या संख्येचें प्रमाण काय आहे हें क्रमांक ३·१ या तक्त्यांत दाखविलें आहे. वय सांगण्यांत लोकांकडून ज्या चुका नेहमी होतात, त्यांच्यामुळे, वयाप्रमाणे केलेल्या या विभागणीवरहि परिणाम झाला आहे, हें या तक्त्यावरून स्पष्ट दिसून येईल. ज्या विशिष्ट वय-संख्येच्या शेवटीं ० व ५ हे आंकडे येतात, तें वय सांगण्याकडेच बऱ्याच जणांचा कल झुकतांना आढळतो. ही गोष्ट २० हें वय सांगणाऱ्यांच्या बाबतींत व यापुढील ० आणि ५ हे आंकडे शेवटीं असणारें वय सांगणाऱ्यांच्या बाबतींत विशेष ध्यानांत येते. यामुळे यापुढील वयाच्या लोकांच्या वयाबाबतच्या आंकड्यांचा बिनचूकपणा कमीकमी होत जातो. याहून पुढच्या वयांच्या म्हणजे ६० वर्षांनंतरच्या वयांच्या लोकांनी सांगितलेल्या स्वतःच्या वयांच्या आंकड्यांचें सूक्ष्म निरीक्षण केलें की, सांगितलें जाणारें वय हा एक मनाने ठरविलेला किंवा समाजमान्य असा आंकडा असावा असें वाटूं लागतें. आपल्याला आपल्या खऱ्या वयाची नीटशी कल्पना नाही, असें वय सांगणारा माणूस सांगतच असे आणि त्याच्या कुटुंबांतील माणसांना विचारलें, तर प्रत्येक जण त्याचें अगदी वेगवेगळें वय असल्याचें सांगे. लोकांचीं स्वतःचीं सांगितलेलीं वयें व इतर आनुषंगिक पुरावा यांच्या साह्याने बरोबर वय ठरविण्याचा बराच प्रयत्न केल्यानंतर आम्ही यांत यश मिळणार नाही हें जाणून हें काम सोडून दिलें. म्हणून वर उल्लेखिलेल्या तक्त्यांत ५७ च्या वरच्या वयाचे सर्व लोक आम्ही एकत्र करून एका गटांतच घातले आहेत.

शेवटीं ० किंवा ५ असलेल्या आंकड्यांकडे जसा लोकांचा विशेष कल दिसून आला, त्याचप्रमाणे विषम आंकड्यांपेक्षा सम आकड्यांचीं वयें सांगण्याकडे विशेष कल दिसून आला. त्यांतहि ४ किंवा ६ हा आंकडा शेवटीं असणाऱ्या संख्येपेक्षा २ किंवा ८ हे आंकडे शेवटीं असणाऱ्या संख्या लोकांना जास्त पसंत पडत असें दिसून आलें. शेवटीं ४ किंवा ६ हे आंकडे असणाऱ्या संख्या या ५ हा आंकडा शेवटीं असणाऱ्या संख्येजवळ असल्यामुळे व ५ शेवटीं असणारी संख्या लोकांना विशेषच पसंत असल्यामुळे ४ किंवा ६ शेवटीं असणाऱ्या संख्या फारशा कोणी पसंत करीत नसत असें वाटतें. याच कारणासाठी ३ व ७ शेवटीं असणाऱ्या संख्यांपेक्षा १ व ९ शेवटीं असणाऱ्या संख्या या ० या आंकड्याच्या अगदी जवळ असल्यामुळे कोणालाच फारशा पसंत कराव्याशा वाटत नसत.

कांही विशिष्ट आंकड्यांची आवड असण्याचा वय सांगण्यावर कसा परिणाम होतो, हें क्र. ३·२ या तक्त्यावरून दिसून येईल. क्र. ३·१ या तक्त्यांत एकेका वर्षांतील लोकांची जी संख्या दिली होती, ती पांच-पांच वर्षांच्या गटांत एकत्रित करून, ० किंवा ५ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या ५, १०, १५ इत्यादि संख्या मध्यभागीं घेऊन, हे गट बनविण्यांत आले आहेत. अशा तऱ्हेने पांच वर्षांतील गटांत एकत्रित केलेल्या संख्यांचें पुन्हा तीन गटांत विभाजन केलें आहे. हे तीन गट म्हणजे

## तक्ता क्रमांक ३·१

## पाहणीच्या क्षेत्रांतील स्त्री व पुरुष लोकसंख्येची वयाच्या एकेक वर्षाप्रमाणे विभागणी

| पूर्ण झालेल्या वर्षांत वय | पुरुष | स्त्रिया | पूर्ण झालेल्या वर्षांत वय | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|
| १ च्या खाली | ६१६ | ६५१ | ३१ | ५२ | ९८ |
| १ | ४५६ | ४८१ | ३२ | २२८ | २७१ |
| २ | ५४७ | ६१५ | ३३ | ९८ | ११९ |
| ३ | ६२० | ६०८ | ३४ | ८३ | १३७ |
| ४ | ५९४ | ५८९ | ३५ | ७१८ | ४७४ |
| ५ | ६५९ | ५६५ | ३६ | १०६ | १७१ |
| ६ | ६५५ | ५६२ | ३७ | ५२ | ११८ |
| ७ | ५२५ | ५८० | ३८ | १५९ | २२९ |
| ८ | ५२७ | ५८३ | ३९ | ३७ | ९० |
| ९ | ४९५ | ५७३ | ४० | ६९५ | ४९१ |
| १० | ४९८ | ५७५ | ४१ | २१ | ५८ |
| ११ | ४४३ | ४९४ | ४२ | १२९ | १७० |
| १२ | ४४७ | ४९६ | ४३ | ४१ | १०६ |
| १३ | २१७ | २९५ | ४४ | ३३ | ७८ |
| १४ | ४०४ | ३८५ | ४५ | ५८७ | ४३३ |
| १५ | ३४१ | ३६८ | ४६ | २२ | १२७ |
| १६ | ३८६ | ३९३ | ४७ | ३३ | ९१ |
| १७ | १७४ | ३१५ | ४८ | ८९ | १५९ |
| १८ | ४६१ | ४३२ | ४९ | १९ | ५९ |
| १९ | १५५ | २०८ | ५० | ५२० | ४६० |
| २० | ५५० | ५७८ | ५१ | १५ | ५३ |
| २१ | ११७ | १९५ | ५२ | ८४ | १३३ |
| २२ | ३६३ | ४२८ | ५३ | २६ | ५८ |
| २३ | १६७ | २१४ | ५४ | २६ | ६५ |
| २४ | १६८ | २७० | ५५ | ३२८ | २५१ |
| २५ | ७०८ | ५८९ | ५६ | ३७ | ७४ |
| २६ | १९५ | २४४ | ५७ | २३ | ५४ |
| २७ | १३७ | २०७ | ५७ च्या वरचे | ९५४ | ११५१ |
| २८ | २८१ | ३४९ | एकूण संख्या | १७९४८ | १९३४४ |
| २९ | ४५ | ९९ | | | |
| ३० | ७८२ | ६२५ | | | |

तक्ता क्रमांक ३·२

**पांचापांचाच्या वयाच्या गटांत स्त्री-पुरुषांच्या लोकसंख्येचें विभाजन—विशिष्ट आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांबद्दलची आवड दाखविणारें**

| वयांचे गट वर्षांत | मुलगे व पुरुष (खालील आंकडे शेवटीं येणाऱ्या नोंदविलेल्या वयांचें) शेकड्यांत प्रमाण | | | एकूण संख्या | मुली व स्त्रिया (खालील आंकडे शेवटीं येणाऱ्या नोंदविलेल्या वयांचें) शेकड्यांत प्रमाण | | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०, ५ | २, ४, ६, ८ | १, ३, ७, ९ | | ०, ५ | २, ४, ६, ८ | १, ३, ७, ९ | |
| ३— ७ | २१.५९ | ४०.९१ | ३७.५० | ३०५३ | १९.४५ | ३९.६४ | ४०.९१ | २९०४ |
| ८—१२ | २०.६६ | ४०.४२ | ३८.९२ | २४१० | २१.१३ | ३९.६६ | ३९.२१ | २७२१ |
| १३—१७ | २२.४० | ५१.९१ | २५.६९ | १५२२ | २०.९६ | ४४.३० | ३४.७४ | १७५६ |
| १८—२२ | ३३.४१ | ५०.०७ | १६.५२ | १६४६ | ३१.४० | ४६.७१ | २१.८९ | १८४१ |
| २३—२७ | ५१.४९ | २६.४० | २२.११ | १३७५ | ३८.६५ | ३३.७३ | २७.६२ | १५२४ |
| २८—३२ | ५६.३४ | ३६.६७ | ६.९९ | १३८८ | ४३.३४ | ४३.०० | १३.६६ | १४४२ |
| ३३—३७ | ६७.९३ | १७.८८ | १४.१९ | १०५७ | ४६.५१ | ३०.२३ | २३.२६ | १०१९ |
| ३८—४२ | ६६.७६ | २७.६७ | ५.५७ | १०४१ | ४७.३० | ३८.४४ | १४.२६ | १०३८ |
| ४३—४७ | ८१.९८ | ७.६८ | १०.३४ | ७१६ | ५१.८६ | २४.५५ | २३.५९ | ८३५ |
| ४८—५२ | ७१.५२ | २३.८० | ४.६८ | ७२७ | ५३.२४ | ३३.८० | १२.९६ | ८६४ |
| ५३—५७ | ७४.५४ | १४.३२ | ११.१४ | ४४० | ५०.०० | २७.६९ | २२.३१ | ५०२ |

तक्ता क्रमांक ३·३

पाहणी केलेल्या केंद्रांतील स्त्री-पुरुष लोकसंख्येची वयाप्रमाणें विभागणी

| पूर्ण झालेल्या वर्षांत वय | बोरी | | बानोरें | | मिरजगांव | | भिठबाव | | मुबलगी | | नालवार | | सर्व केंद्रें | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| ७ खालील | १८.३ | २०.३ | २७.३ | २३.५ | २१.६ | २२.३ | २२.५ | १६.१ | २३.० | २१.५ | २४.६ | २१.७ | २३.१ | २१.० |
| ७—१२ | १८.७ | १७.३ | १७.८ | १८.२ | २०.४ | २०.१ | २२.९ | १६.३ | १२.० | १६.६ | ७.२ | १४.१ | १६.३ | १७.१ |
| १३—१७ | ६.१ | ५.८ | ८.७ | १०.३ | ७.६ | ८.६ | १३.२ | ९.८ | ७.७ | ८.४ | ८.६ | १०.६ | ८.५ | ९.१ |
| १८—२२ | ८.४ | १०.४ | ८.८ | ९.३ | ९.३ | ९.९ | ८.२ | ७.४ | १०.८ | ९.७ | ९.८ | १०.२ | ९.२ | ९.५ |
| २३—२७ | ७.२ | ६.७ | ८.१ | ९.२ | ८.१ | ७.४ | ४.० | ७.३ | ७.१ | ७.८ | ९.९ | ८.३ | ७.७ | ७.९ |
| २८—३२ | ९.२ | ९.३ | ७.२ | ६.७ | ७.१ | ७.२ | ३.८ | ६.३ | ८.९ | ८.८ | ९.४ | ७.१ | ७.६ | ७.४ |
| ३३—३७ | ६.७ | ५.४ | ५.३ | ४.३ | ५.७ | ५.४ | ३.८ | ५.५ | ५.९ | ५.४ | ७.४ | ५.७ | ५.९ | ५.३ |
| ३८—४२ | ८.१ | ५.८ | ४.६ | ४.८ | ५.२ | ४.६ | ३.७ | ५.२ | ७.४ | ५.१ | ६.१ | ६.५ | ५.८ | ५.४ |
| ४३—४७ | ५.१ | ३.८ | ३.२ | ४.३ | ३.४ | ५.१ | २.५ | ४.९ | ४.८ | ४.१ | ४.८ | ३.७ | ४.० | ४.३ |
| ४८—५२ | ४.८ | ५.३ | ३.३ | ३.६ | ३.९ | ३.१ | ३.३ | ६.५ | ४.५ | ३.९ | ४.७ | ४.७ | ४.१ | ४.५ |
| ५३—५७ | २.४ | २.० | १.६ | १.९ | २.३ | १.९ | ३.७ | ४.२ | ३.१ | २.६ | २.४ | ३.१ | २.५ | २.६ |
| ५८ व वरील | ५.० | ७.९ | ४.१ | ३.९ | ५.४ | ४.४ | ८.४ | १०.५ | ४.८ | ६.१ | ५.१ | ४.३ | ५.३ | ५.९ |
| एकूण | ३०५६ | ३०१० | ३७३१ | ३७६४ | ३३५५ | ३३२६ | २२३७ | २८९१ | २०८४ | २२७४ | ३४८५ | ४०७८ | १७९४८ | ११३४३ |

(१) ० किंवा ५ हे आंकडे शेवटीं येणारीं वयें, (२) २, ४, ६ व ८ हे सम आंकडे शेवटीं येणारीं वयें, आणि (३) १, ३, ७, ९ हे विषम आंकडे शेवटीं येणारीं वयें. लोकांकडून वयें जर बरोबर सांगितलीं गेलीं तर या पांच वर्षांच्या गटांत, ० किंवा ५ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांचें प्रमाण अंदाजें शेकडा २० असावयास हवें; २, ४, ६ व ८ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांचें प्रमाण अंदाजें शेकडा ४० आणि १, ३, ७ व ९ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांचें प्रमाण अंदाजें शेकडा ४० असावयास हवें. हें प्रमाण पहिल्या ३ ते ७ व ८ ते १२ या दोन पांच-पांच वर्षांच्या गटांत जवळजवळ तसेंच असलेलें आढळून येतें. पण यापुढें मात्र ० व ५ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांचें प्रमाण वाढत जातें आणि पुढे पुढे तर तें अतिशयच वाढलेलें दिसून येतें. उदाहरणार्थ, २३ ते २७ या गटांतील जवळजवळ निम्म्यांहून अधिक पुरुषांनी आपलें वय २५ असल्याचें सांगितलें आणि ५३ ते ५७ या गटांतील जवळजवळ तीन चतुर्थांश पुरुषांनी आपलें वय ५५ असल्याचें सांगितलें. शेवटीं ० किंवा ५ हे आंकडे येणाऱ्या वयांचे अतिशय फुगलेले आंकडे, हे इतर सर्व आंकड्यांनी शेवट होणाऱ्या वयांची संख्या कमी कमी करूनच फुगतात. परंतु त्यांतल्या त्यांतहि सम आंकडे शेवटीं येणाऱ्या संख्यां-पेक्षा विषम आंकडे शेवटीं येणाऱ्या वयांच्या संख्येवर हा आघात सर्वांत जास्त झालेला आढळतो. म्हणजे सर्व वयाच्या गटांत शेवटीं सम आंकडे असणाऱ्या वयांची नोंद, शेवटीं विषम आंकडे असणाऱ्या वयांच्या नोंदीपेक्षा पुष्कळ जास्त असलेली दिसून येते. शेवटीं १ व ९ हे विषम आंकडे असणारीं वयें हीं ० या आंकड्याच्या जवळ असल्यामुळें त्या वयांची नोंद कमींत कमी होते. तसेंच शेवटीं २ व ४ हे सम आंकडे असणारीं वयें हीं ५ या आंकड्याच्या जवळ असल्यामुळे त्याहि वयांची नोंद कमींत कमी होते.

पुरुषांच्या वयांच्या विभागणीशी तुलना करतां, ० व ५ हे आंकडे शेवटीं येणाऱ्या वयाच्या स्त्रियांच्या नोंदींतले आंकडे फारसे फुगलेले दिसत नाहीत. यावरून स्त्रियांच्या वयांची नोंद ही पुरुषांच्या वयांच्या नोंदीपेक्षा अधिक बरोबर झाली आहे असें दिसेल. हें कदाचित् खरेंहि असेल. परंतु मुळांत स्त्रियांनी जीं वयें सांगितलीं, तीं पुरुषांनी सांगितलेल्या वयांपेक्षा अधिक बरोबर होतीं, असें मुळीच नाही. उलट स्त्रियांनी मुळांत सांगितलेलीं वयें अधिकच चुकीचीं होतीं. एवढें मात्र खरें की, स्त्रियांनी मुळांत सांगितलेलीं वयें इतर पुराव्याच्या साह्याने शक्य तितकीं बिनचूक कर-ण्याचा आम्ही प्रयत्न केला. स्त्रीचें लग्नाच्या वेळचें वय, पति व पत्नी या दोघांच्या वयांतील अंतर, पहिल्या मुलाच्या जन्माच्या वेळचें वय व नंतरच्या मुलांचीं वयें इत्यादि सर्व सांगितलेली माहिती आधारास घेऊन स्त्रियांचीं वयें जास्तींत जास्त बिनचूक नोंदण्याचा आम्ही प्रयत्न केला. वस्तुत: या सर्व माहितीच्या आधाराने पुरुषांचीं व स्त्रियांचीं दोघांचींहि वयें बिनचूक नोंदण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु वर उल्लेखिलेल्या माहितीच्या आधाराने पुरुषांपेक्षा स्त्रियांचीं वयें तपासून बरोबर करणें अधिक सुलभ असतें हें उघड आहे. यामुळे आम्ही केलेल्या अखेरच्या वयांच्या नोंदींत पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या वयांची नोंद अधिक बिनचूक झाली असावी.

आता वेगवेगळ्या ग्रामकेंद्रांच्या लोकसंख्येची स्त्री-पुरुषभेदानुसार व वयोभेदानुसार जी विभागणी झाली आहे तिची थोडक्यांत तुलना करूं. क्रमांक ३·३ या तक्त्यांत वेगवेगळ्या ग्राम-केंद्रांतील स्त्री-पुरुषांच्या संख्येचें निरनिराळ्या वयांच्या गटांमध्ये कसें विभाजन झालें आहे हें देण्यांत आलें आहे. या तक्त्याच्या सर्वांत खालच्या ओळींत प्रत्येक केंद्रांतील स्त्रियांची व पुरुषांची जी एकूण संख्या दिलेली आहे, ती पाहतां या सहा केंद्रांचे दोन गट पडतात असें दिसून येईल. एका गटांतील स्त्री-पुरुषांचें प्रमाण सामान्यत: समान असलेलें व दुसऱ्या गटांत स्त्रियांचें प्रमाण पुरुषांच्या संख्ये-पेक्षा अधिक असलेलें दिसून येईल. बोरी, धानोरें व मिरजगांव येथे स्त्री-पुरुषांचें प्रमाण सामान्यत:

समान आहे. मागील प्रकरणांत दिलेल्या टिपणांवरून हें दिसून येईल की, या तीन ग्रामकेंद्रांतील लोकसंख्येवर, लोकसंख्येचें बहिर्गमन किंवा अंतर्गमन यासारख्या गोष्टींचा परिणाम झालेला नाही. याच्या उलट मिठबाव, मुदलगी व नालवार या तीन ग्रामकेंद्रांच्या लोकसंख्येवर बहिर्गमनाचा बराच परिणाम झाला आहे. पूर्वी नमूद केल्याप्रमाणें मुंबई शहराच्या प्रभावामुळे मिठबाव केंद्रावर फार परिणाम झाला आहे. नालवार या केंद्रावर जवळच्या दगडाच्या खाणींचा व ६ मैलांवरील शहाबादच्या सिमेंट गिरण्यांचा परिणाम झाला आहे. मुदलगी या केंद्रावर, त्यावेळीं चालू असलेल्या घटप्रभेच्या कालव्यांच्या कामामुळे परिणाम झाला होता. परंतु या कामामुळे होणारें या केंद्रांतील लोकांचें बहिर्गमन हें तात्पुरतें असावें असें वाटतें. या तीन केंद्रांतून कामासाठी बाहेर जाणाऱ्यांची संख्या मुख्यतः पुरुषांचीच असल्यामुळे तेथे राहणाऱ्या लोकांच्या संख्येंत स्त्रियांचें प्रमाण जास्त असलेलें दिसतें. स्त्री-पुरुष संख्येंत स्त्रियांचें फार मोठें प्रमाण मिठबाव येथे आढळतें. नालवार येथेहि हें प्रमाण बरेंच मोठें आहे. या तीन केंद्रांतील स्त्री-पुरुष संख्येच्या प्रमाणांतील फरकावरून या केंद्रांतून केवढ्या प्रमाणांत बहिर्गमन होतें, याचें गमक मिळतें.

वेगवेगळ्या ग्रामकेंद्रांतील लोकसंख्येचें पृथक्करण केलें असतां त्यांतील वय-गटांच्या प्रमाणांत महत्त्वाचे फरक आढळतात, पण या फरकाचें कारण मात्र सर्वांच्या बाबतींत सहज उलगडून सांगतां येत नाही. मिठबाव येथे एकूण पुरुष लोकसंख्येपैकी फार मोठी संख्या १७ वर्षांपर्यंतच्या वय-गटांतील मुलांची असलेली आढळते. तसेंच ५२ वर्षांवरील उतार वयाच्या गटांतहि बरीच मोठी संख्या असलेली दिसून येते. या केंद्रांत, १७ वर्षांपर्यंतच्या वय-गटांतील व ५२ वर्षांवरच्या उतार वयाच्या गटांतील एकूण संख्या एकूण पुरुष लोकसंख्येच्या शेकडा ७० या प्रमाणांत आहे. इतर केंद्रांच्या तुलनेने हें प्रमाण फार मोठें आहे. आणि या केंद्रांतून पुरुष-लोकसंख्येचें जें बहिर्गमन बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होतें, त्याच्याशी सुसंगत असेंच हें प्रमाण आहे. परंतु बहिर्गमनाचा ज्या केंद्राच्या पुरुष-लोकसंख्येवर परिणाम झाला आहे, त्या नालवार व मुदलगी या केंद्रांत लहान वयाच्या गटांतील व उतार वयाच्या गटांतील लोकसंख्येचें प्रमाण अगदीच कमी असलेलें आढळतें. इतर सर्व केंद्रांतील लहान वयाच्या गटांतील लोकसंख्येच्या तुलनेने या दोन केंद्रांतील, त्या गटांतील लोकसंख्या बरीच कमी असलेली दिसून येते.

धानोरें येथे लहान वयाच्या गटांतील संख्या बरीच मोठी आहे. परंतु लोकसंख्येंतील इतर वयाच्या गटांचें प्रमाण येथे मिठबावपेक्षा अगदी वेगळें आहे. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे धानोरे येथे स्त्री-पुरुषांच्या संख्येचें प्रमाण समान आहे, व तेथे लोकांच्या बहिर्गमनाची परिस्थिति उत्पन्न झाल्याचें दिसलें नाही. त्यामुळे येथील लहान वयाच्या गटांतील विशेष मोठ्या संख्येचें कारण मिठबावप्रमाणे पुरुष-संख्येचें बहिर्गमन हें नाही. धानोरें येथील लोकसंख्येंत वेगवेगळ्या वय-गटांतील लोकांमध्ये असणाऱ्या प्रमाणाचे जे विशेष आहेत, त्यांच्यावरूनहि ही गोष्ट सिद्ध होते. कारण हे विशेष मिठबावच्या लोकसंख्येंतील वेगवेगळ्या वय-गटांमध्ये असणाऱ्या प्रमाणांतील विशेषांहून अगदी भिन्न आहेत. धानोरें येथे लहान वय-गटांतील मुलींची संख्याहि मोठी आहे. मिठबाव केंद्रांत ती तशी नाही. तसेंच मिठबावच्या तुलनेंत धानोरें येथील वरच्या वय-गटांतील संख्याहि बरीच कमी आहे. वस्तुतः सगळ्या केंद्रांत धानोऱ्यांतील ही विशिष्ट वयाच्या लोकांची संख्या सर्वांत कमी आहे. यावरून असें दिसतें की, धानोरें येथील लहान वय-गटांतील बरीच मोठी संख्या व उतार वय-गटांतील अल्पसंख्या हा येथील जननसंख्येच्या व मृत्युसंख्येच्या दरांचा परिणाम असावा. बोरी व मिरजगांव या दुसऱ्या दोन केंद्रांतहि पुरुष-लोकसंख्येच्या बहिर्गमनाची परिस्थिति उत्पन्न झाली नसली, तरी तेथील लोकसंख्येच्या वेगवेगळ्या गटांचें प्रमाण धानोऱ्यापेक्षा अगदी

भिन्न असें दिसून आलें. विशेषत: बोरीमध्ये लहान वयाच्या गटांतील लोकसंख्येचें प्रमाण अतिशय अल्प होतें. धानोरें व बोरी येथील लोकसंख्येच्या वेगवेगळ्या वयांच्या गटांत जे मोठे फरक दिसून आले, त्यांचें कारण त्या त्या ठिकाणच्या जननसंख्येच्या व मृत्युसंख्येच्या भिन्नपणांतच आहे, असा याचा खुलासा करतां येईल असें वाटत नाही.

आतां आपण कामधंद्याच्या दृष्टीने लोकांचा विचार करूं. प्रथम लहान वय-गटांतील मुलांपासून प्रारंभ करूं. क्रमांक ३·४ या तक्त्यांत ५ ते १७ या वयांतील सगळ्या केंद्रांतील मुलांमुलींचें वर्गीकरण त्यांच्या कामाप्रमाणे करण्यांत आलें आहे. तीन वर्गांत ही विभागणी केली आहे. निरुद्योगी, शाळेंत असणारे आणि कामधंद्याला लागलेले असे हे तीन वर्ग आहेत. शाळेंत जाणाऱ्या मुलांचें सर्वांत जास्त प्रमाण ७ ते १० या वयांत आहे. या वयांतील ५५ टक्के मुलें शाळेंत जात असल्याचें दिसून येतें. यानंतर मात्र हें प्रमाण खालावतें. तरीहि ११ व १२ या वयांतील जवळ-जवळ निम्मीं मुलें शाळेंत जातांना आढळतात. १३ ते १७ या वयाच्या गटांत एक तृतीयांश मुलें शाळेंत असलेलीं व दोन तृतीयांश कामाला लागलेलीं दिसून येतात. मुलींमध्येहि ७ ते १० च्या वयांत शाळेंत जाणाऱ्या मुलींचें प्रमाण सर्वांत अधिक आढळतें. परंतु येथे हें प्रमाण मात्र शेकडा २५ च्या पेक्षा थोडेंसें जास्त एवढेंच आढळतें. यापुढच्या वयांत कामाला लागलेल्या मुलींचें प्रमाण मुलांच्या तुलनेंत हळूहळू वाढतांना दिसतें. म्हणजे ११ व १२ या वयांतील शेकडा ५५ पेक्षा जास्त मुली कामाला लागलेल्या नसतात. परंतु यापुढील १३ ते १७ या वयांतील मुलींत एकदम फरक पडतो. शेकडा ७० हून अधिक मुली कामाला लागलेल्या दिसून येतात. या वयांतील फारच थोड्या मुली शाळेंत असलेल्या आढळून येतात. त्या कामाला लागल्या नसल्या, तर घरींच राहतात. त्यांच्यापैकी बऱ्याच जणींचीं लग्नें झालेलीं असतात व त्या घरकामांत मदत करीत असतात.

**तक्ता क्रमांक ३·४**

**५ ते १७ या वयांतील मुलांची व मुलींची काम करण्याच्या स्थितीप्रमाणे विभागणी**
(सर्व केंद्रांची)

| वय | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंत शिकणारे | शेकडा कामावर असणारे | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| | | **मुलगे** | | |
| ५— ६ | ८२.७ | १५.५ | १.८ | १३१४ |
| ७— ८ | ३०.३ | ५५.९ | १३.८ | १२१२ |
| ९—१० | १३.८ | ५६.९ | २९.३ | १२१६ |
| ११—१२ | ७.२ | ५१.९ | ४०.९ | १०७४ |
| १३—१७ | ३.७ | ३१.६ | ६४.७ | १५२० |
| एकूण | ३०.७ | ४१.२ | ३१.१ | ६३३६ |
| | | **मुली** | | |
| ५— ६ | ९१.० | ८.४ | ०.६ | ११२१ |
| ७— ८ | ६५.७ | २७.७ | ६.६ | ११५२ |
| ९—१० | ५७.५ | २६.० | १६.५ | ११३९ |
| ११—१२ | ५५.४ | १७.१ | २७.५ | ९८४ |
| १३—१७ | २६.२ | ३.५ | ७०.३ | १७३४ |
| एकूण | ५६.० | १५.३ | २८.७ | ६१३० |

## तक्ता क्रमांक ३·५

### काम करण्याच्या स्थितीप्रमाणे अ-प्रौढ (१८ वर्षांखालील) पुरुष-लोकसंख्येची विभागणी

| वय वर्षे | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेले | एकूण संख्या | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेले | एकूण संख्या | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेले | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **बोरी** | | | | **धानोरें** | | | | **मिरजगांव** | | | |
| ५—६ | ८७.७ | ११.७ | ०.६ | १७१ | ८५.३ | १३.१ | १.६ | ३१२ | ७९.४ | १७.० | ३.६ | २२३ |
| ७—८ | ५७.६ | ३९.० | ३.४ | १७७ | १५.० | ७०.८ | १४.२ | २६० | १६.३ | ६०.३ | २३.४ | २१४ |
| ९—१० | ३०.३ | ४९.२ | २०.४ | २०१ | ६.८ | ५५.९ | ३७.३ | २२० | ७.८ | ६०.२ | ३२.० | २३१ |
| ११—१२ | १४.१ | ४४.८ | ४१.१ | १९२ | ४.३ | ४३.५ | ५२.२ | १८४ | ३.९ | ४८.९ | ४७.२ | २३३ |
| १३—१७ | ४.३ | १२.० | ८३.७ | १८४ | — | १८.६ | ८१.४ | ३२२ | ०.४ | ३०.५ | ६९.१ | २५६ |
| एकूण | ३७.५ | ३२.१ | ३०.४ | ९२५ | २५.३ | ३७.६ | ३७.१ | १२९८ | २०.७ | ४३.० | ३६.२ | ११५७ |
| | **मिठबाव** | | | | **मुबलगी** | | | | **मालबार** | | | |
| ५—६ | ८७.९ | १२.१ | — | १७३ | ७८.८ | १९.२ | २.० | १४६ | ७८.९ | १८.७ | २.४ | २८९ |
| ७—८ | २०.३ | ७९.७ | — | १७२ | ३४.० | ४४.२ | २१.८ | १५६ | ४४.२ | ३८.६ | १७.२ | २३३ |
| ९—१० | ५.० | ९४.४ | ०.६ | १८० | ८.५ | ५५.० | ३६.४ | १२९ | २१.२ | ३५.३ | ४३.५ | २५५ |
| ११—१२ | ७.७ | ९२.३ | — | १५६ | ६.० | ५४.९ | ३९.१ | १३३ | ७.४ | ३४.७ | ५७.९ | १७६ |
| १३—१७ | ११.८ | ७३.० | १५.२ | २९६ | — | २६.७ | ७३.३ | १६१ | ४.० | २०.३ | ७५.७ | ३०१ |
| एकूण | २४.९ | ७०.४ | ४.७ | ९७७ | २५.८ | ३९.२ | ३५.० | ७२५ | ३२.७ | २८.४ | ३८.९ | १२५४ |

## तक्ता क्रमांक ३·६

### काम करण्याच्या स्थितीप्रमाणे अ-प्रौढ (१८ वर्षांखालील) स्त्री-लोकसंख्येची विभागणी

| वय वर्षे | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेल्या | एकूण संख्या | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेल्या | एकूण संख्या | शेकडा निरुद्योगी | शेकडा शाळेंतील | शेकडा कामाला लागलेल्या | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **बोरी** | | | | **थानोरें** | | | | **मिरजगांव** | |
| ५— ६ | ८९.७ | १०.३ | — | १४६ | ९६.४ | ३.२ | ०.४ | २५३ | ९२.१ | ७.४ | ०.५ | २०२ |
| ७— ८ | ८२.७ | १५.९ | १.८ | १६३ | ७७.८ | २०.२ | २.० | २४८ | ६४.२ | ३२.५ | ३.३ | २१२ |
| ९—१० | ८३.० | १०.७ | ६.३ | १५९ | ६८.५ | १६.८ | १४.७ | २३२ | ६३.२ | २६.७ | १०.१ | २५८ |
| ११—१२ | ८१.१ | ५.१ | १३.८ | १९६ | ४६.६ | ५.७ | ४७.७ | १९३ | ६३.० | १६.७ | २०.३ | १९२ |
| १३—१७ | ४७.१ | — | ५२.९ | १७४ | ७.५ | १.३ | ९१.१ | ३७३ | ३०.२ | १.१ | ६८.७ | २८१ |
| एकूण | ७६.१ | ८.१ | १५.७ | ८३८ | ५५.० | ८.७ | ३६.३ | १२९९ | ६०.४ | १६.४ | २३.२ | ११४५ |
| | | | **मिठबाव** | | | | **मुबलगी** | | | | **नालवार** | |
| ५— ६ | ८४.६ | १५.४ | — | १३६ | ९२.९ | ४.७ | २.४ | १२७ | ८७.९ | ११.३ | ०.८ | २५७ |
| ७— ८ | ३१.५ | ६८.५ | — | १६२ | ५४.८ | २२.२ | २३.० | १३५ | ७२.८ | १४.२ | १२.९ | २३२ |
| ९—१० | १५.२ | ८४.१ | ०.७ | १४५ | ३८.२ | १७.१ | ४४.७ | १२३ | ५९.५ | १२.६ | २७.९ | २२२ |
| ११—१२ | ३९.१ | ५६.६ | ४.३ | १६१ | ३१.१ | ९.२ | ५९.७ | ११९ | ६१.० | १०.६ | २८.४ | १२३ |
| १३—१७ | ३७.४ | १८.४ | ४४.२ | २८३ | २०.० | — | ८०.० | ११० | २६.८ | — | ७३.२ | ४३३ |
| एकूण | ४०.२ | ४४.८ | १५.० | ८८७ | ४५.२ | ९.८ | ४५.० | ६१४ | ५६.७ | ८.१ | ३५.२ | १२६७ |

वेगवेगळ्या केंद्रांतील तरुण मुलें व मुली यांची काम करण्याच्या स्थितीप्रमाणे वेगवेगळ्या वयांच्या गटांत कशी विभागणी झालेली आहे, हें क्रमांक ३·५ व ३·६ या तक्त्यांत दाखविलें आहे. शिक्षणाच्या दृष्टीने मिठबाव हें इतर सगळ्या केंद्रांत ठळक उठून दिसतें, असें लक्षांत येईल. येथे ७–८ या वयांतील शेकडा ८० मुलें शाळेंत शिकत होतीं व ९–१० या वयांतील शेकडा ९५ मुलें शाळेंत होतीं. हें प्रमाण मोठमोठ्या शहरांतहि असलेलें आढळून येणार नाही. यापुढील वयांतील शाळेंत जाणाऱ्या मुलांचें प्रमाण हळूहळू खालावत जातें. ११–१२ वय-गटांतील शाळेंत जाणाऱ्या मुलांचें प्रमाण जवळजवळ ७५ टक्के होतें. मुंबई शहराशी या खेड्याचें दळणवळण सतत राहत आल्यामुळे मुंबईच्या प्रभावामुळे या खेड्यांतील शाळेंत शिकणाऱ्या मुलांची संख्या एवढी मोठी असावी असें वाटतें. दुसरें असें की, या खेड्यांत शिक्षणाच्या सोयीहि चांगल्या आहेत. परंतु हें सर्व असूनहि येथे शिकणाऱ्या मुलांची एवढी मोठी संख्या आढळते याचें दुसरेंहि एक कारण आहे. इतर केंद्रांशी तुलना करतां मिठबाव येथे मुलांना मिळू शकणारीं अशीं कामें किंवा उद्योग नाहीत ही जी वस्तुस्थिति आहे, ती येथील शाळेंत शिकणाऱ्या मुलांच्या मोठ्या संख्येस कारणीभूत झाली असावी. मिठबाव येथें ११–१२ या वयांतील मुलगा उद्योगाला लागलेला आढळला नाही. या वयाचीं शेकडा ७.७ मुलें निरुद्योगी असलेलीं दिसून आलीं. इतर केंद्रांत लहान वयाचींहि कांहीं मुलें उद्योगाला लागलेलीं आढळलीं. या केंद्रांत ११–१२ या वयाचीं तर शेकडा ४०–६० एवढीं मुलें उद्योगाला लागलेलीं दिसून आलीं. तसेंच इतर केंद्रांतील ११–१२ या वयांतील निरुद्योगी मुलांची संख्याहि मिठबावपेक्षा बरीच कमी होती. हीच परिस्थिति १३ ते १७ या वयांतील मुलांच्या बाबतींतहि आढळून आली. या वयाच्या गटांतील उद्योगाला लागलेल्या मुलांची संख्या इतर केंद्रांच्या मानाने मिठबाव येथे फारच कमी होती आणि निरुद्योगी असणाऱ्या मुलांची संख्या फारच जास्त होती, यावरून हें स्पष्ट दिसून येतें की, मिठबाव येथे लहान व तरुण मुलांना मिळू शकणाऱ्या कामधंद्यांचें प्रमाण फारच अल्प होतें. ही परिस्थिति आर्थिक दृष्ट्या उपकारक नसली, तरी अधिक मुलांना शिक्षणांत गुंतून ठेवण्यास मात्र ती उपकारक झाली असावी, असें वाटतें.

मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने दुसऱ्या टोकाला नालवार हें केंद्र येतें. येथे ९ ते १२ या वयाच्या गटांतील फक्त शेकडा ३५ एवढींच मुलें शाळेंत जात होतीं. इतर चार केंद्रांत हें प्रमाण शेकडा ५० च्या जवळपास होतें. या सर्व केंद्रांत व नालवार येथेहि १३ ते १७ या वयाच्या गटांतील शेकडा ७० ते ८० मुलें कामाला लागलेलीं आढळलीं व निरुद्योगी मुलांचें प्रमाण बरेंच कमी असलेलें दिसलें.

मुलींच्या शिक्षणाच्या बाबतींत मिठबाव विशेष ठळकपणाने उठून दिसतें. येथे ९–१० या या वयांतील शेकडा ८४.१ मुली व ११–१२ वयांतील शेकडा ५६.६ मुली शाळेंत जात असलेल्या दिसल्या. इतर सर्व केंद्रांत ११–१२ वयांतील मुलींपैकी शेकडा २० हून कमी मुली शाळेंत जाणाऱ्या आढळल्या. मुलांच्या प्रमाणेच मिठबाव येथे कामाला लागलेल्या मुलींचेंहि प्रमाण इतर केंद्रांच्या मानाने बरेंच कमी होतें.

प्रौढ माणसांच्या कामधंद्याच्या परिस्थितीचें दिग्दर्शन क्रमांक ३·७ या तक्त्यांत केलें आहे. या तक्त्यांत प्रौढ स्त्री-पुरुषांची वयाच्या चार गटांत विभागणी केली आहे व प्रत्येक गटांतील कामावर असणाऱ्या प्रौढांचें एकूण लोकसंख्येंत जें प्रमाण आहे, तें दाखविलें आहे. या ठिकाणीं, कामावर असणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे पैसा किंवा मजुरी मिळवून देणाऱ्या कामावर असणाऱ्या लोकांची संख्या असा अर्थ अभिप्रेत आहे. सर्व केंद्रांमधील प्रौढांच्या संख्येचा एकत्रित विचार केल्यास शेकडा ९२.६ प्रौढ पुरुष व शेकडा ७३.२ प्रौढ स्त्रिया कामावर होत्या, असें दिसून येईल. १८–४७ या वयाच्या गटांत शेकडा ९६ पुरुष व शेकडा ७८.६ स्त्रिया असें प्रमाण होतें. कामावर असणाऱ्या प्रौढ स्त्री-पुरुषांची सर्वांत जास्त संख्या धानोरें येथे व सर्वांत कमी संख्या मिठबाव येथे होती.

तक्ता क्रमांक ३·७

एकूण लोकसंख्येंत काम करणाऱ्यांचें प्रमाण

| वयाचा गट वर्षांप्रमाणें | बोरी शेकडा | धानोरें शेकडा | मिरजगांव शेकडा | मिठबाव शेकडा | मुदलगी शेकडा | नालवार शेकडा | सर्व केंद्रें शेकडा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | | | | |
| १८—४७ | ९६.४ | ९९.५ | ९७.२ | ८३.२ | ९८.५ | ९५.० | ९६.० |
| ४८—५२ | ९१.८ | ९९.२ | ९४.७ | ९२.९ | ९२.५ | ९४.३ | ९४.३ |
| ५३—५७ | ८७.७ | ९६.६ | ८३.१ | ९०.२ | ९२.२ | ८८.१ | ८९.३ |
| ५८ व वरचे | ६५.४ | ८९.६ | ४८.९ | ५७.७ | ८१.८ | ७०.९ | ६७.४ |
| एकूण | ९२.९ | ९८.५ | ९१.१ | ७९.४ | ९६.३ | ९२.६ | ९२.६ |
| | | | स्त्रिया | | | | |
| १८—४७ | ७०.७ | ९३.८ | ७५.३ | ६७.६ | ८१.२ | ७९.६ | ७८.६ |
| ४८—५२ | ७६.४ | ९३.९ | ६३.७ | ६६.० | ७६.७ | ७१.७ | ७४.३ |
| ५३—५७ | ७०.७ | ८३.८ | ६१.९ | ५६.१ | ६६.१ | ६३.० | ६५.२ |
| ५८ व वरच्या | ४६.० | ५८.७ | ३३.३ | ३१.१ | ४५.३ | ३७.८ | ४०.७ |
| एकूण | ६७.७ | ९०.६ | ७०.२ | ५९.९ | ७६.० | ७४.५ | ७३.२ |

तक्ता क्रमांक ३·८

अवलंबनाच्या प्रकारानुसार अवलंबणाऱ्यांची विभागणी

| अवलंबनाचे प्रकार | बोरी शेकडा | धानोरें शेकडा | मिरजगांव शेकडा | मिठबाव शेकडा | मुदलगी शेकडा | नालवार शेकडा | सर्व केंद्रें शेकडा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुलें | | | | | | | |
| फार लहान वयाचीं | ४१.४ | ५९.० | ४३.७ | ३०.१ | ५३.८ | ४९.५ | ४५.९ |
| शाळेंत शिकणारीं | १२.३ | १७.१ | १८.७ | २५.९ | १६.७ | ११.९ | १७.२ |
| घरकामांत गुंतलेलीं | ८.५ | १२.८ | ७.८ | ०.७ | २.० | ४.७ | ६.३ |
| इतर | १२.२ | २.३ | ६.४ | ४.३ | ६.५ | १०.१ | ६.९ |
| एकूण मुलें | ७४.४ | ९१.२ | ७६.६ | ६१.० | ७९.० | ७६.२ | ७६.३ |
| प्रौढ स्त्रिया | | | | | | | |
| घरकामांत गुंतलेल्या | १८.८ | ३.३ | १६.८ | १४.६ | ११.२ | १४.७ | १३.३ |
| इतर | ३.२ | २.९ | ०.६ | ११.४ | ६.० | ४.२ | ४.६ |
| एकूण प्रौढ स्त्रिया | २२.० | ६.२ | १७.४ | २६.० | १७.२ | १८.९ | १७.९ |
| प्रौढ पुरुष | ३.६ | २.६ | ६.० | १३.० | ३.८ | ४.९ | ५.८ |
| १३ वर्षांवरील काम करणाऱ्या १०० पुरुषांमागे अवलंबणाऱ्यांची संख्या | १५५.९ | १५५.९ | १८८.० | ३९१.२ | १४७.२ | १६२.४ | १८२.० |

क्रमांक ३·८ या तक्त्यांत वेगवेगळ्या वयाच्या गटांतील अवलंबून असणाऱ्यांची संख्या दाखविली आहे. या तक्त्यांतील शेवटच्या ओळींत अवलंबून असणाऱ्यांचें प्रमाण हें १३ वर्षांवरील काम करणाऱ्या प्रत्येकीं १०० पुरुषांच्या संख्येमागे अवलंबून असणारांची संख्या, अशा प्रकारें दाखविलें आहे. तक्त्याच्या इतर भागांत, अवलंबणाऱ्यांची संख्या अवलंबनाच्या वेगवेगळ्या प्रकारांत विभागलेली दाखविली आहे. सहा केंद्रांपैकी, बोरी, धानोरें, मुदलगी व नालवार या चार केंद्रांत, १३ वर्षांवरील काम करणाऱ्या १०० पुरुषांमागे अवलंबणाऱ्यांचें प्रमाण १५० ते १६० एवढें पडतें. मिरजगांव केंद्रांत हें प्रमाण १८८ व मिठबाव येथे ३९१ असलेलें आढळतें. यावरून मिठबाव येथील परिस्थिति अनेक दृष्टींनी इतर केंद्रांहून अगदी भिन्न व अपवादात्मक असल्याचें सहज दिसून येईल. बोरी, मिरजगांव, मुदलगी व नालवार या चार केंद्रांत अवलंबणाऱ्यांपैकीं ७५ ते ८० टक्के मुलें आहेत. धानोऱ्यांत ९० टक्के मुलें आहेत. पण मिठबाव येथें मात्र फक्त ६० टक्केच मुलें आहेत.

या वेगवेगळ्या केंद्रांत काम करणाऱ्यांचें प्रमाण, अवलंबून असणाऱ्यांचें प्रमाण व अवलंबून असणाऱ्यांमध्ये भिन्न वयाच्या गटांतील माणसांचें प्रमाण, या सर्वांमध्ये भिन्नता दिसून येते. ही भिन्नता अंशतः तरी वेगवेगळ्या केंद्रांमध्ये वेगवेगळ्या वयाच्या गटांत जो प्रमाणभेद दिसून येतो त्यामुळे उत्पन्न झाली असावी. या भिन्नतेचीं कारणें संपूर्णपणें शोधून काढावयाचीं झाल्यास, आर्थिक कारणांची तपासणी करावी लागेल. पण हें काम या पाहणीच्या क्षेत्राच्या पलीकडचें आहे.

# ४
# वैवाहिक स्थिति

या प्रकरणांत एकंदर विवाहसंस्थेविषयी व वैवाहिक स्थितीविषयी आम्ही जी माहिती गोळा केली ती सादर करीत आहोत. आम्ही पाहणी केलेल्या केन्द्रांतील सर्व कुटुंबांकडून जो 'सामान्य कुटुंब माहिती तक्ता' भरून घेतला होता, त्याच्या द्वारां व विवाहसंस्थेविषयी जी वेगळी पाहणी आम्ही केली तिच्या द्वारां ही सर्व माहिती गोळा केली आहे. सामान्य माहिती-तक्त्याच्या द्वारां आम्ही जी माहिती मिळविली ती प्रथम सादर केली आहे.

क्रमांक ४·१ या तक्त्यांत स्त्रियांच्या वैवाहिक स्थितीसंबधीचा ठोकळ तपशील दिला आहे. या तक्त्यांत प्रत्येक केंद्रांतील स्त्रियांची पांच वर्षांच्या वय-गटांत विभागणी केली आहे आणि प्रत्येक गटांतील अविवाहित स्त्रियांचें शेकडा प्रमाण दाखविलें आहे.

वेगवेगळ्या केंद्रांत वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित स्त्रियांच्या प्रमाणाचें निरीक्षण केलें असतां, धानोरें व मिठबाव हीं दोन केंद्रें इतर चार केंद्रांत ठळकपणानें उठून दिसतात. बोरी, मिरजगांव, मुदलगी व नालवार या चार केंद्रांत १८–२२ या वय-गटांतील अविवाहित स्त्रियांचें प्रमाण थोडें होतें आणि याच्या पुढील वय-गटांतील प्रमाण तर लक्षांत न घेण्याइतकें थोडें होतें. मिरजगांव व मुदलगी येथें १८–२२ या वय-गटांतील अविवाहित स्त्रियांचें प्रमाण शेकडा २.५ एवढेंच होतें. बोरी व नालवार येथें तें शेकडा ०.५ होतें. याच्या उलट, धानोरें व मिठबाव या दोन केंद्रांत हें प्रमाण बरेंच मोठें होतें. १८–२२ या वय–गटांतील अविवाहितांचें प्रमाण धानोऱ्यास शेकडा २०.९ होतें आणि मिठबाव येथें शेकडा २४.२ इतकें होतें. या वरच्या वय-गटांतहि या केंद्रांतील अविवाहितांचें प्रमाण मोठें होतें. धानोरें येथें ही स्थिति अधिक स्पष्टपणानें दिसून येते. येथें २३–२७ या वय-गटांतील शेकडा ३.९ स्त्रिया, २८–३२ या वय-गटांतील शेकडा ०.८ स्त्रिया आणि ३३ व त्याच्यावरील वय–गटांतील शेकडा ०.५ स्त्रिया अविवाहित होत्या. मिठबाव येथें हें प्रमाण अनुक्रमें शेकडा १.४, ०.५, व ०.२ असें होतें.

धानोरें व मिठबाव हीं केंद्रें एकीकडे व इतर चार केंद्रें दुसरीकडे, असा हा भेद, खालच्या वय-गटांतील अविवाहित स्त्रियांच्या प्रमाणांतहि आढळून आला. १३ वर्षांखालच्या सर्वांत लहान वय-गटांतील अविवाहित मुलींचें प्रमाण या चार केंद्रांत शेकडा ९० ते ९५ एवढें होतें. धानोरें व मिठबाव येथें हें प्रमाण जवळजवळ शंभर टक्के होतें. हा सर्वांत खालचा वय-गट संख्येनें बराच मोठा असल्यामुळें यांत विवाहित मुलींचें प्रमाण शेकड्यांत थोडें दिसलें, तरी त्यावरून प्रत्यक्षांत बाल-विवाहांची बरीच मोठी संख्या या खेड्यांत होती हें लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणजे धानोरें व मिठबाव हीं केंद्रें वगळल्यास इतर चार केंद्रांत १३ वर्षांखालील जवळजवळ शंभर मुली विवाहित असलेल्या आढळल्या. कायद्यानें अशा बालविवाहांना प्रतिबंध केला असल्यामुळें, ही वस्तुस्थिति लक्षांत घेणें महत्त्वाचें आहे. धानोरें व मिठबाव येथें मात्र १३ वर्षांखालील जवळजवळ एकहि मुलगी विवाहित नव्हती.

तक्ता क्रमांक ४·१

वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित मुलींचें व स्त्रियांचें शेकडा प्रमाण

| वय-गट | बोरी शेकडा अविवाहित | बोरी एकूण स्त्रिया | धानोरें शेकडा अविवाहित | धानोरें एकूण स्त्रिया | मिरजगांव शेकडा अविवाहित | मिरजगांव एकूण स्त्रिया | मिठबाव शेकडा अविवाहित | मिठबाव एकूण स्त्रिया | मुबलगी शेकडा अविवाहित | मुबलगी एकूण स्त्रिया | नालवार शेकडा अविवाहित | नालवार एकूण स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —१३ | ९०.६ | ११२९ | ९९.७ | १५४२ | ९१.६ | १३९५ | १००.० | ९३५ | ९२.० | ८६६ | ९४.९ | १४६२ |
| १३—१७ | ३२.२ | १७४ | ८३.९ | ३७३ | २०.३ | २८५ | १२.२ | २८२ | १६.८ | १९० | १७.३ | ४३३ |
| १८—२२ | ०.६ | ३११ | २०.९ | ३४० | २.४ | ३२९ | २४.२ | २१५ | २.७ | २२० | ०.५ | ४१५ |
| २३—२७ | — | २०० | ३.९ | ३३६ | — | २४८ | १.४ | २१२ | — | १७७ | ०.३ | ३३८ |
| २८—३२ | — | २७९ | ०.८ | २४४ | ०.४ | २४१ | ०.५ | १८५ | ०.५ | २०० | — | २८९ |
| ३२— | ०.१ | ९०० | ०.५ | ८४२ | — | ८१६ | ०.२ | १०६२ | ०.३ | ६२१ | ०.३ | ११४२ |
| एकूण | ३६.१ | २९९३ | ५२.८ | ३६७७ | ४०.६ | ३३१४ | ४३.३ | २८९१ | ३६.८ | २२७४ | ३६.० | ४०७९ |

पुढच्या १३–१७ या वय-गटांत अविवाहित स्त्रियांचें प्रमाण धानोरें व मिठबाव हीं केंद्रें वगळून इतर चार केंद्रांत अंदाजें शेकडा २० ते ३० च्या दरम्यान होतें. आणि धानोरें व मिठबाव येथे हें प्रमाण जवळपास शेकडा ८० एवढें होतें. यावरून हें दिसून येईल की, धानोरें व मिठबाव येथील लोकांच्या वैवाहिक स्थितीच्या दृष्टीने विश्लेषण व इतर चार केंद्रांतील विश्लेषण यांच्यांत मूलभूत स्वरूपाचा भेद होता. इतर चार केंद्रांच्या तुलनेंत धानोरें व मिठबाव येथील मुलींचे विवाह बऱ्याच मोठ्या वयांत होत होते.

धानोरें व मिठबाव यांच्याशिवाय दुसऱ्या चार केंद्रांत खालच्या दोन वय-गटांतील अविवाहित मुलींच्या प्रमाणांत बारीक भेद होते. परंतु १३ या विशिष्ट वयाच्या बाबतींत वय सांगतांना ज्या चुका झाल्या असतील, त्यांच्यामुळेच हे बारीक भेद उत्पन्न झाले असावे. धानोरें व मिठबाव या दोन केंद्रांची तुलना करतां १८–२२ पर्यंतच्या सर्व वय-गटांतील अविवाहित मुलींचें प्रमाण धानोऱ्यापेक्षा मिठबाव येथे अधिक होतें असें दिसून येतें. परंतु या पुढील वय-गटांतील अविवाहित स्त्रियांचें प्रमाण मिठबावपेक्षा धानोरें येथे अधिक होतें. वस्तुत: धानोरें येथे हें प्रमाण इतकें जास्त होतें की तेथे जन्मभर अविवाहित राहणाऱ्या स्त्रियाहि अगदीच नव्हत्या असें नाही. इतर ठिकाणीं मात्र अशा स्त्रिया सांपडल्याच नाहीत. धानोरें या खेड्यांतील अधिकांश वस्ती भिल्लांची होती या गोष्टीची आठवण या ठिकाणीं साहजिकच होईल. तेव्हा या केंद्रांतील स्त्रियांच्या वैवाहिक स्थितीबद्दलचीं जीं ठळक वैशिष्ट्यें तीं भिल्ल जमातीच्या आचार-परंपरांतीलच आहेत हें दिसून येईल. याच्या उलट मिठबाव येथे आढळून येणारें लग्नाचें वाढतें वय, हा मुख्यत: मुंबई शहराचा मिठबावच्या लोकांवर जो प्रभाव होता, त्याचा परिणाम असला पाहिजे.

क्रमांक ४·२ या तक्त्यांत वेगवेगळ्या वय-गटांतील विवाहित स्त्रियांचें पहिल्या लग्नाच्या वेळचें वय दिलें आहे. त्यावरून हें दिसून येईल की, बोरी व मिरजगांव येथील विवाहित स्त्रियांपैकी अनुक्रमें शेकडा ३३.८ आणि ३१.५ एवढ्यांचीं लग्नें ८ वर्षांच्या वयांत किंवा त्याच्या खालील वयांत झालीं होतीं. मुदलगी येथे शेकडा ४३.९ स्त्रियांचीं लग्नें या वयांत झालीं होतीं. धानोरें व मिठबाव येथे ८ किंवा त्याच्या खालील वयांत लग्न झालेल्यांचें प्रमाण शेकडा ५ पेक्षाहि कमी पडत होतें. मिठबाव व धानोरें वगळल्यास इतर चार केद्रांमध्यें शेकडा ७५ ते ८१ स्त्रियांचीं लग्नें १३ वर्षांच्या अगोदर झालेलीं दिसलीं आणि मिठबाव येथे १३ वर्षांच्या अगोदर लग्न झालेल्यांचें प्रमाण शेकडा ४४ व धानोऱ्यास शेकडा १० एवढेंच आढळलें.

नालवार व मुदलगी या कानडीभाषी केंद्रांमध्ये १६ किंवा त्याच्या वरील वयांत झालेल्या लग्नांचें प्रमाण शेकडा २ पेक्षाहि कमी होतें व मिरजगांव आणि बोरी येथे हें प्रमाण अनुक्रमें शेकडा ३ व ६ असें होतें. सोळा किंवा त्याच्यावरील वयांत लग्न करणाऱ्यांची संख्या धानोरें येथे सर्वांत मोठी म्हणजे शेकडा ७० एवढी आढळली. यानंतरचा क्रमांक मिठबावचा होता. येथे १६ किंवा त्याच्यावरच्या वयांत लग्न करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण शेकडा २५ एवढें होतें. आपण जर वेगवेगळ्या पंचवार्षिक वय-गटांतील १६ किंवा त्यावरील वयांत लग्न करणाऱ्यांचें प्रमाण तपासून पाहिलें, तर धानोऱ्यांस १८ वर्षांवरील सर्व वय-गटांत अशा स्त्रियांचें प्रमाण बरेंच मोठें होतें, असें दिसून येईल. यावरून असा निष्कर्ष निघतो की वाढत्या वयांत म्हणजे १६ वर्षांनंतर लग्न करण्याची प्रथा तेथे बरींच वर्षें चालू असली पाहिजे. धानोऱ्यास बहुसंख्येंत असणाऱ्या भिल्ल जमातीचें हें वैशिष्ट्य असावें असें वाटतें व असें असल्यास ही प्रथा अगदी जुन्या काळापासून चालत आली असावी असें दिसतें. याच्या उलट, मिठबाव येथे १६ वर्षांवरील वयांत लग्न झालेल्यांचें प्रमाण प्रौढ वय-गटांपेक्षा तरुण वय-गटांत बरेंच मोठें दिसून येतें. यावरून असें दिसतें की, मिठबाव येथे लग्नाचें वय

तक्ता क्रमांक ४·२

वेगवेगळ्या वय-गटांतील विवाहित स्त्रियांचें, पहिल्या लग्नाच्या वेळच्या वयाप्रमाणें विभाजन

| सध्याचें वय | पहिल्या लग्नाच्या वेळच्या वयाप्रमाणें शेकडा | | | | | पहिल्या लग्नाच्या वेळच्या वयाप्रमाणें शेकडा | | | | | पहिल्या लग्नाच्या वेळच्या वयाप्रमाणें शेकडा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ८ व खालील | ९— | १३— | १६ व वरील | एकूण संख्या | ८ व खालील | ९— | १३— | १६ व वरील | एकूण संख्या | ८ व खालील | ९— | १३— | १६ व वरील | एकूण संख्या |
| | | | **बोरी** | | | | | | **धानोरें** | | | | | **मिरजगाव** | |
| –१३ | ४५.७ | ५४.३ | — | — | १०५ | ६०.० | ४०.० | — | — | ५ | ६४.४ | ३५.७ | — | — | ११५ |
| १३–१७ | २५.६ | ३५.९ | ३३.३ | ५.१ | ११८ | २१.७ | १८.३ | २०.० | ४०.० | ६० | १९.९ | ४८.० | २९.४ | २.७ | २२३ |
| १८–२२ | २१.० | ४३.७ | २१.४ | १३.९ | ३०९ | २.६ | ४.२ | १७.० | ७६.२ | २६९ | १६.५ | ५३.२ | २५.० | ५.४ | ३१८ |
| २३–२७ | २९.१ | ४४.२ | १८.१ | ८.५ | २०० | ४.० | ५.६ | १९.३ | ७१.० | ३२३ | २६.९ | ५२.७ | १६.३ | ४.१ | २४५ |
| २८–३२ | ३०.९ | ५१.३ | १२.४ | ५.५ | २७९ | ३.८ | ६.७ | १४.३ | ७५.२ | २४२ | ३२.३ | ४८.५ | १५.१ | ४.२ | २३९ |
| ३३–३७ | ३२.७ | ४८.४ | १३.२ | ५.७ | १५९ | ३.८ | ४.५ | १३.४ | ७८.३ | १६० | २६.६ | ५४.८ | १५.३ | ३.४ | १७८ |
| ३८– | ४१.७ | ४५.६ | ८.६ | ४.१ | ७४० | ४.२ | ४.४ | २४.७ | ६६.७ | ६७८ | ४०.१ | ४९.१ | ९.५ | १.३ | ६३३ |
| एकूण | ३३.८ | ४६.१ | १३.७ | ६.३ | १८०५ | ४.६ | ५.६ | १९.६ | ७०.२ | १७३८ | ३१.५ | ४९.७ | १५.८ | २.९ | १८४० |
| | | | **मिठबाव** | | | | | **मुखलगी** | | | | | **नालवार** | | |
| –१३ | — | — | — | — | — | माहिती मिळाली नाही | | | | | माहिती मिळाली नाही | | | | |
| १३–१७ | — | ९.५ | ५२.४ | ३८.१ | २२ | १३.८ | ३१.१ | ३२.४ | ०.७ | १५५ | १८.५ | ५१.६ | २९.३ | ०.६ | ३४१ |
| १८–२२ | ०.६ | ८.८ | ३२.७ | ५७.९ | १६३ | २६.१ | ३५.२ | ३४.७ | ४.० | २०८ | १९.५ | ४९.९ | २९.१ | १.५ | ३८९ |
| २३–२७ | १.० | १३.२ | ४२.९ | ४२.९ | २०९ | ३५.४ | ३३.५ | २६.१ | ५.० | १७३ | १७.७ | ४९.१ | ३०.४ | २.८ | ३२४ |
| २८–३२ | १.१ | २६.० | ३५.९ | ३७.० | १८३ | ४५.४ | २९.० | २४.० | १.६ | १९७ | २१.० | ५३.६ | २२.९ | २.६ | २६९ |
| ३३–३७ | १.३ | ३०.० | ३६.९ | ३१.९ | १५८ | ४७.४ | ३४.५ | १५.५ | २.६ | १२२ | ३१.७ | ४७.१ | १९.५ | १.८ | २२२ |
| ३८– | ८.१ | ५४.७ | २६.९ | १०.३ | ९०३ | ५६.१ | ३५.५ | ८.२ | ०.२ | ४८० | ३४.१ | ४९.० | १५.८ | १.२ | ८६५ |
| एकूण | ४.९ | ३८.७ | ३१.८ | २४.६ | १६३८ | ४३.९ | ३३.६ | २०.६ | १.९ | १३३५ | २५.६ | ४९.८ | २३.० | १.६ | २४११ |

गेल्या कांही वर्षांतच वाढलें आहे. या केंद्रावर मुंबई शहराचा विशेष प्रभाव पडत असल्याचा उल्लेख मागे येऊन गेलाच आहे. तेव्हां गेल्या कांही वर्षांत येथे लग्नाचें वय जें बऱ्याच प्रमाणांत वाढलेलें दिसतें, तें मुंबई शहराच्या या प्रभावामुळे व या केंद्रांत दिसून येणाऱ्या स्त्रियांच्या वाढत्या शिक्षणामुळे असावें असें दिसतें. बोरी येथेहि १६ वर्षांवरील वयांत लग्न झालेल्यांचें प्रमाण प्रौढ वय-गटांपेक्षां तरुण वय-गटांत अधिक दिसून येतें. त्यामुळे येथेहि लग्नाचें थोडेसें वाढलेलें वय गेल्या कांही वर्षांतीलच आहे असें दिसतें. परंतु १६ व्या वर्षी किंवा त्या वर्षावरील वयांत लग्न करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण बोरी येथे तरुण वय-गटांतहि जरा कमीच दिसून येतें. त्यामुळे वाढत्या वयांतील लग्नांची प्रथा तेथे आजहि विशेष प्रमाणांत आहे असें म्हणतां येणार नाही. उरलेल्या तीन केंद्रांत हें प्रमाण अजूनहि फार थोडें आहे आणि वाढत्या वयांतील स्त्रियांचें लग्न हें तेथे अजूनहि अपवादात्मकच आहे.

बालविवाहाला किंवा १४ वर्षाखालील मुलींच्या लग्नाला एक वेगळेंच महत्त्व आहे. कारण ' १९२९ चा सारडा कायदा ' या नांवाने प्रसिद्ध असलेल्या एका जुन्या कायद्यानुसार अशा लग्नांना प्रतिबंध केला गेला आहे. या कायद्याचें स्वरूप शिफारसवजा आहे आणि प्रत्यक्षांतहि त्याचा कांही विशेष परिणाम झालेला दिसून आला नाही. हा कायदा पास झाल्यानंतर या कायद्याचा भंग करून किती लग्नें झालीं हें पाहण्यासाठी, आमच्या पाहणींत एकूण नोंदल्या गेलेल्या व १९२९ नंतर झालेल्या लग्नांपैकी, बालविवाहांचें प्रमाण केवढें आहे याचा अजमास घेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. याशिवाय गेल्या कांही वर्षांत या परिस्थितींतहि कांही सुधारणा झाली आहे की काय हें अजमावण्यासाठी, गेल्या तीन वर्षांत झालेल्या लग्नांत बालविवाहांचें प्रमाण केवढें आहे हें पाहण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांतून निघालेले निष्कर्ष तक्ता क्रमांक ४·३ यामध्ये दाखविलेले आहेत.

**तक्ता क्रमांक ४·३**

**एकूण झालेल्या विवाहांमध्ये बालविवाहांचे शेकडा प्रमाण**

**(१) १९२९ पासून व (२) गेल्या तीन वर्षांतील**

| केंद्र | एकूण विवाहांमध्ये बालविवाहांचें शेकडा प्रमाण | |
|---|---|---|
| | १९२९ पासून झालेले | गेल्या तीन वर्षांत झालेले |
| बोरी | ७९.४ | ४७.९ |
| धानोरें | ९.९ | ८.८ |
| मिरजगांव | ८३.७ | ५७.१ |
| मिठबाव | २६.६ | ०.८ |
| मुदलगी | ८२.२ | माहिती नाही |
| नालवार | ८३.२ | माहिती नाही |

यावरून असें दिसून येईल की, धानोरें व मिठबाव वगळून इतर चार केंद्रांत १९२९ नंतर झालेल्या लग्नांपैकी शेकडा ८० बालविवाह होते. परंतु बोरी व मिरजगांव येथे आलेल्या अनुभवावरून या बाबतींत एकंदरींत सगळीकडे सध्या सुधारणा होत आहे, असें दिसून येतें. या दोन केंद्रांत गेल्या तीन वर्षांत झालेल्या लग्नांपैकी शेकडा ५० च बालविवाह होते. मुदलगी व नालवार येथील

परिस्थिति अजमावतां आली नाही. परंतु येथेहि बालविवाहांचें प्रमाण कमी झालें असावें. धानोऱ्यास बालविवाहांचें प्रमाण पूर्वीहि फारसें नव्हतें. परंतु तेवढें प्रमाण मात्र अजूनहि कमी झाल्याचें दिसून येत नाही. आजहि तेथे एकूण झालेल्या लग्नांपैकी शेकडा १० हे बालविवाह असतात. याच्या उलट मिठबाव येथे गेल्या कांही वर्षांत या बाबतींतील सुधारणा अगदी ठळक आहे. सध्या तेथे बालविवाह अगदी अपवाद म्हणूनच दिसून येतो. मुंबई शहराचा या केंद्रावरील फार मोठा प्रभाव पूर्वी उल्लेखिलेला आहेच. परंतु बोरी व मिरजगांव येथेहि बालविवाहाचें प्रमाण बरेंच घटलेलें आढळतें. तेव्हां बाहेरच्या जगाशी होणारें दळणवळण व एकंदर शिक्षणाचा प्रसार यांच्यामुळे ही घट मुख्यतः घडून आली असावी, असें म्हणतां येईल. सारडा कायद्यामुळेच बालविवाहांतील ही घट घडून आली, असें म्हणतां येणार नाही. कारण प्रत्यक्ष व्यवहारांत या कायद्याचा विसर पडलेला आहे असेंच दिसून येतें.

एकदा लग्न झाल्यानंतर बहुसंख्य स्त्रिया साहजिकच विवाहित स्थितींतच असलेल्या दिसल्या, पण कांही विधवा झाल्या, कांहींचा घटस्फोट झाला, व कांही नवऱ्यापासून वेगळ्या राहूं लागल्या. घटस्फोटाचीं किंवा वेगळें राहण्याचीं उदाहरणें फारशीं दिसलीं नाहीत. पण याबद्दल पुढे माहिती देऊं. क्रमांक ४·४ या तक्त्यांत किमान एकदा तरी लग्न झालेल्या स्त्रियांमध्ये किमान एकदा तरी विधवा झालेल्या स्त्रियांचें काय प्रमाण आहे, हें दाखविलें आहे. किमान एकदा विधवा झालेल्या म्हणजे ज्यांनी एकदा तरी वैधव्य अनुभवलें अशा; मग त्यांनी नंतर पुनर्विवाह केलेला असो की नसो. या तक्त्यावरून हें दिसून येईल की, किमान एकदा विवाह झालेल्या स्त्रियांशीं किमान एकदा वैधव्य आलेल्यांचें प्रमाण बोरी येथें शेकडा ३१.४, मुदलगी येथे शेकडा ३२.२ आणि नालवार येथे शेकडा ३३.८ होतें. या तीन केंद्रांतील प्रत्येक वय-गटांतील किमान एकदा वैधव्य आलेल्यांचें प्रमाण पाहिलें, तर तें मुदलगीपेक्षा नालवार येथे अधिक आहे व बोरीपेक्षा मुदलगी येथे अधिक आहे. किमान एकदा विवाह झालेल्या एकूण स्त्रियांमध्ये किमान एकदा वैधव्य आलेल्यांचें प्रमाण मिठबाव येथे सर्वांत जास्त म्हणजे शेकडा ३८.९ एवढें होतें. परंतु या केंद्रांत म्हाताऱ्या स्त्रियांची बरीच मोठी संख्या असल्यामुळे हें प्रमाण मोठें दिसत असावें. वस्तुतः प्रत्येक वय-गटांतील किमान एकदा वैधव्य आलेल्यांचें या केंद्रांतील प्रमाण जर आपण तपासून पाहिलें, तर तें बोरीपेक्षाहि कमी असलेलें दिसून येतें. मिठबाव येथील सर्वांत लहान वय-गटांतील किमान एकदा वैधव्य आलेल्यांचें मोठें प्रमाण विशेष लक्षांत घेण्यासारखें नाही. कारण या वय-गटांतील फारच थोड्या जणींची नमुन्यादाखल पाहणी केलेली होती. वेगवेगळ्या वय-गटांतील विधवांचें प्रमाण मिरजगांव येथे कमी होतें व धानोरें येथे तें बरेंच कमी होतें. धानोरें केंद्रांत लग्नाचें वय मोठें असल्यामुळे विधवांचें प्रमाण इतकें कमी असावें. मिठबाव येथील विधवांचें कमी प्रमाण हेंहि या कारणामुळेच असावें. परंतु मिरजगांव येथील विधवांचें कमी प्रमाण, हें मात्र या वरील कारणामुळे आहे असें म्हणतां येणार नाही.

विधवा झालेल्या स्त्रियांपैकी कांहींनी नंतर पुनर्विवाह केले. क्रमांक ४·५ या तक्त्यामध्ये विधवांपैकी ज्यांनी पुनर्विवाह केले, त्यांचें प्रमाण दिलें आहे. धानोरें येथे हें प्रमाण सर्वांत अधिक म्हणजे शेकडा ३७.५ एवढें होतें. एकंदरीने धानोरें या केंद्रांत स्त्रियांच्या वैवाहिक स्थितीसंबंधीचे बरेच वेगळे विशेष दिसून आले. विवाहाचें वाढतें वय, यामुळेच वैधव्याचें दिसून येणारें कमी प्रमाण आणि विधवांपैकीं बऱ्याच जणींचे पुनर्विवाह झाल्यामुळे, एकंदर विधवांच्या संख्येंत दिसून येणारी अधिक घट, हे असे धानोऱ्यांतील वेगळे विशेष आहेत. याच्या उलट मिठबाव येथे विधवांचे पुनर्विवाह जवळजवळ मुळीच आढळले नाहीत. लग्नाचें वाढतें वय हा विशेष याहि केंद्राचा होता, परंतु येथे विधवांचें प्रमाण धानोऱ्याइतकें कमी नव्हतें आणि येथ विधवांचे पुनर्विवाह मुळीच

## तक्ता क्रमांक ४·४

### किमान एक विवाह झालेल्या स्त्रियांशी किमान एक वैधव्य आलेल्या स्त्रियांचें प्रमाण

| वय-गट | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुबलगी | | नालवार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या | किमान एक वैधव्य आलेल्या शेकडा | किमान एक विवाह झालेल्या एकूण संख्या |
| —१७ | २.२ | २२४ | — | ६५ | १.५ | ३४० | ९.१ | २२ | २.७ | २२७ | ४.४ | ४३२ |
| १८—२७ | ८.८ | ५०९ | ६.१ | ५९२ | ५.७ | ५६३ | ७.६ | ३७२ | ११.५ | ३९१ | १६.२ | ७५० |
| २८—३७ | २१.७ | ४३८ | १६.९ | ४०२ | १८.० | ४१७ | २१.६ | ३४२ | २८.० | ३२१ | २६.२ | ५१९ |
| ३८—४७ | ३८.५ | २८६ | १९.४ | ३३५ | ३७.४ | ३२१ | ३६.५ | २८८ | ४५.० | २०९ | ५०.३ | ४१४ |
| ४७— | ७६.२ | ४५४ | ५०.९ | ३४४ | ६७.७ | ३१६ | ६९.८ | ६१४ | ७८.८ | २८८ | ८०.२ | ४९५ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ३१.४ | १९११ | १९.८ | १७३८ | २२.७ | १९५७ | ३८.९ | १६३८ | ३२.२ | १४३६ | ३३.८ | २६१० |

तक्ता क्रमांक ४·५

**किमान एकदा विधवा झालेल्यांमध्ये पुनर्विवाहितांची शेकडेवारी**

| वय-गट | बोरी | | थानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुदलगी | | नालवार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | पुनर्विवाहित शेकडा | किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या |
| —१७ | २०.०० | ५ | — | — | ४०.०० | ५ | — | २ | ३३.३३ | ६ | ५७.८९ | १९ |
| ८—२७ | ६८.८९ | ४५ | ७५.०० | ३६ | ५६.२५ | ३२ | ३.५७ | २८ | ७३.३३ | ४५ | ५९.८४ | १२२ |
| २८—३७ | ५६.८४ | ९५ | ६१.७६ | ६८ | ४०.०० | ७५ | १.३५ | ७४ | ६०.०० | ९० | ३८.९७ | १३६ |
| ३८—४७ | २४.७७ | १०९ | ५३.८५ | ६५ | १८.३३ | १२० | — | १०५ | ४१.४९ | ९४ | २२.६० | २०८ |
| ४८— | ८.३८ | ३४६ | १४.२९ | १७५ | ८.६१ | २१३ | ०.४७ | ४२९ | ७.९३ | २२७ | ६.८२ | ३१७ |
| एकूण | २३.६७ | ६०० | ३७.५० | ३४४ | २०.२२ | ४४५ | ०.६७ | ६३८ | ३१.६० | ४६२ | २३.९२ | ८८२ |

झाले नसल्यामुळे हें प्रमाण घटलें नाही. इतर केंद्रांमध्ये विधवांच्या पुनर्विवाहाचें प्रमाण मुदलगी येथे शेकडा ३१.६, बोरी येथे शेकडा २३.७, नालवार येथे शेकडा २३.९ आणि मिरजगांव येथे शेकडा २०.२ असें होतें. आपण जर वेगवेगळ्या वय-गटांतील विधवांमधील पुनर्विवाहाचें प्रमाण तपासलें, तर आपल्याला असें दिसून येईल कीं, मिठबाव हें केंद्र वगळल्यास, इतर केंद्रांत २८ वर्षांच्या वयापूर्वी विधवा झालेल्यांपैकी शेकडा ६० ते ७५ जणींनी पुनर्विवाह केले होते. विधवांमधील २८–३७ या वय-गटांतील पुनर्विवाहितांचें प्रमाण शेकडा ४० ते ६० पर्यंत होतें व पुढील ३८–४७ या वय-गटांत तें प्रमाण शेकडा २० ते ४० पर्यंत होतें.

विधवांच्या पुनर्विवाहाचें प्रमाण जातिभिन्नत्वामुळे वेगवेगळें दिसून येतें कां हें तपासून पाहणें मनोरंजक ठरेल. तक्ता क्रमांक ४·६ यामध्ये याबद्दलची माहिती दिलेली आहे. त्यावरून हें दिसून येईल की, सामान्यतः तथाकथित उच्च जातींमध्ये व कारागिरांच्या जातींमध्ये विधवांचे पुनर्विवाह हे मध्यम हिंदू जातींच्या आणि वर्गीकृत व मागासलेल्या जातींच्या मानाने बरेच कमी आढळतात.

घटस्फोटांचें व विभक्त होणाऱ्यांचें प्रमाण एकंदरीने कमी असल्याबद्दलचा उल्लेख मागे आलेलाच आहे. क्रमांक ४·७ या तक्त्यामध्ये एकूण विवाहित व पुनर्विवाहित स्त्रियांपैकी घटस्फोट घेतलेल्यांचें व विभक्त राहणाऱ्यांचें शेकड्यांत प्रमाण दिलेलें आहे. याशिवाय या वर्गांत संशयित वैवाहिक स्थिति असणाऱ्या, वेश्या व रखेल्या यांचाहि समावेश आम्ही केला आहे. धानोरें, मिठबाव व बोरी येथे या वर्गांतील स्त्रियांचें प्रमाण शेकडा २ ते ३ एवढें होतें. मिरजगांव व नालवार येथे तें शेकडा ४ ते ५ असें होतें. परंतु मुदलगी येथे मात्र हें प्रमाण बरेंच मोठें म्हणजे शेकडा ८ एवढें होतें. हें प्रमाण एवढें मोठें असण्याचें एक कारण म्हणजे मुदलगी येथें असणारी वेश्यांची बरीच मोठी संख्या हें होय. या भागांत प्रचलित असलेल्या (देवदासी) प्रथेप्रमाणें या स्त्रियांचें लग्न प्रथम एका विशिष्ट देवाशी लावलें जातें व नंतर त्या देवापासून घटस्फोट घेऊन त्या वेश्याव्यवसाय करतात असें सांगण्यांत आलें.

आतां आपण वेगवेगळ्या केंद्रांतील पुरुषांच्या वैवाहिक स्थितीची तपासणी करूं. क्रमांक ४·८ या तक्त्यांत वेगवेगळ्या केंद्रांतील वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित पुरुषांचें प्रमाण दाखविलें आहे. स्त्रियांच्या वैवाहिक स्थितीबद्दल जो एक ठळक विशेष धानोरें व मिठबाव या दोन केंद्रांत दिसून आला, तोच पुरुषांच्या वैवाहिक स्थितीबद्दलहि आढळून येतो. इतर चार केंद्रांपेक्षा हीं दोन केंद्रें या विशेषामुळे ठळक उठून दिसतात. इतर केंद्रांपेक्षां या दोन केद्रांत वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित पुरुषांचें प्रमाण बरेंच मोठें होतें. तरीहि धानोऱ्यापेक्षां मिठबाव येथेंच सगळ्या वय-गटांतून अविवाहित पुरुषांची बरीच मोठी संख्या आढळली. उदाहरणार्थ, १८–२२ वय-गटांतील अविवाहित पुरुषांचें प्रमाण मिठबाव येथे शेकडा ९५ एवढें मोठें होतें. धानोरें येथे हें प्रमाण फक्त शेकडा ५३ एवढें होतें व इतर केंद्रांत तर तें शेकडा ४८ पासून शेकडा ३०.५ पर्यंत होतें. त्याचप्रमाणे यापुढील २३–२७ या वय-गटांत मिठबाव येथे शेकडा ३२.९ एवढे पुरुष अविवाहित होते. धानोऱ्यास हें प्रमाण केवळ शेकडा ८.६ होतें व इतर केंद्रांपेक्षा तें अधिक नव्हतें. इतर केंद्रांत हें प्रमाण शेकडा ४.० ते १६.१ पर्यंत असें वेगवेगळें होतें. यावरून हें स्पष्ट दिसून येईल की, इतर चार केंद्रांहून धानोरें हें जरी या बाबतींत विशेष वेगळें नसलें, तरी मिठबाव हें केंद्र मात्र वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित पुरुषांच्या संख्येमुळे इतरांपेक्षा अगदी निराळें असलेलें दिसून येतें. पुरुषांमधील हें विशेष वाढलेलें लग्नाचें वय, हा मुंबई शहराशी असलेल्या त्या केंद्राच्या सतत दळणवळणाचा परिणाम आहे.

तक्ता क्रमांक ४·६

वेगवेगळया जातींतील किमान एकदा विधवा झालेल्या स्त्रियांमध्ये पुर्नविवाहितांची शेकडेवारी

| जात किंवा जमात | बोरी: पुर्नविवाहित शेकडा | बोरी: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | धानोरें: पुर्नविवाहित शेकडा | धानोरें: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | मिरजगांव: पुर्नविवाहित शेकडा | मिरजगांव: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | मिठबाव: पुर्नविवाहित शेकडा | मिठबाव: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | मुबलगी: पुर्नविवाहित शेकडा | मुबलगी: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | नालवार: पुर्नविवाहित शेकडा | नालवार: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या | सहा केंद्रें एकत्रित: पुर्नविवाहित शेकडा | सहा केंद्रें एकत्रित: किमान एकदा विधवा झालेल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब्राह्मण | ०.० | १८ | — | — | ०.० | ७ | ०.० | १० | ०.० | ८ | ०.० | ५ | ०.० | ४८ |
| पुढारलेले हिंदू | १४.३ | ३५ | ०.० | २ | १०.० | ४० | ०.० | ८ | ०.० | ६ | ५.६ | १८ | ९.२ | १०९ |
| मराठा | १५.१ | १६५ | ३७.५ | ८ | ११.६ | १२९ | ६.१ | ३२८ | २०.० | १५ | ०.० | ४ | ७.४ | ६४९ |
| मध्यम हिंदू (कारागीर) | २२.२ | ३६ | ६०.० | ५ | १५.० | २० | ०.० | ६ | २०.० | १० | ५.९ | १७ | १८.१ | ९४ |
| मध्यम हिंदू (उरलेले) | २६.७ | १३५ | ५५.० | २० | २३.९ | ९२ | ७.७ | २६० | ३६.९ | ३३३ | २४.३ | ३७१ | २३.६ | १२११ |
| महार | ४०.२ | ८२ | ३८.९ | १८ | ३५.४ | ४८ | ०.० | २६ | — | — | ३१.४ | १०५ | ३२.३ | २७९ |
| मांग, ढोर, भंगी वगैरे | २६.७ | ३० | ५०.० | ८ | ३४.३ | ७० | — | — | १७.६ | १७ | ०.० | ६ | २९.८ | १३१ |
| मागासलेले व आदिवासी | ४७.५ | ४० | ३६.५ | २७७ | २०.० | १५ | — | — | १६.२ | ३७ | २७.५ | १७८ | ३२.५ | ५४७ |
| हिंदूंखेरीज इतर | १३.६ | ५९ | ०.० | ६ | ८.३ | २४ | — | — | २५.० | ३६ | २०.८ | १७८ | १८.५ | ३०३ |
| एकूण | २३.८ | ६०० | ३७.५ | ३४४ | २०.३ | ४४५ | ६.४ | ६३८ | ३१.७ | ४६२ | २४.१ | ८८२ | २१.५ | ३३७१ |

तक्ता क्रमांक ४·७

सर्व विवाहित व पुनर्विवाहित स्त्रियांमध्ये घटस्फोट घेतलेल्या, विभक्त झालेल्या वगैरे स्त्रियांची शेकडेवारी

| वय-गट | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुबलगी | | नालवार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित | घट-स्फोटित, विभक्त व इतर शेकडा | एकूण विवाहित |
| —१७ | ०.९ | २१८ | ३.२ | ६३ | ३.७ | ३२५ | — | २० | ३.७ | २१५ | २.२ | ४१५ |
| १८—२७ | १.६ | ४८७ | २.५ | ५६९ | ५.४ | ५२१ | २.४ | ३३७ | ८.९ | ३४८ | ३.७ | ६७६ |
| २८—३७ | ३.७ | ३८३ | २.४ | ३६७ | ४.२ | ३५७ | २.७ | २६२ | ९.२ | २६१ | ७.४ | ४०६ |
| ३८—४७ | ४.६ | १९५ | ०.३ | ३०४ | ३.७ | २१५ | ५.२ | १७४ | ६.२ | १४५ | ५.४ | २४० |
| ४८— | ४.६ | १३१ | ४.९ | १८४ | ४.३ | ११६ | ५.१ | १७८ | १६.१८ | ६८ | ९.६ | ११४ |
| एकूण | २.८ | १४१४ | २.४ | १४८७ | ४.४ | १५३४ | ३.४ | ९७१ | ८.० | १०३७ | ४.८ | १८५१ |

### तक्ता क्रमांक ४·८

### वेगवेगळ्या वय-गटांतील अविवाहित पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण

| वय-गट | बोरी अविवाहित शेकडा | बोरी एकूण पुरुष | धानोरें अविवाहित शेकडा | धानोरें एकूण पुरुष | मिरजगांव अविवाहित शेकडा | मिरजगांव एकूण पुरुष | मिठवाव अविवाहित शेकडा | मिठवाव एकूण पुरुष | मुबलगी अविवाहित शेकडा | मुबलगी एकूण पुरुष | नालवार अविवाहित शेकडा | नालवार एकूण पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —१२ | ९८.९ | ११२४ | ९९.८ | १६७७ | ९९.० | १३९९ | १००.० | १००३ | १००.० | ९०३ | ९८.६ | १५२६ |
| १३—१७ | ८२.६ | १८४ | ९४.१ | ३२२ | ८०.९ | २५६ | ९९.३ | २९६ | ७४.५ | १६१ | ८५.४ | ३०१ |
| १८—२२ | ४८.० | २५६ | ५३.० | ३१७ | ३२.४ | ३०९ | ९५.० | १८२ | ३०.५ | २२६ | ४२.३ | ३४३ |
| २३—२७ | १६.१ | २१७ | ८.६ | ३०२ | ७.८ | २६९ | ३२.९ | ८८ | ४.० | १४९ | १०.८ | ३४४ |
| २८— | ३.३ | १२६० | ०.७ | १०९५ | २.८ | ११०४ | १.२ | ६४६ | ०.९ | ८१७ | २.२ | १३८८ |
| एकूण | ४८.१ | ३०४१ | ५८.७ | ३७१३ | ५२.३ | ३३३७ | ६८.० | २२१५ | ४९.० | २२५६ | ५०.६ | ३९०२ |

क्रमांक ४·९ व ४·११ या तक्त्यांमध्ये एकदा तरी लग्न झालेल्या पुरुषांविषयीचा तपशील दिला आहे. स्त्रियांच्या बाबतींत आपण जसें केलें, त्याप्रमाणें सर्व केंद्रांतील एकदा विधुर झालेल्या पुरुषांच्या प्रमाणाची तुलना करूं. क्रमांक ४·९ या तक्त्यांत वेगवेगळ्या पंचवार्षिक वय-गटांतील एकदा लग्न झालेल्या पुरुषांमध्ये एकदा विधुर झालेल्या पुरुषांचें काय प्रमाण आहे, तें दाखविलें आहे. एकदा लग्न झालेल्या पुरुषांमध्ये एकदा विधुर झालेल्यांचें प्रमाण बोरी, मिरजगांव, मुदलगी व नालवार येथे शेकडा ४५ ते ४७ च्या दरम्यान होतें. प्रत्येक वय-गटांतील या प्रमाणाची जर आपण तुलना केली, तर असें दिसून येईल की, बोरी व मुदलगीपेक्षा हें प्रमाण मिरजगांव व नालवार येथे थोडें कमी होतें. विधुरांचें प्रमाण मिठबाव येथे सर्वांत कमी होतें व धानोरें येथेहि बरेंच कमी होतें. या दोन केंद्रांत जें वाढलेलें लग्नाचें वय आहे, त्याचा हा परिणाम असावा. पण या दोन केंद्रांमधील एक भेद लक्षांत घेण्यासारखा आहे. पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे धानोरें येथे एकदा लग्न झालेल्या स्त्रियांमध्ये विधवांचें प्रमाण सर्वांत कमी होतें आणि मिठबाव येथे जरी हें प्रमाण कमी होतें, तरी धानोऱ्यापेक्षा तें बरेंच जास्त होतें. याच्या उलट एकदा लग्न झालेल्या पुरुषांमध्ये एकदा विधुर झालेल्यांचें सर्वांत कमी प्रमाण मिठबाव येथे होतें. धानोरें येथे जरी हें प्रमाण कमी असलें, तरी मिठबावपेक्षा तें बरेंच जास्त होतें.

क्रमांक ४·१० या तक्त्यामध्ये एकदा विधुर झालेल्यांमध्ये पुनर्विवाहितांचें काय प्रमाण आहे हें दाखविलें आहे. एकदा विधवा झालेल्या स्त्रियांमध्ये हें प्रमाण जसें धानोरें येथे सर्वांत अधिक होतें, व मिठबाव येथे सर्वांत कमी होतें, तसेंच पुरुषांच्या बाबतींतहि आहे. परंतु मिठबाव येथे विधवांच्या पुनर्विवाहाचें एकहि उदाहरण आढळलें नव्हतें, तरी विधुरांचे पुनर्विवाह तेथे अगदीच झालेले नव्हते असें दिसलें नाही. विधवांच्या पुनर्विवाहाच्या मानाने किमान एकदा विधुर झालेल्यां-मध्ये पुनर्विवाहाचें प्रमाण सगळीकडेच बरेंच जास्त होतें आणि सर्वच वय-गटांमध्ये असें दिसून येत होतें. परंतु विधुरांच्या व विधवांच्या पुनर्विवाहांच्या बाबतींत एक महत्त्वाचा फरक आढळला तो असा की, पुढच्या पुढच्या वय-गटांत हें पुनर्विवाहाचें प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये फार झपा-ट्याने कमी झालेलें दिसलें. याचा अर्थ असा की, स्त्रियांच्या बाबतींत पुनर्विवाहाची शक्यता अगो-दरच्या वयांत विधवा झालेल्यांमध्येच मुख्यत: दिसली. परंतु पुरुषांमध्ये मात्र ही शक्यता पुढील वयांत विधुर झालेल्यांतहि बरीच दिसून आली.

क्रमांक ४·११ या तक्त्यामध्ये, वेगवेगळ्या पंचवार्षिक वय-गटांतील विवाहित व पुन-र्विवाहित पुरुषांमध्ये घटस्फोटित व विभक्त झालेल्या पुरुषांचें प्रमाण दाखविलें आहे. सगळ्या केंद्रांमध्ये विवाहित पुरुषांमध्ये घटस्फोटित व विभक्त झालेल्या पुरुषांचें प्रमाण शेकडा २ पेक्षाहि कमी असलेलें दिसून येतें.

द्विपत्नीकत्वाचीं उदाहरणें सगळ्याच केंद्रांत आढळून आलीं. परंतु हीं उदाहरणें मिरजगांव, मिठबाव व मुदलगीपेक्षा धानोरें, बोरी व नालवार येथे जास्त प्रमाणांत आढळलीं. क्रमांक ४·१२ या तक्त्यांत, वेगवेगळ्या वय-गटांत सर्व विवाहित पुरुषांमध्ये द्विपत्नीक पुरुषांचें प्रमाण दाखविलें आहे. धानोरें येथे द्विपत्नीकत्व हें जवळजवळ सर्वसामान्य असलेलें आढळलें. येथे ३७ वर्षांवरील विवाहित पुरुषांमध्ये शेकडा १० जणांना एकाच वेळीं दोन बायका असलेल्या आढळल्या.

क्रमांक ४·१३ या तक्त्यामध्ये दोन बायका करण्यासाठी दिलेल्या कारणानुसार द्विपत्नीक पुरुषांचें वर्गीकरण केलें आहे. बऱ्याच पुरुषांना कांहीच कारण देतां आलें नाही. मिरजगांवच्या बऱ्याच द्विपत्नीक पुरुषांनी पहिल्या बायकोपासून मूल न होणें किंवा मुलगा न होणें हें कारण सांगितलें. बोरी, नालवार व धानोरें येथे मात्र दोन बायका करण्याची प्रथा बऱ्याच प्रमाणांत प्रचलित

तक्ता क्रमांक ४·९

किमान एकदा लग्न झालेल्या पुरुषांमध्ये किमान एकदा विधुर झालेल्यांचें शेकडयांत प्रमाण

| वय-गट | बोरी |  | बानोरें |  | मिरजगांव |  | मिठबाव |  | मुदलगी |  | नालवार |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या | किमान एकदा विधुर झालेले शेकडा | किमान एकदा विवाहितांची संख्या |
| —१७ | — | ४४ | — | २३ | १.६ | ६३ | — | २ | २.४ | ४१ | ३.० | ६६ |
| १८—२७ | ५.४ | ३१५ | ९.० | ४२५ | ५.५ | ४५७ | ४.५ | ६७ | ६.३ | ३०० | ८.७ | ५०५ |
| २८—३७ | २०.१ | ४५७ | १६.५ | ४६० | १२.८ | ४०७ | ६.६ | १६५ | १९.२ | ३०२ | १७.१ | ५६८ |
| ३८—४७ | ३४.० | ३९१ | २५.३ | २९३ | २७.५ | २८० | १८.५ | १३५ | ३५.३ | २५२ | २६.३ | ३७२ |
| ४८— | ४७.२ | ३६८ | ३९.५ | ३३४ | ४६.८ | ३८५ | ३०.८ | ३३८ | ४६.१ | २५६ | ४५.१ | ४१७ |
| एकूण | २६.४ | १५७५ | २०.८ | १५३५ | २१.१ | १५९२ | २०.२ | ७०७ | २४.७ | ११५१ | २२.२ | १९२८ |

तक्ता क्रमांक ४·१०

किमान एकदा विधुर झालेल्यांमध्ये पुनर्विवाहित पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण

| वय-गट | बोरी पुनर्विवाहित शेकडा | बोरी किमान एकदा विधुर | धानोरें पुनर्विवाहित शेकडा | धानोरें किमान एकदा विधुर | मिरजगांव पुनर्विवाहित शेकडा | मिरजगांव किमान एकदा विधुर | मिठबाव पुनर्विवाहित शेकडा | मिठबाव किमान एकदा विधुर | मुडलगी पुनर्विवाहित शेकडा | मुडलगी किमान एकदा विधुर | नालवार पुनर्विवाहित शेकडा | नालवार किमान एकदा विधुर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —१७ | — | — | — | — | १००.०० | १ | — | — | — | १ | — | २ |
| १८—२७ | ६४.७१ | १७ | ८६.८४ | ३८ | ६०.०० | २५ | ३३.३३ | ३ | ७८.९५ | १९ | ७०.४५ | ४४ |
| २८—३७ | ८१.५२ | ९२ | ९२.११ | ७६ | ८४.६२ | ५२ | ६३.६४ | ११ | ८७.९३ | ५८ | ७९.३८ | ९७ |
| ३८—४७ | ७३.६८ | १३३ | ९३.२४ | ७४ | ८५.७१ | ७७ | ६८.०० | २५ | ८८.७६ | ८९ | ७४.४९ | ९८ |
| ४८— | ५४.०२ | १७४ | ६७.४२ | १३२ | ५३.८९ | १८० | ४३.२७ | १०४ | ६३.५६ | ११८ | ४८.४० | १८८ |
| एकूण | ६६.८३ | ४१६ | ८१.५६ | ३२० | ६६.५७ | ३३५ | ४८.९५ | १४३ | ७७.१९ | २८५ | ६३.४० | ४२९ |

तक्ता क्रमांक ४.११

विवाहित व पुनर्विवाहित पुरुषांमध्ये घटस्फोटित व विभक्त झालेल्या पुरुषांचें शेकडयांत प्रमाण

| वय-गट | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुदलगी | | नासवार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित | घटस्फोटित व विभक्त शेकडा | एकूण विवाहित |
| —१७ | — | ४४ | १५.० | २० | १.६ | ६२ | — | २ | — | ४० | — | ६४ |
| १८—२७ | २.० | ३०३ | १.२ | ४१५ | १.४ | ४४१ | १.६ | ६४ | ०.३ | २९५ | १.२ | ४८६ |
| २८—३७ | १.६ | ४३३ | ०.७ | ४५१ | ३.१ | ३८७ | ३.२ | १५६ | ३.१ | २८६ | ०.५ | ५४५ |
| ३८—४७ | २.० | ३४९ | ०.३ | २८७ | २.३ | २६३ | ३.३ | १२३ | १.७ | २३८ | १.५ | ३४२ |
| ४८— | ०.३ | २८७ | १.० | २८८ | १.३ | २९८ | ०.७ | २७७ | १.९ | २०९ | ०.६ | ३१८ |
| एकूण | १.५ | १४१६ | १.० | १४६१ | २.० | १४५१ | १.९ | ६२२ | १.८ | १०६८ | ०.९ | १७५५ |

तक्ता क्रमांक ४·१२

एकूण विवाहित पुरुषांमध्ये द्विपत्नीक पुरुषांचें शेकड्यांत प्रमाण

| वय-गट | बोरी द्विपत्नीक पुरुष शेकडा | बोरी विवाहित पुरुष | धानोरें द्विपत्नीक पुरुष शेकडा | धानोरें विवाहित पुरुष | मिरजगांव द्विपत्नीक पुरुष शेकडा | मिरजगांव विवाहित पुरुष | मिठबाव द्विपत्नीक पुरुष शेकडा | मिठबाव विवाहित पुरुष | मुबलगी द्विपत्नीक पुरुष शेकडा | मुबलगी विवाहित पुरुष | मालवार द्विपत्नीक पुरुष शेकडा | मालवार विवाहित पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —१७ | — | ४४ | — | २० | — | ६२ | — | २ | — | ४० | — | ६४ |
| १८—२७ | २.० | ३०३ | ०.७ | ४१५ | ०.२ | ४४१ | — | ६४ | — | २९५ | १.२ | ४८६ |
| २८—३७ | २.३ | ४३३ | ४.० | ४५१ | १.३ | ३८७ | — | १५६ | ०.७ | २८६ | ४.१ | ५४५ |
| ३८—४७ | ४.० | ३४९ | ९.१ | २८७ | ३.० | २६३ | १.६ | १२३ | २.१ | २३८ | ३.५ | ३४२ |
| ४८— | ४.२ | २८७ | १०.४ | २८८ | ३.७ | २९३ | १.१ | २७७ | १.९ | २०९ | ३.५ | ३१८ |
| एकूण | ३.० | १४१६ | ५.३ | १४६१ | १.७ | १४५१ | ०.८ | ६२२ | १.० | १०६८ | ३.२ | १७५५ |

## तक्ता क्रमांक ४·१३

### सांगितलेल्या कारणानुसार द्विपत्नीकांचें विभाजन

| कारणें | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिल्या पत्नीपासून मूल नसणें | ३ | ९ | १० | १ | — | ३ | २६ |
| मुलगा नसणें | २ | ३ | ६ | १ | — | १ | १३ |
| पहिल्या पत्नीशीं पटत नसणें | १ | १ | — | — | — | १ | ३ |
| पहिली पत्नी अल्पवयी | ४ | — | १ | — | — | १ | ६ |
| पहिली पत्नी आजारी किंवा पंगू असणें | — | १ | — | १ | — | १ | ३ |
| शेतकामाच्या मदतीसाठी | — | २८ | — | — | — | — | २८ |
| कारण दिलें नाही | ३२ | ३५ | ८ | २ | ११ | ४९ | १३७ |
| एकूण संख्या | ४२ | ७७ | २५ | ५ | ११ | ५६ | २१६ |

## तक्ता क्रमांक ४·१४

### जातीप्रमाणे द्विपत्नीकांचें विभाजन

| | द्विपत्नीकांची संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जात | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार | एकूण |
| ब्राह्मण | १ | — | — | — | — | — | १ |
| पुढारलेले हिंदू | ३ | — | १ | — | — | १ | ५ |
| मराठा | ११ | — | ९ | ५ | — | — | २५ |
| मध्यम हिंदू (कारागीर) | २ | ४ | — | — | ९ | १९ | ३४ |
| मध्यम हिंदू (उरलेले) | ५ | २ | ४ | — | ९ | १९ | ३९ |
| महार | १० | १ | २ | — | — | ७ | २० |
| मांग, ढोर, भंगी वगैरे | ५ | — | ६ | — | — | — | ११ |
| मागासलेले व आदिवासी | ४ | ७४ | २ | — | — | १८ | ९८ |
| हिंदूंखेरीज इतर | १ | — | १ | — | २ | ११ | १५ |
| एकूण | ४२ | ८१ | २५ | ५ | २० | ७५ | २४८ |

असल्यामुळे कारण देण्याची कोणाला गरज वाटली नाही. तरी दोन बायका असणें हें शेतीच्या कामाला उपयोगी पडतें, असें धानोरें येथे पुष्कळांनी सांगितलें. बोरी येथे १२ उदाहरणें अशीं आढळलीं की, ज्यांत पुरुषांनी प्रथम अगदी लहान मुलीशी लग्न केलें होतें. पण त्या फारच लहान असल्यामुळे त्यांनी नंतर दुसरें लग्न केलें. पहिली बायको वयांत येईपर्यंत आपल्या आईबापांजवळ राहिली व वयांत आल्यावर नवऱ्याकडे जाऊन सवतीबरोबर राहूं लागली.

क्रमांक ४·१४ या तक्त्यामध्ये द्विपत्नीक पुरुषांचें वर्गीकरण जातींप्रमाणे केलें आहे. द्विपत्नीकत्वाचीं उदाहरणें जरी सर्व जातींमध्ये आढळलीं, तरी धानोऱ्याच्या भिल्लांमध्ये आणि मुदलगी व नालवार येथील लिंगायतांमध्ये तीं बरींच जास्त आढळलीं. नालवार येथे मुसलमान व लमाण यांच्यांतहि द्विपत्नीकत्वाचें प्रमाण बरेंच आढळलें. बोरी व मिरजगांव येथे मराठयांत व वर्गीकृत जमातीमध्ये द्विपत्नीकत्वाचीं उदाहरणें आढळलीं. अलीकडे, म्हणजे १९४६ मध्ये हिंदूंमधील द्विपत्नीकत्वाला प्रतिबंधक असा कायदा मुंबई सरकारने पास केला. या कायद्यामुळे की काय कोण जाणे पण गेल्या कांही वर्षांत द्विपत्नीकत्वाचीं उदाहरणें बरींच कमी आढळलीं. उदाहरणार्थ, या पाहणीच्या अगोदरच्या तीन वर्षांमध्ये झालेल्या लग्नासंबंधीची जी आम्ही वेगळी पाहणी केली, तिच्यांत द्विपत्नीकत्वाचें एकहि उदाहरण आढळलें नाही.

क्रमांक ४·१५ या तक्त्यामध्ये नवराबायकोच्या वयांमधील अंतर दाखविणारी माहिती दिली आहे. या तक्त्यांत एकदा विवाहित झालेल्या स्त्रियांचें दशवार्षिक वय-गटांत विभाजन केलें आहे. आणि नवराबायकोच्या वयांतल्या अंतराप्रमाणे तितक्या वर्षांच्या गटांत त्यांचें वर्गीकरण केलें आहे. धानोरें व मिठबाव येथील लोकांत अनेक बाबतींत जसा फरक दिसून आला, तसा तो येथेहि दिसून आला. धानोऱ्यास नवराबायकोच्या वयांतील अंतर कमी आहे. उलट, मिठबाव येथे तें बरेंच आहे. उदाहरणार्थ, धानोऱ्यांतील स्त्रियांपैकी शेकडा ८३.५ एवढया जणींच्या बाबतींत हें अंतर ६ वर्षें किंवा त्याहून कमी होतें. उलट मिठबाव येथे फक्त शेकडा ३२.८ एवढयाच स्त्रियांच्या बाबतींत एवढें कमी अंतर आढळलें. दुसऱ्या टोकाला, धानोऱ्यास शेकडा ३.९ एवढया स्त्रियांच्याच बाबतींत हें अंतर १५ वर्षें किंवा त्याहून अधिक होतें. परंतु मिठबाव येथे शेकडा १८.६ एवढया स्त्रियांच्या बाबतींत एवढें मोठें अंतर होतें. नवराबायकोच्या वयांतील फार मोठें अंतर हें मिठबाव येथील विधवांचें प्रमाण बरेंच मोठें असण्याचें एक कारण असावें. यामुळेच मिठबाव येथे लग्नाचें वय बरेंच मोठें असूनहि विधवांचें तेथील प्रमाण धानोऱ्यापेक्षा कमी नव्हतें.

या तक्त्यावरून आणखी एक गोष्ट लक्षांत येते ती अशी की, प्रौढ स्त्रियांच्या मानाने तरुण स्त्रियांच्या बाबतींत नवराबायकोमधील अंतर कमी आढळतें. ही स्थिति धानोऱ्याखेरीज इतर केंद्रांत सारखीच असलेली दिसून आली. उदाहरणार्थ, इतर सर्व केंद्रांत तरुण वय-गटांतील नवराबायकोंत ६ किंवा त्याहून कमी वर्षांचें अंतर असणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण प्रौढ वय-गटांतील स्त्रियांपेक्षा बरेंच जास्त असलेलें आढळतें. गेल्या कांही वर्षांत नवराबायकोच्या वयामधील अंतर कमी होत आहे, याचाच हा पुरावा असावा. हें अनुमान सयुक्तिकहि असेल. परंतु वरील तक्ता हा एकदा लग्न झालेल्या सर्वच स्त्रियांच्या संख्येवर आधारलेला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या संख्येंत पुनर्विवाहित स्त्रिया व विधवा याहि समाविष्ट झालेल्या आहेत. पुनर्विवाहित स्त्रियांच्या बाबतींत नवराबायकोमधील अंतर हें प्रथम-विवाहित स्त्रियांपेक्षा जास्त राहण्याचीं कारणें उघड आहेत. दुसरें असें की, नवराबायकोच्या वयांतील फार मोठें अंतर हें एक वैधव्याचें कारण असल्यामुळे विवाहित स्त्रियांपेक्षा विधवांच्या बाबतींत हें अंतर जास्तच असलेलें आढळणार. ही गोष्ट क्रमांक ४·१६ या तक्त्यांत दिसून येईल. या तक्त्यांत स्त्रियांचें वर्गीकरण, एकदा विवाहित, विधवा

### तक्ता क्रमांक ४·१५

### दांपत्याच्या वयांतील अंतराप्रमाणे किमान एकदा विवाहित स्त्रियांच्या शेकडेवारीची वेगवेगळ्या वय-गटांत विभागणी

| | बोरी: नवराबायकोच्या वयांतील अंतराप्रमाणे स्त्रियांचें शेकड्यांत प्रमाण | | | | | धानोरें: नवराबायकोच्या वयांतील अंतराप्रमाणे स्त्रियांचें शेकड्यांत प्रमाण | | | | | मिरजगांव: नवराबायकोच्या वयांतील अंतराप्रमाणे स्त्रियांचें शेकड्यांत प्रमाण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वय-गट | ६ वर्षा-पर्यंत | ७ ते १० | ११ ते १४ | १५ व वरील | एकूण संख्या | ६ वर्षा-पर्यंत | ७ ते १० | ११ ते १४ | १५ व वरील | एकूण संख्या | ६ वर्षा-पर्यंत | ७ ते १० | ११ ते १४ | १५ व वरील | एकूण संख्या |
| —१७ | ५३.० | २७.४ | १३.७ | ५.९ | २२४ | ८४.२ | १०.० | २.९ | २.९ | ७१ | ६६.६ | २७.७ | ३.३ | २.४ | ३४० |
| १८–२७ | ४४.३ | ३६.१ | ९.६ | १०.० | ५०९ | ८७.३ | ८.० | २.० | २.७ | ५६६ | ५६.६ | ३१.८ | ५.७ | ५.९ | ५६३ |
| २८–३७ | ४१.९ | ३६.८ | ८.९ | १२.४ | ४३८ | ८२.८ | १०.९ | ३.० | ३.३ | ३९६ | ४४.८ | ३८.५ | ६.५ | १०.२ | ४१७ |
| ३८–४७ | ५०.९ | ३१.५ | ४.५ | १३.१ | २८६ | ८३.१ | ८.५ | ४.० | ४.४ | २४८ | ३१.३ | ४६.७ | ९.९ | १२.१ | ३२१ |
| ४८— | ५०.३ | ३४.७ | ३.४ | ११.६ | ४५४ | ७२.७ | ११.४ | ६.८ | ९.१ | १७६ | ३३.८ | ४७.७ | ९.९ | ८.६ | ३१६ |
| एकूण | ४६.९ | ३४.२ | ८.० | १०.९ | १९११ | ८३.५ | ९.४ | ३.२ | ३.९ | १४६१ | ४८.१ | ३७.४ | ६.८ | ७.७ | १९५७ |
| | मिठबाव | | | | | मुबलगी | | | | | नालवार | | | | |
| —१७ | २३.८ | ५२.४ | १४.३ | ९.५ | २२ | ५५.६ | ३०.० | ९.८ | ४.६ | १५५ | पुरेशी माहिती मिळाली नाही | | | | |
| १८–२७ | ४६.४ | ३५.८ | ७.४ | १०.४ | ३७२ | ४०.८ | ४०.५ | १०.३ | ८.४ | ३८१ | | | | | |
| २८–३७ | ३४.६ | ३४.९ | १२.१ | १८.४ | ३४२ | ३४.९ | ४०.५ | ९.९ | १४.७ | ३१९ | | | | | |
| ३८–४७ | २९.० | ३७.९ | २१.२ | ११.९ | २८८ | २४.० | ३९.८ | १७.८ | १८.४ | २०० | | | | | |
| ४८— | २५.५ | ३५.१ | १२.३ | २७.१ | ६१४ | १८.३ | ३४.३ | २०.६ | २६.८ | ५८० | | | | | |
| एकूण | ३२.८ | ३६.० | १२.६ | १८.६ | १६३८ | ३४.६ | ३८.० | १३.१ | १४.३ | १३३५ | | | | | |

### तक्ता क्रमांक ४·१६

### दांपत्याच्या वयामध्ये १५ किंवा अधिक वर्षांचें अंतर असलेल्या स्त्रियांचें प्रमाण

| वैवाहिक स्थिति | बोरी शेकडा | मिरजगांव शेकडा | मिठबाव शेकडा | मुदलगी शेकडा |
|---|---|---|---|---|
| एकदा विवाहित | ८.३ | ५.८ | १२.६ | ७.४ |
| विधवा | १३.४ | १०.३ | २७.८ | २८.२ |
| दोनदा किंवा अधिक वेळां विवाहित | २७.० | ३३.७ | ५०.० | ३१.५ |

आणि दोनदा किंवा अधिक वेळां पुनर्विवाहित अशा प्रकारें केलें आहे. या तक्त्यांत प्रत्येक वर्गांतील स्त्रियांमध्ये नवराबायकोच्या वयांत १५ पेक्षा अधिक अंतर असणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण दाखविलें आहे.

धानोरें व नालवार या केंद्रांतील या संबंधीची माहिती अपुरी असल्यामुळे ती या तक्त्यांत समाविष्ट केली नाही. या तक्त्यावरून हें स्पष्ट दिसून येईल की, नवराबायकोंत १५ पेक्षा अधिक अंतर असणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण एकदा लग्न झालेल्या स्त्रियांपेक्षा विधवांत अधिक आढळतें व दोनदा किंवा अधिक वेळां पुनर्विवाहित झालेल्यांत त्याहून अधिक आढळतें. विधवा किंवा दोन किंवा अधिक वेळां पुनर्विवाहित स्त्रिया प्रौढ वय-गटांत तरुण वय-गटांपेक्षा साहजिकच अधिक आढळतात. नवराबायकोंतील अंतर तरुण वय-गटांतील स्त्रियांत कमी झालेलें आढळतें असें जें तक्त्यावरून वाटतें तें अंशतः यामुळेच असावें व म्हणून तें बरोबर नसावें.

# ५

# विवाह

पाहणीपूर्वीच्या तीन वर्षांत या केंद्रांत जे विवाह झाले, त्यांच्या संबंधीची वेगळी पाहणी आम्ही केली, याबद्दलचा उल्लेख पूर्वी आलेला आहे. आमच्या पाहणींतल्या केंद्रांतील फक्त मध्यवर्ती खेड्यां-पुरतीच ही पाहणी मर्यादित केली होती. पाहणीपूर्वीच्या तीन वर्षांत या सहा मध्यवर्ती खेड्यांत जेवढीं लग्नें झालीं, त्या सर्वांचा समावेश पाहणींत करावा असा आमचा हेतु होता. बोरी, धानोरें व मिठबाव येथे हें काम पूर्ण झालें. पण उरलेल्या तीन खेड्यांत गेल्या तीन वर्षांतील सर्व लग्नां-संबंधीची पाहणी आम्ही करूं शकलों नाही. मिरजगांव येथल्या अन्वेषिकेनें तीन ऐवजी दोन वर्षांत झालेल्या लग्नांचीच पाहणी केली. अर्थात् हें चुकीनें घडलें. नालवार येथल्या अन्वेषिकेनें पाहणी-पूर्वीच्या एकच वर्षांतील लग्नांची माहिती मिळविली. पण तिला पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे हें झालें. मुदलगी येथील अन्वेषिकेला आजारामुळे सुट्टी घेऊन जावें लागलें, त्यामुळे तेथील या वेगळ्या पाहणीचें काम अर्धवटच सोडून द्यावें लागलें. क्रमांक ५·१ या तक्त्यामध्ये या वेगळ्या पाहणींत जेवढ्या लग्नांबद्दल माहिती मिळाली, तेवढ्यांची संख्या दिली आहे.

**तक्ता क्रमांक ५·१**

**खास पाहणींत समाविष्ट झालेल्या विवाहितांची संख्या**

| खेडें | मुलांच्या विवाहांची संख्या | मुलींच्या विवाहांची संख्या | एकूण विवाहांची संख्या |
|---|---|---|---|
| बोरी | ६७ | ५२ | ११९ |
| धानोरें | ६८ | २३ | ९१ |
| मिरजगांव | ३० | २६ | ५६ |
| मिठबाव | ६७ | ५७ | १२४ |
| मुदलगी | १२ | १४ | २६ |
| नालवार | २९ | १४ | ४३ |
| एकूण | २७३ | १८६ | ४५९ |

कुटुंबाकडून मिळालेल्या माहितीवरून मुलांचीं व मुलींचीं लग्नें असा दोन वर्गांत विवाहांची विभागणी या तक्त्यांत केली आहे. नेहमीच्या प्रथेप्रमाणे लग्नानंतर लागलीच किंवा थोड्या काळानंतर मुली आपलें माहेर सोडून सासरीं जातात. वडिलांचें घर सोडून गेल्यामुळे त्या यानंतर कुटुंबाचे घटक म्हणून राहत नाहीत. कुटुंब-सामान्य-माहिती तक्त्यामध्ये याच कारणामुळे त्यांचा

समावेश केला गेला नाही. मुलींच्या विवाहांची नोंद आमच्या पहिल्या पाहणींत केली गेली नाही, म्हणून पहिल्या पाहणींत नोंदल्या गेलेल्या विवाहांमध्ये माहिती देणाऱ्या कुटुंबांकडून मुलांच्या विवाहांचीच नोंद जास्त झालेली दिसते.

मुलांच्या व मुलींच्या विवाहांचा जर आपण एकत्र विचार केला, त्यावरून त्यांचें वार्षिक प्रमाण काढलें व एकंदर वार्षिक विवाहांच्या संख्येचा एकूण लोकसंख्येशी संबंध जोडला, तर दर वर्षाला बोरी खेरीज इतर सर्व खेड्यांत हें विवाहांचें प्रमाण १००० लोकसंख्येला ६ ते ८ एवढें पडतें असें दिसून येईल. बोरी येथे हें प्रमाण १००० लोकसंख्येला १२ एवढें असलेलें दिसून येतें.

या खास पाहणींत वधूवरांच्या खेड्यांबद्दल आम्ही चौकशी केली, विशेषतः त्यांचीं खेडीं परस्परांपासून किती दूर आहेत हें विचारलें. क्रमांक ५·२ या तक्त्यांत वधूवरांच्या खेड्यांतील अंतराप्रमाणे विवाहांचें वर्गीकरण केलें आहे.

**तक्ता क्रमांक ५·२**

**वधूवरांच्या खेड्यांतील अंतराप्रमाणे विवाहांचें विभाजन**

| मैलांत अंतर | विवाह-शेकडा |
|---|---|
| तेंच खेडें | २०.८ |
| ५ मैलांपर्यंत | १६.३ |
| ६ –१० | १८.५ |
| ११–१५ | ९.४ |
| १६–२० | ९.२ |
| २१–२५ | ४.६ |
| २६–५० | ९.२ |
| ५० पेक्षा जास्त | १२.० |
| एकूण संख्या | ४५९ |

या तक्त्यावरून हें दिसून येईल की शेकडा २१ लग्नें हीं एकाच खेड्यांतील वधूवरांत झालीं होतीं. शेकडा ३५ लग्नांतील वधूवरांच्या खेड्यांतील अंतर १० मैलांपेक्षा कमी होतें. केवळ शेकडा १२ लग्नांतील वधूवरांच्या खेड्यांतील अंतर ५० पेक्षा जास्त मैल होतें. यावरून हें स्पष्ट दिसून येईल की, आपल्या खेड्याच्या पंचक्रोशींतील वधूवरांमध्येच विवाह करण्याकडे बहुतेकांचा कल दिसून येतो. विवाह ठरवितांना दोन्ही कुटुंबांना परस्परांची पुरेशी ओळख किंवा माहिती असणें अवश्य असतें, तेव्हां हें योग्यच आहे.

बरीचशीं लग्नें त्याच खेड्यांतील मुलांमुलींत किंवा जवळच्या मुलांमुलींत होतात, ही जशी वस्तुस्थिति आहे, त्याचप्रमाणे वधूवरांच्या कुटुंबांचें परस्परांशी अगोदरचें कांही नातें असतें, हीहि वस्तुस्थिति आहे. आतेमामेभावंडें हें सर्वांत जवळचें नातें असतें. क्रमांक ५·३ या तक्त्यांत वधूवरांचें परस्परांशी किंवा त्यांच्या कुटुंबांचें परस्परांशी नातें असेल, त्याप्रमाणे तीन वर्गांत त्यांची विभागणी केली आहे. हे तीन वर्ग पुढीलप्रमाणे आहेत : (१) सख्खीं किंवा चुलत आतेमामे-

भावंडें असलेले वधूवर, (२) परस्परांशी दूरचें नातें असलेले पण कुटुंबांचा निकट परिचय असलेले वधूवर, (३) परस्परांशी नातें नसलेले किंवा कुटुंबांचा परिचय नसलेले वधूवर. विवाहांचें हें वर्गीकरण करतांना जातीप्रमाणेहि वर्गीकरण करून दिलें आहे.

**तक्ता क्रमांक ५·३**

**वधूवरांमधील पूर्वीचा आप्तसंबंध व वधूवरांची जात याप्रमाणे केलेलें विवाहांचें विभाजन**

| जात | सख्खीं किंवा चुलत आते-मामेभावंडें शेकडा | दूरचें नातें किंवा कुटुंबाचा परिचय शेकडा | पूर्वीची ओळख किंवा माहिती नसलेली शेकडा | एकूण विवाहांची संख्या |
|---|---|---|---|---|
| ब्राह्मण व इतर पुढारलेल्या जाती | ७.९ | २.६ | ८९.५ | ३८ |
| मराठा | १९.२ | १५.१ | ६५.७ | ७३ |
| कारागीर जाती | ३१.८ | १७.१ | ५१.१ | ४१ |
| इतर मधल्या जाती | १४.३ | ७.६ | ७८.१ | ११९ |
| वर्गीकृत जाती | ३२.० | १२.० | ५६.० | ५० |
| मागासलेल्या व आदिवासी जाती | १६.३ | ५.४ | ७८.३ | ९२ |
| हिंदूखेरीज इतर | २१.७ | १५.२ | ६३.१ | ४६ |
| एकूण | १९.२ | १०.० | ७०.८ | ४५९ |

यावरून हें दिसून येईल की, जवळजवळ शेकडा २० लग्नें हीं सख्ख्या किंवा चुलत आतेमामेभावंडांत झालीं होतीं व शेकडा ७० हीं पूर्वपरिचय नसलेल्या कुटुंबांमध्ये झालीं होतीं. आतेमामेभावंडांच्या लग्नाचें प्रमाण ब्राह्मणांत व पुढारलेल्या जातींत कमी दिसतें व कारागीर जातींत व वर्गीकृत जातींत तें बरेंच मोठें आढळतें. या जातींत एकूण विवाहांच्या एकतृतीयांश विवाह हे आतेमामेभावंडांत झालेले दिसले..

लग्नाची प्रथम सूचना कोणाकडून केली जाते—वधूपक्षाकडून की वरपक्षाकडून? हा प्रश्न आम्ही विचारला व ज्या २७३ कुटुंबांनी आपल्या मुलांचीं लग्नें झाल्याचें सांगितलें, त्यांतील फक्त शेकडा ३२ कुटुंबांनी लग्नाची सूचना वधूपक्षाकडून आल्याचें सांगितले. उरलेल्या विवाहांच्या बाबतींत ही सूचना वरपक्षाकडून केल्याचें सांगण्यांत आलें. त्याचप्रमाणे ज्या १८६ कुटुंबांनी आपल्या मुलींचीं लग्नें झाल्याचें सांगितलें, त्यांच्यापैकी फक्त शेकडा २७ कुटुंबांनी आपण प्रथम विवाहाची सूचना केल्याचें सांगितलें. ह्या दोन्ही पक्षांकडून मिळालेल्या माहितींत सामान्यतः सुसंगति आढळते तेव्हां यावरून असें दिसून येईल की जवळजवळ शेकडा ३० विवाहांत सूचना प्रथम वधूपक्षाकडून केली जाते व जवळजवळ शेकडा ७० विवाहांत ती वरपक्षाकडून केली जाते.

या बाबतींतील परिस्थिति सर्व जातींत सारखी नसते. क्रमांक ५·४ या तक्त्यांत वेगवेगळ्या जाति-समूहांची या दृष्टीने तुलना केली आहे. प्रत्येक जातींतील नमूद केलेल्या विवाहांमध्यें मुलीच्या पक्षाकडून विवाहाची सूचना होणाऱ्या विवाहांचें प्रमाण या तक्त्यांत दाखविलें आहे.

तक्ता क्रमांक ५·४

वधूपक्षाकडून विवाहाची सूचना आलेल्या विवाहांचें शेकडा प्रमाण

| जात | विवाहांचें शेकडा प्रमाण |
|---|---|
| ब्राह्मण व इतर पुढारलेल्या जाती | ७३.७ |
| मराठा | ४९.३ |
| कारागीर जाती | ४१.५ |
| इतर मधल्या जाती | ४०.३ |
| वर्गीकृत जाती | ८.० |
| मागासलेल्या व आदिवासी जाती | १.१ |
| हिंदूखेरीज इतर | १९.६ |
| एकूण | ३१.२ |

या तक्त्यावरून हें दिसून येईल की, ब्राह्मणांत व इतर पुढारलेल्या जातींत लग्नाची सूचना ही बहुधा वधूपक्षाकडून होते. परंतु वर्गीकृत, मागासलेल्या व आदिवासी जातींत आणि हिंदूखेरीज इतर धर्माच्या लोकांत लग्नाची सूचना ही बहुधा प्रथम वरपक्षाकडून होते. लग्नाची सूचना करणारा पक्ष हा कनिष्ठ समजला जातो असें मानलें, तर मागासलेल्या व आदिवासी जातींत पुढारलेल्या जातींपेक्षा स्त्रियांना अधिक मानाचें स्थान आहे असें दिसतें.

बहुसंख्य लग्नें आईबापांच्या किंवा पालकांच्या संमतीने ठरविलीं जातात. परंतु या बाबतींत एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी होती की, मुलांच्या शेकडा ४० लग्नांत मुलांची संमती स्पष्ट-पणें विचारली होती व त्यांनी ती दिली होती असें त्यांच्या कुटुंबियांनी सांगितलें. मुलींच्या लग्नांच्या बाबतींत मात्र फक्त शेकडा १५ मुलींना त्यांची संमति विचारली होती व त्यांनी ती दिली होती, असें त्यांच्या कुटुंबियांनी सांगितलें. एकूण ४५९ लग्नांपैकी फक्त १५ लग्नें वरवधूंच्या परस्पर पसंतीने ठरविलीं गेलीं असें सांगण्यांत आलें. हीं १५ उदाहरणें भिल्लांची बहुसंख्य वस्ती असणाऱ्या धानोरें खेड्यांतील होतीं. भिल्लांमध्यें मुलामुलींच्या विवाहपूर्व वागणुकींत बराच मोकळेपणा दिसून आला आणि त्यांची विवाहाची पद्धतहि बरीच कमी कडक आढळली. औपचारिक विवाह्-विधीशिवाय पतिपत्नी म्हणून एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषांचीं उदाहरणेंहि येथे आढळलीं. औपचारिक विवाहविधि हा परस्परांच्या सोईप्रमाणे नंतर केव्हांतरी करण्यांत येतो असें दिसलें. 'झगडा' नांवाचा दुसरा एक विवाहप्रकार भिल्लांमध्ये असल्याचें कळलें. या प्रकाराप्रमाणे परस्पर पसंती व संमतीनंतर वर व वधू पळून जातात व लपून राहतात. हें जाणून मुलीचा बाप मुलाच्या बापाकडून नुकसान-भरपाईची रक्कम मागतो. लवादानें ही रक्कम ठरविली जाते व ही रक्कम दिली गेली की, मुलामुलींचें लग्न झालें असें मानलें जातें. ही रक्कम नगद दिली जाते किंवा मुलगा सासऱ्याकडे राहून रक्कम फिटेपर्यंत काम करण्याचें कबूल करतो.

या विशिष्ट विवाहपद्धतीमुळे किंवा जातींतील रूढीमुळे वराकडून वधूला हुंड्याची रक्कम देण्याची चाल धानोरें येथे सर्वसामान्य असलेली आढळली. उदाहरणार्थ, धानोरें येथे झालेल्या ६८ मुलांच्या लग्नांपैकी ५९ लग्नांमध्ये असा हुंडा दिल्याचें आढळलें. ही रक्कम साधारणतः रु. ३००

हून थोडी जास्तच असे. इतर खेड्यांत ही प्रथा इतकी सर्वसामान्य असलेली दिसून आली नाही. थोड्याच कुटुंबांनी असा हुंडा दिलेला आढळला. तसेंच वरानें वधूला हुंडा द्यावयाचा ही प्रथा जशी दिसली, त्याचप्रमाणें वधूनें वराला हुंडा द्यावयाचीहि प्रथा दिसली. सामान्यतः पुढारलेल्या जातींत वधूकडून वराला हुंडा दिला जाई. उलटपक्षीं खालच्या जातींत उलट प्रथा आढळून येई. क्रमांक ५·५ या तक्त्यांत असा हुंडा दिलेल्या लग्नांचें प्रमाण व हुंड्याची सरासरी रक्कम हीं दाखविलीं आहेत.

**तक्ता क्रमांक ५·५**

**वरासाठीं किंवा वधूसाठीं हुंडा दिलेल्या विवाहांचें प्रमाण व दिलेला सरासरी हुंडा**

| खेडें | वराकडून हुंडा दिलेल्या विवाहांचें प्रमाण | वधूला दिलेल्या रकमेची सरासरी रुपये | वधूकडून हुंडा दिलेल्या विवाहांचें प्रमाण | वराला दिलेल्या रकमेची सरासरी रुपये |
|---|---|---|---|---|
| बोरी | ६.० | ६८.७ | ९.६ | ४३२.५ |
| धानोरें | ८६.८ | ३०१.१ | ८.७ | १२.५ |
| मिरजगांव | ३०.० | १८२.० | ११.५ | ३२०.८ |
| मिठबाव | १०.४ | १२४.३ | १२.३ | १२६.८ |
| मुदलगी | ३३.३ | २६८.७ | १४.३ | १६२.५ |
| नालवार | ३७.९ | २३३.० | १४.३ | २८७.५ |

वेगवेगळ्या खेड्यांतील विवाहावर होणाऱ्या सरासरी खर्चाचें प्रमाण मुलांच्या लग्नांबाबत रु. ४०० ते रु. ७०० पर्यंत व मुलींच्या लग्नांच्या बाबतींत रु. २०० ते रु. ४५० पर्यंत होतें. क्रमांक ५·६ या तक्त्यांत प्रत्येक खेड्यांतील लग्नांवरील सरासरी खर्च दिला आहे.

**तक्ता क्रमांक ५·६**

**वेगवेगळ्या खेड्यांत विवाहांवर होणारा सरासरी खर्च**

| खेडें | मुलांच्या विवाहांवरील सरासरी खर्च रुपये | मुलींच्या विवाहांवरील सरासरी खर्च रुपये |
|---|---|---|
| बोरी | ४१७.३ | ३५९.० |
| धानोरें | ४३९.२ | २१९.४ |
| मिरजगांव | ५५६.१ | ४३५.४ |
| मिठबाव | ६३७.९ | ३६८.८ |
| मुदलगी | ४१०.० | १९७.७ |
| नालवार | ७०४.५ | ३२५.० |

मुलांचीं लग्नें हीं मुलींच्या लग्नांपेक्षा अधिक खर्चाचीं आहेत असें यावरून दिसतें. मुलाला हुंड्याची जी रक्कम मुलीकडे द्यावी लागते, तिच्यामुळे हा खर्च वाढत असावा. या खेड्यांतील कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नाच्या तुलनेने लग्नांवर होणारा हा खर्च बराच जास्त वाटतो. बहुतेक विवाहांत कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाच्या निम्म्याइतका खर्च केला जातो व कांही विवाहांत तर जवळजवळ वार्षिक उत्पन्नाएवढा हा खर्च असतो. कर्ज काढल्याशिवाय हा एवढा खर्च करणें शक्य नसतें, त्यामुळे विवाह हा सगळ्यांच्याच बाबतींत कर्ज काढण्याचा प्रसंग ठरतो. क्रमांक ५·७ या तक्त्यांत कर्ज काढून केलेल्या लग्नांचें प्रमाण दाखविलें आहे.

**तक्ता क्रमांक ५·७**

**कर्ज काढून केलेल्या विवाहांचें प्रमाण**

| खेडें | कर्ज काढून केलेल्या मुलांच्या विवाहांचें प्रमाण शेकडा | कर्ज काढून केलेल्या मुलींच्या विवाहांचें प्रमाण शेकडा |
|---|---|---|
| बोरी | ७०.१ | ४८.१ |
| धानोरें | ४४.१ | ४.३ |
| मिरजगांव | ४०.० | ४६.२ |
| मिठबाव | ७४.६ | ७३.७ |
| मुदलगी | २५.० | १४.३ |
| नालवार | ७२.४ | ६४.३ |
| एकूण | ६४.३ | ५५.३ |

रुढी, लोकमत व कुटुंबाचा फाजील अभिमान या सर्वांचा एवढा प्रभाव लोकांवर असतो की, लग्नावर होणाऱ्या या भारी खर्चापासून सुटका होईलसें दिसत नाही. गेल्या कांही वर्षांत, या भारी खर्चामुळे केवढी अडचण सतत सोसावी लागते, याची वाढती जाणीव होऊं लागली आहे आणि विवाहांवर होणाऱ्या खर्चावर बंधन घालण्याचे प्रयत्न जात-पंचायतींकडून होत आहेत. परंतु वस्तुस्थिति अशी आहे की, या खर्चाचा बराचसा भाग दडपणामुळे केलेला नसून खुषीने केलेला असतो. हा खर्च करणें लोकांना आवडतें. लग्नें चांगलीं थाटाने करणें हें आयुष्यांतील एक महत्त्वाचें कर्तव्य मानलें जातें आणि हे लोक लग्नें खरोखरच चांगलीं करतात. निदान आपल्या आवाक्याच्या मानाने चांगलीं करतात. आणि नंतर लग्नासाठी काढलेलें कर्ज फेडण्यासाठी अनेक वर्षें कष्ट करीत राहतात.

# ६

# जननक्षमतेशी संबद्ध शारीरिक घटक

लोकसंख्येच्या दृष्टीने लोकांच्या वैवाहिक स्थितीला एक विशिष्ट महत्त्व प्राप्त होतें. कारण विवाहामुळे स्त्रीपुरुषांना जी समाजमान्यता मिळते, तिच्यामुळे त्यांच्या संततीला कायदेशीर प्रतिष्ठा प्राप्त होते. म्हणून लोकांच्या जननक्षमतेवर विवाहाचा प्रत्यक्ष परिणाम होतो व लोकसंख्येवरहि होतो. विवाहित जोडप्यापासून झालेली संततीच कायदेशीर मानली जाते. त्यामुळे अविवाहित किंवा विधवा स्त्रियांना झालेली संतति—म्हणजे बेकायदेशीर संतति थोडी आढळते. उदाहरणार्थ, आमच्या पाहणींत बेकायदेशीर संततीची एकहि नोंद नव्हती. अशा तऱ्हेने विवाहामुळेच प्रजोत्पादनाला समाजमान्यता प्राप्त होत असली तरी स्त्रीची जननक्षमता ही तिच्या विशिष्ट शारीरिक वैशिष्ट्यांमुळे नियंत्रित व मर्यादित झालेली असते. या प्रकरणांत याच वैशिष्ट्यांचा थोडक्यांत विचार करूं.

मासिक पाळीचा प्रारंभ किंवा ऋतुप्राप्ति व मासिक पाळीचा शेवट यांच्यामध्ये जो काळ असतो, तो स्त्रीच्या दृष्टीने प्रजोत्पादनाचा काळ असतो. त्यामुळे मासिक पाळीचा प्रारंभ व शेवट यावेळचें स्त्रीचें वय हें जननक्षमतेचा विचार करतांना मुख्यतः लक्षांत घ्यावें लागतें. क्रमांक ६·१

**तक्ता क्रमांक ६·१**

**मासिक पाळीच्या प्रारंभाच्या वयाप्रमाणे स्त्रियांची विभागणी**

| मासिक पाळीच्या प्रारंभाचें वय-वर्षांत | स्त्रियांची संख्या | शेकड्यांत प्रमाण |
|---|---|---|
| ११ | ३१ | ०.३ |
| १२ | १३१७ | १३.२ |
| १३ | २८९८ | २९.१ |
| १४ | ३२११ | ३२.३ |
| १५ | १६१२ | १६.२ |
| १६ | ५८३ | ५.९ |
| १७ | १५२ | १.५ |
| १८ | ८२ | ०.८ |
| १९ व वरील | ७४ | ०.७ |
| एकूण माहिती देणाऱ्या | ९९६० | १००.० |
| माहिती न देणाऱ्या | ११८१ | |
| एकूण | १११४१ | |

या तक्त्यामध्ये आमच्या पाहणींत समाविष्ट झालेल्या स्त्रियांचें विभाजन मासिक पाळीच्या प्रारंभाच्या वयाप्रमाणे केलेलें आहे. त्या तक्त्यावरून हें दिसून येईल की, शेकडा १० स्त्रियांना आपल्या मासिक पाळीच्या प्रारंभाचें वय सांगतां आलें नाही. त्यांच्यापैकी बहुतेक जणी वृद्ध झाल्या होत्या व त्यांची मासिक पाळी बंद झाली होती. बाकीच्या स्त्रियांच्या बाबतींत असें दिसून येईल की, बऱ्याच जणींचें मासिक पाळीच्या प्रारंभाचें वय १४ होतें. मासिक पाळीच्या प्रारंभाच्या वयांची सरासरी काढली, तर ती १३.८ वर्षें म्हणजे जवळजवळ १४ वर्षे अशीच येते. तरीहि शेकडा ४० स्त्रियांच्या मासिक पाळीचा प्रारंभ १३ वर्षाला किंवा त्यापेक्षा अगोदरहि झालेला दिसतो. दुसऱ्या टोकाला शेकडा १० स्त्रियांची मासिक पाळी १५ वर्षांनंतर सुरू झालेली दिसते.

मासिक पाळीने सुरू होणारा प्रजोत्पादनाचा काळ मासिक पाळीच्या शेवटाने संपतो. मासिक पाळीच्या शेवटाचें वय मासिक पाळीच्या प्रारंभाप्रमाणे तितकें स्पष्टपणे लक्षांत येत नाही. कारण हा शेवट हळूहळू घडून येत असतो. क्रमांक ६·२ या तक्त्यामध्ये स्त्रियांची वयाप्रमाणे विभागणी करून मासिक पाळी बंद झालेल्या किती स्त्रिया प्रत्येक वय-गटांत येतात हें दाखविलें आहे. ३३ वर्षाच्या अगोदर मासिक पाळी बंद झाल्याचें एकहि उदाहरण पाहणींत आढळलें नाही. म्हणून या तक्त्यांत ३३ वर्षाच्या अगोदरच्या वय-गटांतील स्त्रिया दाखविल्या नाहीत.

**तक्ता क्रमांक ६·२**

**प्रत्येक वय-गटांतील मासिक पाळी संपलेल्या स्त्रियांचें प्रमाण**

| सध्याचें वय वर्षांत | एकूण स्त्रियांची संख्या | मासिक पाळी संपल्याचें सांगणाऱ्या स्त्रियांची संख्या | एकूण स्त्रियांत मासिक पाळी संपलेल्यांचें प्रमाण | अगोदरच्या व पुढच्या प्रमाणांतील अंतर |
|---|---|---|---|---|
| ३३—३७ | १००१ | २५ | २.५० | २.५० |
| ३८—४२ | १०२१ | १८७ | १८.३२ | १५.८२ |
| ४३—४७ | ८१८ | ४४० | ५३.७९ | ३५.४७ |
| ४८—५२ | ८४३ | ७०० | ८३.०४ | २९.२५ |
| ५३ व वरील | १६२४ | १६२४ | १००.०० | १६.९६ |

या तक्त्यावरून दिसून येईल की, ४३–४७ या वय-गटांतील शेकडा ५३.७९ स्त्रियांची मासिक पाळी संपली होती. या वय-गटांतील मध्यवर्ती वय जें ४५ त्या वयाशी या शेकड्यांतील प्रमाणाचा संबंध जोडून सामान्यत: ४५ वर्षांच्या स्त्रियांपैकी शेकडा ५३·७९ स्त्रियांची मासिक पाळी संपलेली असते असें म्हणतां येईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास एकूण स्त्रियांपैकी शेकडा ५३.७९ स्त्रियांची मासिक पाळी ४५ वर्षांच्या अगोदर संपलेली असते, असें म्हणतां येईल. त्याचप्रमाणे एकूण स्त्रियांपैकी शेकडा ८३.०४ स्त्रियांची मासिक पाळी ५० वर्षांच्या अगोदर संपलेली असते असें दिसून येईल. या दोन शेकडेवारीमधील अंतर घेतलें, तर सामान्यत: शेकडा

२९.२५ स्त्रियांची मासिक पाळी ४५ ते ५० या वर्षांच्या दरम्यान संपलेली असते, असें अनुमान काढतां येईल. अगोदरच्या व नंतरच्या वय-गटांतील शेकडेवारींतील अंतर तक्त्याच्या शेवटच्या स्तंभांत दाखविलें आहे. या स्तंभावरून अप्रत्यक्ष रीतीने, मासिक पाळी संपण्याच्या वयानुसार एकूण स्त्रियांची विभागणी ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, या शेवटच्या स्तंभांतील शेकडेवारीवरून आपणांस असें म्हणतां येईल की, एकूण स्त्रियांपैकी शेकडा ३५.४७ स्त्रियांची मासिक पाळी ४० ते ४५ वयाच्या दरम्यान संपलेली होती.

मासिक पाळी कायमची बंद झाली म्हणजे स्त्रीचा प्रजोत्पादनाचा कालखंड कायमचा संपतो. याशिवाय मध्यंतरीच्या या प्रजोत्पादनाच्या काळांतहि जननक्षमता तात्पुरती बंद होण्याचे कालखंडहि असतात. प्रसूतीनंतर मासिक पाळी तात्पुरती बंद राहण्याचा जो कालखंड असतो, तो अशा प्रकारचा असतो. हा कालखंड केवढा असतो याबद्दलची माहिती गोळा करण्याचा आम्ही प्रयत्न केला. या बाबतींतील माहिती विश्वासार्ह असावी, यासाठी पाहणीच्या पूर्वीच्या पांच वर्षांत ज्यांचें निदान एक तरी पूर्ण नऊ महिन्याचें गरोदरपण झालें होतें, अशाच विवाहित स्त्रियांपुरती ही पाहणी आम्ही मर्यादित केली होती. अशा स्त्रियांची संख्या ४८८ होती. क्रमांक ६·३ या तक्त्यामध्ये शेवटच्या प्रसूतीनंतर जितका काळ मासिक पाळी बंद होती, त्याप्रमाणे या स्त्रियांची विभागणी केली आहे. या तक्त्यावरून हें दिसून येईल की, जवळजवळ शेकडा २० स्त्रियांच्या बाबतींत हा काळ सहा महिन्यांपेक्षां कमी होता. तसेंच शेकडा ३० स्त्रियांच्या बाबतींत तो ६ महिने ते १ वर्ष एवढा होता. शेकडा १० स्त्रियांच्या बाबतींत मात्र हा काळ दोन वर्षांहून अधिक होता.

### तक्ता क्रमांक ६·३

### प्रसूतीनंतरची मासिक पाळी तात्पुरती थांबण्याच्या काळाप्रमाणे स्त्रियांची विभागणी

| प्रसूतीनंतरची मासिक पाळी तात्पुरती थांबण्याचा काळ | स्त्रियांची संख्या | एकूण संख्येची शेकडेवारी |
|---|---|---|
| ३ महिन्यांपर्यंत | ५५ | ११.३ |
| ६ महिन्यांपर्यंत | ३४ | ७.० |
| १२ महिन्यांपर्यंत | १४८ | ३०.३ |
| १८ महिन्यांपर्यंत | ९३ | १९.१ |
| २४ महिन्यांपर्यंत | ११० | २२.५ |
| २४ महिन्यांहून अधिक | ४८ | ९.८ |
| एकूण | ४८८ | १००.० |

मासिक पाळी सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंतच्या काळांत, हे मासिक पाळी तात्पुरती बंद होण्याचे प्रसूतीनंतरचे कालखंड सोडले, तर इतर वेळीं आपली मासिक पाळी नियमित होती, असें यांच्यापैकी बहुतेक स्त्रियांनी सांगितलें. क्रमांक ६·४ या तक्त्यामध्ये वेगवेगळ्या केंद्रांतील, नियमित व अनियमित मासिक पाळी असलेल्या स्त्रियांची शेकडेवारी दिली आहे.

**तक्ता क्रमांक ६·४**

**नियमित व अनियमित मासिक पाळी असणाऱ्या स्त्रियांची शेकडेवारी**

| केंद्र | एकूण स्त्रियांची संख्या | नियमित पाळी असणाऱ्यांची शेकडेवारी | अनियमित पाळी असणाऱ्यांची शेकडेवारी |
|---|---|---|---|
| बोरी | १२९८ | ९६.० | ४.० |
| धानोरें | १५०० | ९८.१ | १.९ |
| मिरजगांव | ११७८ | ९३.८ | ६.२ |
| मिठबाव | १०९८ | ८९.१ | १०.९ |
| मुदलगी | ९६८ | ८७.५ | १२.५ |
| नालवार | १३४३ | ८८.७ | ११.३ |
| एकूण | ७३८५ | ९२.६ | ७.४ |

यावरून हें दिसून येईल की, शेकडा ९० पेक्षा जास्त स्त्रियांनी आपली पाळी नियमित असल्याचें सांगितलें.

नियमित मासिक पाळी असणाऱ्या स्त्रिया या सामान्यत: जननक्षम असतात असें मानण्यास हरकत नाही. तरी याहि स्त्रियांत कांही जणींत निरनिराळ्या कारणांमुळे वांझपणा असलेला आढळून येतो. याशिवाय स्त्रिया स्वत: जननक्षम असतांनाहि त्यांचे पति प्रजोत्पादनक्षम नसल्या-मुळे त्या वांझ आहेत असें दिसतें. वांझपणाचें एकूण प्रमाण किती आहे याबद्दलची प्रत्यक्ष माहिती आम्हांला मिळाली नाही. तरीहि जननक्षम असणाऱ्या परंतु संतति न झालेल्या स्त्रियांच्या संख्ये-वरून एकंदर वांझपणाचें प्रमाण किती आहे, याचें अनुमान करतां येईल. नमुना म्हणून केलेल्या आमच्या पाहणींत समाविष्ट झालेल्या स्त्रियांपैकी कांही जणींचीं लग्नें होऊन बरींच वर्षें झालीं होतीं, तरी त्यांना तोंपर्यंत मूल झालेलें नव्हतें. क्रमांक ६·५ या तक्त्यामध्ये, लग्न होऊन कांही वर्षें झालेल्या स्त्रियांमध्ये मूल नसणाऱ्यांचें प्रमाण दिलें आहे.

**तक्ता क्रमांक ६·५**

**लग्नाला ठराविक वर्षें झालेल्या स्त्रियांमध्ये मूल नसणाऱ्यांचें प्रमाण**

| लग्नाला झालेलीं वर्षें | एकूण स्त्रियांची संख्या | मूल नसणाऱ्यांची शेकडेवारी |
|---|---|---|
| ५— ९ | १८२७ | १७.५ |
| १०—१४ | १५३४ | ७.३ |
| १५—१९ | १४६० | ५.२ |
| २०—२४ | १११४ | ४.७ |
| २५ व वरील | २६१८ | ४.७ |

यावरून हें दिसून येईल की, मूल नसणाऱ्यांचें प्रमाण, लग्नाला जशीं जास्त वर्षें होतात, तसें साहजिकच घटत जातें. परंतु लग्नाला २० ते २४ वर्षें झालेल्यांपैकी मूल नसणाऱ्यांचें जें शेकडा ४.७ हें प्रमाण आहे, तें मात्र पुढील वर्षांत मुळीच घटलेलें नाही. तेव्हां शेकडा ४.७ किंवा ठोकळ-मानानें शेकडा ५ स्त्रिया ह्या वांझ असतात, असें अनुमान करण्यास हरकत नाही. परंतु या शेकडे-वारींत स्वतःच्या शारीरिक कारणांमुळे वांझ असणाऱ्या स्त्रिया व स्वतः वांझ नसतांहि पतीच्या प्रजोत्पादनशक्तीच्या अभावामुळे वांझ ठरलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या स्त्रियांचा समावेश आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

मूल नसणारी स्त्री असा जो शब्दप्रयोग आतांपर्यंत केला आहे तो जिचें मूल जिवंत स्थितींत जन्मलें नाही अशी स्त्री अशा अर्थानें केला आहे. अशा स्त्रियांमध्ये कांही जणींनी गरोदरपणाचा अनुभव घेतला होता; परंतु त्यांचीं मुलें जिवंत स्थितींत जन्मलीं नव्हतीं. उदाहरणार्थ, आमच्या पाहणींत, लग्नाला दहा किंवा अधिक वर्षें झालेल्या व ज्यांची मुलें जिवंत स्थितींत जन्मलीं नव्हतीं अशा ३६६ स्त्रिया होत्या. परंतु त्यांच्यापैकी ३० जणींनी किंवा शेकडा ८ जणींनी गरोदरपण अनु-भवलें होतें. म्हणजे त्या वांझ नव्हत्या. वरील तक्त्यांत शेकडा ४.७ स्त्रिया वांझ आढळतात. त्यांच्यांतून शेकडा ८ काढून टाकल्या तर उरलेल्या शेकडा ४.३ एवढ्या स्त्रिया वांझ होत्या असें मानावें लागेल.

# ७

# जननक्षमता

आमच्या पाहणींत समाविष्ट झालेल्या लोकांमधील जननक्षमतेसंबंधीची परिस्थिति या प्रकरणांत निवेदन करणार आहोंत. आमच्या पाहणीच्या पूर्वीच्या एका वर्षांत, पाहणींत समाविष्ट झालेल्या सर्व स्त्रियांना झालेल्या मुलांच्या संख्येवरून ही परिस्थिति अजमावावयाची आहे. या वर्षांत जन्मलेल्या मुलांची संख्या एकूण १४५५ अशी आम्हांला सांगण्यांत आली. परंतु जननक्षमतेचीं गमकें ठरविण्यासाठी या जन्मसंख्येचें पृथक्करण करण्यापूर्वी खेड्याच्या नोंदवहींत नोंदलेल्या जन्मसंख्येवरून आमच्या पाहणींतली जन्मसंख्या बरोबर आहे किंवा नाही हें तपासून घेतलें पाहिजे. प्रत्येक खेड्यांत जन्मलेल्या मुलांची नोंद करण्यासाठी जन्मनोंदवही ठेवलेली असते व प्रत्येक जन्माची नोंद त्यांत केली जाईल अशी अपेक्षा असते. परंतु ही नोंद पुष्कळदा अपुरी असते हें माहीत असतें. तेव्हां आमच्या पाहणींत नोंदलेल्या जन्मांच्या संख्येची खेड्याच्या जन्मनोंदवहींतील जन्मांच्या संख्येशीं तुलना करून पाहिली की, किती प्रमाणांत जन्मनोंदी अपुऱ्या राहतात हें कळून येईल.

आमच्या पाहणीपूर्वीच्या एक वर्षांत, पाहणींत समाविष्ट झालेल्या सर्व स्त्रियांना झालेल्या मुलांबद्दल आम्ही माहिती विचारली होती. वर सांगितल्याप्रमाणे १४५५ मुलांच्या जन्मांची नोंद आम्ही केली. परंतु या मुलांपैकी सगळीं आमच्या पाहणीक्षेत्रांतल्या खेड्यांत जन्मलेलीं नव्हतीं. एकूण जन्मलेल्या मुलांपैकी २२३ मुलांचा जन्म या खेड्यांच्या बाहेर झाला होता. परंतु आमच्या पाहणीच्या वेळीं खेड्यांतील रहिवासी म्हणून नोंदलेल्या स्त्रियांना हीं मुलें झालीं होतीं व म्हणून यांचा समावेश आमच्या जन्माच्या नोंदींत झाला. अर्थात् या जन्मांची नोंद त्या त्या खेड्यांत होणें शक्यच नव्हतें.

क्रमांक ७·१ या तक्त्यांत प्रत्येक केंद्रांत नोंदलेल्या जन्मांची संख्या व त्या केंद्रांतील खेड्यांबाहेर झालेल्या जन्मांची संख्या दिलेली आहे.

**तक्ता क्रमांक ७·१**

**पाहणींत नोंदलेल्या जन्मसंख्या व पाहणीबाहेरच्या खेड्यांतील जन्मसंख्या**

| केंद्र | नोंदलेली जन्मसंख्या | खेड्याबाहेरच्या जन्मांची संख्या | एकूण जन्मसंख्येंत बाहेरच्या जन्मसंख्येची शेकडेवारी |
|---|---|---|---|
| बोरी | २४२ | ३४ | १४.० |
| धानोरें | ३२६ | २१ | ६.४ |
| मिरजगांव | २४० | ३१ | १२.९ |
| मिठबाव | १५१ | २३ | १५.२ |
| मुदलगी | २०९ | ४५ | २१.५ |
| नालवार | २८७ | ६९ | २४.० |
| एकूण | १४५५ | २२३ | १५.३ |

यावरून दिसून येईल की, एकूण सर्व केंद्रांमधील एकत्रित जन्मसंख्येपैकी शेकडा १५.३ एवढ्या मुलांचा जन्म त्या खेड्याबाहेर झाला होता.

क्रमांक ७·२ या तक्त्यांत, खेड्यांत झालेल्या जन्मांपैकी किती जन्मांची नोंद खेड्याच्या जन्मनोंदवहींत झाली नव्हती हें दिलें आहे. आमच्या पाहणींतील सहा केंद्रांपैकी बोरी व नालवार या केंद्रांत जन्मनोंदवही आढळली नाही. हीं दोन्ही केंद्रें पूर्वीच्या हैद्राबाद राज्यांत होतीं. याशिवाय धानोरें या केंद्रांत खुद्द धानोरें या खेड्यांत जन्मनोंदवही होती, तरी त्या केंद्रांत समाविष्ट झालेल्या दोन लहान खेड्यांत अशी नोंदवही नव्हती. म्हणून क्रमांक ७·२ या तक्त्यांतून बोरी व नालवार हीं केंद्रें व धानोरें केंद्रांतील २ खेडीं हीं वगळलीं आहेत. या तक्त्यावरून हें दिसून येईल की, पाहणींतल्या इतर केंद्रांतील जन्मसंख्येपैकी शेकडा २४.२ किंवा जवळजवळ शेकडा २५ एवढ्या जन्मांची नोंद खेड्यांतील जन्मनोंदवहींत केलेली नव्हती.

### तक्ता क्रमांक ७·२

### खेड्यांत झालेल्या जन्मांपैकीं खेड्याच्या नोंदवहींत न नोंदलेल्या जन्मांचें प्रमाण

| केंद्र | ग्रामकेंद्रांतील खेड्याबाहेरचे जन्म वजा करून केंद्रांतील खेड्यांतील जन्मसंख्या | नोंदवहींत नोंदलेली जन्मसंख्या | न नोंदलेल्या जन्मसंख्येची शेकडेवारी |
|---|---|---|---|
| धानोरें | २४२* | ५३ | २१.९ |
| मिरजगांव | २०९ | ५४ | २५.८ |
| मिठबाव | १२८ | ३२ | २५.० |
| मुदलगी | १६४ | ४१ | २५.० |
| एकूण | ७४३ | १८० | २४.२ |

*धानोऱ्याजवळच्या दोन खेड्यांत झालेले जन्म, तेथे नोंदवही नसल्याने यांतून वगळले आहेत.

मोठ्या खेड्यापेक्षा लहान खेड्यांतील जन्मांची नोंद ही जास्त अपुरी असते, अशी जी समजूत आहे, ती बरोबर नाही, असें आम्हांला दिसून आलें. उदाहरणार्थ, मिरजगांव या केंद्रांतील खुद्द मिरजगांव या बऱ्याच मोठ्या खेड्यांत शेकडा ३१ जन्मांची नोंद केलेली नव्हती. उलटपक्षीं या केंद्रांतील लहान खेड्यांत एकूण शेकडा ११ जन्मांची नोंद तेवढी आढळली नाही. त्याचप्रमाणे धानोरें या केंद्रांत धानोरें या मोठ्या मध्यवर्ती खेड्यांत शेकडा २८ जन्मांची नोंद नव्हती. परंतु त्या केंद्रांतील इतर लहान खेड्यांत जेथे जन्मनोंदवही ठेवलेली होती, तेथे फक्त शेकडा १० जन्मांचीच नोंद केलेली नव्हती. उरलेल्या मिठबाव व मुदलगी या केंद्रांत लहान खेड्यांचा समावेश नसल्यामुळे लहान व मोठ्या खेड्यांतील नोंदींबद्दलची तुलना करतां यणें शक्य नव्हतें.

आम्ही केलेल्या जन्मनोंदीहि अपुऱ्या राहिल्या असण्याचा संभव आहे. हा अपुरेपणा अजमावण्यासाठी, खेड्यांच्या नोंदवहींत नोंदलेल्या जन्मांपैकी किती आमच्या नोंदींत नोंदले नव्हते हें पाहिलें पाहिजे. सुदैवाने अशीं ३ च उदाहरणें आढळलीं. ज्या खेड्यांत जन्मनोंदवह्या ठेवल्या जातात, त्या सर्व खेड्यांतील नोंदलेल्या एकूण ५६३ जन्मांपैकी फक्त ३ च जन्म आमच्याकडे नोंदले

नव्हते. ही शेकडेवारी $\frac{१}{२}$ एवढीच येते. याच्यामध्ये खेड्यांतील नोंदवहींत व आमच्या नोंदींत दोन्हीकडे सुटलेल्या जन्मांची संख्या मिळवली पाहिजे. शेकडा २५ जन्म खेड्यांच्या नोंदवहींत नोंदले गेले नव्हते आणि शेकडा $\frac{१}{२}$ जन्म नोंदवहींत नोंदले असतां आमच्याकडे नोंदले गेले नव्हते, या दोन्ही गोष्टी लक्षांत घेतल्या तर एकूण शेकडा $\frac{१}{८}$ एवढेच जन्म खेड्यांच्या नोंदवहींतून व आमच्याहि नोंदींतून सुटले असावे असें म्हणतां येईल. म्हणजे आमच्या नोंदींतील दोष हा $\frac{१}{२}+\frac{१}{८}$ म्हणजे शेकडा $\frac{५}{८}$ किंवा शेकडा ०.६२५ एवढाच येईल. हा दोष अगदी क्षुल्लक असल्यामुळे आमची जन्मनोंद जवळजवळ निर्दोष होती असें म्हणतां येईल.

आतां पाहणीपूर्वीच्या एका वर्षांतील जन्मांचें पृथक्करण करून त्यावरून लोकसंख्येच्या जननक्षमतेचीं कांही गमकें बसविण्यास प्रारंभ करूं. यापैकी एक गमक असें की, जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत १००० स्त्रिया जिवंत राहिल्या वा विवाहित स्थितींत राहिल्या तर त्यांना होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या हें एक माप मानतां येईल. क्रमांक ७·३ या तक्त्यांत हें कोष्टक मांडलें आहे. एका

**तक्ता क्रमांक ७·३**

**पाहणीच्या सहा केंद्रांतील प्रत्येकीं हजार विवाहित स्त्रियांच्या जननक्षमतेचे दर**

| वय | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १३–१७ | १७.३९ | ५१.७२ | १२९.१९ | २००.०० | १०३.४५ | १६१.५९ |
| १८–२२ | २२०.७४ | ३४३.५१ | २४८.३० | २८४.८१ | २६८.४२ | २७७.९३ |
| २३–२७ | २८७.२३ | ३५१.७९ | २८६.३४ | २५६.९८ | २७६.३२ | २२३.८३ |
| २८–३२ | २९९.२१ | ३०४.९३ | २००.०० | २१५.२८ | ३२३.३५ | १५०.०० |
| ३३–३७ | १४७.२९ | २१५.२८ | १४२.८६ | १२८.२१ | ३०१.०८ | १४०.२४ |
| ३८–४२ | १२६.०५ | ११२.५० | ५८.८२ | ७६.०९ | १४६.०७ | ४३.२१ |
| ४३–४७ | ७८.९५ | ३४.७२ | १७.७० | ३६.१४ | ५६.६० | १३.३३ |
| ४८–५२ | १२.९९ | — | — | — | — | — |
| एकूण | ११८९.८५ | १४१४.४५ | १०८३.२१ | ११९७.५१ | १४७५.२९ | १०१०.१३ |
| एकूण | ५९४९.२५ | ७०७२.२५ | ५४१६.०५ | ५९८७.५५ | ७३७६.४५ | ५०५०.६५ |

वर्षांतील जन्मांच्या नोंदीवरून प्रत्येक वयाच्या एकूण १००० विवाहित स्त्रियांना किती मुलें होतील, हें प्रमाण प्रथम आकारावयाचें व यावरून जननक्षमतेची सूचक संख्या काढावयाची. वरील तक्त्यांत हें प्रमाण प्रत्येक वर्षाला असें न दाखवितां पंचवार्षिक वय-गटाला जेवढें होईल तेवढें दाखविलें आहे. प्रत्येक वय-गटांतील स्त्रियांना जेवढी मुलें झालीं असतील, तेवढी त्या गटांतील सर्व विवाहित स्त्रियांची धरून त्यांचें १००० स्त्रियांतील प्रमाण काढलें आहे. उदाहरणार्थ, बोरी येथे १८–२२ या वय-गटांतील प्रत्येकी १००० विवाहित स्त्रियांना २२०.७४ मुलें झालीं असें प्रमाण पडलें. हें वार्षिक जननाचें प्रमाण आहे. म्हणजे १८–२२ या वय-गटांतील १००० विवाहित स्त्रियांना पांच वर्षांत याच्या पांचपट मुलें होतील असें मानतां येईल. जेव्हां जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत या स्त्रियांना किती मुलें होतील ही संख्या, प्रत्येक पंचवार्षिक वय-गटांतील वार्षिक प्रमाणाला पांचाने

गुणून व या सर्व गुणाकारांची बेरीज करून मिळेल. यापेक्षा अधिक सोपी रीत म्हणजे प्रत्येक वय-गटांतील वार्षिक प्रमाणांची बेरीज करावयाची व त्या बेरजेला पांचाने गुणावयाचें. क्रमांक ७·३ या तक्त्यांतील शेवटच्या ओळींत याच रीतीने प्रमाण दाखविलें आहे. यावरून हें आढळून येतें की, जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत प्रत्येकीं १००० विवाहित स्त्रियांना होणाऱ्या मुलांची संख्या नालवार येथे ५०५० येथपासून तों मुदलगी येथे ७३७६ येथपर्यंत होती. मुदलगी व धानोरें येथील संख्या जवळपास सारखी आहे. परंतु इतर चार केंद्रांच्या मानाने ती बरीच मोठी आढळून येते. इतर चार केंद्रांतील संख्या बरीचशी समान आहे. जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत विवाहित स्त्रीला होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या ५ ते ६ एवढी या चार केंद्रांत आढळते. मुदलगी व धानोरें येथे ही संख्या ७ किंवा त्यापेक्षा अधिक म्हणजे बरीच मोठी वाटते.

या वर काढलेल्या सूचक प्रमाणांत, स्त्री ही जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत जिवंत आहे व विवाहित आहे, असें गृहीत धरलें आहे. या सूचक प्रमाणांतील स्त्रीच्या विवाहित स्थितीची अट थोडी सैल केली व जननक्षमतेच्या काळापैकी कांही काळ ती अविवाहित होती किंवा घट-स्फोटित किंवा विधवा होती असें धरलें, तर तिच्या एकंदर आयुष्यांत तिला होणाऱ्या अपेक्षित मुलांची संख्या साहजिकच कमी होईल. यावरून जननक्षमतेचें दुसरें सूचक प्रमाण आपणांस मिळतें. यांत सध्याचें विवाहाचें प्रमाण, आणि वैधव्याचें किंवा घटस्फोट इत्यादींचें असलेलें प्रमाण लक्षांत घेतलें जातें. प्रत्येकीं १००० स्त्रियांमध्ये हें सूचक प्रमाण जेव्हां दाखविलें जातें तेव्हां त्याला एकूण जननक्षमतेचें प्रमाण असें म्हटलें जातें व यांत १००० स्त्रियांना संपूर्ण आयुष्यांत आजच्या एकूण वैवाहिक परिस्थितीप्रमाणे किती मुलें होतील ह्याची संख्या दिली जाते. हें कोष्टक क्रमांक ७·४ या तक्त्यांत दिलें आहे. क्रमांक ७·३ च्या तक्त्याप्रमाणेच हें आहे. फरक एवढाच आहे की, येथे प्रत्येक पंचवार्षिक वय-गटांतील स्त्रियांना होणाऱ्या मुलांच्या संख्येचें प्रमाण विवाहित स्त्रियांपुरतेंच मर्यादित न ठेवतां त्या वय-गटांतील सर्व स्त्रियांशी जोडलें आहे. यावरून दिसून येईल की, एकूण जनन-क्षमतेचें प्रमाण मिठबाव येथें ३८५६ ते मुदलगी येथे ६१४८, यांच्या दरम्यान आहे.

क्रमांक ७·३ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत विवाहित स्त्रियांना होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या आणि क्रमांक ७.४ च्या तक्त्याप्रमाणे जननक्षमतेच्या संपूर्ण काळांत वैवाहिक परिस्थितींतील नाना प्रकारच्या अडथळ्यांमुळे पूर्ण काळ विवाहित अवस्थेंत न राहणाऱ्या स्त्रियांना होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या यांच्यांतील फरक हा जननक्षमतेंतील घट दर्शवितो. उशिरां होणारीं लग्नें किंवा वैधव्य, घटस्फोट किंवा विभक्तता यांच्यासारख्या अड-थळ्यांमुळे ही घट घडून येते. प्रत्येक स्त्रीच्या बाबतींतील ही घट बोरी, मिरजगांव व नालवार या तीन केंद्रांत ०.७ एवढी आहे, धानोऱ्यास ती १.० एवढी, मुदलगी येथे १.२ आणि मिठबाव येथे २.२ एवढी जास्त आहे.

मिठबाव येथील जननक्षमतेंत जी घट येथे दाखविली आहे, ती अतिरंजित अंदाजामुळे वाढ-लेली दिसत असावी. क्रमांक ७·३ या तक्त्याप्रमाणे १००० स्त्रियांना होणाऱ्या मुलांची जी संख्या त्या केंद्रांत दाखविली होती, ती अतिरंजित असणें शक्य आहे. मिठबाव येथील १३–१७ या वय-गटां-तील १००० स्त्रियांचें वैवाहिक जननक्षमतेचें प्रमाण २०० असें दाखविलें आहे. इतर केंद्रांतील या वय-गटांतील प्रमाणापेक्षा मिठबाव येथील हें प्रमाण फारच जास्त असलेलें दिसतें,पण वस्तुस्थिति अशी होती की, या वय-गटांत तेथे फारच थोड्या विवाहित स्त्रिया होत्या. त्यामुळे केवळ २० विवाहित स्त्रियांवरून हें प्रमाण काढलें गेलें असल्यामुळे येथला अंदाज बराच जास्त असण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे १३–१७ या वय-गटांतील स्त्रियांना होणाऱ्या मुलांची संख्या काढण्या-

साठी एक वर्षाच्या अंदाजाला पांचाने गुणावें लागल्यामुळे हा अंदाज अधिकच फुगलेला दिसून येतो. असें असतांहि जननक्षमतेंतील घटीचें प्रमाण इतर केंद्रांपेक्षां मिठबाव येथे सर्वांत जास्त होतें ही गोष्ट खरी आहे.

**तक्ता क्रमांक ७·४**

**वेगवेगळया वयाच्या प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे जननक्षमतेचे वैवाहिक स्थितीनिरपेक्ष दर**

| वय | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १३–१७ | ११.५ | ८.० | ९६.१ | १४.२ | ८७.० | १३२.७ |
| १८–२२ | २१२.२ | २६७.६ | २३०.१ | २०९.३ | २३८.३ | २६३.४ |
| २३–२७ | २७०.० | ३२४.४ | २६९.४ | २१७.० | २४८.५ | २००.० |
| २८–३२ | २७६.० | २७८.७ | १७५.० | १६७.६ | २७९.२ | १२६.४ |
| ३३–३७ | १३२.१ | १९३.७ | १२३.६ | ९४.३ | २२७.६ | १०३.६ |
| ३८–४२ | ८६.२ | १०६.७ | ३९.५ | ४७.६ | ११४.० | २७.३ |
| ४३–४७ | ५३.१ | ३१.१ | ११.८ | २१.१ | ३४.९ | ६.८ |
| ४८–५२ | ६.४ | — | — | — | — | — |
| एकूण | १०४७.५ | १२१०.२ | ९४५.५ | ७७१.१ | १२२९.५ | ८६०.२ |
| १००० स्त्रियांची एकूण जननक्षमता | ५२३७.३ | ६०५१.६ | ४७२७.२ | ३८५५.६ | ६१४७.९ | ४३०१.२ |

एकूण जननक्षमतेच्या सूचीमध्ये मुलगे व मुली या दोहोंचा समावेश केला आहे. याच्या ऐवजी एकूण जन्मलेल्या मुलांच्या संख्येपैकी केवळ मुलींच्याच संख्येचा विचार केला, तर दर हजार स्त्रियांना जननक्षमतेच्या काळांत मृत्यु आला नाही तर किती मुली होतील, याचें प्रमाण काढतां येईल. क्रमांक ७·५ या तक्त्यामध्ये पाहणी केलेल्या सर्व केंद्रांमधील हें ठोक प्रजोत्पादनाचें प्रमाण दाखविलें आहे. हें प्रमाण मिठबाव येथे २ ते धानोरें व मुदलगी येथे ३.० यांच्या दरम्यान आहे. याचा अर्थ असा की, जननक्षमतेच्या काळांत स्त्री जिवंत राहिली, तर पाहणीच्या वर्षांतील जनन-क्षमतेच्या प्रमाणानुसार स्त्रीला आपल्या आयुष्यांत २ ते ३ मुली व्हाव्या.

**तक्ता क्रमांक ७·५**

**सहा केंद्रांमधील एकूण ठोक जननक्षमतेचे दर**

| केंद्र | एकूण ठोक जननक्षमतेचे दर |
|---|---|
| बोरी | २.६१ |
| धानोरें | २.९८ |
| मिरजगांव | २.३५ |
| मिठबाव | १.९१ |
| मुदलगी | ३.०२ |
| नालवार | २.१४ |

तक्ता क्रमांक ७·६

**निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण आणि स्त्रियांच्या पिढीचें वयोमान**

| वय | स्त्रियांची संख्या | पाहणीच्या वर्षातील जन्मांची संख्या | १००० स्त्रियांमागे जननक्षमतेचें प्रमाण | मध्यवर्ती वय | मध्यवर्ती वयापर्यंत जगणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण | स्तंभ ४ X ६ | स्तंभ ५ X ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३—१७ | १७०१ | १०६ | ६२.३२ | १५ | ०.५९८२५ | ३६.९५ | ५५४.२५ |
| १८—२२ | १७९७ | ४३१ | २३९.८४ | २० | ०.५७५८२ | १३८.१० | २७६२.०० |
| २३—२७ | १४९१ | ३८३ | २५६.८७ | २५ | ०.५४७८५ | १४०.७३ | ३५१८.२५ |
| २८—३२ | १४१४ | ३०७ | २१७.११ | ३० | ०.५०७८० | ११०.२४ | ३३०७.२० |
| ३३—३७ | १००१ | १४० | १३९.८६ | ३५ | ०.४५६७० | ६३.८७ | २२३५.४५ |
| ३८—४२ | १०२१ | ६७ | ६६.६२ | ४० | ०.४०३०१ | २६.४५ | १०५८.०० |
| ४३—४७ | ८१८ | २० | २४.४५ | ४५ | ०.३८८९७ | ८.५३ | ३८३.८५ |
| ४८—५२ | ८४३ | १ | १.१९ | ५० | ०.२९५२७ | ०.३५ | १७.५० |
| एकूण | १००८६ | १४५५ | १००७.२६ | | | ५२५.२२ | १३८३६.५० |
| वरील ओळ X ५ | | | ५०३६.३० | | | २६२६.१० | ६९१८२.०० |

४ थ्या स्तंभाच्या आधाराने प्रत्येक स्त्रीमागे एकूण जननक्षमतेचें प्रमाण = ५.०३६३० X ०.४९१४८ (लिंगभेद प्रमाण) = २.४७५२४

७ व्या स्तंभाच्या आधाराने प्रत्येक स्त्रीमागे निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण = २.६२६१० X ०.४९१४८ (लिंगभेद प्रमाण) = १.२९०६८

८ व्या स्तंभाच्या आधाराने $प्र_1$ = ६९.१८२००; $प्र_0$ = २.६२६१०

$$\text{तेव्हां पिढीचें वयोमान} = \frac{प्र_1}{प्र_0} = २६.३४०१$$

**तक्ता क्रमांक ७·७**

**निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण आणि पुरुषांच्या पिढीचें वयोमान**

| वय | पुरुषांची संख्या | पाहणीच्या वर्षांतील जन्मांची संख्या | १००० पुरुषांमागे जननक्षमतेचें प्रमाण | मध्यवर्ती वय | मध्यवर्ती वयापर्यंत जगणाऱ्या पुरुषांचें प्रमाण | स्तंभ ४ × ६ | स्तंभ ५ × ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३—१७ | १५२० | ७ | ४.६१ | १५ | ०.५९८९१ | २.७६ | ४१.४० |
| १८—२२ | १६३५ | ९६ | ५८.७२ | २० | ०.५७४७९ | ३३.७५ | ६७५.५० |
| २३—२७ | १४२१ | ३१२ | २१९.५६ | २५ | ०.५४९९४ | १२०.७४ | ३०१८.५० |
| २८—३२ | १४६५ | ३८५ | २६२.८० | ३० | ०.५१८७७ | १३६.३३ | ४०८९.९० |
| ३३—३७ | १०९९ | २५१ | २२८.३९ | ३५ | ०.४७७५१ | १०९.०६ | ३८१७.१० |
| ३८—४२ | १०९३ | २१६ | १९७.६२ | ४० | ०.४२६३५ | ८४.२६ | ३३७०.४० |
| ४३—४७ | ७४७ | ९९ | १३२.५३ | ४५ | ०.३७१८१ | ४९.२८ | २२१७.६० |
| ४८—५२ | ७५८ | ६१ | ८०.४७ | ५० | ०.३१५५२ | २५.३९ | १२६९.५० |
| ५३—५७ | ४६० | १९ | ४१.१३ | ५५ | ०.२५२८३ | १०.४० | ५७२.०० |
| ५७ च्या वर | ९७२ | ९ | ९.२६ | ६० | ०.१८१७५ | १.६८ | १००.८० |
| एकूण | १११७० | १४५५ | १२३५.०९ | ३७५ | | ५७३.६५ | १११७२.२० |
| वरील ओळ × ५ | | | ६१७५.४५ | | | २८६८.२५ | ९५८६१.०० |

४ थ्या स्तंभाच्या आधाराने प्रत्येक पुरुषाचें एकूण जननक्षमतेचें प्रमाण = ६.१७५४५० × (लिंगभेद प्रमाण) ०.५०८५२ = ३.१४०३४

७ व्या स्तंभाच्या आधाराने प्रत्येक पुरुषाचें निव्वळ जननक्षमतेचें प्रमाण = २.८६८२५ × (लिंगभेद प्रमाण) ०.५०८५२ = १.४५८५६

८ व्या स्तंभाच्या आधाराने $\text{प्र}_1$ = ९५.८६१००; $\text{प्र}_0$ = २.८६८२५

$$\text{तेव्हां पिढीचें वयोमान} = \frac{\text{प्र}_1}{\text{प्र}_0} = ३३.४२१४२$$

स्त्रियांच्या मृत्यूचें प्रमाण जर आपण लक्षांत घेतलें, तर प्रत्येक स्त्रीला तिच्या आयुष्यांत, एकंदर जननक्षमतेचें व मृत्यूचें प्रमाण धरून, किती मुली होतील हें काढतां येईल. या प्रमाणाला निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण असें म्हणतात. पाहणींतील प्रत्येक केंद्रामधील स्त्रियांचें हें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण आम्ही काढूं शकलों नाही. कारण येथील मृत्यूसंबंधीची परिस्थिति आम्हांला माहीत होऊं शकली नाही. म्हणून, हिंदुस्थानच्या पश्चिम विभागांतील खेडे विभागाच्या १९५१ च्या शिरगणतीप्रमाणे जी आयुर्मान-सारणी दिली आहे, तिचा यासाठी आधार घेतला. पाहणींतील सहाहि केंद्रें यांत समाविष्ट आहेत. या आधारावरून ६ केंद्रांतील एकत्रित माहितीप्रमाणे निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण आम्ही काढलें आहे. तें क्रमांक ७·६ या तक्त्यांत दाखविलें आहे. त्यावरून दिसून येईल की, सहा केंद्रांतील एकत्रित लोकसंख्येंत निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण १.२९ एवढें आहे.

लोकसंख्येंतील पुरुषांचेंहि असेंच प्रजोत्पादनाचें प्रमाण काढतां येईल. त्यासाठी मुलग्यांच्या जन्मांचा संबंध त्यांच्या पित्यांशी जोडावा लागेल. याला पित्यांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण म्हणतात आणि वरील तक्त्यांत दिलेल्या प्रमाणाला मातांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण म्हणतात. क्रमांक ७·७ या तक्त्यांत पित्यांच्या निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण दाखविलें आहे. पाहणीच्या वेळीं खेड्यांत असणाऱ्या स्त्रियांकडून मुलग्यांच्या जन्माबद्दल जी माहिती मिळाली, त्या माहितीवर हें प्रमाण आधारलें आहे. या सर्व स्त्रियांचे पति त्या खेड्यांत त्यावेळीं राहत नव्हते. ही परिस्थिति मुख्यत: मिठबाव येथे आढळली. या केंद्रांतील बरेचसे पुरुष नोकरीधंद्यासाठी मुंबईला असतात, याचा उल्लेख मागे आलेलाच आहे. यामुळे पाहणीच्या वेळीं बऱ्याच स्त्रियांचे पति खेड्यांत असलेले आढळले नाहीत. तेव्हां, पाहणीच्या वेळी मुलग्यांचे पिते खेड्यांत असोत वा नसोत, जन्मलेल्या सर्व मुलग्यांचा संबंध त्यांच्या पित्याशीं जोडण्यांत आला होता. पित्यांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण १.४६ एवढें आहे असें दिसून येईल.

मातांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण हें १.२९ आहे, त्याचा अर्थ हा की, सध्याच्या पिढीची स्त्री आपल्यानंतर सरासरीने १.२९ एवढ्या मुली पुढील पिढीसाठी ठेवील. त्याचप्रमाणे पित्यांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण हें जें १.४६ आहे, त्याचा अर्थ हा की, सध्याच्या पिढीचा पुरुष आपल्यानंतर सरासरीने १.४६ एवढे मुलगे पुढील पिढीसाठी ठेवील. या दोन प्रमाणांमधील अंतराचा अर्थ हा की, स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या अधिक वेगानें वाढत आहे. परंतु या दोन प्रमाणांमधील अंतराचें हेंहि एक कारण असूं शकेल की, पिढीचें वयोमान हें पुरुषांच्या व स्त्रियांच्या बाबतींत सारखें नाही. पिढीचें वयोमान सामान्यपणें मातापित्यांचा जन्म आणि मुलांचा जन्म यांच्यामधील अंतराच्या सरासरी एवढें असतें. स्त्रियांच्या व पुरुषांच्या पिढीचें वयोमान क्रमांक ७·६ व ७·७ या तक्त्यांत दिलें आहे. त्यावरून असें दिसून येईल की, स्त्रियांच्या पिढीचें वयोमान २६.३४ वर्षें एवढें व पुरुषांच्या पिढीचें वयोमान ३३.४२ वर्षें एवढें आहे. निव्वळ प्रजोत्पादनाचीं १.२९ आणि १.४६ हीं जीं प्रमाणें आहेत, तीं म्हणजे स्त्रियांच्या व पुरुषांच्या संख्येंत अनुक्रमें २६.३४ व ३३.४२ वर्षांत होणाऱ्या वाढीचीं प्रमाणें आहेत.

या दोन प्रमाणांवरून वार्षिक प्रमाण काढतां येईल. स्त्री-लोकसंख्येचें ०.००९७ आणि पुरुष-लोकसंख्येचें ०.०११४ असें हें प्रमाण निघतें. तेव्हां या दोन प्रमाणांतील अंतर विशेष मोठें नाही. परंतु हें अंतर महत्त्वाचें आहे काय हें ठरविण्यासाठी एकूण माहितीची बरीच बारकाईने तपासणी करावी लागेल.

८

# जननक्षमतेशी संबद्ध सामाजिक व आर्थिक घटक

अनेक कारणांमुळे वैवाहिक जननक्षमतेवर परिणाम होतो असें मानलें जातें. आतापर्यंतच्या आमच्या पाहणींत आम्ही अशा जीवशास्त्रीय व सामाजिक-आर्थिक कारणांची तपासणी केली होती; परंतु साधारणपणें यांपैकी कोणत्याहि कारणांचा वैवाहिक जननक्षमतेवर लक्षांत घेण्याजोगा भला-बुरा परिणाम झाला असल्याचा कोणताच निश्चित पुरावा आम्हांला आढळला नाही. या विशिष्ट पाहणींतहि आम्हांला हेंच दिसून आलें. या प्रकरणांत कांही विशेष महत्त्वाच्या कारणांची तपासणी करून, या कारणांचा वैवाहिक जननक्षमतेवर कांही परिणाम झाला असल्याचा कांहीच पुरावा मिळाला नाही, हें सांगायचें आहे. यासाठी पुढील कारणांचा विचार करावयाचा आहे: (१) सध्याच्या लग्नाचें वय, (२) नवराबायकोच्या वयामधील अंतर, (३) एकूण मुलांची संख्या व क्रम, (४) उत्पन्न, (५) जात. या कारणांचा वैवाहिक जननक्षमतेवर कांही परिणाम झाल्याचा निश्चित पुरावा आढळत नाही, ही गोष्ट क्रमांक ८·१ पासून ८·५ पर्यंतच्या तक्त्यांत दाखवली आहे.

यासाठी पुढील पद्धत स्वीकारली आहे. ज्या कारणाचा विचार करावयाचा त्या कारणा-प्रमाणें विवाहित स्त्रियांचें वर्गीकरण केलें. उदाहरणार्थ, जात. मग यांपैकी प्रत्येक वर्गातील स्त्रियांची वयें लक्षांत घेऊन मागील प्रकरणांत दिलेलें, त्या त्या वयांतील वैवाहिक जननक्षमतेचें विशिष्ट प्रमाण आधाराला घेऊन, प्रत्येक वर्षाला या स्त्रियांना होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या काढली. पाहणीच्या आदल्या वर्षी या स्त्रियांना झालेल्या मुलांच्या संख्येची, या संख्येशी तुलना केली. प्रत्येक वर्गातील स्त्रियांना अपेक्षित असणाऱ्या व प्रत्यक्ष झालेल्या मुलांची संख्या, या दोहोंत बराच सारखेपणा असला, तर विचारांत घेतलेल्या कोणत्याही कारणाचा वैवाहिक जननक्षमतेवर परिणाम झाल्याचा कांहीहि पुरावा नाही, असें मानलें जातें. अपेक्षित असणाऱ्या व प्रत्यक्ष झालेल्या मुलांच्या संख्येमधील फरकाचें संख्याशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व आहे काय, हें विशिष्ट (Chi–Square) कसोटीने पारखून पाहिलें. वरील सर्व कारणांच्या बाबतींत या विशिष्ट कसोटीच्या पद्धतीने अपेक्षित व प्रत्यक्ष झालेल्या मुलांच्या संख्येंत सुसंवादच आहे असें दाखविलें. जो थोडासा फरक असेल, तो संख्याशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही. तेव्हां वरील कारणांचा वैवाहिक जननक्षमतेवर कांही परिणाम झाला असें दाखविणारा कोणताच निश्चित पुरावा नाही, असाच निष्कर्ष निघतो.

पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणें आमच्या सर्वसामान्य पाहणींतूनही आम्ही हाच निष्कर्ष काढला होता. तेव्हां आम्ही पाहणी केलेल्या एकूण लोकसंख्येंत, वैवाहिक जननक्षमतेवर सामान्यतः परिणाम करणाऱ्या कोणत्याहि कारणांचा परिणाम झालेला दिसला नाही, असें म्हणावें लागतें. निदान या कारणांचा कांही परिणाम झाला असेल, तर तो अगदीच थोडा आहे आणि तो निश्चित करण्यासाठी बरीच तपशीलवार पाहणी करावी लागेल.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे मिठबाव या खेड्यांत एक वेगळी विशिष्ट परिस्थिति आढळून आली. ती म्हणजे काम करणाऱ्या वयांतील बऱ्याच पुरुषांचें मुंबईला बराच काळ वास्तव्य असणें ही होय. मिठबावच्या विवाहित स्त्रियांपैकी ३३८ स्त्रियांचे नवरे वर्षांतील बराच काळ मुंबईंत राहत होते.

| लग्नाच्या वेळचें वय वर्षांत | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **बोरी** | | | | **धानोरें** | | | | **मिरजगांव** | | | |
| १२ पर्यंत | ८३० | १६३ | १५८.२२ | ०.१४४४ | ११५ | २४ | २५.०६ | ०.०४४८ | ९७६ | १७० | १६८.९९ | ०.००६० |
| १३—१७ | २८८ | ५१ | ५३.६२ | ०.१२८० | ९१५ | २१६ | २१०.३८ | ०.१५०१ | ३१० | ५७ | ५५.६१ | ०.०३४७ |
| १७ च्या वरील | १३६ | २५ | २६.७७ | ०.११७० | ३६९ | ८३ | ८७.५६ | ०.२३७५ | ६६ | ८ | १०.७९ | ०.७२१४ |
| अनिर्दिष्ट | ३ | — | ०.३८ | — | — | — | — | — | ६ | १ | ०.६१ | — |
| एकूण | १२५७ | २३९ | २३९.०० | ०.३८९ | १३९९ | ३२३ | ३२३.०० | ०.४३२ | १३५८ | २३६ | २३६.०० | ०.७६२ |
| | **मिठबाव** | | | | **मुबलगी** | | | | **नालवार** | | | |
| १२ पर्यंत | २१९ | ३२ | २६.३० | १.२३५४ | ५४५ | ११२ | ११६.८२ | ०.१९८८ | १००७ | १६९ | १६९.८४ | ०.००४२ |
| १३—१७ | ५१२ | ८९ | ९३.४४ | ०.२११० | २९२ | ७१ | ६८.६८ | ०.०७८४ | ५५४ | १०० | ९९.६२ | ०.००१४ |
| १७ च्या वरील | १३१ | २९ | २९.८२ | ०.०२२५ | ६७ | १८ | १५.३३ | ०.३९२८ | ७७ | ९ | ९.६२ | ०.०४०० |
| अनिर्दिष्ट | ८ | १ | १.४४ | — | २१ | ५ | ४.९७ | — | १४ | ३ | १.९२ | — |
| एकूण | ८७० | १५१ | १५१.०० | १.४६९ | ९२५ | २०६ | २०६.०० | ०.६७० | १६५२ | २८१ | २८१.०० | ०.०४६ |

## तक्ता क्रमांक ८·२

### नवराबायकोच्या वयांतील अंतराचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम

| नवराबायकोच्या वयामधील अंतर वर्षांत | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बोरी | | | | थानोरें | | | | मिरजगाव | | |
| ०—५ | ३७७ | ७८ | ६९.८६ | ०.९४८५ | | वर्गीकरण करण्यास पुरेशी माहिती नाही. | | | ४६५ | ८६ | ८७.९५ | ०.०४३२ |
| ६—१० | ६३३ | १२० | १२१.९२ | ०.०३०२ | | | | | ६८६ | ११७ | ११६.१२ | ०.००६७ |
| ११ व वरील | २४० | ३९ | ४५.७४ | ०.९९३२ | | | | | १११ | ३१ | २९.६६ | ०.०६०५ |
| अनिर्दिष्ट | ७ | २ | १.४८ | — | | | | | १६ | २ | २.२७ | — |
| एकूण | १२५७ | २३९ | २३९.०० | १.९७२ | | | | | १३५८ | २३६ | २३६.०० | ०.११० |
| | | मिठबाव | | | | मुवलगी | | | | नालवार | | |
| ०—५ | २२१ | ४६ | ४०.९७ | ०.६१७५ | २३७ | ६३ | ५२.८० | १.९७०५ | ४०८ | ६९ | ७२.४८ | ०.१६७१ |
| ६—१० | ४३३ | ७१ | ७५.९२ | ०.३१८८ | ४८७ | १०३ | १०८.८६ | ०.३१२३ | ८४१ | १४२ | १४२.६३ | ०.००२८ |
| ११ व वरील | २०१ | २९ | ३१.३० | ०.१६९० | २०० | ३९ | ४४.१० | ०.५८९८ | ३७३ | ६७ | ६२.५१ | ०.३२२५ |
| अनिर्दिष्ट | १५ | ५ | २.८१ | — | १ | १ | ०.२७ | — | ३० | ३ | ३.३८ | — |
| एकूण | ८७० | १५१ | १५१.०० | १.१०५ | ९२५ | २०६ | २०६.०० | २.८७३ | १६५२ | २८१ | २८१.०० | ०.४९२ |

तक्ता क्रमांक ८·३

पाहणीपूर्वीच्या काळांतील एकूण जन्मसंख्येचा वैवाहिक जननक्षमतेवर झालेला परिणाम

| पाहणी पूर्वीच्या काळात जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **बोरी** | | | | **वानोरें** | | | | **मिरजगांव** | | | |
| ० | ३२२ | ४५ | ५०.३८ | ०.५७४५ | २१५ | ५६ | ५५.५० | ०.००४५ | ३०४ | ५६ | ५१.६८ | ०.३६११ |
| १—३ | ४६० | १२१ | ११३.५९ | ०.४८३४ | ४७२ | १५८ | १५०.१९ | ०.४०६१ | ४२४ | ८७ | ९८.०१ | १.२३६८ |
| ४—६ | ३१२ | ५९ | ६०.६० | ०.०४२२ | ३६८ | ७९ | ८७.२० | ०.७७११ | ३२६ | ६२ | ५७.७२ | ०.३१७४ |
| ६ च्या वरील | १५७ | १४ | १३.५० | ०.०१८५ | ३४४ | ३० | ३०.११ | ०.०००४ | २८५ | ३० | २५.३४ | ०.८५७० |
| अनिर्दिष्ट | ६ | — | ०.९३ | — | — | — | — | — | ११ | १ | ३.२५ | — |
| एकूण | १२५७ | २३९ | २३९.०० | १.११९ | १३९९ | ३२३ | ३२३.०० | १.१८२ | १३५८ | २३६ | २३६.०० | २.७७२ |
| | **मिठबाव** | | | | **मुबलगी** | | | | **मालवार** | | | |
| ० | १६२ | ३६ | ४०.५१ | ०.५०२१ | २६० | ३९ | ४६.५१ | १.२१२६ | ३१७ | ५८ | ७२.३३ | २.८३९१ |
| १—३ | ३३५ | ७९ | ७४.५२ | ०.२६९३ | २१४ | ७८ | ७८.८४ | ०.०००९ | ६३० | १४० | १३५.४३ | ०.१५४२ |
| ४—६ | २५७ | ३१ | २९.७१ | ०.०५६० | २१८ | ६० | ५५.९० | ०.३००७ | ३७४ | ५५ | ५३.१८ | ०.०६२३ |
| ६ च्या वरील | ११५ | ५ | ५.९८ | ०.१६०६ | १५३ | २९ | २४.७५ | ०.७२९८ | २४८ | २८ | १९.४७ | ३.७३७१ |
| अनिर्दिष्ट | १ | — | ०.२८ | — | — | — | — | — | ३ | — | ०.५९ | — |
| एकूण | ८७० | १५१ | १५१.०० | ०.९८८ | ९२५ | २०६ | २०६.०० | २.२४४ | १६५२ | २८१ | २८१.०० | ६.७९३ |

## तक्ता क्रमांक ८·४

### कुटुंबाच्या उत्पन्नाचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम

| कुटुंबाचे उत्पन्न (रुपये) | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)² / अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बोरी | | | | मिरजगांव | | | | मुवलगी | | | |
| — ५०० | ४९८ | ११० | १०२.४३ | ०.५५९५ | ४३५ | ७२ | ७८.०५ | ०.४६९० | ३४७ | ८६ | ८३.५७ | ०.०७०७ |
| ५०१—१००० | ४६४ | ७६ | ८२.४३ | ०.५०१६ | ५७१ | १०४ | ९८.४७ | ०.३१०६ | ४४२ | ९७ | ९४.०७ | ०.०९१३ |
| १००१ व वरील | २५० | ४७ | ४५.९७ | ०.०२३१ | ३३२ | ५४ | ५६.६३ | ०.१२२१ | १३६ | २३ | २८.३६ | १.०१३० |
| अनिर्दिष्ट | ४५ | ६ | ८.१७ | — | २० | ६ | २.८५ | — | — | — | — | — |
| एकूण | १२५७ | २३९ | २३९.०० | १.०८४ | १३५८ | २३६ | २३६.०० | ०.९०२ | ९२५ | २०६ | २०६.०० | १.१७५ |
| | नालवार | | | | धानोरे | | | | मिठबाव | | | |
| — ५०० | ७२८ | १३८ | १२६.१८ | १.१०७२ | ५०३ | १३२ | १२६.४९ | ०.२४०० | ५९२ | १०७ | १०१.१० | ०.३४४३ |
| ५०१—१००० | ६२० | ९४ | १०२.८४ | ०.७५९९ | ५३३ | १२४ | ११८.०५ | ०.२९९९ | १८४ | ३१ | ३३.३७ | ०.१६८३ |
| १००१ व वरील | २९९ | ४९ | ५१.३३ | ०.१०५८ | ३३६ | ६१ | ७२.६४ | १.८६५२ | ९० | १३ | १५.१० | ०.२९२१ |
| अनिर्दिष्ट | ५ | — | ०.६५ | — | २७ | ६ | ५.८२ | — | ६ | — | १.४३ | — |
| एकूण | १६५२ | २८१ | २८१.०० | १.९७३ | १३९९ | ३२३ | ३२३.०० | २.४०५ | ८७० | १५१ | १५१.०० | ०.८०५ |

तक्ता क्रमांक ८·५

आतीचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम

| जात | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)$^2$ / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)$^2$ / अपेक्षित | स्त्रियांची संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची जन्मसंख्या | अपेक्षित जन्मसंख्या | (प्रत्यक्ष—अपेक्षित)$^2$ / अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोरी | | | | मिरजगांव | | | | थानोरें | |
| ब्राह्मण | ३८ | ५ | ६.५६ | ०.३७१० | ३३ | ४ | ५.५९ | ०.४५२३ | — | — | — | — |
| मागासलेल्या व वर्गीकृत जाती | २९५ | ५२ | ५५.२१ | ०.१८६६ | ३५३ | ६१ | ५९.०७ | ०.०६३१ | १३०५ | ३०८ | ३०२.५६ | ०.०९७८ |
| इतर हिंदू | ७७४ | १५५ | १४९.४४ | ०.२०६९ | ८९४ | १५३ | १५६.९६ | ०.०९९९ | ७८ | १२ | १६.६९ | १.३१७९ |
| हिंदूंशिवाय इतर धर्मांचे | १५० | २७ | २७.७९ | ०.०२२५ | ७८ | १८ | १४.३७ | ०.९१७० | १६ | ३ | ३.७५ | ०.१५०० |
| एकूण | १२५७ | २३९ | २३९.०० | ०.७८७ | १३५८ | २३६ | २३६.०० | १.५३२ | १३९९ | ३२३ | ३२३.०० | १.५६६ |
| | | | मिठबाव | | | | मुबलगी | | | | नालवार | |
| ब्राह्मण | २६ | ४ | ३.३१ | ०.१४३८ | १९ | ६ | ४.१३ | ०.८४६७ | १२ | ३ | २.१६ | ०.३२६७ |
| मागासलेल्या व वर्गीकृत जाती | ४३ | ४ | ८.४९ | २.३७४६ | ८९ | २८ | २१.८५ | १.७३१० | ५९६ | ९८ | १०१.२० | ०.१०१२ |
| इतर हिंदू | ८०१ | १४३ | १३९.२० | ०.१०३७ | २०८ | ४६ | ४५.०५ | ०.०२०० | ४३१ | ७३ | ७२.६८ | ०.००१४ |
| लिंगायत | — | — | — | — | ५१८ | १०६ | ११३.०९ | ०.४४४५ | २५० | ३८ | ४२.३२ | ०.४४१० |
| हिंदूंशिवाय इतर धर्मांचे | — | — | — | — | ९१ | २० | २१.८७ | ०.१५९९ | ३६३ | ६९ | ६२.६४ | ०.६४५७ |
| एकूण | ८७० | १५१ | १५१.०० | २.६२२ | ९१५ | २०६ | २०६.०० | ३.२०२ | १६५२ | २८१ | २८१.०० | १.५१६ |

या विशिष्ट परिस्थितीचा या स्त्रियांच्या जननक्षमतेवर कांही परिणाम झाला काय हें तपासून पाहणें उपयुक्त ठरेल. क्रमांक ८·६ या तक्त्यांत हें केलें आहे. पूर्वी विशद केलेली पद्धतच येथे अनुसरली आहे.

**तक्ता क्रमांक ८·६**

**मिठबाव येथील पुरुषांच्या स्थलान्तराचा वैवाहिक जननक्षमतेवर होणारा परिणाम**

| वय | स्थलांतरित पति असलेल्या विवाहित स्त्रियांची संख्या | प्रत्येक वर्षी मुलांच्या जन्माची अपेक्षित संख्या | प्रत्यक्ष झालेल्या मुलांची वर्षातील संख्या |
|---|---|---|---|
| १३—१७ | १० | २ | २ |
| १८—२२ | ७४ | १५ | २८ |
| २३—२७ | ८० | १९ | २३ |
| २८—३२ | ५५ | १४ | ९ |
| ३३—३७ | ४७ | ६ | ६ |
| ३८—४२ | २९ | २ | २ |
| ४३—४७ | १९ | १ | १ |
| ४८ व वरील | २४ | — | — |
| एकूण | ३३८ | ५९ | ७१ |

या ३३८ स्त्रियांची वयाप्रमाणे विभागणी केली आहे. नंतर त्या त्या वय-गटांतील इतर विवाहित स्त्रियांच्या जननक्षमतेवरून त्यांना एका वर्षांत होणाऱ्या अपेक्षित मुलांची संख्या काढली आहे. या संख्येची, या स्त्रियांना प्रत्यक्ष झालेल्या मुलांच्या संख्येशी तुलना केली आहे. या ३३८ स्त्रियांचें जननकार्य इतर स्त्रियांच्या अपेक्षित जननकार्यापेक्षा कमी नव्हतें हें दिसून येईल. २३ वर्षांवरील वय-गटांत उभय प्रकारच्या स्त्रियांचें प्रमाण सारखेंच आहे; परंतु १८–२२ या खालच्या वय-गटांत इतर स्त्रियांच्या मानाने या स्त्रियांचें प्रमाण बरेंच जास्त पडतें. तेव्हां यावरून हें दिसून येईल की, या स्त्रियांचे पति वर्षातील बराच काळ परगांवीं राहत असले, तरी त्यांच्या जननक्षमतेवर त्याचा कांहीच विपरीत परिणाम झालेला नाही. उलटपक्षीं खालच्या वय-गटांतील स्त्रियांची जनन-क्षमता वाढल्याचेंच दिसून येतें.

# ९

# जननक्षमता – पूर्वीची व सध्याची

मागील प्रकरणांत जननक्षमतेची जी चर्चा केली, ती फक्त एका वर्षांतील म्हणजे पाहणी-पूर्वीच्या एका वर्षांत स्त्रियांना झालेल्या मुलांच्या संख्येच्या आधारावर केली. यांतून जनन-क्षमतेचें जें प्रमाण काढलें आहे, तें सध्याची जननक्षमतेची पातळी धरून काढलें आहे. परंतु पूर्वीच्या मानानें जननक्षमतेच्या पातळींत गेल्या थोडया वर्षांत वाढ किंवा घट झाली असणेंहि शक्य आहे. हें असें आहे किंवा काय हें तपासण्यासाठी आमच्यापाशी कांही अप्रत्यक्ष असा पुरावा आहे. या प्रकरणांत तोच पुढे मांडावयाचा आहे.

आमच्या पाहणींतल्या स्त्रियांना एकंदर किती मुलें झालीं, हें आपणांस माहीत आहे. आमच्या पाहणीच्या वेळीं या स्त्रिया वेगवेगळया वयांच्या होत्या व त्यांना तोंपर्यंत झालेल्या सर्व मुलांची संख्या त्यांनी सांगितली होती. या संख्येची अपेक्षित संख्येशी तुलना करतांना, गेल्या कांही वर्षांत जनन-क्षमतेच्या प्रमाणांत कांही फरक पडला नाही आणि पाहणीपूर्वीच्या वर्षांत त्यांचें जें जननक्षमतेचें प्रमाण आलें, तेंच प्रमाण त्यांचें लग्न झाल्याच्या काळापासून तसेंच चालत आलें आहे, असें गृहीत धरावें लागेल. जर प्रत्यक्ष झालेल्या सर्व मुलांची संख्या, वर गृहीत धरलेल्या समजुतीप्रमाणे अपे-क्षित संख्येपेक्षा जास्त निघाली तर त्या स्त्रियांची जननक्षमतेची पातळी आजच्यापेक्षा पूर्वी जास्त होती असें मानावें लागेल. वेगळया शब्दांत सांगावयाचें तर गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेचें प्रमाण घटलें आहे, असें मानावें लागेल. परंतु जर प्रत्यक्ष झालेल्या सर्व मुलांची संख्या अपेक्षित संख्येपेक्षा कमी निघाली तर उलटें अनुमान काढावें लागेल.

मागच्या एका प्रकरणांत, स्त्रियांचें दिलेल्या वयांतील सध्याचें जननक्षमतेचें प्रमाण काढून दाखविलें होतें. याचा उपयोग करून विशिष्ट वयाच्या विवाहित स्त्रीला, विशिष्ट वयाला लग्न झालें असतां, आतापर्यंतच्या विवाहित आयुष्यांत किती मुलें होतील ही संख्या काढतां येईल; परंतु स्त्रियांचीं लग्नें वेगवेगळया वयांत झालेलीं असल्यामुळे, या पद्धतीने ही संख्या काढणें फार गुंता-गुंतीचें होतें. यापेक्षा सोपी रीत अशी आहे की, विवाहित स्त्रियांच्या जननक्षमतेचें प्रमाण त्यांच्या आजच्या वयावरून न काढतां त्यांच्या वैवाहिक कालावधीवरून काढणें ही होय. विशिष्ट विवाह-कालावधीच्या विवाहित स्त्रीला किती मुलें अपेक्षित आहेत, हें विवाहकाळाचीं जेवढीं वर्षें असतील तेवढया वर्षांपुरतें वार्षिक जननक्षमतेचें प्रमाण एकत्रित करून काढतां येईल.

पाहणीपूर्वीच्या वर्षांत विवाहित स्त्रियांना जीं मुलें झालीं, त्यांच्यावरून त्यांचें विशिष्ट वैवा-हिक कालावधींतील जननक्षमतेचें प्रमाण क्रमांक ९·१ या तक्त्यांत दिलें आहे. यांच्यापैकी बऱ्याचशा स्त्रियांचीं लग्नें १३ वर्षांपूर्वी झालीं होतीं, हें लक्षांत असेलच. परंतु या विशिष्ट कामासाठी त्या स्त्रियांचा विवाहकाळ इतक्या लहान वयापासून मोजणें हें अर्थशून्य ठरेल. म्हणून अशा सर्व स्त्रियांच्या बाबतींत विवाहकाळ हा १३ वर्षांपासूनच धरण्यांत आला आहे.

विशिष्ट कालावधींतील जननक्षमतेचे दर स्त्रीच्या विवाहकाळांतील वर्षांप्रमाणे एकत्रित केले तर सध्याचाच जननक्षमतेचा दर तिच्या विवाहकाळांत चालू होता, असें धरून, त्याप्रमाणे तिला

किती मुलें होतील, त्यांची अपेक्षित संख्या काढतां येते. या संख्येची तुलना त्या स्त्रियांना प्रत्यक्ष किती मुलें झालीं त्या संख्येशी करतां येईल. ही तुलना क्रमांक ९·२ या तक्त्यांत केली आहे. यापुढच्या आलेखांच्या द्वारांहि ती दाखविली आहे.

तक्ता क्रमांक ९·१

विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर (प्रत्येकीं हजार स्त्रियांमागें)

| विवाहाला लोटलेलीं वर्षें | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| ० | — | ५२.६ | — | — | — | — |
| १ | — | २६०.० | ५४.० | १४२.९ | — | ७३.५ |
| २ | ६४.६ | ३०९.५ | ७१.४ | २३८.१ | १३५.१ | २२०.८ |
| ३ | ७१.४ | ४००.० | २६९.५ | ४८३.९ | ८३.३ | २६२.५ |
| ४ | २६४.७ | २७७.८ | २१४.३ | २९६.३ | ४२४.२ | १८५.२ |
| ५ | ८६.२ | ३८०.९ | २३३.९ | ३०४.३ | २१८.२ | ३३८.५ |
| ६ | १८१.८ | ३८४.६ | २१६.२ | ३८४.६ | १३०.४ | ३८४.६ |
| ७ | २७८.३ | ३०५.१ | २७२.७ | २२७.३ | ३२०.८ | १९५.४ |
| ८ | ३३३.३ | ३३३.३ | १३७.९ | २५०.० | २५०.० | २१८.० |
| ९ | २७१.४ | ३७१.९ | ३०१.६ | २४१.४ | ३६८.४ | २६१.९ |
| १० | ३०७.७ | ३८६.० | २९७.३ | २३०.८ | ४१९.३ | ४०४.८ |
| ११ | ४८१.५ | २४०.० | २५९.३ | २४७.८ | ३१५.८ | १६९.५ |
| १२ | २५०.० | ३१६.७ | २७६.६ | २१४.३ | २३६.४ | १५९.४ |
| १३ | २८१.३ | २६०.० | २९६.३ | २८०.० | २००.० | १९६.१ |
| १४ | २७२.७ | २८५.७ | २८२.१ | १११.१ | २७७.८ | २४४.४ |
| १५ | ३११.७ | ३३३.३ | २१८.८ | २००.० | ३२३.५ | १८९.२ |
| १६ | २९४.१ | ३६०.० | २६०.९ | १४२.९ | १२५.० | १११.१ |
| १७ | २१२.१ | २५०.० | १७३.९ | १७६.५ | ३२३.५ | १८६.४ |
| १८ | १८१.८ | ३५४.८ | २२७.३ | ३१२.५ | ३००.० | १३१.६ |
| १९ | ३८७.१ | १२०.० | २४२.४ | २२७.३ | ४००.० | ६१.२ |
| २० | ६२.५ | २४३.९ | २०८.३ | ११७.७ | १००.० | ११७.७ |
| २१ | ४११.८ | १३३.३ | १५०.० | ७१.४ | ३१२.५ | १४२.९ |
| २२ | ७०.४ | ४८.८ | १४२.९ | १३७.९ | ३५४.८ | १३९.५ |
| २३ | १४२.९ | १००.० | १४२.९ | ८३.३ | २२७.३ | २००.० |
| २४ | २६६.७ | — | ३५.७ | ६२.५ | २८५.७ | — |
| २५ | ९५.२ | ११४.३ | ४५.५ | ७४.१ | १००.० | ६६.७ |
| २६ | १११.१ | ७४.१ | — | १००.० | १८१.८ | — |
| २७ | १२३.१ | २०.४ | १०४.१ | ७६.९ | १२५.० | ५७.७ |
| २८ | ४८.५ | १२.५ | ८.६ | १५.४ | ३.० | — |

## तक्ता क्रमांक ९·२


**(१) विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व (२) झालेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना ( प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे )**


| विवाहाला लोटलेलीं वर्षें | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (१) | (२) | (१) | (२) |
| ० | — | — | ५२.६ | ५२.६ | — | — |
| १ | — | ४४.४ | ३१२.६ | ३००.० | ५४.१ | ५४.१ |
| २ | ६४.५ | ११३.६ | ६२२.२ | ५२३.८ | १२५.५ | ११९.१ |
| ३ | १३६.० | २८५.७ | १०२२.२ | ९००.० | ३९५.३ | ४४४.४ |
| ४ | ४००.७ | ६४७.१ | १२९९.९ | १०५५.६ | ६०९.६ | ६४२.९ |
| ५ | ४८६.९ | ३६२.१ | १६८०.९ | १५८७.३ | ८४२.९ | ७५०.० |
| ६ | ६६८.७ | ९०९.१ | २०६५.५ | १८६१.५ | १०५९.२ | १२४३.२ |
| ७ | ९४७.० | ९६९.१ | २३७०.६ | २१८६.४ | १३३१.९ | १५९६.० |
| ८ | १२८०.४ | १२७७.८ | २७०३.९ | २५१५.२ | १४६९.८ | १८६२.१ |
| ९ | १५५१.८ | १६८५.७ | ३०७६.८ | ३०६७.८ | १७७१.४ | २२५४.० |
| १० | १८५९.५ | १८४६.२ | ३४६२.८ | ३४५६.१ | २०६८.७ | २८६४.९ |
| ११ | २३४१.० | २४०७.४ | ३७०२.८ | ३६२०.० | २३२८.० | २८५१.९ |
| १२ | २५९१.० | २४०९.१ | ४०११.४ | ४०८३.३ | २६०४.६ | ३३२९.८ |
| १३ | २८७२.२ | २९३७.५ | ४२७९.४ | ४२६०.० | २९००.९ | ४५५५.६ |
| १४ | ३१४५.० | २८६३.६ | ४५६५.१ | ४५४७.६ | ३१८२.९ | ४१२८.२ |
| १५ | ३४५६.६ | ३४१५.६ | ४८९८.५ | ४८९७.४ | ३४०१.७ | ४९०६.३ |
| १६ | ३७५०.८ | ४२९४.१ | ५२५८.५ | ५४४०.० | ३६६२.५ | ४५२१.७ |
| १७ | ३९६२.९ | ३७९८.० | ५५०८.५ | ५३७५.० | ३८३६.५ | ४८४७.८ |
| १८ | ४१४४.७ | ४२२२.२ | ५८६३.३ | ५९६७.७ | ४०६३.७ | ५९५४.६ |
| १९ | ४५३१.८ | ४१९३.६ | ५९८३.३ | ६४००.० | ४३०६.१ | ६०००.० |
| २० | ४५९४.३ | ४०००.० | ६२२७.२ | ६०७३.१ | ४५१४.५ | ७३३३.३ |
| २१ | ५००६.१ | ६२३५.३ | ६३६०.५ | ६२००.० | ४६६४.५ | ७१००.० |
| २२ | ५०७६.५ | ४७४६.५ | ६४०९.३ | ६७०७.३ | ४८०७.३ | ६३८१.० |
| २३ | ५२११.३ | ५८५७.१ | ६५०९.३ | ७३३३.३ | ४९५०.२ | ६३५७.१ |
| २४ | ५४८६.० | ६०००.० | ६५०९.३ | ७४४४.४ | ४९८५.९ | ६४६४.३ |
| २५ | ५५८१.३ | ४९०४.८ | ६६२३.६ | ७६५७.१ | ५०३१.४ | ६६८१.८ |
| २६ | ५६९२.४ | ७२२२.२ | ६६९७.७ | ६४८१.५ | ५०३१.४ | ५३३३.३ |
| २७ | ५८१५.४ | ५९८४.६ | ६७१८.१ | ७३४६.९ | ५१३५.५ | ६५८३.३ |
| २८ | ५८६४.० | ६६७४.८ | ६७३०.६ | ७८०८.३ | ५१४४.१ | ७२२३.२ |


## तक्ता क्रमांक ९·२ (चालू)


### (१) विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व (२) झालेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना (प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे)


| विवाहाला लोटलेलीं वर्षे | मिठबाव | | मुवलणी | | नालवार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (१) | (२) | (१) | (२) |
| ० | — | — | — | — | — | — |
| १ | १४२.९ | २३८.१ | — | ९७.६ | ७३.५ | १०२.९ |
| २ | ३८१.० | ४७६.२ | १३५.० | १६२.२ | २९४.३ | ३२४.७ |
| ३ | ८६४.८ | १०००.० | २१८.५ | २२२.२ | ५५६.८ | ६८७.५ |
| ४ | ११६१.१ | ९२५.९ | ६४२.७ | ७२७.३ | ७४२.० | ९०१.२ |
| ५ | १४६५.५ | ८२६.१ | ८६०.९ | ८३६.४ | १०८०.५ | १२९२.३ |
| ६ | १८५०.१ | १६१५.४ | ९९१.३ | ९५६.५ | १४६५.१ | १५६९.२ |
| ७ | २०७७.४ | १५२२.७ | १३१२.१ | ११८८.७ | १६६०.५ | १६७८.२ |
| ८ | २३२७.४ | २०४१.७ | १५६२.१ | १७५०.० | १८७८.४ | १८०७.७ |
| ९ | २५६८.८ | २३१०.३ | १९३०.५ | २१०५.३ | २१४०.३ | २५००.० |
| १० | २७९९.५ | २१५३.९ | २३४९.८ | २०९६.८ | २५४५.१ | ३१६६.७ |
| ११ | ३१४७.४ | २३४७.८ | २६६५.६ | २८९४.७ | २७१४.६ | ३२८८.१ |
| १२ | ३३६१.६ | ३०७१.४ | २९०२.० | २८७२.७ | २८७४.० | ३२६०.९ |
| १३ | ३६४१.६ | ३१२०.० | ३१०२.० | ३१३३.३ | ३०७०.१ | ३४५१.० |
| १४ | ३७५२.८ | २९४४.४ | ३३७९.८ | ३८८८.९ | ३३१४.५ | ३८२२.२ |
| १५ | ३९५२.८ | २७६६.७ | ३७०३.३ | ३६७६.५ | ३५०३.७ | ३३५१.४ |
| १६ | ४०९५.६ | ४१४२.९ | ३८२८.३ | ३८७५.० | ३६१४·८ | ४४०७.४ |
| १७ | ४२७२.१ | ३८८२.४ | ४१५१.८ | ४०४४.१ | ३८०१.३ | ४५७६.३ |
| १८ | ४५८४.६ | ४५६२.५ | ४४५१.८ | ७५००.० | ३९३२.८ | ४७१०.५ |
| १९ | ४८११.९ | ४७२७.३ | ४८५१.८ | ४९६६.७ | ३९९४.१ | ५३०६.१ |
| २० | ४९२९.५ | ४२९४.१ | ४९५१.८ | ४९००.० | ४१११.७ | ६४११.८ |
| २१ | ५०००.९ | ४३५७.१ | ५२६४.३ | ६१२५.० | ४२५४.६ | ५५१४.३ |
| २२ | ५१३८.९ | ४६२०.७ | ५६१९.२ | ६०००.० | ४३९४.१ | ६१६२.८ |
| २३ | ५२२२.२ | ४०००.० | ५८४६.४ | ५४०९.१ | ४५९४.१ | ६४००.० |
| २४ | ५२८४.७ | ५२५०.० | ६१३२.२ | ६८५७.१ | ४५९४.१ | ५०६६.७ |
| २५ | ५३५८.८ | ५३७०.४ | ६२३२.२ | ४७००.० | ४६६०.८ | ५३७७.८ |
| २६ | ५४५८.८ | ७१००.० | ६४१४.० | ८२७२.७ | ४६६०.८ | ६४५४.६ |
| २७ | ५५३५.७ | ५६१५.४ | ६५३९.० | ६८५०.० | ४७१८.५ | ६५१९.२ |
| २८ | ५५५१.१ | ५८३८.५ | ६५४२.० | ७०४०.० | ४७१८.५ | ६०५६.७ |



प्रत्येकीं १००० स्त्रियांमागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर प्रत्येकीं हजार स्त्रियांमागे
प्रत्येकीं १००० स्त्रियांमागे एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
७०००
६०००
५०००
४०००
३०००
२०००
१०००
०
५
१०
१५
२०
२५
२८


प्रत्येकी १००० स्त्रियामागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर प्रत्येकी हजार स्त्रियामागे
प्रत्येकी १००० स्त्रियामागे एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
१००० २००० ३००० ४००० ५००० ६००० ७०००
५ १० १५ २० २५ २८


प्रत्येकी १००० स्त्रियांमागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
मिरजगांव
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर प्रत्येकी हजार स्त्रियांमागे
प्रत्येकी १००० स्त्रियांमागे एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
७०००
६०००
५०००
४०००
३०००
२०००
१०००
१०
१५
२०
२५
२८


प्रत्येकी १००० स्त्रियांमागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा —o— संकलित दर प्रत्येकी हजार स्त्रियांमागे
प्रत्येकी १००० स्त्रियांमागे ---x--- एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
०
१०००
२०००
३०००
४०००
५०००
६०००
५
१०
१५
२०
२५


प्रत्येकी १००० स्त्रियांमागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर प्रत्येकी हजार स्त्रियांमागे
प्रत्येकी १००० स्त्रियांमागे एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
७०००
६०००
५०००
४०००
३०००
२०००
१०००
०
५
१०
१५
२०
२५


प्रत्येकी १००० स्त्रियांमागे मुलांची संख्या
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर व जन्मलेल्या मुलांची एकूण संख्या यांची तुलना
नालवार
विवाहकालसापेक्ष जननक्षमतेचा संकलित दर प्रत्येकी हजार स्त्रियामागे
प्रत्येकी १००० स्त्रियामागे एकूण जन्मलेल्या मुलांची संख्या
विवाहाला लोटलेला कालावधि वर्षांत
० ५ १० १५ २० २५ २८
१००० २००० ३००० ४००० ५००० ६००० ७०००

या आलेखांवरून हें दिसून येईल की, सहापैकी तीन केंद्रांतील वेगवेगळया वय-गटांतील स्त्रियांना प्रत्यक्ष झालेल्या मुलांची संख्या, आणि पाहणीच्या आदल्या वर्षीच्या जन्मांवरून काढलेल्या विशिष्ट काळाच्या जननक्षमतेच्या प्रमाणानुसार त्यांना होणाऱ्या मुलांची अपेक्षित संख्या, या बऱ्याच जुळणाऱ्या दिसतात. तेव्हां या तीन केंद्रांत गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेच्या पातळींत कांही फरक झाल्याचा पुरावा आढळत नाही. उलटपक्षीं मिरजगांव व नालवार येथे गेल्या कांही वर्षांत जनन-क्षमतेंत थोडीशी घट झाल्याचें दिसतें. या दोन्ही केन्द्रांमध्ये सध्याच्या जननक्षमतेच्या प्रमाणावरून अपेक्षित मुलांची संख्या ही प्रत्यक्ष झालेल्या मुलांच्या संख्येपेक्षा कमी होती. या दोन संख्यांमधील फरक नालवारपेक्षा मिरजगांव येथे जास्त आहे. तरीहि या दोन्ही केंद्रांच्या बाबतींतील हा पुरावा अगदी स्पष्ट दिसत आहे आणि सांगण्यांतील चुकांमुळे फरक उत्पन्न झाला असें म्हणून उपेक्षा करण्या-सारखा नाही. कारण स्त्रियांकडून माहिती देण्यांत कांही चुका झालेल्या असल्या, तरी प्रत्यक्ष झालेल्या मुलांची संख्या कमी सांगण्याच्याच चुका होण्याचा संभव आहे. कारण मरण पावलेल्या मुलांची संख्या सांगण्यांत पुष्कळदां गळली असण्याचाच संभव आहे. यामुळे प्रत्यक्ष झालेल्या म्हणून सांगितलेल्या मुलांचा आंकडा वास्तविक झालेल्या मुलांपेक्षा कमी असण्याचीच शक्यता आहे. मिठबाव येथें असेंच घडून आलें असें दिसतें. या ठिकाणीं प्रत्यक्ष झालेल्या म्हणून सांगितलेल्या मुलांची संख्या अपेक्षित जन्म-संख्येपेक्षा कमी आहे; म्हणजे या केंद्रांत गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेचें प्रमाण वाढलें असावें असें सूचित होतें. परंतु प्रत्यक्ष झालेल्या म्हणून सांगितलेल्या मुलांच्या संख्ये-बद्दल अधिक खोलांत शिरून पाहिलें, तेव्हां असें आढळून आलें की मरण पावलेल्या मुलांचा आंकडा कमी सांगितला गेल्यामुळें प्रत्यक्ष झालेल्या म्हणून सांगितलेल्या मुलांची संख्याहि असल्यापेक्षा कमी सांगितली गेली होती. क्रमांक ९·३ या तक्त्यांत प्रत्येक केंद्रामधील वेगवेगळया वयांच्या स्त्रियांनी झालेल्या मुलांच्या सांगितलेल्या संख्येमध्ये मृत मुलांचें प्रमाण दाखविलें आहे. त्यावरून हें दिसून येईल की, इतर सर्व केंद्रांपेक्षा मिठबाव येथे सर्व वयांच्या स्त्रियांच्या मुलांमध्ये मृत्यूचें प्रमाण सर्वांत कमी आहे. हें इतकें कमी मृत्यूचें प्रमाण असण्यासारखें मिठबाव येथील सार्वजनिक

**तक्ता क्रमांक ९·३**

**वेगवेगळया वय-गटांतील स्त्रियांना झालेल्या मुलांपैकीं मृत मुलांचें शेकडयांत प्रमाण**

| वय-गट | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १८—२२ | २७.१ | १७.६ | २६.० | १०.८ | २७.८ | २६.० |
| २३—२७ | २९.६ | २२.९ | २२.३ | १३.६ | २९.३ | २९.४ |
| २८—३२ | ३५.३ | २७.४ | २८.५ | १४.० | २८.२ | ३४.६ |
| ३३—३७ | ३७.८ | २५.३ | २६.३ | १६.७ | ३४.७ | ३६.६ |
| ३८—४२ | ३६.८ | २९.० | ३१.५ | १६.८ | ३७.८ | ३७.७ |
| ४३—४७ | ३३.० | ३२.० | ३३.८ | १८.६ | ३४.१ | ३९.१ |
| ४८—५२ | ४३.३ | ३१.७ | ३२.३ | १९.४ | ४४.८ | ४० १ |
| ५३ व वरील | ४३.६ | ३१.० | ४२.८ | २८.३ | ४३.१ | ४६.५ |
| एकूण | ३६.३ | २७.९ | २९.६ | १८.२ | ३४.० | ३४.५ |

स्वच्छता व आरोग्य यांच्यांत कांहीच आढळलें नाही. म्हणून आमचें अनुमान असें आहे की, या केंद्रांत प्रत्यक्ष झालेल्या मुलांची सांगण्यांत आलेली संख्या प्रत्यक्षापेक्षा कमी असावी आणि म्हणून सध्याच्या जननक्षमतेच्या प्रमाणानुसार अपेक्षित संख्येपेक्षा ती फारशी कमी नसावी. म्हणून गेल्या कांही वर्षांत या केंद्रांतील जननक्षमतेंत जी वाढ झाल्यासारखी दिसते, ती खरी नसावी.

शेवटीं असा निष्कर्ष निघतो की, गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेची पातळी जवळपास पूर्वी-सारखीच राहिलेली आहे. परंतु कांही केंद्रांमध्ये मात्र गेल्या कांही वर्षांत जननक्षमतेचें प्रमाण घटल्याचा पुरावा आढळतो. हा पुरावा महत्त्वाचा आहे. कारण आमच्या पहिल्या पाहणींतहि असाच पुरावा आढळला होता.

# १०

# कुटुंबनियोजनासंबंधीचे दृष्टिकोन

संततिनियमन व कुटुंबनियोजन यांच्याकडे पाहण्याची एकंदर लोकांची काय दृष्टि आहे, याचा अंदाज घेणें हा या विशिष्ट पाहणीमागचा एक महत्त्वाचा हेतु होता. आमच्या अन्वेषिका त्या त्या खेड्यांत सहा महिने राहिल्यानंतरच, पाहणींतलें हें कार्य हातीं घेण्यांत आलें. पूर्वी सांगितलेंच आहे की, आमच्या अन्वेषिका या सर्व प्रशिक्षित नर्सेस व हेल्थ व्हिजिटर्स होत्या. तसेंच त्यांनी पुणें महानगरपालिकेच्या कुटुंबनियोजन केंद्रांत दोन आठवड्यांचें प्रशिक्षणहि घेतलें होतें. आमच्या पाहणीच्या क्षेत्रांतील खेड्यांत सुइणीचें काम करण्याची आम्ही त्यांना मुद्दामच मोकळीक दिली होती. त्याचप्रमाणे लहान लहान रोगांवर औषधयोजना करण्याचीहि मुभा त्यांना दिली होती आणि यासाठी आवश्यक त्या औषधांचाहि पुरवठा केला होता. लोकांचा विश्वास मिळविण्याच्या दृष्टीने, तसेंच कुटुंबनियोजनाबद्दलची चर्चा करण्यास अवश्य ती संधि मिळवून देण्याच्या दृष्टीने हें सर्व फार उपयुक्त ठरलें.

पाहणीच्या या भागासाठी जी प्रश्नावलि उपयोगांत आणली, ती इतर प्रश्नावलींबरोबर पहिल्या प्रकरणाच्या परिशिष्टामध्ये दिली आहे. परंतु या विशिष्ट पाहणीसाठी तयार केलेली ही प्रश्नावलि अन्वेषिकांच्या मार्गदर्शनासाठीच मुख्यत: होती. माहिती गोळा करून ठराविक पद्धतीने नोंदण्यासाठी नव्हती. म्हणून अन्वेषिकांनी ही प्रश्नावलि ठरलेल्या प्रकारें भरली नाही. तसेंच या कामासाठी स्त्रियांची एकदा भेट घेऊन काम भागलें नाही. एका विशिष्ट वयाच्या विवाहित स्त्रियांची या कामासाठी अन्वेषिकांनी वारंवार भेट घेतली आणि जेथे त्या त्या स्त्रीला कुटुंबनियोजनाची माहिती खरोखरच हवी आहे असें दिसून आलें, तेथेच त्या स्त्रियांबद्दलची अवश्य ती माहिती टिपून घेतली. कुटुंबनियोजनाबद्दल एखाद्या स्त्रीने खरोखरच उत्सुकता दाखविली, तर संततिप्रतिबंधासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व पद्धतींची तिला क्रमाक्रमाने माहिती दिली गेली. ऱ्हिदम् पद्धतीपासून ( Rhythm method ) प्रारंभ करून, शस्त्रक्रिया करण्याच्या पद्धतीपर्यंत सर्व पद्धतींची माहिती, तिला हळूहळू व ती उत्सुकता दाखवील त्या प्रमाणांत दिली गेली. एखाद्या स्त्रीला यासंबंधी उत्सुकता नसली, तर ती अन्वेषिकेला तसें स्पष्ट सांगे व मग तिला माहिती देण्याचा आग्रह धरला जात नव्हता. या विशिष्ट पाहणीच्या अशा पद्धतीमुळे कुटुंबनियोजनासंबंधीच्या दृष्टींबद्दलची एकत्रित माहिती ही भरलेल्या प्रश्नावलींच्या स्वरूपांत न येतां, विशिष्ट स्त्रियांबद्दलचीं टिपणें अशा स्वरूपांत आली. या टिपणांत अन्वेषिकांना वेगवेगळ्या स्त्रियांच्या प्रतिक्रियांतील विविधता जाणून घेतां आली.

पाहणीच्या या भागाबद्दल असें ठरविण्यांत आलें होतें की, २५ ते ४० या वय-गटांतील व पाहणीपूर्वीच्या पांच वर्षांत ज्यांनी निदान एक गरोदरपण अनुभविलें आहे, अशा सर्व विवाहित स्त्रियांची पाहणी करण्यांत यावी. परंतु पुरेसा वेळ नसल्यामुळे सामान्यत: अशा स्त्रियांपैकी जवळजवळ निम्या स्त्रियांनाच भेटणें शक्य झालें. अशा माहितीसाठी भेटलेल्या स्त्रियांचें प्रमाण सर्व केंद्रांत सारखें नव्हतें. मिठबाव येथे हें काम जवळ जवळ पूर्ण झालें होतें. उलटपक्षीं मुदलगी येथे या बाबतीं-

तील संपूर्ण पाहणी सोडून द्यावी लागली. क्रमांक १०·१ या तक्त्यांत, पांच केंद्रांमध्ये वरील व्याख्येंत बसणाऱ्या व म्हणून ज्यांना भेटणें अवश्य होतें, अशा स्त्रियांची संख्या आणि प्रत्यक्ष जितक्या स्त्रियांच्या बाबतींत टिपणें केलीं गेलीं, त्यांची संख्या दिली आहे.

**तक्ता क्रमांक १०·१**

**कुटुंबनियोजन पाहणीसाठी निवडलेल्या स्त्रियांची संख्या व प्रत्यक्ष भेटी दिल्या गेलेल्या स्त्रियांची संख्या**

| खेडें | कुटुंबनियोजन पाहणीसाठी निवडलेल्या स्त्रियांची संख्या | भेटलेल्या स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| बोरी | २०४ | ६८ |
| धानोरें | २३६ | ९८ |
| मिरजगांव | २४१ | १५७ |
| मिठबाव | २८९ | २२६ |
| नालवार | ३३७ | ९८ |
| एकूण | १३०७ | ६४७ |

शेवटची प्रसूति किंवा शेवटचें गरोदरपण यांच्या बाबतींत या स्त्रियांना प्रश्न विचारण्यांत येत. कारण यामुळे शारीरिक किंवा आर्थिक त्रास होत आहे काय, याचा अंदाज घ्यावयाचा होता. भेट घेतलेल्या एकूण स्त्रियांपैकी शेकडा ७४ जणींनी गरोदरपणांत कांही त्रास होत नसल्याचें सांगितलें. उरलेल्यांनी थोडचा तक्रारी सांगितल्या. फक्त शेकडा ५ जणींनाच त्यासाठी वैद्यकीय उपचार करावे लागले होते. शेकडा ८१ जणींना प्रसूतीच्या वेळीं कांही त्रास होत नव्हता. शेकडा ८ जणींना फक्त प्रसूतीच्या वेळींच त्रास होत होता. उरलेल्या शेकडा ११ जणींनी मात्र प्रसूतीच्या वेळीं व नंतरहि फार त्रास होत असल्याचें सांगितलें. शेकडा ५ जणींनी सांगितलें की, शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीने आपल्याला यापुढे मूल होणें हानिकारक आहे.

शेकडा ८६ जणींची प्रसूति स्वतःच्या घरींच झाली होती. शेकडा ११ जणींची प्रसूति त्यांच्या आईच्या घरीं झाली होती. शेकडा ३ जणींची प्रसूति मात्र हॉस्पिटलमध्ये झाली होती. हीं उदाहरणें मिरजगांव येथील होतीं. क्रमांक १०·२ या तक्त्यांत या स्त्रियांचें वर्गीकरण बाळंतपणांत व नंतर त्यांना मुख्यतः कोणाची मदत मिळाली त्यावरून केलें आहे. क्रमांक १०·३ या तक्त्यांत प्रसूतीसाठी झालेल्या खर्चाप्रमाणे या स्त्रियांचें वर्गीकरण केलें आहे.

सर्वसाधारणपणें प्रसूति ही नित्याची व साधी घटना आहे आणि यांत विशेष त्रास असा कांही नाही असेंच स्त्रियांना वाटत असलेलें दिसलें. प्रसूतिकाळांत कोणाची मदत मिळत नसल्याची किंवा न झेपणारा खर्च होत असल्याची तक्रार थोडचाच जणींनी केली.

या स्त्रियांची कुटुंबनियोजनासंबंधी किंवा कुटुंब मर्यादित ठेवण्यासंबंधी म्हणजे मुख्यतः संततिप्रतिबंधासंबंधी काय वृत्ति होती तें आतां पाहूं. प्रथम आपण कुटुंबनियोजन व संततिनियमन यांच्यांत भेद न करतां संततिप्रतिबंध हा सर्वसामान्य शब्दच यासाठी वापरूं. आमच्या अन्वेषिकांनी ज्यांच्या भेटी घेतल्या, त्या ६४७ स्त्रियांपैकी शेकडा ४० जणींनी संततिप्रतिबंधक उपायांविषयी आपलें अनुकूल मत व्यक्त केलें. उलटपक्षीं जवळजवळ तितक्याच स्त्रियांनी आपलें प्रतिकूल मत दर्शविलें.

### तक्ता क्रमांक १०·२

### गेल्या प्रसूतीच्या वेळीं व नंतरच्या बाळंतपणाच्या दिवसांत मदत करणाऱ्यांच्या नात्याप्रमाणे स्त्रियांची विभागणी

| मदत देणारे | स्त्रियांची शेकडेवारी |
|---|---|
| सासू | २८.१ |
| इतर सासरची मंडळी | १४.१ |
| मुलगी | १४.३ |
| आई | २४.७ |
| बहीण | ४.१ |
| माहेरचे नातेवाईक | ४.८ |
| पति व इतर पुरुष | ५.१ |
| इतर | ४.९ |
| एकूण संख्या | ६४७ |

शेकडा ७ जणींच्या बाबतींत १४ वर्षांखालील मुलांची मदत होती.

### तक्ता क्रमांक १०·३

### गेल्या प्रसूतीवरील खर्चाप्रमाणे स्त्रियांची विभागणी

| रुपयांत खर्च | स्त्रियांची शेकडेवारी |
|---|---|
| रु. ५ पर्यंत | २६.६ |
| रु. ६ ते १५ | १४.८ |
| रु. १६ ते २५ | १९.५ |
| रु. २६ ते ५० | २५.९ |
| रु. ५० च्या वर | १३.२ |
| एकूण संख्या | ६४७ |

उरलेल्या स्त्रियांपैकी शेकडा १५ जणींनी या विषयाची चर्चा करावयासच नकार दिला. त्यांचें मत एकंदरीने विरोधी होतें असें म्हणतां येईल. परंतु यांच्यापैकी कांही जणींना हा विषय चर्चा करण्याच्याहि दृष्टीने धोक्याचा वाटला असावा व म्हणून त्यांनी चर्चा केली नसावी, अशीहि शक्यता आहे. शेकडा ३ जणींनी आपला विरोध दर्शविला नाही. परंतु आपल्याला संततिप्रतिबंधक उपायांची गरज नाही, असें सांगून या बाबतींत उत्सुकता दाखवली नाही. शेकडा २ जणींना नीट समजलेलें दिसलें नाही व म्हणून कांही उत्तर देतां आलें नाही, असें वाटलें. या विषयाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन थोडक्यांत अशा प्रकारचा होता.

संततिप्रतिबंधक उपायांना अनुकूल व प्रतिकूल अशा दोन गटांतील स्त्रियांमध्ये पुढील गोष्टीं-बाबत कांही फरक होता काय हें आतां पाहूं. त्यांची वैयक्तिक, सामाजिक व कौटुंबिक परिस्थिति म्हणजे त्यांचें सध्याचें वय, त्यांना झालेल्या मुलांची संख्या, त्यांना असणाऱ्या जिवंत मुलांची संख्या, त्यांची जात व त्यांच्या नवऱ्यांचा शैक्षणिक दर्जा यासंबंधीची माहिती तक्ता क्रमांक १०·४ ते १०·८ यांच्यामध्ये दाखविली आहे. या तक्त्यांत वरील परिस्थितीतील घटकांप्रमाणे स्त्रियांचें वर्गीकरण केलें आहे. आणि संततिप्रतिबंधाला अनुकूल व प्रतिकूल असणाऱ्या त्या त्या वर्गांतील स्त्रियांचें शेकडेवारीत प्रमाण दाखविलें आहे. यावरून हें दिसून येईल की, ज्या स्त्रिया प्रौढ वय-गटांत होत्या, ज्यांना बरींच मुलें झालीं होतीं आणि ज्यांना जिवंत मुलगे बरेच होते, त्या स्त्रियांपैकी बऱ्याच जणी संततिप्रतिबंधाला अनुकूल होत्या. हें अपेक्षित असेंच होतें. मुलांच्या मृत्युसंख्येच्या प्रमाणाचाहि स्त्रियांच्या अनुकूल किंवा प्रतिकूल दृष्टिकोनावर परिणाम झालेला आढळला. उदाहरणार्थ, संतति-प्रतिबंधाला अनुकूल असलेल्या स्त्रियांत एकूण जन्मलेल्या मुलांपैकी जिवंत मुलांचें प्रमाण शेकडा ७९.८ एवढें होतें, आणि प्रतिकूल असलेल्या स्त्रियांच्या बाबतींत हें प्रमाण ७४.३ एवढें होतें. प्रत्येक गटांतील स्त्रियांची तुलना केली असतांहि हेंच आढळून आलें. सर्व वय-गटांतील स्त्रियांमध्ये ज्या अनुकूल होत्या, त्यांच्या जिवंत मुलांचें प्रमाण प्रतिकूल असणाऱ्या स्त्रियांच्या मुलांपेक्षा अधिक होतें. तेव्हां या सर्वच बाबतींत स्त्रियांची संततिप्रतिबंधाबद्दलची जी वृत्ति बनलेली आढळली, ती सर्वसामान्यपणें अपेक्षित अशीच दिसून येते.

### तक्ता क्रमांक १०·४
### वेगवेगळया गटांतील स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति

| संततिप्रतिबंधा-संबंधी वृत्ति | —वय-गट— –२७ | २८–३२ | ३३–३७ | ३७ वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | —स्त्रियांची शेकडेवारी— | | | | |
| अनुकूल | ३६.८ | ३८.० | ४३.७ | ४४.१ | ३९.१ |
| प्रतिकूल | ४५.६ | ३९.६ | ३४.४ | ३६.८ | ३९.१ |
| इतर | १७.७ | २२.४ | २१.९ | १९.१ | २१.८ |
| एकूण संख्या | १७३ | २५१ | १५४ | ६९ | ६४७ |

### तक्ता क्रमांक १०·५
### एकूण झालेल्या मुलांप्रमाणें स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति

| संततिप्रतिबंधा-संबंधी वृत्ति | —जन्मलेल्या मुलांची संख्या— –२ | ३–५ | ६–८ | ८ वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | —स्त्रियांची शेकडेवारी— | | | | |
| अनुकूल | १८.८ | ३६.४ | ४९.१ | ४७.५ | ३९.१ |
| प्रतिकूल | ६०.० | ४३.३ | ३१.७ | २५.४ | ३९.१ |
| इतर | २१.२ | २०.३ | १९.२ | २७.१ | २१.८ |
| एकूण संख्या | ८२ | २८० | २२५ | ६० | ६४७ |

## तक्ता क्रमांक १०·६

### जिवंत असणाऱ्या मलग्यांप्रमाणें स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति

| संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | —जिवंत मुलांची संख्या— ० | १ | २ | ३–५ | ५ वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | —स्त्रियांची शेकडेवारी— | | | | | |
| अनुकूल | १९.२ | ३५.७ | ३७.३ | ५३.१ | ५४.५ | ३९.१ |
| प्रतिकूल | ५३.९ | ४४.४ | ४४.१ | २६.१ | २७.३ | ३९.१ |
| इतर | २६.९ | १९.९ | १८.६ | २०.८ | १८.२ | २१.८ |
| एकूण संख्या | ७९ | १९९ | १६३ | १९५ | ११ | ६४७ |

## तक्ता क्रमांक १०·७

### वेगवेगळ्या जातींतील स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति

| संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | ब्राह्मण | पुढारलेले व मध्यम हिंदू | वर्गीकृत व मागासलेल्या जाति | इतर जाति | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | —स्त्रियांची शेकडेवारी— | | | | |
| अनुकूल | ६२.५ | ३६.५ | ४१.८ | ४८.७ | ३९.१ |
| प्रतिकूल | २०.८ | ४३.५ | ३३.९ | ३७.८ | ३९.१ |
| इतर | १६.७ | २०.० | २४.३ | १३.५ | २१.८ |
| एकूण संख्या | २४ | ४०६ | १७९ | ३८ | ६४७ |

## तक्ता क्रमांक १०·८

### नवऱ्याच्या शैक्षणिक दर्जाप्रमाणे स्त्रियांची संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति

| संततिप्रतिबंधासंबंधी वृत्ति | —नवऱ्याचा शैक्षणिक दर्जा— शाळेंत न गेलेले | ५ व्या वर्गापर्यंत | ६ व्या व ७ व्या वर्गाचे | सातवीच्या वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | —स्त्रियांची शेकडेवारी— | | | | |
| अनुकूल | ४०.७ | ४१.७ | ३३.० | ३९.३ | ३९.१ |
| प्रतिकूल | ३७.८ | ४३.३ | ४०.२ | ३६.९ | ३९.१ |
| इतर | २१.५ | १५.० | २६.८ | २३.८ | २१.८ |
| एकूण संख्या | २७३ | १८८ | ९९ | ८७ | ६४७ |

जातीचाहि स्त्रियांच्या अनुकूलतेवर किंवा प्रतिकूलतेवर परिणाम झालेला दिसला. ब्राह्मण स्त्रियांच्या लहान गटापैकी शेकडा ६२.५ स्त्रिया संततिप्रतिबंधाला अनुकूल होत्या. उलटपक्षीं पुढारलेल्या व मधल्या जातीच्या हिंदू स्त्रियांच्या बहुसंख्य गटापैकी फक्त शेकडा ३६·५ एवढयाच स्त्रिया अनुकूल होत्या. या बाबतींत हें ध्यानांत घेण्यासारखें आहे की, वर्गीकृत व मागासलेल्या जातींतील आणि हिंदूंखेरीज इतर धर्मांतील स्त्रियांमध्ये अनुकूलतेचें प्रमाण वरीलपेक्षा थोडे अधिक होतें.

नवऱ्यांच्या शैक्षणिक दर्जाचा त्यांच्या बायकांच्या संततिप्रतिबंधासंबंधीच्या दृष्टिकोनावर कांही परिणाम झालेला दिसला नाही. शिक्षणाची पातळी बरीच वरची असली, तरच कांही परिणाम होत असावा, असें असणें मात्र शक्य आहे.

संततिप्रतिबंधासंबंधी स्त्रियांत जी अनुकूलता आढळली म्हणून वर सांगितलें आहे, तिचें स्वरूप बरेंच वेगवेगळें होतें. योग्य साधनें वापरून संततिप्रतिबंधाला लागलीच प्रारंभ करण्याच्या तत्परतेपासून तों पुढे केव्हां तरी तीं वापरण्याची इच्छा दाखविण्यापर्यंत या अनुकूलतेचें वेगवेगळें स्वरूप होतें. क्रमांक १०·९ या तक्त्यांत या बाबतींत अनुकूल असलेल्या स्त्रियांच्या तयारीचें नक्की स्वरूप व त्यांची उत्सुकता यांच्याप्रमाणे त्यांची विभागणी करण्यांत आली आहे.

**तक्ता क्रमांक १०·९**

**संततिप्रतिबंधाला अनुकूल स्त्रियांची त्यांच्या उत्सुकतेप्रमाणे विभागणी**

| उत्सुकतेचे प्रकार | स्त्रियांची शेकडेवारी |
|---|---|
| कुटुंबमर्यादिततेसाठी लागलीच संततिप्रतिबंध सुरू करण्यास तयार | ४५.१ |
| कुटुंबनियोजनासाठी संततिप्रतिबंध सुरू करण्यास तयार | ३.२ |
| नवऱ्याच्या वृत्तीविषयी साशंक असणाऱ्या | २०.९ |
| उपाय वापरण्याची पद्धत न समजणाऱ्या | १३.४ |
| उपाय वापरण्याची जरूर न वाटणाऱ्या | ६.२ |
| पुढे केव्हांतरी उपाय वापरूं इच्छिणाऱ्या | १०.७ |
| एकूण संख्या | २५३ |

तेव्हां अनुकूल असणाऱ्यांपैकी शेकडा ४५ स्त्रिया संततिप्रतिबंधक उपाय वापरण्यास लागलीच सुरुवात करणाऱ्या होत्या हें दिसून येईल. या बाबतींत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे की, आहे तेवढीच मुलांची संख्या कायम ठेवण्यासाठी संततिप्रतिबंध करावयाचा, अशीच सर्वांची धारणा होती. या स्त्रियांमध्ये, संततिप्रतिबंधांत नवऱ्याचें सहकार्य मिळालेल्या स्त्रियांचा एक महत्त्वाचा गट होता. संततिप्रतिबंध प्रत्यक्षांत अंमलांत आणण्याच्या दृष्टीने नवऱ्याचें सहकार्य हें महत्त्वाचें ठरतें ही गोष्ट पुन्हा अनुभवास आली. नवरा अनुकूल झाल्यानंतर संततिप्रतिबंधक उपाय करण्यांत कसलीच अडचण येत नसल्याचें दिसून आलें. या गटांतील बहुसंख्य स्त्रिया या मिरजगांव व नालवार येथील होत्या. त्यांना पुरुषांवरील शस्त्रक्रिया—व्हॅसेक्टमी (Vasectomy) किंवा स्वत:वरील शस्त्रक्रिया सल्फिजेक्टमी (Salphingectomy) हे उपाय अधिक पसंत होते.

उदाहरणार्थ,

श्रीमती....मिरजगांवची राहणारी, वय ३२, ९ जिवंत मुलें असलेली व त्यांतील ४ मुलगे असलेली अशी होती. तिची भेट घेतली तेव्हां ती गरोदर होती. तिला व तिच्या पतीला यापुढे मुलें होणें कायमचें बंद करावयाचें होतें आणि सल्फिजेक्टमी हा शस्त्रक्रियेचा उपाय त्यांना आपल्यापुढील प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उत्तम वाटला.

श्रीमती.... मिरजगावची राहणारी, ३५ वर्षांची होती. तिला ४ मुलें होतीं व त्यापैकी ३ मुलगे होते. तिचा नवरा श्री..... हा झाडावरून पडल्यामुळे त्याचा पाय मोडला होता. हें जोडपें काळजींत असल्यामुळे संततिप्रतिबंधास तत्काळ अनुकूल झालें आणि आमच्या अन्वेषिकेकडून मोठ्या आनंदाने त्यांनी सर्व माहिती मिळविली. पेसरी व ऑर्थोजिनॉल जेली ही प्रारंभीं वापरून पाहण्याची त्या जोडप्याची इच्छा होती. नंतर नवरा स्वत:वर शस्त्रक्रिया करून घेणार होता.

श्रीमती.... मिरजगांवची. तिला ३ मुलगे होते. पण मुलगी नव्हती. तिचें वय ३० वर्षांचें होतें. आमच्या अन्वेषिकेच्या भेटीपूर्वी एक आठवडा तिची मुलगी मरण पावली होती. नवरा-बायको दोघेहि शेतावर कामावर गेले असतांना, घरीं ठेवलेली त्यांची २ वर्षांची मुलगी घराबाहेर हिंडत असतां चिखलांत रुतून बसली व चिखलांतच बुडाल्याने तेथेच मरण पावली. त्या बाईच्या नवऱ्याची स्वत:वर शस्त्रक्रिया करून घेण्याची तयारी पाहून आमच्या अन्वेषिकेला आश्चर्य वाटलें. पण शस्त्रक्रियेला अनुकूल होण्याचें कारण त्यांनी असें सांगितलें की, 'गरिबांना आपल्या मुलांकडे नीट लक्ष देतां येणें अशक्य असतें. लक्ष देतां न आल्यामुळेच आमची मुलगी मरण पावली. गरिबांनी जास्त मुलें होऊं देतां उपयोगी नाही.' यामुळे त्या स्त्रीच्या नवऱ्याने स्वत:वर शस्त्रक्रिया करून घेण्याची उत्सुकता दाखवली.

श्रीमती .... बोरीची राहणारी, वय २८ वर्षें, मुलांपैकी ५ मुलें जिवंत असलेली. ती व तिचा नवरा हीं दोघेंहि नवऱ्यावरील शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार होतीं. कारण हा एकदाच करा-वयाचा उपाय असतो व ही शस्त्रक्रिया मोफत करून दिली जाते.

वर उल्लेखिलेल्या शेकडा ४५ स्त्रियांमध्ये स्त्रियांचा दुसरा गट होता. या स्त्रिया संतति-प्रतिबंधाला अनुकूल होत्या. परंतु नवऱ्यांचें सहकार्य मिळेल असें त्यांना वाटत नव्हतें. मात्र या स्त्रिया इतक्या त्रासलेल्या होत्या की नवऱ्यांच्या प्रतिकूलतेकडे दुर्लक्ष करून त्यांनाच वापरतां येतील अशीं कोणतींहि साधनें वापरून पाहण्यास त्या तयार होत्या. उदाहरणार्थ,

श्रीमती .... बोरीची राहणारी, वय ४० वर्षें. ६ मुलें जिवंत असलेली. तिला यापुढे गरोदरपण मुळीच नको होतें. म्हणून ती स्वत:वर शस्त्रक्रिया (सल्फिजेक्टमी) करून घेण्यास तयार होती. अर्थात् हा उपाय उत्तम नाही असें तिला वाटत होतें. पण दुसरा मार्ग नव्हता. तिचा नवरा या बाबतींत सहकार्य करण्यास तयार नव्हता. म्हणून नवऱ्याकडे फारसें लक्ष न देतां सल्फिजेक्टमी करून घेण्यास ती तयार होती.

श्रीमती ....नालवारची. वय ३२ वर्षें. झालेल्या ८ मुलांपैकी ४ जिवंत असलेली. ती मागास-लेल्या जातींतील होती. नवऱ्याचें मत विचारांत न घेतां ती ऱ्हिदम् पद्धत अमलांत आणणार होती. त्याच्याकडे लक्ष देण्याची तिला गरज वाटली नाही. कारण तो तिच्याशी एकनिष्ठ नसल्याची तिला शंका येत होती.

श्रीमती .... मिठबावची. वय ४० वर्षें. ८ मुलांपैकी ७ जिवंत असलेलीं. ती त्यावेळी नवव्यांदा गरोदर होती. आमच्या अन्वेषिकेजवळ ती रडत रडत सांगत होती की, आतांपर्यंतच्या दु:खी कष्टी आयुष्यांत तिच्यासारख्या अवस्थेंतील स्त्रियांना संततिप्रतिबंधासाठी कांहीहि मदत सरकारकडून

झाली नाही. ती आतां इतकी अशक्त झाली होती की, आपल्या नवऱ्याचा विचार करण्यास ती तयार नव्हती. अगदी निराश झाल्याने मूल होणें थांबविण्यासाठी वाटेल तें करण्यास ती तयार होती. परंतु सध्या ती गरोदर असल्यामुळे कांही करणें शक्य नव्हतें. प्रसूतीनंतर मात्र ती स्वतःवर सल्फिजेक्टमी करून घेण्यास उत्सुक होती. परंतु या शस्त्रक्रियेची सोय मिठबाव येथे किंवा जवळपासहि होण्यासारखी नव्हती.

श्रीमती . . . . धानोऱ्याची भिल्ल स्त्री. वय ३० वर्षे. ४ मुलें असलेली. नवऱ्याच्या वृत्तीकडे विशेष लक्ष न देतां वेगवेगळे संततिप्रतिबंधक उपाय करून पाहण्याची तिची तयारी होती. तिने कांही वनस्पति वापरून पाहिल्या होत्या; पण त्यांचा कांही परिणाम झाला नव्हता. पिण्याच्या किंवा खाण्याच्या औषधासारखा कांही उपाय असला, तर तिला तो हवा होता. कारण संततिप्रतिबंधाचे इतर उपाय तिला फार गुंतागुंतीचे व अवघड वाटत होते. स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेणें तिला जमेलसें वाटत नव्हतें.

श्रीमती . . . . धानोऱ्याची भिल्ल स्त्री, वय वर्षे ३२. तिला ५ मुलें होतीं. संतति बंद होण्यासाठी तिला औषध हवें होतें. या बाबतींत स्वतःच्या मताप्रमाणे ती करूं शकत होती आणि नवरा आपल्या आड येईल असें तिला वाटत नव्हतें.

क्रमांक १०·९ या तक्त्याप्रमाणे शेकडा ३·२ एवढयाच स्त्रिया कुटुंबनियोजनासाठी म्हणजे होणाऱ्या मुलांत योग्य तें अंतर राखण्यासाठी संततिप्रतिबंधक साधनें वापरण्यास तयार होत्या. सामान्यतः मुलांच्या जन्मांमध्ये योग्य तें अंतर राहावें यासाठी संततिप्रतिबंधक साधनांचा उपयोग केला पाहिजे, हा विचार फारसा कोणाला पटला नाही. हा विचार पटलेल्या थोडयाच स्त्रिया आढळल्या. त्या पुढीलप्रमाणे :–

श्रीमती . . . . मिरजगांवला राहणारी, २८ वर्षांची. ३ मुलें — २ मुली व १ मुलगा — असणारी होती. तिला आणखी एक मुलगा हवा होता. पण कांही काळानंतर हवा होता. म्हणून तिने पेसरी वापरण्यास प्रारंभ केला.

श्रीमती . . . . धानोऱ्याची, २५ वर्षे वयाची व दोनच मुलें असलेली. तिला आणखी एक मूल हवें होतें पण कांही काळानंतर. तेव्हां गर्भधारणा पुढे ढकलण्यासाठी ऱ्हिदम् पद्धतीचा अवलंब करण्यास ती तयार होती.

अनुकूल असणाऱ्या स्त्रियांपैकी शेकडा २० जणी म्हणजे बऱ्याच स्त्रिया संततिप्रतिबंधाला अनुकूल असल्या, तरी आपल्या नवऱ्यांना ही कल्पना मुळीच पसंत पडणार नाही, हें जाणून होत्या. यांतहि दोन गट होते. यापैकी एका गटांतील स्त्रियांनी स्पष्टपणें सांगितलें की, नवऱ्यांची त्यांना भीति वाटत असल्यामुळे प्रतिबंधक उपायांचा प्रत्यक्ष अवलंब करणें शक्य नव्हतें. दुसऱ्या गटांतील स्त्रिया अनुकूल असूनहि आपल्या नवऱ्याशी या बाबतींत बोलण्याचें काम त्यांनी अन्वेषिकेवर सोपवलें. म्हणजे नवराबायकोमधील मध्यस्थाचें काम अन्वेषिकेने करावें अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे,

श्रीमती . . . . धानोऱ्याची, २७ वर्षे वयाची. हिला तीन मुलें होतीं; त्यापैकी एक मुलगा होता. अन्वेषिकेने तिला भेट दिली, तेव्हां ती गरोदर होती. संततिप्रतिबंधासंबंधी तिने उत्सुकता दाखविल्यामुळे आमच्या अन्वेषिकेने तिला प्रतिबंधाचे वेगवेगळे उपाय समजावून सांगितले. परंतु त्या स्त्रीचा नवरा या बाबतींत अनुकूल नसल्यामुळे ती एकहि उपाय करून पाहूं शकत नव्हती.

श्रीमती . . . . धानोऱ्याची. वय वर्षे ३०. सातांपैकी ६ मुलें जिवंत असलेली. यापैकी २ मुलगे होते. या स्त्रीची प्रकृति ठीक राहत नसल्यामुळे अधिक मुलें होऊं देणें हें तिला त्रासाचें वाटत होतें. पण तिचा नवरा व सासू हे दोघे प्रतिबंधक उपायांच्या विरुद्ध होते. त्यांच्या मतें त्यांची सुस्थिति असल्या-

मुळे कितीहि मुलें झालीं, तरी त्यांना पोसण्याचें सामर्थ्य त्यांच्यापाशी होतें व म्हणून प्रतिबंधाची गरज नव्हती. त्या कुटुंबाचें माणशीं उत्पन्न वार्षिक रु.४०० एवढें होतें. त्या स्त्रीचें मात्र म्हणणें होतें की, मुलांना जन्म देण्याचें काम नवऱ्याला करावें लागत नसल्यामुळे अधिक मुलें झालीं तरी त्याची त्याला मुळीच पर्वा नव्हती.

धानोऱ्याची एक भिल्ल स्त्री ३७ वर्षें वयाची व ७ पैकी ५ मुलें जिवंत असलेली होती. ती संततिप्रतिबंधाला अनुकूल होती. पण नवऱ्याकडून या बाबतींत सहकार्य मिळण्याची तिला आशा नव्हती. तो तिला मारहाण करी. तिचा विवाहबाह्य कांही संबंध आहे अशी शंका नेहमी घेई. संततिप्रतिबंधाबद्दल तिनें अनुकूलता दाखविली की, नवरा तिच्यावर वाईट हेतूंचा आरोप करी.

श्रीमती....बोरी येथे राहणारी, २६ वर्षांची होती. तिच्या ४ मुलांपैकी १ मुलगा व १ मुलगी एवढींच जिवंत होतीं. तिला वारंवार फिट्स् येत. तिचा नवरा नेहमी तिच्या मनाविरुद्ध वागत असे व तिला कोणत्याहि गोष्टींत मोकळीक देत नसे असें ऐकलें. ही स्त्री पापभीरु होती. तिचा नवरा मात्र वर्तनांत फारसा विधिनिषेध न बाळगणारा होता. ती आपल्या नवऱ्याला इतकी भीत होती की, नवऱ्याला नकळत ती अन्वेषिकेशी बोलत होती आणि अशा बोलण्यासाठी नवरा आपल्याला मारहाण करील अशी भीति तिला वाटत होती. संततिप्रतिबंधक उपाय वापरावे अशी तिची इच्छा होती. पण प्रत्यक्षांत तें करणें तिला अगदी अशक्य होतें.

दुसऱ्या गटांतील स्त्रियांत पुढीलप्रमाणें उदाहरणें आढळली.

श्रीमती....ही एका न्हाव्याची ३० वर्षांची बायको होती. तिला झालेल्या १० मुलांपैकी ७ जिवंत होतीं. या स्त्रीला मूळव्याधीची व्यथा होती व दर प्रसूतीच्या वेळीं अतिशय कष्ट होत होते. आपल्या नवऱ्यापाशी याबद्दल तिने तक्रारहि केली होती. पण कांही उपयोग झाला नाही. तिने आमच्या अन्वेषिकेला आपल्या नवऱ्याला भेटण्यास सांगितलें व त्याने स्वत:वर शस्त्रक्रिया करवून घेऊन तिच्या मागचा त्रास बंद करावा असें त्याला सुचविण्यास सांगितलें.

श्रीमती.... ही ३० वर्षांची होती. हिला झालेल्या ६ मुलांपैकी ३ जिवंत होतीं. आमच्या पहिल्या पाहणीच्या वेळीं तिने नाखुषीने माहिती दिली होती. पण कुटुंबनियोजनाच्या प्रश्नावलीं-तील माहिती तिने तत्परतेनें दिली. कारण आमच्या अन्वेषिकेनें तिची शेवटची प्रसूति केली होती. कुटुंबनियोजनाबद्दल आपल्या नवऱ्यापाशी अन्वेषिकेने गोष्ट काढावी व आपला मार्ग सुलभ करून द्यावा अशी तिची अपेक्षा होती.

श्रीमती....नालवारची होती. तिच्या ७ मुलांपैकी ५ जिवंत होतीं. मुलें होणें बंद करण्या-साठी तिने पोटांत कांही औषध घेतलें होतें पण त्याचा कांही उपयोग झाला नव्हता. आपल्या नवऱ्याला संततिप्रतिबंधक उपायांची माहिती अन्वेषिकेने द्यावी व तो एकहि उपाय करण्यास तयार नसेल तर ती उपाय करणार आहे असें त्याला सांगावें, अशी तिने अन्वेषिकेला विनंती केली. पण पोटांत घेण्याचें औषध मिळाल्यास उत्तम असें तिने आपलें मत प्रकट केलें.

क्रमांक १०·९ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे शेकडा १३·४ स्त्रियांना संततिप्रतिबंधक साधनें कशीं वापरायचीं हें ध्यानांतच येत नव्हतें. संततिप्रतिबंधाला अनुकूल असणाऱ्या या गटां-तील स्त्रियांना प्रतिबंधाचीं साधनें फार गुंतागुंतीचीं वाटत. कांही जणींनी वापरण्यास प्रारंभ केला पण त्याचे परिणाम काय होतील या कल्पनेने त्यांना चिंता वाटत होती. साधनें कशीं वापरावयाचीं याचा नीटसा उमज पडत नसल्यामुळे तीं वापरलीं जाण्याचा फार कमी संभव आहे, असा अनुभव धानोरें येथे आला. या गटांतील स्त्रिया प्रारंभीं या विषयाबद्दल उत्सुकता दाखवीत. परंतु वेग-वेगळ्या साधनांची माहिती देण्यास सुरुवात झाली की, उमज पडत नसल्यामुळे त्यांची उत्सुकता नाहीशी होई. जसें,

श्रीमती....मिरजगांवची २७ वर्षांचीं होती. ४ मुलांपैकी तिचीं ३ मुलें जिवंत होतीं. ती इतकी अशक्त होती की आणखी मुलें होऊं देणें तिला धोक्याचें होतें. अन्वेषिकेने तिला प्रतिबंधक साधनें वापरण्यास सुचवलें. तिच्या नवऱ्यानेहि तें मान्य केलें. पेसरी-डायफ्रॅम हें साधन या जोडप्यासाठी उपयुक्त ठरलें असतें. अन्वेषिकेने पेसरी कशी बसवावयाची तें समजावून सांगितलें. पण पेसरी आंत अडकून राहिली तर काय होईल ही भीति त्या स्त्रीला वाटली.

श्रीमती....धानोऱ्याची ३२ वर्षांची भिल्ल स्त्री. हिचीं सर्व ८ मुलें जिवंत होतीं. मुलें होणें बंद करण्यासाठी ती स्वतःच नवऱ्याच्या संमतीनें अन्वेषिकेला भेटली. ती गरोदरपणांत गहू व गूळ खात असे. कारण गर्भावर त्यांचा अनिष्ट परिणाम होतो अशी तिची समजूत होती. पण तसा कांहीच परिणाम झाला नाही. तिला मोजतांहि येत नव्हतें, त्यामुळे प्रतिबंधक साधनें वापरण्यांतील गुंतागुंत तिला घाबरवणारी होती. म्हणून तिने आपल्या नवऱ्याला अन्वेषिकेकडे पाठवून, साधनांची सर्व माहिती त्याला करवून देण्याचें ठरवलें. स्वतःवर व्हॅसेक्टमी ही शस्त्रक्रिया करून घेण्याचें नवऱ्याने कबूल केलें. परंतु या बाबतींत अखेरचा निर्णय घेण्यापूर्वी आपल्या सासऱ्याचा सल्ला घ्यावयाचा आहे असें त्याने सांगितलें. त्यानंतर तो पुन्हा आलाच नाही.

श्रीमती....मिरजगांवची ३७ वर्षांची स्त्री. हिचीं ७ पैकी ६ मुलें जिवंत होतीं. मुलें होणें बंद करण्यासाठी व्हॅसेक्टमी ही शस्त्रक्रिया करून घेण्याचें तिने व तिच्या नवऱ्याने ठरविलें. परंतु ऑपरेशनरूममध्ये जाऊनहि शस्त्रक्रियेच्या भीतीने तिचा नवरा बाहेर निघून गेला.

श्रीमती....बोरी गांवची व २८ वर्षें वयाची. हिचीं ४ पैकी ३ मुलें जिवंत होतीं. अन्वेषिकेने जेव्हां या स्त्रीला प्रतिबंधक साधनांची माहिती दिली तेव्हां तिने ती मोठ्या उत्सुकतेने ऐकून घेतली. पण साधनांच्या वापरण्यांतील गुंतागुंतीमुळे तिचा इतका घोटाळा झाला की नवऱ्याची मदत असूनहि ती एखादा उपाय प्रत्यक्षांत अंमलांत आणील असें दिसलें नाही.

श्रीमती....बोरी येथली ३० वर्षांची स्त्री. तिच्या ४ मुलांपैकी ३ जिवंत होतीं. ती हरिजन जातीची होती. प्रतिबंधक साधनें वापरण्याची पद्धत तिला फारच घोटाळ्याची वाटली.

संततिप्रतिबंधाला अनुकूल असणाऱ्या स्त्रियांपैकी शेकडा ६.२ स्त्रियांचा जो एक गट होता, त्यांतील स्त्रिया एकंदरीने अनुकूल असल्या, तरी आपल्या बाबतींत संततिप्रतिबंधाच्या साधनांची गरज नाही असें त्यांचें मत होतें. त्यांच्यापैकी कांही म्हाताऱ्या होत्या व कांहींचे नवरे वर्षांतील बराच काळ परगांवला होते. या दुसऱ्या प्रकारच्या स्त्रिया मिठबाव येथे बऱ्याच होत्या. उदाहरणार्थ,

श्रीमती....मिरजगांवची ३२ वर्षांची स्त्री होती. कारागीर वर्गापैकी ती असून तिला ५ मुलें होतीं. तिच्या मतें संततिप्रतिबंधक साधनांची गरज इतर स्त्रियांना असली तरी तिला त्यांची गरज नव्हती. कारण तिच्या मुलांमध्ये बरेंच अंतर होतें. दर चौथ्या वर्षी तिला मूल होई व गरोदरपणाचा तिला कांही त्रास नव्हता.

श्रीमती....बोरीची राहणारी ४२ वर्षांची स्त्री होती. तिला ७ मुलें होतीं. तिला व तिच्या नवऱ्याला कुटुंबनियोजन पसंत होतें. परंतु त्यांना स्वतःला मात्र या साधनांची गरज नव्हती. कारण त्यांनी नवराबायकोचे संबंध बंद केले होते. त्यांच्या शब्दांत सांगावयाचें तर ते 'बहीण भावासारखे राहत होते'.

श्रीमती.....मिठबावची २८ वर्षांची स्त्री. तिला ३ मुलें होतीं व शिवाय एका सावत्र मुलीचा सांभाळ करावयाचा होता. ही स्त्री संततिप्रतिबंधाला अनुकूल होती. परंतु स्वतःला त्या साधनांची गरज नाही असें ती म्हणाली. कारण नवरा २ वर्षांपासून तिला भेटला नव्हता व त्याने पैसेहि पाठवले नव्हते.

अनुकूल असणाऱ्या स्त्रियांमध्ये शेकडा १० स्त्रियांचा शेवटचा एक गट असा होता की, त्यांना संततिप्रतिबंध पसंत होता. पण सध्याच त्या तीं साधनें वापरण्यास तयार नव्हत्या, कारण त्यांना जास्त मुलें व विशेषतः मुलगे हवे होते. उदाहरणार्थ,

श्रीमती....धानोऱ्याची २८ वर्षांची भिल्ल स्त्री. तिच्या ६ मुलांपैकी ३ जिवंत होतीं. परंतु तिला एकहि मुलगा नव्हता. तिला मुलगा हवा होता म्हणून ती सध्याच संततिप्रतिबंधक साधनें वापरणार नव्हती.

श्रीमती....मिरजगांवची २७ वर्षांची स्त्री. ४ मुलांपैकी तिचीं २ मुलें—१ मुलगा व १ मुलगी जिवंत होतीं. तिला आणखी मुलें विशेषतः मुलगे पाहिजे होते. म्हणून ती प्रतिबंध करणार नव्हती.

संततिप्रतिबंधाला अनुकूल असणाऱ्या स्त्रियांचीं वेगवेगळीं मतें व वृत्ति दर्शविणारीं कांही उदाहरणें वर तपशिलासह दिलीं आहेत. पूर्वी सांगितल्याप्रमाणे, या प्रश्नाबाबत स्त्रियांच्या प्रतिक्रिया ध्यानांत घेऊन, ज्या स्त्रियांनी अधिक माहिती मिळविण्याबाबत उत्सुकता दाखविली त्यांना आम्ही संततिप्रतिबंधाच्या वेगवेगळ्या साधनांची क्रमाक्रमाने माहिती दिली. क्रमांक १०·१० च्या तक्त्यांत ह्या स्त्रियांना जें साधन व जी पद्धत सोइस्कर वाटली, त्याप्रमाणे त्यांची विभागणी केली आहे. या तक्त्यांत २०० स्त्रियांचें याप्रमाणे वर्गीकरण केलें आहे. त्यांच्यांत लागलीच प्रतिबंधक साधनें वापरण्यास तयार असलेल्या ११४ स्त्रियांचा समावेश आहे, तसेंच वापरण्याची इच्छा असणाऱ्या परंतु लागलीच वापरण्यास प्रारंभ न करणाऱ्या अशा इतर स्त्रियांचाहि आहे.

क्रमांक १०·१० या तक्त्यांत स्त्रियांची ही विभागणी प्रत्येक केन्द्रासाठी वेगळी केली आहे. कारण तक्त्यावरून हें दिसून येईल की, साधनांची निवड ही प्रत्येक केन्द्रांत स्थलपरत्वें भिन्न होती. या ५ केन्द्रांपैकी एकट्या नालवार येथे साधनांची निवड विविध प्रकारची होती. मिठबाव येथे अनुकूल असणाऱ्या स्त्रियांपैकी जवळ जवळ निम्म्या स्त्रियांना शरीरसंबंध टाळण्यापेक्षा अधिक कांही करण्याची गरज वाटली नाही. एका दृष्टीने पाहिलें तर, संततिप्रतिबंधक साधनांना त्या प्रतिकूलच होत्या असें म्हणावें लागेल. बोरी, धानोरें व उरलेलें मिठबाव येथे ऱ्हिदम् पद्धतिच बहुतेकांना पसंत पडली. आमच्या अन्वेषिकांनी प्रथम याच पद्धतीची माहिती दिली. तेलचिंधीचा

**तक्ता क्रमांक १०·१०**

**स्त्रियांच्या संततिप्रतिबंधाच्या पद्धतीच्या निवडीप्रमाणे विभागणी**

| संततिप्रतिबंधक पद्धति | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | नालवार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| लैंगिक संबंधांत संयम | — | — | १ | ३८ | २ | ४१ |
| ऱ्हिदम् पद्धति | १३ | १८ | ६ | ३६ | ८ | ८१ |
| तेलचिंधी | — | — | १ | — | २ | ३ |
| पेसरी | — | २ | १४ | — | ६ | २२ |
| व्हॅसेक्टमी ( Vasectomy ) | १ | — | ३५ | १ | ५ | ४२ |
| सॅल्फिजेक्टमी (Salphingectomy) | २ | — | ८ | — | १ | ११ |
| एकूण | १६ | २० | ६५ | ७५ | २४ | २०० |

वापर बहुतेक कोणालाच पसंत पडला नाही. उरलेल्या दोन केन्द्रांत—मिरजगांव व नालवार—बऱ्याच जणींनी पेसरीची निवड केली. पेसरी कशी बसवावयाची याचें प्रात्यक्षिक त्या स्त्रियांना दाखविण्यांत आलें. परंतु त्याप्रमाणे नियमित व्यवस्थित उपयोग केला जात आहे किंवा नाही, हें पाहणें शक्य झालें नाही. बोरी, धानोरें व मिठबाव या ३ केन्द्रांपेक्षा मिरजगांव येथे जरी विविध साधनांची निवड जास्त प्रमाणांत होती, तरी तेथे शस्त्रक्रियेविषयी—व्हॅसेक्टमी—फार मोठ्या प्रमाणांत अनुकूलता आढळली. या केन्द्रांत निम्म्यापेक्षा अधिक स्त्रियांनी व्हॅसेक्टमी या शस्त्रक्रियेलाच अनुकूलता दाखविली. नालवार येथेहि याच उपायाला कांही प्रमाणांत अनुकूलता दिसून आली.

मिरजगांवला व्हॅसेक्टमी या शस्त्रक्रियेचीच इतक्या जास्त प्रमाणांत कां निवड केली गेली, याचा थोडासा खुलासा केला पाहिजे. येथील अन्वेषिकेने आपल्या पहिल्या निवेदनांतच कळविलें की, इतर सर्व उपायांपेक्षा व्हॅसेक्टमी ही शस्त्रक्रिया पसंत असणारे १० जण निघाले आहेत. ज्या स्त्रियांशी आमच्या अन्वेषिकेने याबाबत चर्चा केली, त्यांनी आपल्या नवऱ्यांपाशी हा विषय काढला. तेव्हां अधिक माहिती मिळविण्यासाठी त्या स्त्रियांचे नवरे आमच्या अन्वेषिकेला भेटले. शस्त्रक्रिया करवून घेण्याची त्यांची खरोखरीच तयारी आहे काय हें अजमावण्यासाठी आम्ही त्या खेडेगांवच्या लोकांना एका ठराविक दिवशीं दोन शल्यचिकित्सकांना (सर्जनना) या कामासाठी आम्ही आणणार आहोंत असें सांगितलें. जेव्हां शल्यचिकित्सक खेड्यांत आले, तेव्हां १३ जणांनी शस्त्रक्रियेसाठी नांवें दिलीं होतीं. ९ जणांवर शस्त्रक्रिया केली गेली व बाकीचे ४ जण शस्त्रक्रियेचें भय वाटून निघून गेले.

एका महिन्यानंतर पुन्हा शल्यचिकित्सक पाठविण्यासंबंधी मागणी आली. यावेळीं १६ जणांनी नांवें दिलीं. यापैकी ५ जण जवळच्या खेड्यांतील होते. आम्ही ३ शल्यचिकित्सक पाठवले व त्यांनी १३ जणांवर शस्त्रक्रिया केली. उरलेले ३ जण शेवटच्या घटकेला निघून गेले. यानंतर शेजारच्या खेड्यांतून शल्यचिकित्सक पाठविण्यासाठी वारंवार विनंती करण्यांत आली. आम्हांला असेंहि सुचविण्यांत आलें की, बऱ्याच जणांना ही शस्त्रक्रिया करून घ्यावयाची आहे. परंतु या गोष्टीला जी प्रसिद्धि मिळते तिच्यामुळे ते बिचकत आहेत. तेव्हां शल्यचिकित्सक जर खेड्यापासून थोड्या दूर अशा लहानशा गांवांत आले, तर तेथे जाऊन गाजावाजा न होतां पुरुषांना शस्त्रक्रिया करून घेतां येईल. ही गोष्ट महत्त्वाची होती हें खरें. परंतु आम्हांला ही विनंती मान्य करणें शक्य नव्हतें. कारण आमच्या पाहणीच्या मर्यादेबाहेर बरेंच दूर आम्हांला जावें लागलें असतें.

जेथे जेथे आम्ही शस्त्रक्रिया करण्याचें कबूल केलें, तेथे नवराबायको दोघांची लेखी संमति मिळवली होती. वर सांगितल्याप्रमाणे आम्ही एकूण २२ जणांवर शस्त्रक्रिया करविली व ७ जण आयत्या वेळीं भीतीने निघून गेले. या २९ जणांची वैयक्तिक व कौटुंबिक विशेष माहिती खाली देत आहोंत. क्रमांक १०·११ या तक्त्यांत या पुरुषांच्या व त्यांच्या बायकांच्या वयांप्रमाणे वर्गीकरण केलें आहे. यावरून हें दिसून येईल की, २९ पैकी २० जणांच्या बायका ३७ वर्षांखालील होत्या. क्रमांक १०·१२ या तक्त्यांत या पुरुषांचें वर्गीकरण, त्यांना झालेलीं मुलें, जिवंत मुलें व जिवंत मुलगे यांच्या संख्येप्रमाणे केलें आहे. यावरून हें दिसून येईल की, त्या सर्वांना निदान ४ मुलें झालीं होतीं, २ पेक्षा जास्त जिवंत होतीं व १ तरी मुलगा होता. त्यापैकी जवळ जवळ निम्म्यांना ८ किंवा त्याहून अधिक मुलें झालीं होतीं, ६ किंवा अधिक मुलें जिवंत होतीं व यांपैकी ४ किंवा अधिक मुलगे होते.

क्रमांक १०·१३ या तक्त्यामध्ये जातीप्रमाणे त्यांचें वर्गीकरण केलें आहे. त्यावरून हें दिसून येईल की, सर्व जातींतून हीं माणसें आलीं होतीं. शिक्षणाच्या दृष्टीने पाहिलें तर, त्यांच्यापैकी ९ जण अशिक्षित होते व ८ जण प्राथमिक ४ इयत्तांपेक्षा जास्त शिकलेले होते.

जवळजवळ एक वर्षानंतर, मिरजगांवला ज्या २२ जणांवर शस्त्रक्रिया करण्यांत आली होती, त्यांना भेटण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्यांचा या बाबतींतील अनुभव व भावना हीं जाणून घेण्यासाठी त्यांना भेटायचें होतें. त्यांच्यापैकी ३ जण खेड्यांत नसल्यामुळे भेटूं शकले नाहीत. उरलेल्या १९ जणांपैकी एक जणानेच शस्त्रक्रियेच्या जागीं दुखत असल्याचें सांगितलें. आपल्या निर्णयाबद्दल कोणालाहि पश्चात्ताप झाल्याचें आढळलें नाहीं. झालेल्या गोष्टीबद्दल त्यांना समाधानच वाटत होतें.

**तक्ता क्रमांक १०·११**

**संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यास तयार असलेल्या पुरुषांचे त्यांच्या वयाप्रमाणे व त्यांच्या बायकांच्या वयाप्रमाणे विभाजन**

| नवऱ्याचें वय | बायकोचें वय | | | |
|---|---|---|---|---|
| | ३२ व खालील | ३३–३७ | ३८ व वरील | एकूण |
| ३७ व खालील | ८ | १ | — | ९ |
| ३८—४२ | १ | ८ | १ | १० |
| ४३—४७ | — | २ | १ | ३ |
| ४८ व वरील | — | — | ७ | ७ |
| एकूण | ९ | ११ | ९ | २९ |

**तक्ता क्रमांक १०·१२**

**संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार असलेल्यांची (१) एकूण झालेलीं मुलें, (२) जिवंत मुलें व, (३) जिवंत मुलग्यांची संख्या यांच्याप्रमाणे विभागणी**

| मुलांची संख्या | पुरुषांची खालील माहितीप्रमाणे विभागणी | | |
|---|---|---|---|
| | जन्मलेलीं मुलें | जिवंत मुलें | जिवंत मुलगे |
| १ | — | — | १ |
| २ | — | — | ३ |
| ३ | — | २ | ७ |
| ४ | — | ४ | १० |
| ५ | ४ | ७ | ४ |
| ६ | ३ | ४ | ३ |
| ७ | ७ | ५ | १ |
| ८ | ६ | ५ | — |
| ९ | ४ | १ | — |
| १० | ५ | १ | — |
| एकूण | २९ | २९ | २९ |

## तक्ता क्रमांक १०·१३

### संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेस तयार असलेल्यांची जातीप्रमाणें विभागणी

| जात | पुरुषांची संख्या |
|---|---|
| ब्राह्मण | ३ |
| मराठा | ७ |
| मध्यम हिंदू | ११ |
| मागासलेल्या जाती | ३ |
| अ-हिंदू | ३ |
| जैन ओस्वाल | २ |
| एकूण | २९ |

आतां ज्यांना संततिप्रतिबंध पसंत नव्हता, अशा स्त्रियांकडे वळूं. अशा एकूण २५३ स्त्रिया होत्या. यांच्यापैकी २० जणींनी आपल्या प्रतिकूलतेचीं कांहीच कारणें दिलीं नाहीत. क्रमांक १०·१४ या तक्त्यांत उरलेल्या स्त्रियांची विभागणी त्यांच्या नापसंतीच्या कारणाप्रमाणे केली आहे.

## तक्ता क्रमांक १०·१४

### संततिप्रतिबंध नापसंत असणाऱ्या स्त्रियांची, नापसंतीच्या कारणाप्रमाणे विभागणी

| नापसंतीचें कारण | स्त्रियांची संख्या |
|---|---|
| जास्त मुलें हवीं होतीं | १६८ |
| प्रकृतीच्या व देवाच्या विरुद्ध आहे | ६० |
| मोठें कुटुंब पोसण्याची पात्रता | ५ |
| एकूण | २३३ |

यावरून हें दिसून येईल की, शेकडा ७० स्त्रियांना संततिप्रतिबंध जो पसंत नव्हता, तो कांही सर्वसामान्य कारणांसाठी नसून केवळ वैयक्तिक कारणांसाठीच पसंत नव्हता. त्यांना जास्त मुलें हवीं होतीं. क्रमांक १०·१५ या तक्त्यामध्ये अशा स्त्रियांची विभागणी त्यांना झालेल्या मुलांवरून व जिवंत असलेल्या मुलग्यांवरून केली आहे. यावरून दिसून येईल की, त्यांच्यापैकी फक्त शेकडा १५ जणींनाच ४ पेक्षा अधिक मुलें झालीं होतीं. तेव्हां संततिप्रतिबंधक उपाय म्हणजे मुलांची संख्या कायमची मर्यादित करून टाकण्याचे उपाय आहेत, मुलांमधील अंतर वाढविण्याचे नाहीत, असा अर्थ त्या समजल्या असाव्यात. कारण तसें असलें तरच, त्यांची याबाबतची नापसंती त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने पाहिलें तर कळूं शकेल.

तक्ता क्रमांक १०·१५

आस्त मुलें हवीं असल्यामुळे संततिप्रतिबंध नापसंत असणाऱ्या स्त्रियांची (१) झालेलीं मुलें (२) जिवंत मुलगे यांच्याप्रमाणे विभागणी

| मुलांची किंवा मुलग्यांची संख्या | दर्शविलेलीं जिवंत मुलें असणाऱ्या स्त्रियांची संख्या | दर्शविलेले जिवंत मुलगे असणाऱ्या स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| ० | २ | ३३ |
| १ | १३ | ६३ |
| २ | ४७ | ४८ |
| ३ | ४१ | १७ |
| ४ | ४० | ४ |
| ५ | १२ | १ |
| ६ | ७ | २ |
| ६ वरील | ६ | ० |
| एकूण | १६८ | १६८ |

क्रमांक १०·१४ या तक्त्यावरून हें दिसून येईल की, संततिप्रतिबंधाला प्रतिकूल असणाऱ्या स्त्रियांपैकी केवळ ½ स्त्रियांनीच आपलीं सर्वसामान्य किंवा तथाकथित धार्मिक कारणें दिलीं. ज्या एकूण ६४७ स्त्रियांची आम्ही पाहणी केली, त्यांच्यांत या प्रतिकूल असणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण फक्त शेकडा १० एवढेंच पडतें. यावरून असा निष्कर्ष काढतां येईल की, आमच्या पाहणीच्या क्षेत्रांतील लोकसंख्येंत सर्वसामान्य कारणांसाठी संततिप्रतिबंधाला प्रतिकूलता अशी फारच थोडी होती.

तथाकथित धार्मिक कारणांमुळे ज्यांनी संततिप्रतिबंधाला प्रतिकूलता दाखवली, त्यांची संततिप्रतिबंधासंबंधीची कल्पना चुकीची होती. उदाहरणार्थ, प्रतिबंधक साधनें म्हणजे गर्भपात घडवून आणणारीं साधनें अशी त्यांची समजूत होती. परंतु प्रतिकूलतेचें कारण सांगण्यास त्यांना सांगितलें की, मग मात्र त्या ठराविक कारणें सांगत असत. उदाहरणार्थ,

श्रीमती ....नालवारची ३० वर्षांची स्त्री. हिला ४ मुलें होतीं व त्यावेळीं ती गरोदर होती. त्यामुळे हेंच गरोदरपण शेवटचें ठरविण्याची कल्पना तिला पसंत पडली. परंतु अन्वेषिकेकडून संततिप्रतिबंधासंबंधीची माहिती ऐकून घेण्यास ती तयारच होईना. कारण संततिप्रतिबंध म्हणजे गर्भपात करविणें अशी तिची समजूत होती व म्हणून ती अन्वेषिकेशी अनादरानें वागूं लागली. पण अन्वेषिकेने आपली सहनशीलता ढळूं दिली नाही. गर्भपात करविणें म्हणजे संततिप्रतिबंध नव्हे हें तिला समजावून सांगितलें व प्रतिबंधक साधनांचा कशा प्रकारें उपयोग होतो हेंहि शांतपणें सांगितलें. संततिप्रतिबंध म्हणजे गर्भपात करविणें नव्हे हें कळल्यानें त्या स्त्रीला बरें वाटलें. परंतु असा प्रतिबंध करणें हें देवाधर्माच्या विरुद्ध आहे म्हणून आपल्याला तें नापसंत आहे असेंच मत तिने दिलें.

संततिप्रतिबंधासंबंधीच्या चुकीच्या कल्पनांचें दुसरें उदाहरण मिरजगांव येथे आढळलें. श्रीमती ....ही कारागीर जातींतील स्त्री होती. तिच्या ५ मुलांपैकी ४ जिवंत होतीं. संततिप्रतिबंध करणें म्हणजे नवऱ्याशी लैंगिक संबंध बंद करणें अशीच तिची खरोखर समजूत होती व असें केल्यास नवरा वाईट मार्गाला लागेल असें तिला वाटत होतें. तसेंच अन्वेषिका ही खेड्यांतील स्त्रियांना औषध देऊन त्यांचा गर्भपात करण्यास मदत करते असेंच तिला वाटत होतें. म्हणून संततिप्रतिबंध करणें हें निसर्गाच्या विरुद्ध जाणें आहे असें मत तिने व्यक्त केलें.

श्रीमती....घानोऱ्याची २५ वर्षांची स्त्री. हिला ४ मुलें होतीं. ती कुटुंबनियोजनाच्या विरुद्ध होती. कारण मृत्यूमुळे वाटेल तेवढीं मुलें नाहीशीं होऊं शकतील, तेव्हां निपुत्रिक राहूं नये म्हणून होतील तेवढीं मुलें होऊं दिलींच पाहिजेत असें मत तिने व्यक्त केलें.

क्रमांक १०·४ या तक्त्यांत 'इतर' या सदराखाली ज्या स्त्रिया घातल्या आहेत त्यांच्यापैकी कांही जणींचीं उदाहरणें आतां देऊं. पाहणींत आलेल्या एकूण ६४७ स्त्रियांपैकी शेकडा २१.८ एवढ्या या स्त्रिया होत्या. या गटांतील स्त्रियांत, संततिप्रतिबंधाविषयी कसलेंच कुतूहल न दाखविणाऱ्या व त्याबद्दल उदासीन असलेल्या अशाच स्त्रियांचा मुख्यत: समावेश होतो. या गटांतील स्त्रियांना समजाविणें फार कठिण गेलें. त्यामुळे या स्त्रिया संततिप्रतिबंधाला खरोखर अनुकूल आहेत की प्रतिकूल आहेत हें समजणें कठिण होऊन बसलें. तसेंच त्यांची या बाबतींतील काय विचारसरणी आहे हेंहि कळणें कठिण झालें. या स्त्रियांकडून आमच्या अन्वेषिकांना तिरस्कार व अपमानच सहन करावा लागला. उदाहरणार्थ,

श्रीमती....घानोऱ्याची ३६ वर्षांची भिल्ल स्त्री. हिला झालेल्या ७ मुलांपैकी ६ जिवंत होतीं. आमच्या अन्वेषिकेनें तिला एकदा सामान्य-कौटुंबिक-प्रश्नावलींतील माहिती भरण्यासाठी भेट दिली होती. तेव्हां आतां दुसऱ्यांदा अन्वेषिकेने आपल्याकडे येणें तिला पसंत नव्हतें. अन्वेषिकेशी ती इतक्या तुसडेपणाने वागली की, तिच्यापाशी संततिप्रतिबंधाचा विषय काढण्याचें धैर्य अन्वेषिकेला झालें नाही.

श्रीमती....घानोऱ्याची २९ वर्षांची भिल्ल स्त्री. हिला झालेल्या ५ मुलांपैकी ४ जिवंत होतीं. कौटुंबिक प्रश्नावलीपैकी शेवटच्या गरोदरपणासंबंधी कांहीहि माहिती देण्यास ती नाखुष होती. अन्वेषिकेने संततिप्रतिबंधाची गोष्ट काढतांच ही स्त्री अन्वेषिकेला तेथेच ठेवून आपण घरांतून चालती झाली.

श्रीमती....घानोऱ्याची स्त्री. हिला ३ मुलें होतीं. संततिप्रतिबंधासंबंधी हिचें मत काय होतें हें अजमावणें शक्य नव्हतें. कारण अन्वेषिका तिच्या घरीं गेली की, अन्वेषिकेला ती बाहेर घालवून देत असे.

श्रीमती....धानोऱ्याची ३३ वर्षांची स्त्री. तिला झालेल्या ६ मुलांपैकी ५ जिवंत होतीं. अन्वेषिका घरीं येतांच, तिला बसायला सांगून ही स्त्री मागच्या दाराने निघून गेली.

घानोऱ्याच्या दुसऱ्या एका स्त्रीने अन्वेषिका घरापाशी येतांच तिला ओरडून सांगितलें की, आपल्याला अधिक मुलें हवीं आहेत व तीं अन्वेषिकेच्या मदतीशिवाय आपल्यास होतील. ही स्त्री ३२ वर्षांची असून तिला ५ मुलें होतीं.

मिरजगांवला ३५ वर्षांची तेलीण होती. तिला झालेल्या ६ मुलांपैकी ४ जिवंत होतीं. आपल्या प्रश्नावलींतील माहिती तिने सांगावी म्हणून आमच्या अन्वेषिकेने पुष्कळ वेळ घालवला. पण तिने कांहीच उत्तर दिलें नाही. कोणतीहि चांगली संस्था आपल्या अन्वेषिकेला कुटुंबनियोजनासारख्या विषयाबद्दल खेडुतांशी चर्चा करण्यास कधीहि सांगणार नाही असें मत तिने व्यक्त केलें. हा सगळा अगाऊपणा अन्वेषिकेच्याच डोक्यांतला होता असेंहि तिने स्पष्ट सांगितलें.

वरील वर्णनावरून हें दिसून येईल की, पाहणींतल्या या भागाविषयीच्या लोकांच्या प्रतिक्रियांत वेगवेगळ्या केंद्रांत बराच फरक होता. स्थानिक परिस्थितींत असणाऱ्या कांही गोष्टींमुळे त्या त्या केंद्रांतील लोकांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया झालेल्या दिसून आल्या असाव्या, असें दिसतें. परंतु आम्हांला असें वाटतें की, अन्वेषिकेचें व्यक्तिमत्व व पूर्वग्रहदूषितता, तसेंच त्या त्या खेड्यांतील पुढाऱ्यांची वृत्ति, यांच्यापैकी एकाचा किंवा दोहोंचाहि या प्रतिक्रियांवर फार प्रभाव पडला असावा.

याच्यावरून असेंहि अनुमान काढतां येतें की, या विषयासंबंधीची लोकांची वृत्ति ही अजून ठराविक प्रकारची बनलेली नाही. खेड्यांतील लोकांना हा विषय अगदी नवीन आहे; आणि महत्त्वाची गोष्ट अशी आहे की खेड्यांतील लोकांचा याबद्दल कांही पूर्वग्रह झालेला नाही व त्यांचीं मनें याबद्दल ग्रहण-क्षम अशीं आहेत. विशेष असें की, संततिप्रतिबंधाला विरोध करणारे असे धार्मिक निषेध नाहीत. त्यामुळे या विषयाची सुरुवात कशा तऱ्हेने करण्यांत येते याच्यावर लोकांच्या प्रतिक्रिया अवलंबून राहतात. पाहणी करणाराच्या पद्धतीचा व वृत्तीचा या प्रतिक्रियांवर होणारा परिणाम टाळणें शक्य होत नाही. अनाग्रही वृत्तीने ही पाहणी केली गेली व हा विषय काढला तर एकंदर अनुकूल पण अकरणात्मक प्रतिक्रिया दिसून येतात. बोरी, धानोरें व मिठबाव येथें असेंच दिसून आलें. उलटपक्षीं मिरजगांव येथे अधिक तत्पर व कार्योन्मुख अशा स्वरूपाची पाहणी झाल्यामुळे, प्रतिकूल प्रतिक्रिया न होतां, उलट प्रत्यक्ष प्रयोग करूं इच्छिणाऱ्यांचाच गट पुढे आला.

# ११

# सार्वजनिक आरोग्य

आमच्या पाहणीच्या परिसरांत रोगग्रस्ततेचें प्रमाण कितपत आहे, हें अजमावण्याचा प्रयत्न आम्ही या पाहणींत केला. कुटुंब-सामान्य-माहिती प्रश्नावलीच्या द्वारां, पाहणीपूर्वीच्या एका वर्षाच्या काळांतील या विभागांतील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याविषयी माहिती मिळवली होती. यासाठी पुढील प्रश्न विचारले होते :—(१) मागील वर्षांत कोणकोणते आजार झाले ? (२) कोणत्या महिन्यांत झाले ? (३) आजार किती काळ राहिला ? (४) वैद्यकीय इलाज कोणते केले ? (५) या इलाजांसाठी किती खर्च आला ? — या प्रश्नांशिवाय क्षय व दमा यांच्यासारख्या जुनाट आजारांची माहिती वेगळ्या प्रश्नांच्या द्वारां गोळा केली. आंधळेपणा, बहिरेपणा, मुकेपणा किंवा वेड यांच्यासारख्या कायमच्या पंगू बनविणाऱ्या गोष्टींचीहि माहिती जमविली व पाहणी केलेल्या विभागांतील लोकांचें आरोग्य कोणत्या प्रतीचें आहे, हें त्यांच्या स्वास्थ्यापेक्षा आजाराबद्दलच्या माहितीवरून मुख्यत: अजमावलें.

आमच्या या पाहणींत आम्ही मिळविलेल्या माहितीचा बिनचुकपणा, पाहणी करण्याची आमची पद्धत व पाहणी केलेल्यांच्या समजाची पातळी यांच्यामुळे कांहीसा मर्यादित झाला आहे. आजारी माणसांच्या रोगाचें निदान आम्हांला करतां आलें नाही, कारण तशीं वैद्यकीय साधनें आमच्या जवळ नव्हतीं. शिवाय मागील एका वर्षांत आजारासंबंधी माहिती द्यावयाची म्हणजे सांगणाऱ्यांना आपल्या स्मरणशक्तीला ताण द्यावा लागे. तसेंच वर्षभराच्या काळांत पसरलेल्या घटनांची नोंद करतांना जे दोष नेहमी आढळतात, तेहि आम्ही जमविलेल्या या माहितींत असण्याची शक्यता आहे. लहानसहान आजार आठवणींतून सुटण्याचीहि शक्यता होती. तसेंच आजाराची माहिती सांगतांना कमीअधिक फुगवून सांगण्याची शक्यताहि जमेस धरली पाहिजे. दुसरें असें की, अन्वेषक हे वैद्यकीय दृष्टीने शिक्षण मिळालेले नव्हते आणि अन्वेषिका मात्र आरोग्य-प्रचारिका होत्या. अन्वेषकांनी पुरुषांच्या व अन्वेषिकांनी स्त्रियांच्या आरोग्याची पाहणी केली. यामुळे पाहणी करण्याच्या पद्धतींत थोडाबहुत फरक पडला असावा. तरीहि पाहणी करण्याची पद्धत सारखी असावी, याबद्दल अगोदर काळजी घेतली गेली होती.

वर उल्लेखिलेल्या मर्यादांशिवाय रोगटपणाच्या दृष्टीने जे रोग महत्त्वाचे आहेत ते कांहीसे गळले आहेत किंवा त्यांची नोंद नीट झाली नाही असेंहि दिसतें. ज्यांची पाहणी केली, त्यांचें अज्ञान व पाहणी करणाऱ्यांजवळ वैद्यकीय साधनांचा अभाव या जोडकारणांमुळे हे दोष आले असावेत. याशिवाय सामाजिक दृष्टीने जे लांछनास्पद समजले जातात असे गुप्त रोग, क्षय किंवा महारोग यांच्यासारख्या रोगांची पूर्ण नोंद झाली नसावी.

शारीरिक अस्वास्थ्याच्या दृष्टीने आम्ही जी माहिती गोळा केली, ती मुलांची व प्रौढांची अशी वेगवेगळी दिली आहे. मुलांच्या आरोग्यासंबंधीची माहिती चार मराठीभाषी केंद्रांतच गोळा केली गेली. बालमृत्यूंसंबंधीची माहिती व वर्षाखालील मुलांचें वजन याबद्दलचीहि माहिती दिली आहे;

कारण यावरून मुलांच्या आरोग्याची प्रत अजमावतां येते. सगळ्यांचीं वजनें घेणें हें कठिण झालें असतें म्हणून तें केलें नाही.

### १३ वर्षांखालील मुलांचे आजार व बालमृत्यु यांच्यासंबंधीची माहिती

मुलांमधील रोगटपणाचा विचार करतांना बालमृत्यूंचा विचार करणें योग्य होईल. क्रमांक ११·१ या तक्त्यामध्यें पाहणीच्या वर्षाच्या काळांत वेगवेगळया केंद्रांत जन्मलेल्या मुलांपैकी मृत्युमुखीं पडलेल्या मुलांची माहिती देण्यांत आली आहे. साही केंद्रांमधून ही माहिती मिळाली आहे. क्रमांक ११·१ या तक्त्यावरून पाहणी केलेल्या केंद्रांतील बालमृत्यूंचे बिनचूक प्रमाण ठरवितां येणार नाही. कारण पाहणीपूर्वीच्या वर्षांत जीं मुलें जन्मलीं व पाहणीच्या वर्षांत मरण पावलीं, त्यांची माहिती आमच्यापाशी नाही. एकूण सहा केंद्रांत जन्मलेल्या १४५५ मुलांपैकी १०७ मुलें मरण पावलीं.

**तक्ता क्रमांक ११·१**

**पाहणीच्या वर्षांतील जन्मांपैकी मृत्यूंची संख्या आणि दर १००० जन्मांमागे मृत्यूचें प्रमाण**

| केंद्र | पाहणीच्या वर्षामधील जन्म | जन्मलेल्यांपैकी बालमृत्यूंची संख्या | १००० जन्मांमागे मृत्यूचें प्रमाण |
|---|---|---|---|
| बोरी | २४२ | १४ | ५७.८ |
| धानोरें | ३२६ | ११ | ३३.८ |
| मिरजगांव | २४० | २५ | १०४.२ |
| मिठबाव | १५१ | ६ | ३९.७ |
| मुदलगी | २०९ | २८ | १३३.९ |
| नालवार | २८७ | २३ | ८०.१ |
| एकूण | १४५५ | १०७ | ७३.५ |

प्रत्येकीं १००० जन्मांमध्ये त्या वर्षांतील बालमृत्यूंचें प्रमाण मुदलगी येथें सर्वांत जास्त होतें. इतर केंद्रांच्या मानानें धानोरें व मिठबाव या केंद्रांत बालमृत्यूंचें प्रमाण पुष्कळच कमी होतें. धानोरें व मिठबाव येथील बालमृत्यूंची संख्या इतकी कमी दिसते कीं, कांही नोंदी करण्याचें राहून गेलें असावें असें वाटतें. परंतु आमच्यापाशी जी थोडी माहिती जमली, तिच्यावरून नोंदीच्या अशा चुका गृहीतच धराव्या लागतील. म्हणून वेगवेगळया केंद्रांची या बाबतींत तुलना करणेंहि योग्य होणार नाही. पहिल्या वर्षांतील मुलांच्या मृत्यूंसंबंधीच्या कारणांची पुरेशी माहिती अद्याप उपलब्ध नसल्यामुळे बालमृत्यूंच्या नोंदींत उणीव राहिलेली आहे किंवा काय, हें तपासून पाहणें कठिण आहे. म्हणून बाल-मृत्यूंसंबंधी कांही थोडया गोष्टीच आम्ही पुढे ठेवीत आहोत. एकूण १०७ मृत्यूंपैकी ५६ मृत्यु हे जन्माच्या पहिल्या महिन्यांतच झाले होते. आईच्या वयाच्या दृष्टीनें बालमृत्यूंचें पृथक्करण केलें असतां असें दिसून येतें की, तरुण वयाच्या मातांना झालेल्या मुलांत बालमृत्यूंचें प्रमाण जास्त होतें. क्रमांक ११·२ या तक्त्यांत याबद्दलची माहिती दिली आहे. पाहणीच्या वर्षांतील जन्मांपैकी बाल-मृत्यूंबद्दल एवढीच माहिती आमच्याजवळ आहे.

**तक्ता क्रमांक ११·२**

**पाहणीच्या वर्षांत जन्मलेल्या दर १००० मुलांतील मृत्युसंख्येची आईच्या वयाप्रमाणे विभागणी**

| आईचें वय वर्षांत | जन्मांची संख्या | बालमृत्यु | १००० जन्मांपैकी बालमृत्यु |
|---|---|---|---|
| १३–१७ | १०६ | ११ | १०३.८ |
| १८–२२ | ४३१ | ३७ | ८५.८ |
| २३–२७ | ३८३ | २५ | ६५.३ |
| २८–३२ | ३०७ | १७ | ५५.४ |
| ३३ व वरील | २२८ | १७ | ७४.६ |
| एकूण | १४५५ | १०७ | ७३.५ |

वर उल्लेखिल्याप्रमाणें मुलांच्या आरोग्याचें एक गमक म्हणजे वजनाप्रमाणे त्यांचें वर्गीकरण. तान्ह्या मुलांचें वजन करणें सोपें असल्यामुळें १ वर्षाखालील मुलांचें आम्ही वजन केलें. मुलांचें वजन करण्याच्या बाबतींत लोकांकडून थोडा विरोध झाला. कारण वजन केल्याने मुलांची प्रकृति बिघडते, अशी कांही लोकांची समजूत होती. सुदैवाने अशीं उदाहरणें थोडीं होतीं. या विरोध करणारांना समजावून सांगणें अन्वेषिकांना बरेंच कठिण गेलें. परंतु जेथे लोकांचा वजन करण्याला पूर्ण विरोध होता तेथे वजन करूं नका असें अन्वेषिकांना सांगण्यांत आलें होतें.

क्रमांक ११·३ या तक्त्यांत साही केंद्रांतील १ वर्षाच्या आंतील मुलांचीं वजनें दिलीं आहेत. या तक्त्यावरून हें दिसून येईल की, सरासरी पहिल्या ३ महिन्यांत मुलांचें वजन ८।। पौंड होतें. पुढच्या ३ महिन्यांत तें सरासरीने १२ पौंड, पुढील ३ महिन्यांत १३$\frac{3}{4}$ पौंड आणि शेवटच्या ३ महिन्यांत १४$\frac{3}{4}$ पौंड होतें. यावरून असें आढळलें की, पहिल्या सहा महिन्यांनंतर मुलांच्या वजनांत फारच थोडी वाढ झाली होती.

क्रमांक ११·४ या तक्त्यांत, पाहणीच्या वर्षांत, सहा केंद्रांत १३ वर्षांखालील मुलांच्या ज्या आजारांची नोंद झाली, ती प्रत्येकीं १०० च्या प्रमाणांत दिलेली आहे. ही माहिती ४ मराठीभाषा केंद्रांतूनच गोळा केली आहे. या तक्त्यावरून दिसून येईल की, आजारी मुलांचें—मुलें व मुली यांचें—सर्वांत जास्त प्रमाण मिठबाव येथे व सर्वांत कमी प्रमाण बोरी येथे होतें. क्रमांक ११·५ या तक्त्यांत मुलांच्या आजारांचें वर्गीकरण सर्वसामान्य प्रकारांत केलें आहे. यांत मोठे आजार किंवा जुनाट आजार हे जवळ जवळ नाहीतच. जवळ जवळ $\frac{3}{4}$ आजार हे पडसें, खोकला, ताप व हगवण अशाच प्रकारचे होते. प्रत्येक प्रकारच्या आजाराची माहिती पुढे देण्यांत येत आहे.

**बारीक दुखणीं** :— या वर्गांत पडसें, खोकला, डोळे येणें अशासारख्या एखादा आठवडाभर टिकणारे आजार येतात. मुलें व मुली यांच्या आजारांपैकी सर्वांत जास्त प्रमाण म्हणजे एकूण सर्व आजारांपैकी शेकडा ४० एवढें प्रमाण या वर्गांतील दुखण्यांचें होतें. क्रमांक ११·५ या तक्त्यावरून हें दिसून येईल. धानोरें व मिठबाव येथील जवळ जवळ निम्मीं दुखणीं या वर्गांतील होतीं. मिरजगांव येथे या वर्गांतील दुखण्यांचें प्रमाण जरी कमी होतें, तरी किरकोळ ताप या वर्गांतील दुखण्यांचें प्रमाण बरेंच जास्त असल्यामुळें वरील दुखण्यांची उणीव भरून निघाली. या बाबतींत असें असावें की, पडसें व खोकला यांच्याबरोबर थोडा ताप असला की, दुखणें सांगतांना कधी पडसें–खोकला, तर कधी ताप असें सांगितलें गेलें असावें.

तक्ता क्रमांक ११·३

## १ वर्षापर्यंतच्या मुलांची वजनाप्रमाणे विभागणी

| वय महिन्यांत | वजन पौंडांत ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | एकूण | सरासरी वजन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —३ | १ | ७ | १५ | २६ | ३८ | ३७ | ३० | ३२ | ११ | ४ | ३ | — | — | — | — | — | — | २०४ | ८.४ |
| ४—६ | १ | — | ३ | २ | ४ | १० | १३ | २२ | ३२ | ४० | ४३ | ११ | ११ | २ | २ | २ | — | १९८ | १२.० |
| ७—९ | — | — | — | — | — | ३ | १ | ८ | २४ | ३० | २९ | १९ | १० | ८ | ६ | १ | १ | १४० | १३.४ |
| १०—१२ | — | — | — | — | १ | ३ | १ | ८ | ९ | २४ | ३३ | १८ | २२ | १९ | १२ | ८ | ४ | १६२ | १४.४ |
| एकूण | २ | ७ | १८ | २८ | ४३ | ५३ | ४५ | ७० | ७६ | ९८ | १०८ | ४८ | ४३ | २९ | २० | ११ | ५ | ७०४ | ११.८ |

तक्ता क्रमांक ११·४

प्रत्येक केन्द्रांतील दर १०० मुलांमागे मुलगे व मुली यांच्या दुखण्यांची संख्या

| केंद्र | दुखण्यांची संख्या | |
|---|---|---|
| | मुलगे | मुली |
| बोरी | २.३ | ३·७ |
| धानोरें | १३.१ | १६.५ |
| मिरजगांव | ८.९ | १२.९ |
| मिठबाव | १४.४ | २७.४ |
| एकूण | ९·७ | १२·७ |

**विषमज्वर व इतर ताप :—** क्रमांक ११·५ या तक्त्यावरून हें दिसून येईल की, एकूण दुखण्यांपैकी शेकडा २० दुखणीं या वर्गांतील होतीं. मिरजगांवला स्त्रियांच्या एकूण दुखण्यांपैकी शेकडा ४७ व पुरुषांच्या एकूण दुखण्यांपैकी शेकडा ३० दुखणीं या वर्गांतील होतीं. स्त्री-पुरुषांच्या दुखण्यांपैकी शेकडा ५ दुखणीं मुदतीच्या तापाचीं होतीं. मिरजगांव येथे एकूण दुखण्यांपैकी अनुक्रमें शेकडा २६ व शेकडा १० एवढीं दुखणीं मुदतीच्या तापाचीं होतीं. इतर २ केंद्रांच्या मानानें या २ केंद्रांत नोंदलेल्या दुखण्यांची संख्या कमी होती व बोरी येथें ती विशेषच कमी होती. मिठबाव व धानोरें येथे मुदतीच्या तापाचीं दुखणीं थोडीं आढळलीं. परंतु या केंद्रांत चांगल्या वैद्यकीय मदतीचा अभाव असल्यामुळे साध्या व मुदतीच्या तापांतील भेद समजला नसेल, असेंहि असणें शक्य आहे. मिरजगांवला हॉस्पिटल असल्यामुळे मुदतीच्या तापाचें निदान झालें असावें व म्हणून तापांची नोंद त्याप्रमाणे केली गेली असावी.

**हगवण व आव :—** क्रमांक ११·५ या तक्त्याप्रमाणे मुलांमध्ये या दुखण्यांचें प्रमाण पुष्कळ आढळून येतें. एकूण दुखण्यांपैकी शेकडा १० या वर्गांतील दुखणीं आहेत. मिरजगांव व धानोरें येथे दुखण्यांचें प्रमाण दुसऱ्या दोन केंद्रांपेक्षा अधिक होतें, तरी तेथील एकूण दुखण्यांपैकी शेकडा १२ एवढेंच हगवणीच्या दुखण्यांचें प्रमाण आढळतें.

**रिकेटस् :—** रिकेटस् झालेल्या मुलांची व मुलींची चार केंद्रांतील एकूण संख्या ३४ एवढीच म्हणजे पाहणींतील एकूण दुखण्यांपैकी शेकडा ३ एवढें या दुखण्याचें प्रमाण होतें.

**क्षय व दमा :—** एकूण आजारी मुलांपैकी शेकडा २.३ मुलगे व शेकडा ५.८ मुली या दुखण्यांच्या वर्गांत मोडत होत्या. परंतु या वर्गांतील बहुतेक उदाहरणें दम्याचीं असून तीं मिठबाव येथील होतीं. मुलग्यांत शेकडा ५ व मुलींत शेकडा १५ असें या रोगाचें प्रमाण पडत होतें. या केन्द्राचें हें वैशिष्टय होतें की, मोठीं माणसें व लहान मुलें अशा सर्व वयाच्या माणसांत दम्याचें फार मोठें प्रमाण आढळलें. अपेक्षेप्रमाणे क्षयाचें एकहि उदाहरण एकाहि केंद्रांतील मुलांत आढळलें नाही.

**गोंवर, कांजण्या व देवी यांसारखे आजार :—** मुलग्यांच्या दुखण्यांपैकी शेकडा ६.२ व मुलींच्या दुखण्यांपैकी शेकडा १५·६ एवढें प्रमाण या वर्गांतील रोगांचें आढळलें. या आजारांच्या

तक्ता क्रमांक ११·५

दुखण्यांच्या प्रकाराप्रमाणे मुलगे व मुली यांची विभागणी

| दुखण्याचा प्रकार | बोरी |  | घानोरें |  | घिरजगांव |  | मिठबाव |  | एकूण चारी केंद्रें |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली |
| पडसें खोकला यासारखीं बारीक दुखणीं | ७ | ११ | ११८ | १२५ | २५ | २३ | ८१ | ११५ | २३१ (४५.१) | २७४ (३७.५) |
| किरकोळ ताप | ४ | ३ | ३९ | ४३ | ३८ | ८४ | १२ | २४ | ९३ (१८.१) | १५४ (२१.१) |
| विषम ज्वर | ६ | १३ | २ | ४ | २० | १८ | — | २ | २८ (५.५) | ३७ (५.१) |
| हगवण | १ | ५ | ३० | २० | १६ | २२ | १४ | १९ | ६१ (११.९) | ६६ (९.०) |
| रिकेट्स् | २ | — | ७ | ८ | २ | २ | ७ | ६ | १८ (३.५) | १६ (२.२) |
| क्षय, दमा | १ | १ | ३ | १ | — | १ | ८ | ३९ | १२ (२.३) | ४२ (५.८) |
| देवी, कांजिण्या, गोवर वगैरे | २ | ९ | १४ | ५३ | २ | १५ | १४ | ३७ | ३२ (६.२) | ११४ (१५.६) |
| कॉलरा प्लेगसारखे साथीचे रोग | — | — | ४ | — | ५ | ३ | २ | ३ | ११ (२.१) | ६ (०.८) |
| इतर | ३ | — | २ | १ | १६ | १२ | ६ | ८ | २७ (५.३) | २१ (२.९) |
| एकूण | २६ | ४२ | २१९ | २५५ | १२४ | १८० | १४४ | २५३ | ५१३ (१००.०) | ७३० (१००.०) |

* कंसांतील आंकडे एकूण दुखण्यांपैकी प्रत्येक प्रकाराची शेकडेवारी दाखवितात.

बाबतींत मुलगे व मुली यांच्यांत एवढा फरक कां असावा हें कळत नाही. माहिती गोळा करणाऱ्यांमध्ये जो भेद होता, त्यामुळे हा फरक दिसत असावा असें वाटतें. धानोरें येथे या वर्गांतील दुखण्यांचें प्रमाण मुलींमध्ये फार म्हणजे शेकडा २० एवढें आढळलें. या वर्गांत मोडणाऱ्या दुखण्यांपैकी शेकडा ६० गोंवराचीं, शेकडा १८ डांग्या खोकल्याचीं, शेकडा १० कांजिण्याचीं, शेकडा ८ देवीचीं व उरलेलीं गालगुंड वगैरे प्रकारचीं दुखणीं होतीं.

**प्रौढ स्त्रीपुरुषांचे आजार** :— प्रौढांच्या दुखण्यांची माहिती साही केन्द्रांतून गोळा केली होती. क्रमांक ११·६ या तक्त्यांत पाहणींतल्या केन्द्रांतील १०० लोकसंख्येमागे सांगितलेल्या दुखण्यांची संख्या, स्त्रीपुरुषांची अशी वेगळी दाखविली आहे. तक्त्यावरून हें दिसून येईल की, दोन्ही कानडी भाषी केंद्रांत स्त्रीपुरुषांच्या दुखण्यांच्या संख्येंतील फरक नजरेंत भरण्यासारखा आहे. या दोन केंद्रांत व मिठबाव येथेहि हे जे ठळक फरक आढळतात, याचें कारण, पूर्वी सांगितल्याप्रमाणे सर्व केंद्रांतील अन्वेषिका या प्रशिक्षित आरोग्य प्रचारिका होत्या व अन्वेषक हे मात्र या दृष्टीनं तयार नव्हते, हें असावें. आपण जर स्त्रीपुरुषांच्या दुखण्यांच्या संख्यांची बेरीज केली आणि दोन्ही कानडी भाषी केंद्रांत स्त्रियांचीं बारीकसारीक दुखणींहि नोंदविलीं गेली व पुरुषांच्या दुखण्यांची नोंद कमी झाली असें धरलें, तरीहि मिठबाव या केंद्रांतील प्रौढांच्या आरोग्याची स्थिति सर्वांत वाईट असलेली दिसून येते.

**तक्ता क्रमांक ११·६**

**प्रत्येक १०० प्रौढ स्त्रीपुरुषांमागे आजाऱ्यांचें प्रमाण**

| केन्द्र | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| बोरी | ४.३ | ४.० |
| धानोरें | १०.१ | १०.२ |
| मिरजगांव | ११.९ | ११.५ |
| मिठबाव | १७.७ | २७.८ |
| मुदलगी | ६.४ | ४२.८ |
| नालवार | ८.१ | ४६.२ |
| एकूण | ९.४ | २३.० |

गोळा केलेल्या माहितीच्या पृथक्करणाला सुरुवात करण्यापूर्वी, आजारांच्या वर्गीकरणाबद्दल थोडा खुलासा करणें अवश्य आहे. गोळा केलेली माहिती ढोबळ स्वरूपाची असल्यामुळे आजारांचे वर्गहि ढोबळ स्वरूपाचेच करणें भाग पडलें. सर्व तऱ्हेचे ताप एकत्र केले आहेत. मुदतीचा, मलेरियाचा अशासारखे भेद केले नाहीत कारण तशी बिनचुक माहिती मिळालेली नव्हती. अशा तऱ्हेने एकसारखीं बाह्य लक्षणें असणारे आजार चुकून एकत्र होणें इतर वर्गांतील आजारांच्या बाबतींतहि अशक्य नव्हतें. क्रमांक ११·७ या तक्त्यांत, आजारांचें वर्गीकरण करून प्रत्येक आजाराची प्रत्येक केंद्रांतील शेकडेवारी दिली आहे.

**ताप** :— तक्त्यावरून हें दिसून येईल की, पुरुषांच्या आजारांपैकी शेकडा ४७ आणि स्त्रियांच्या आजारांपैकी शेकडा ५१ हे तापाचे आजार होते. आजाराच्या प्रकारांत तापांचा प्रकार हा सर्वांत मोठा व महत्त्वाचा होता. सगळ्या केंद्रांतील एकूण स्त्रीपुरुषांच्या १८०२ तापाच्या आजारांपैकी

तक्ता क्रमांक ११·७

आजारांच्या प्रकारांप्रमाणे प्रौढ स्त्रीपुरुषांची विभागणी

| आजाराचा प्रकार | बोरी | | वानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुदलगी | | नालवार | | एकूण | | एकूण प्रत्यक्ष संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| ताप | ६३.८ | ४५.९ | ४७.६ | ६७.७ | ४५.९ | ४०.९ | ३४.६ | २७.३ | ५१.७ | ३५.८ | ५३.६ | ६५.१ | ४७.३ | ५१.२ | ४७९ | १३२३ |
| पचनक्रियेचे आजार | ९.६ | १२.२ | १६.० | ७.४ | १६.४ | १२.३ | ११.२ | १०.६ | १२.६ | १४.३ | १२.० | ७.३ | १३.५ | ९.४ | १३७ | २४४ |
| फुफ्फुसाचे आजार (एकूण) | ७.२ | ४.० | १२.६ | ६.४ | १६.० | ११.४ | १९.१ | १९.३ | १२.६ | १०.९ | १०.९ | ८.६ | १४.० | ११.० | १४२ | २८६ |
| (१) दमा | १.२ | १.३ | १.४ | ०.५ | १.३ | ४.१ | ९.३ | १३.८ | २.३ | ३.४ | ७.३ | २.२ | ४.२ | ४.८ | ४३ | १२४ |
| (२) क्षय | — | २.७ | — | २.८ | २.२ | ०.४ | ०.९ | १.५ | ८.० | २.२ | १.६ | ०.७ | १.७ | १.२ | १७ | ३२ |
| वाताचे आजार | १.२ | ८.१ | १.० | ५.१ | ०.९ | ९.५ | ६.१ | ९.२ | — | ४.४ | १.० | १.१ | २.० | ४.५ | २० | ११५ |
| स्त्रियांचे रोग | — | १७.६ | — | ३.७ | — | ७.३ | — | ९.५ | — | २२.१ | — | २.५ | — | ७.३ | — | १९० |
| इतर | १८.१ | ११.१ | २२.८ | ९.७ | २०.८ | १८.६ | २८.८ | २४.० | २३.० | १२.५ | २२.५ | १५.४ | २३.२ | १६.६ | २३५ | ४२९ |
| एकूण प्रत्यक्ष संख्या | ८३ | ७४ | २०६ | २१७ | २३१ | २२० | २१४ | ५४५ | ८७ | ३२१ | ११२ | १२१० | १००.० | १००.० | १०१३ | २५८७ |

या दुखण्यांशिवाय मुदलगी येथील किरकोळ आजार असलेल्या आणखी २८२ स्त्रियांचीं उदाहरणें आहेत. परंतु या स्त्रियांचीं दुखणीं किरकोळ असल्याने त्यामुळे त्यांच्या कामांत कांही अडथळा आला नव्हता.

नमूद केल्याप्रमाणे फक्त ६४ म्हणजे शेकडा ३.५ एवढे टायफॉइडचे ताप होते. तापाच्या वर्गांत मलेरियाच्या तापाचेंहि प्रमाण पुष्कळ असलें पाहिजे असें वाटतें. विशेषत: ज्या खेड्यांत सांड-पाण्याच्या निकालाची व्यवस्था नाही व जेथे जंतुनाशक औषधें वापरलीं जात नाहीत, तेथे मलेरियाचे प्रमाण नेहमी बरेंच असतें. मिठबाव व धानोरें या दोन केंद्रांतच पाणी वाहून जाण्याची थोडीशी नैसर्गिक सोय होती. कारण धानोरें हें उंचावर वसलें आहे व मिठबाव येथील जमीन रेताड असल्यामुळे पाणी शोषून घेणारी आहे. मुदलगीखेरीज इतर केंद्रांत सांडपाण्याची व्यवस्था लाव-ण्याचा कांहीच प्रयत्न केला गेला नव्हता. मुदलगींत मात्र मागे सांगितल्याप्रमाणे सार्वजनिक स्वच्छता विशेष चांगली राखली गेली होती. नालवारच्या स्त्रियांत तापाचें प्रमाण अतिशयच जास्त आढळलें. धानोऱ्यास या वर्गांतील आजारांचें प्रमाण जरी मोठें असलें, तरी नालवारच्या तुलनेंत एकूण आजारांची संख्या कमी होती.

याशिवाय, क्षयाचीं दुखणीं हीं ताप या वर्गामध्येच नोंदविलीं गेलीं असावीं अशी शंका आहे. उदाहरणार्थ, मिठबाव येथील स्त्रीपुरुषांच्या जुनाट तापांचें प्रमाण शेकडा ९ होतें व मुदलगी येथे तें शेकडा ७.५ एवढें होतें. क्रमांक ११·८ या तक्त्यांत वेगवेगळ्या केंद्रांतील तापांचा कालावधि दाखवला आहे. त्यावरून दिसून येईल की, एकूण $\frac{3}{4}$ तापांचा कालावधि एक आठवड्यापेक्षा कमी होता. इतर केंद्रांपेक्षा मिठबाव, बोरी व नालवार येथील तापांच्या कालावधीची सरासरी जास्त होती.

क्रमांक ११·९ या तक्त्यावरून तापाची लाट उसळण्याच्या विशिष्ट ऋतूमधील दिवसांची कल्पना येईल. पावसाळ्यांत तापांचें प्रमाण सर्वांत जास्त आढळून येतें. कांही कांही खेड्यांत तर पावसाळा हा मृत्यूचा ऋतु समजला जातो.* पचनक्रिया बिघडल्यामुळे होणारे आजारहि पावसाळ्यांतच जास्त आढळतात हें पुढेहि दिसून येईल. क्रमांक ११·९ या तक्त्यावरून आणखी एक ठळक गोष्ट लक्षांत येईल की धानोरें येथें हिवाळ्यांत आढळून येणारें तापाचें जास्त प्रमाण हें नेहमीपेक्षा वेगळें आहे. भिल्लांची मोकळ्या हवेची आवड आणि हिवाळ्यांतहि दररोज नदीवर नियमित स्नानास जाण्याची संवय यांच्यामुळे कदाचित् थंडी होऊन त्यांना ताप येत असावा.

**पचनक्रियेचीं दुखणीं** :—क्रमांक ११·७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे हीं दुखणीं पुरुषांत शेकडा १३.५ व स्त्रियांत शेकडा ९.५ एवढीं आढळलीं. या वर्गांतील दुखण्यांत हगवण, आंव, त्याचप्रमाणे पोटदुखी यांच्यासारख्या बारीकसारीक दुखण्यांचा समावेश होतो. आपल्या खेड्यांत हगवण व आंव यांच्यासारखीं दुखणीं पावसाळ्यांत सामान्यपणे आढळून येतात. कारण नदीच्या व विहिरीच्या पाण्यांत सांडपाणी वाहून जातें किंवा जमिनींतून झिरपत जातें व त्यामुळे दूषित पाण्यापासून होणारीं वरील प्रकारचीं दुखणीं वाढतात. क्रमांक ११·१० या तक्त्यांत या प्रकारच्या दुखण्यांचा उद्‌भव कोणत्या ऋतूंत जास्त होतो तें दाखविलें आहे.

**फुफ्फुसांचे व श्वासाचे आजार** :— क्रमांक ११·७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे, आजारांच्या महत्त्वाप्रमाणे दुसऱ्या क्रमांकाच्या या वर्गांत पुरुषांतील शेकडा १४.१ व स्त्रियांतील शेकडा ११.१, एवढे आजार समाविष्ट होतात. या वर्गांत पडसें व खोकला यांच्यासारखे बारीक आजार जसे येतात, तसेंच न्युमोनिया, क्षय व दमा यांच्यासारखे मोठे आजारहि येतात. क्रमांक ११·७ या तक्त्यावरून दिसून येईल की, या वर्गांतील आजारांचें सर्वांत मोठें प्रमाण मिठबाव येथे आढळून आलें. तेथे स्त्रियांच्या या वर्गांतील दुखण्यांपैकी शेकडा ७० व पुरुषांच्या दुखण्यांपैकी शेकडा ५०

* ( वरील समजुतीमुळे मिरजगांवला व्हॅसेक्टमी करून घेण्यास कांही जण तयार होते, तरी शस्त्रक्रिया पावसाळ्यांत ठेवल्यामुळे ते आले नाहीत. )

तक्ता क्रमांक ११·८

ताप आलेल्या प्रौढांची तापाच्या कालावधीप्रमाणे विभागणी

| तापाचा कालावधि | बोरी | | जानोरें | | झिरजगांव | | मिठबाव | | मुबलगी | | नालबार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| —१ आठवडा | ५.७ | ५.८ | ४३.९ | ४५.७ | २४.५ | १०.० | ९.५ | १३.४ | ११.१ | २७.८ | २२.३ | ४६.८ | २२.३ | ३७.७ |
| —४ आठवडे | ६६.० | ६१.१ | ४३.९ | ४२.८ | ५५.७ | ५१.१ | ५०.० | ४३.६ | ६२.२ | ३९.२ | ४३.७ | ३४.८ | ५१.६ | ३८.८ |
| —३ महिने | १५.१ | २०.४ | ८.३ | ८.८ | १५.१ | २३.३ | २७.१ | २३.५ | १७.८ | ८.७ | २६.२ | १०.३ | १८.२ | १२.६ |
| —११ महिने | १३.२ | ८.७ | ४.१ | — | ३.८ | २.२ | ९.४ | ४.७ | ८.९ | ३.५ | २.९ | ३.८ | ६.० | ३.५ |
| १२ महिने व वरील बहुतेक जुनाट आजार | — | २.९ | — | २.० | ०.९ | २.२ | २.७ | १४.१ | — | १०.४ | ४.९ | १.४ | १.७ | ३.८ |
| कालावधि सांगितला नाहीं | — | — | — | ०.७ | — | १.१ | १.३ | ०.७ | — | १०.४ | — | २.९ | ०.२ | ३.६ |
| एकूण १०० = | ५३ | ३४ | ९८ | १४७ | १०६ | ९० | ७४ | १४९ | ४५ | ११५ | १०३ | ७८८ | ४७९ | १३२३ |

तक्ता क्रमांक ११·९

तापाच्या उद्भवाची ऋतूप्रमाणे विभागणी

| केंद्र | ताप येण्याचा ऋतु: उन्हाळा पुरुष | स्त्रिया | पावसाळा पुरुष | स्त्रिया | हिवाळा पुरुष | स्त्रिया | निर्देश नसलेला पुरुष | स्त्रिया | एकूण पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरी | १३ | ४ | २७ | १५ | ११ | १३ | २ | २ | ५३ | ३४ |
| धानोरें | १४ | १३ | २८ | ५६ | ५६ | ७५ | — | ३ | ९८ | १४७ |
| मिरजगांव | ३७ | २६ | ४४ | १९ | २५ | २१ | — | २४ | १०६ | ९० |
| मिठबाव | ११ | २६ | २८ | ६० | १९ | ३६ | १६ | २७ | ७४ | १४९ |
| मुदलगी | २१ | ४० | १५ | २७ | ९ | २८ | — | २० | ४५ | ११५ |
| नालवार | १६ | २७२ | २६ | २७७ | ४२ | १७५ | १९ | ६४ | १०३ | ७८८ |
| एकूण | ११२ | ३८१ | १६८ | ४५४ | १६२ | ३४८ | ३७ | १४० | ४७९ | १३२३ |
| प्रत्येक ऋतूंतील एकूण शेकडेवारी | २३.४ | २८.८ | ३५.१ | ३४.३ | ३३.८ | २६.३ | ७.७ | १०.६ | १००.० | १००.० |

तक्ता क्रमांक ११·१०

पचनक्रियेच्या आजारांची ऋतुप्रमाणे विभागणी

| केंद्र | पचनक्रियेचे आजार होण्याचा ऋतु: उन्हाळा | | पावसाळा | | हिवाळा | | निर्देश नसलेला | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| बोरी | १ | २ | ३ | ४ | १ | ३ | ३ | — | ८ | ९ |
| धानोरें | २ | २ | १३ | ८ | १३ | २ | ५ | ४ | ३३ | १६ |
| मिरजगांव | ८ | ४ | २० | ९ | ६ | ७ | ४ | ७ | ३८ | २७ |
| मिटबाव | ५ | ७ | ८ | १९ | ७ | १६ | ४ | १६ | २४ | ५८ |
| मुदलगी | ३ | १४ | ४ | १० | ३ | ११ | १ | ११ | ११ | ४६ |
| नालवार | १ | २८ | ५ | ४२ | २ | ९ | १५ | ९ | २३ | ८८ |
| एकूण | २० | ५७ | ५३ | ९२ | ३२ | ४८ | ३२ | ४७ | १३७ | २४४ |
| प्रत्येक ऋतूंतील एकूण शेकडेवारी | १४.६ | २३.४ | ३८.६ | ३७.६ | २३.४ | १९.७ | २३.४ | १९.३ | १००.० | १००.० |

दुखणीं जुनाट स्वरूपाच्या दम्याचीं होतीं. या खेड्यांत ७५ स्त्रियांनी व २० पुरुषांनी दमा असल्याचें सांगितलें. वस्तुत: मिठबावला ७५ च्या ऐवजीं १३७ स्त्रियांना दमा होता. परंतु दम्याबरोबरच ज्यांना इतर दुखणीं त्या वर्षांत झालीं, त्यांनी तीं दुखणीं वर्षांतील दुखण्यांत नोंदवलीं व दमा कायमचा आजार म्हणून सांगण्यांत आला. क्रमांक ११·७ च्या तक्त्यांतील दम्याच्या १६७ उदाहरणांपैकी शेकडा ५७ एकट्या मिठबावमधील व उरलेलीं शेकडा ४३ हीं इतर ५ केंद्रांमधील होतीं. दम्यामुळे मिठबाव येथील जुनाट आजारांचें एकूण प्रमाण इतर केंद्रांच्या मानानें पुष्कळच जास्त वाढलें आहे. दमा असणाऱ्या स्त्रियांपैकी ¾ स्त्रिया ४५ वर्षांवरील वय-गटांतील होत्या. क्रमांक ११·११ या तक्त्यांत दम्याच्या आजारांची पुरुषांच्या व स्त्रियांच्या वयाप्रमाणे विभागणी केली आहे.

सगळ्याच केंद्रांत क्षयाचीं म्हणून सांगितलेलीं उदाहरणें कमी आहेत. जुनाट तापाचीं म्हणून सांगितलेलीं दुखणीं, क्षयाचीं असणें शक्य आहे, याबद्दलचा उल्लेख मागे आलेलाच आहे.

**तक्ता क्रमांक ११·११**

**दमेकरी स्त्रीपुरुषांची वयाप्रमाणे विभागणी**

| केंद्र | वय गट: १३–२९ पुरुष | १३–२९ स्त्रिया | ३०–४४ पुरुष | ३०–४४ स्त्रिया | ४५–५४ पुरुष | ४५–५४ स्त्रिया | ५५ व वरील पुरुष | ५५ व वरील स्त्रिया | एकूण पुरुष | एकूण स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरी | — | — | — | — | — | — | १ | १ | १ | १ |
| धानोरें | २ | — | १ | — | — | — | — | १ | ३ | १ |
| मिरजगांव | — | १ | — | २ | २ | २ | १ | ४ | ३ | ९ |
| मिठबाव | २ | १० | ५ | १५ | ४ | १९ | ९ | ३१ | २० | ७५ |
| मुदलगी | — | १ | — | ४ | १ | २ | १ | ४ | २ | ११ |
| नालवार | — | ३ | ४ | ७ | ७ | ९ | ३ | ८ | १४ | २७ |
| एकूण | ४ | १५ | १० | २८ | १४ | ३२ | १५ | ४९ | ४३ | १२४ |

फुफ्फुसाच्या इतर आजारांपैकी सर्व केंद्रांत मिळून ५ च उदाहरणें आढळलीं. मिठबाव येथे एकूण १३ उदाहरणें जुनाट खोकल्याचीं आढळलीं. यांतील १० स्त्रिया होत्या. खोकला, पडसें व छातींत दुखणें अशांसारख्या फुफ्फुसाच्या दुखण्यांची संख्या मिठबाव, मिरजगांव व धानोरें येथे बरीच मोठी दिसून आली.

**संधिवात** :— क्रमांक ११·७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे पुरुषांत शेकडा २ व स्त्रियांत शेकडा ४.५ एवढें या दुखण्याचें प्रमाण आढळलें. मिठबावखेरीज इतर केंद्रांत संधिवाताचीं फारशीं उदाहरणें दिसून आलीं नाहीत. मिठबाव येथे मात्र एकूण दुखण्यांपैकी शेकडा १० दुखणीं संधिवाताचीं होतीं.

**स्त्रियांचे आजार** :— स्त्रियांच्या जननसंस्थेशी संबद्ध असणाऱ्या रोगांचा एक वेगळाच वर्ग आम्ही केला. प्रसूतीनंतरचे आजार, जननेंद्रियाचे गुप्त रोग व पंडुरोग यांचाहि समावेश या वर्गांत केला होता. स्त्रियांच्या एकूण दुखण्यांपैकी शेकडा ७.३ किंवा एकूण १९० दुखणीं या वर्गांत मोडत होतीं. यांच्यापैकी २२ दुखणीं गुप्त रोगाचीं होतीं व त्यांतील १९ एकट्या मुदलगी खेड्यांतील

होतीं. या वर्गांतील १९० दुखण्यांपैकी ¾ दुखण्यांचा कालावधि एक महिन्यापेक्षा कमी होता. जवळ-जवळ ¼ दुखणीं जुनाट स्वरूपाचीं होतीं.

**इतर दुखणीं** :—'इतर' हा जो दुखण्यांचा शेवटचा वर्ग होता, त्यांत विविध प्रकारच्या लहान व मोठ्या, तसेंच तीव्र व जुनाट अशा दोन्ही प्रकारच्या व इतर वर्गांत समाविष्ट होऊं न शकणाऱ्या दुखण्यांचा समावेश होता. या वर्गांत थोडीं अर्धांगवायूचीं दुखणीं व ६२ महारोगाचीं होतीं. महारोगाच्या दुखण्यांपैकी ३७ एकट्या मिरजगांवचीं होतीं. या वर्गांत समाविष्ट होणारीं इतर दुखणीं म्हणजे डोकेदुखी, डोळे येणें इत्यादि होतीं. क्रमांक ११·७ च्या तक्त्यांत दाखविल्या-प्रमाणे सर्व केंद्रांतील एकूण दुखण्यांपैकी पुरुषांत शेकडा २२.६ व स्त्रियांत शेकडा १६.१ दुखणीं या वर्गांतील होतीं.

प्लेग, कॉलरा यांच्यासारख्या साथीच्या रोगांचीं फारशीं उदाहरणें आढळलीं नाहीत. पुरुषांतील गुप्त रोग 'इतर' या वर्गांत घातले होते. यांची सांगितलेली संख्या अतिशयच कमी वाटली. नाळवार येथे ९ व मुदलगी येथे १ एवढीच गुप्त रोगांची संख्या आढळली.

दुखण्यांसंबंधीची माहिती गोळा करण्यांत आमचा एक उद्देश असा होता की, आजारामुळे कामाचे किती दिवस वाया गेले त्याचा अंदाज घ्यावा. क्रमांक ११·१२ या तक्त्यांत प्रत्येक आजाऱ्या-मागे त्याच्या आजाराच्या दिवसांची सरासरी दिलेली आहे. याच तक्त्यांत, आजाऱ्यांच्या आजारा-मुळे प्रत्येक प्रौढ स्त्रीपुरुषामागे कामाचे किती तास वाया गेले त्यांची सरासरी दिली आहे. यावरून एकूण सर्व केंद्रांमध्ये पुरुषांमध्ये वर्षांत सरासरीने प्रत्येक पुरुषामागे कामाचे ७ दिवस व स्त्रीमागे १८ दिवस वाया गेले असें दिसून येतें.

पाहणीच्या वर्षांत, पाहणी केलेल्या खेड्यांतील लोकांना कोणकोणतीं दुखणीं झालीं, त्या-संबंधीचीच चर्चा वर केली आहे. याशिवाय कामाच्या दृष्टीने कायमचे पंगु झालेले लोक होतेच. एकंदर आजारांचा विचार करतांना त्यांचाहि विचार करावयास हवाच होता. पंगुत्वाचे सर्व-सामान्य प्रकार म्हणजे आंधळेपणा, दमा, वेड, बहिरेपणा, मुकेपणा व महारोगासारखे रोग हे होते. जुनाट स्वरूपाच्या रोगांची नोंद त्या वर्षांतील आजारांच्या नोंदींत आणि कायम स्वरूपाच्या पंगु-त्वाच्या नोंदींत अशी दोन्हीकडे झाली असण्याचा संभव आहे.

साही केंद्रांचा एकत्र विचार केला असतां शेकडा ४.८ पुरुष व शेकडा ६ स्त्रिया ह्या कायमच्या पंगु असलेल्या आढळल्या. १३ वर्षांखालील मुलांमध्ये शेकडा १.२ मुलगे व शेकडा १.६ मुली कायमच्या पंगु असलेल्या दिसून आल्या. मागे सांगितल्याप्रमाणे मुलांसंबंधीची विशेष माहिती फक्त चार केंद्रांतूनच मिळाली होती.

क्रमांक ११·१३ या तक्त्यांत एकूण पंगु असणाऱ्यांची संख्या व जन्मापासूनच पंगु असणारांचें त्यांतील प्रमाण हीं प्रत्येक केंद्रासाठीं वेगवेगळीं दिलीं आहेत. त्यावरून हें दिसून येईल कीं, एकूण पंगुत्वप्रकारांपैकीं प्रौढांमध्ये शेकडा १० आणि मुलांमध्ये शेकडा १५ जन्मापासूनच अस्तित्वांत होते. याचाच अर्थ असा की, एकूण १००० पैकी ५ प्रौढ व एकूण १००० पैकी २ मुलें हीं जन्मापासून पंगु होतीं. प्रौढांच्या बाबतींत असें असणें शक्य आहे की, अगदी लहान वयांत पंगुत्व आलें असल्यास तें जन्मापासूनच होतें असें सांगितलें गेलें असेल.

क्रमांक ११·१४ या तक्त्यांत पंगुत्वाच्या प्रकारांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे व निर-निराळ्या वर्गांतील केवढी संख्या प्रत्येक केंद्रांत आहे, हें दाखविलें आहे. पंगुत्वाच्या प्रकारांचा वेगवेगळा विचार आतां करण्यांत येत आहे.

तक्ता क्रमांक ११·१२

आजारामुळे वाया गेलेल्या कामाच्या दिवसांची संख्या

| | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुबलगी | | नालवार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| एकूण प्रौढांची संख्या | १९१७ | १८६४ | २०३६ | २१३६ | १९३८ | १९०७ | १२१२ | १९६२ | १३५३ | १४०८ | २३७६ | २६१७ | १०८३२ | ११८९४ |
| आजारी प्रौढांची एकूण संख्या | ८० | ७३ | २०३ | २१५ | २३० | १८९ | २०८ | ५०७ | ८६ | २७२ | १९० | १११७ | १०१० | २८५४ |
| प्रत्येक वर्षी प्रत्येक आजारी प्रौढाच्या आजारानें वाया गेलेले कामाचे दिवस | ७०.३ | १०९.६ | ४८.८ | ६०.२ | ४७.७ | ८३.३ | १००.५ | १७९.२ | ७३.३ | १४२.३ | १३६.० | ४६.१ | ७८.८ | ७६.३ |
| प्रत्येक वर्षी प्रत्येक प्रौढा-मागे आजारा-मुळें वाया गेलेले कामाचे दिवस | २.९ | ४.३ | ४.९ | ६.१ | ५.७ | ८.३ | १७.२ | ४६.३ | ४.७ | २७.५ | १०.९ | १९.७ | ७.३ | १८.३ |

तक्ता क्रमांक ११·१३

एकूण पंगूंची संख्या व जन्मापासून पंगु असलेल्या प्रौढ स्त्रीपुरुषांची संख्या

| | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुखलगी | | नालवार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| पंगु प्रौढांची एकूण संख्या | १२० | ८९ | ७६ | ५४ | ११४ | ९७ | ९८ | २१६ | ३१ | १११ | ८२ | १४३ | ५२१ | ७१० |
| जन्मतः पंगु प्रौढांची शेकडेवारी | १४.२ | १०.१ | ५.३ | १३.० | ६.१ | ८.२ | ११.२ | ७.९ | १९.४ | ९.९ | १२.२ | ५.६ | १०.६ | ८.५ |
| पंगु अप्रौढांची एकूण संख्या | २९ | १२ | ६ | १० | १५ | ७ | १४ | ५१ | येथे अप्रौढांमधील पंगुत्वाची माहिती मिळाली नाही | | | | ६.४ | ८.० |
| जन्मतः पंगु अप्रौढांची एकूण शेकडेवारी | ६.९ | १६.७ | ५०.० | १०.० | १३.३ | ५७.१ | २८.६ | ५.९ | | | | | १७.२ | १२.५ |

तक्ता क्रमांक ११·१४

पंगुत्वाच्या प्रकाराप्रमाणे प्रौढांची व अप्रौढांची विभागणी

| पंगुत्वाचा प्रकार | बोरी प्रौढ | बोरी अप्रौढ | धानोरें प्रौढ | धानोरें अप्रौढ | मिरजगांव प्रौढ | मिरजगांव अप्रौढ | मिठबाव प्रौढ | मिठबाव अप्रौढ | मुबलगी प्रौढ | नालवार प्रौढ | एकूण प्रौढ (सहा केंद्रांतील) | एकूण अप्रौढ (चार केंद्रांतील) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ दमा | ३० | — | २४ | — | ३७ | — | १५१ | ५१ | ३१ | ५५ | ३२८* | ५१ |
| +२ क्षय व जुनाट खोकला | ५ | — | ६ | — | ७ | — | १३ | — | १७ | १० | ५८* | — |
| | | | +३६ | | | | | | +११ | | +४७ | |
| ३ आंधळेपणा | १२६ | ३१ | २८ | ६ | ६० | ७ | ५८ | ३ | ३१ | ७६ | ३७९ | ४७ |
| (अ) दोन्ही डोळ्यांचा | माहिती नाही | | २१ | २ | २५ | ५ | ३५ | १ | २३ | ५७ | — | — |
| (ब) एका डोळ्याचा | माहिती नाही | | ७ | ४ | ३५ | २ | २३ | २ | ८ | १९ | — | — |
| ४ बहिरेपणा | ४ | १ | ८ | १ | १७ | ६ | १२ | १ | ७ | ८ | ५६ | ९ |
| ५ मुकेपणा | ३ | — | ३ | — | ३ | ४ | ६ | — | १ | ५ | २१ | ४ |
| ६ पायांत किंवा हातांत पंगुपणा | २५ | ४ | ९ | ८ | ४१ | ४ | ३० | ६ | २१ | ४८ | १७४ | २२ |
| ७ महारोग | ११ | १ | ७ | — | ३७ | — | — | — | २ | ५ | ६२ | १ |
| ८ वेड | ५ | ३ | ६ | १ | ४ | — | ३९ | २ | १८ | १५ | ८७ | ६ |
| ९ इतर | — | १ | ३ | — | ५ | १ | ५ | २ | ३ | ३ | १९ | ४ |
| एकूण | २०९ | ४१ | १३० | १६ | २११ | २२ | ३१४ | ६५ | १४२ | २२५ | १२३१ | १४४ |

*दम्याची व क्षयाची ही संख्या क्र. ११.७ या तक्त्याशी जुळत नाही. पाहणीच्या वर्षात या आजाऱ्यांना इतर दुखणीं असलीं तर त्या दुखण्याची नोंद ते करीत व दमा हें पंगुत्वाच्या सदरांत घालीत.

+ या सदरांत + खुणेचे जे आंकडे दिले आहेत ते जुनाट खोकल्याचे आहेत. पण ते क्षयाचे असावेत अशी शंका अन्वेषिकेला आली.

**आंधळेपणा** :— एकूण नमूद केलेल्या पंगूंच्या संख्येमध्ये पूर्ण किंवा अंशतः आंधळेपणाचीं उदाहरणें बरींच दिसलीं. एकूण पंगूंच्या संख्येपैकी शेकडा ३१ आंधळेपणाचींच उदाहरणें आहेत. बोरी येथें आंधळेपणाचें प्रमाण सर्वांत जास्त होतें. तेथे एकूण पंगूंपैकी शेकडा ५५ एवढी आंधळ्यांची संख्या होती. परंतु एका डोळ्याचें आंधळेपण की, दोन्ही डोळ्यांचें, याचा या केंद्रांत उल्लेख केला गेला नव्हता. क्रमांक ११·१५ या तक्त्यामध्ये आंधळेपणाचीं सांगितलीं गेलेलीं कारणें दिलीं आहेत; परंतु अनेक उदाहरणांत आंधळेपणाचें कारण दिलेलें नाही. तरी या तक्त्यावरून हें दिसून येतें की, शेकडा ३७ आंधळ्यांच्या बाबतींत आंधळेपण हें देवीच्या आजारामुळे आलेलें होतें. डोळे येणें हेंहि एक आंधळेपणाचें महत्त्वाचें कारण सांगण्यांत आलें.

**दमा व क्षय** :— पाहणीच्या वर्षांतील आजारांमध्ये दम्याबद्दलची चर्चा येऊन गेलेली आहे. दमा हा आजार कायमचा असल्यामुळे कायम पंगुत्वाच्या सदरांत तो धरला जातो. एकूण पाहणींतील पंगुत्वापैकी $\frac{1}{2}$ उदाहरणें दम्याचीं होतीं. दमेकरी असणाऱ्या ३२८ प्रौढांपैकी शेकडा ४६ एवढे एकट्या मिठबावमधील होते. दमा व क्षय यांच्यामुळें आलेल्या पंगुत्वाचा समावेश पाहणीच्या वर्षाच्या काळांतील जुनाट आजारांमध्ये होऊं शकत होता आणि कायमच्या पंगुत्वाच्या यादींतहि त्यांचा समावेश होऊं शकत होता, हें लक्षांत घेतलें पाहिजे. माहिती गोळा करण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलींत मागील वर्षांतील आजार व कायमचें पंगुत्व यांची नोंद करण्यासाठी दोन वेगळे प्रश्न होते. प्रत्यक्ष माहिती नोंदतांना नेहमीच्या जुनाट रोगाखेरीज इतर कांही आजार पाहणीपूर्वीच्या एका वर्षांत झाला असेल, तर तो त्या वर्षांतल्या आजारांत नमूद केला जाई व दमा, क्षय यांच्यासारखे रोग हे कायमच्या पंगुत्वाच्या सदरांत नोंदले जात. यामुळे गेल्या वर्षांतील आजारांत दमा अथवा क्षय यांनी आजारी असलेल्यांची संख्या त्याचप्रमाणें कायमच्या पंगुत्वाच्या सदरांत नोंदल्या गेलेल्यांची संख्या या दोन्ही नोंदींत विसंगति उत्पन्न झाली. क्षयाबाबतच्या उदाहरणांत ही विसंगति थोडीशीच होती. परंतु दम्याबाबतच्या उदाहरणांत मात्र ती फार ठळक दिसून आली. क्रमांक ११·१४ या तक्त्यांत कायमच्या आजारांच्या सदरांत दम्याचीं ३२८ उदाहरणें नोंदलेलीं आहेत आणि क्रमांक ११·७ या तक्त्यांत मागील वर्षीच्या आजारांच्या सदरांत केवळ १६७ उदाहरणें दम्याचीं म्हणून नोंदलीं आहेत. क्षयाच्या आजाराबाबतहि असेंच घडलें आहे. क्रमांक ११·१४ या तक्त्यांत क्षयाचीं ५८ उदाहरणें नोंदलीं आहेत तर क्रमांक ११·७ या तक्त्यांत क्षयाचीं केवळ ४९ उदाहरणेंच दिलीं आहेत. क्रमांक ११·१४ या तक्त्यांत क्षयाच्या ५८ उदाहरणांशिवाय जुनाट खोकल्याचीं ४७ उदाहरणें नोंदलीं आहेत. हींहि क्षयाचींच असावीं, अशी आमच्या अन्वेषिकेला शंका होती.

**बहिरेपणा, मुकेपणा** :— एकूण पंगुत्वाच्या प्रकारांत बहिरेपणाचें प्रमाण बरेंच आढळलें. हें प्रमाण एकूण पंगुत्वप्रकारांच्या शेकडा ५ एवढें होतें. म्हातारपणांत कमी अधिक बहिरेपणा हा सर्वसामान्य असतो. म्हणून ६२ वर्षांवरील बहिऱ्यांचा समावेश कायम पंगुत्वामध्ये केला नाही. अशा बहिऱ्यांचीं एकूण १६ उदाहरणें होतीं. क्रमांक ११·१६ या तक्त्यामध्ये इतर बहिऱ्यांची वयाप्रमाणे विभागणी केलेली आहे. स्त्रीपुरुषांची संख्याहि वेगळी दाखवली आहे. पाहणींतल्या एकूण सहा केंद्रांत मुक्यांची संख्या फक्त २१ होती.

**वेड** :— मिठबावखेरीज इतर ५ केंद्रांत मिळून वेडाचीं ४८ उदाहरणें होतीं आणि एकट्या मिठबावमध्ये ३९ उदाहरणें होतीं. पुरुषांमध्ये वेडाचें प्रमाण अगदी उपेक्षणीय होतें आणि नोंदलेलीं वेडाचीं उदाहरणें बहुतेक स्त्रियांचीं होतीं.

तक्ता क्रमांक ११·१५

पाहणी केलेल्या केंद्रांत दृष्टि जाण्याचीं दिलेलीं कारणें

| दृष्टि जाण्याचीं कारणें | बोरी प्रौढ | बोरी अप्रौढ | धानोरें प्रौढ | धानोरें अप्रौढ | मिरजगांव प्रौढ | मिरजगांव अप्रौढ | मिठबाव प्रौढ | मिठबाव अप्रौढ | मुदलगी प्रौढ | नालवार प्रौढ | एकूण प्रौढ | एकूण अप्रौढ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| देवी | ४७ | ३ | ५ | १ | ५ | १ | ४ | — | २ | १४ | ७७ | ५ |
| डोळे येणें | २९ | १८ | २ | १ | ७ | ४ | १ | २ | ८ | ९ | ५६ | २५ |
| तीव्र डोकेदुखी | ५ | — | ६ | — | ९ | — | ३ | — | २ | — | २५ | — |
| अपघात | ९ | — | १ | — | ९ | — | ५ | — | ४ | १ | २९ | — |
| प्रसूति | ४ | — | — | — | — | — | — | — | — | — | ४ | — |
| वृद्धत्व | ७ | — | ४ | — | ८ | — | १३ | — | ८ | ७ | ४७ | — |
| इतर कारणें व कारण माहीत नाही | २५ | १० | १० | ४ | २२ | २ | ३२ | १ | ७ | ४५ | १४१ | १७ |
| एकूण | १२६ | ३१ | २८ | ६ | ६० | ७ | ५८ | ३ | ३१ | ७६ | ३७९ | ४७ |

तक्ता क्रमांक ११·१६

सहा केंद्रांतील प्रौढ बहिऱ्यांची वयाप्रमाणें विभागणी

| वय (वर्षांत) | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| —३२ | ५ | १३ |
| ३३—५२ | ५ | १७ |
| ५३—६२ | ६ | १० |
| एकूण | १६ | ४० |

**महारोग** :— मिरजगांवला पंगूंमध्ये महारोगाचें बरेंच प्रमाण आढळलें. या केंद्रांत एकूण ३७ महारोगी होते आणि उरलेल्या ५ केंद्रांत एकूण फक्त २५ महारोगी होते. खेड्यांवरील टिपणांमध्ये जीं कारणें दिलीं आहेत, तीं लक्षांत घेऊन मिरजगांवांतील महारोगासंबंधी एक वेगळी पाहणी आम्ही तज्ज्ञांकडून करवून घेतली. मिरजगांवच्या १५० कुटुंबांची ही पाहणी ३ तज्ज्ञ डॉक्टरांकडून करवली. या डॉक्टरांच्या गटांत एक महारोग-तज्ज्ञहि होते. महारोगाची जेथे शंका आली, त्या त्या कुटुंबांत लोकांना शंका येऊं न देतां वैद्यकीय तपासणी करण्यांत आली. महारोगाचा अंदाज घेण्यासाठी केलेल्या या विशेष वैद्यकीय तपासणींत मिरजगांवचीं सगळीं कुटुंबें समाविष्ट केलीं गेलीं नव्हतीं. या पाहणीसाठी निवडलेलीं हीं १५० कुटुंबें उगीचच निवडलीं नव्हतीं. हीं कुटुंबें मिरजगांव या मुख्य खेड्यांतील होतीं व गांवापासून दूर असणारीं कुटुंबें वगळलीं होतीं. परंतु जेथे महारोगी असल्याची माहिती होती, असें एकहि कुटुंब वगळलें गेलें नव्हतें. मिरजगांवांत असणाऱ्या ३७ महारोग्यांच्या संख्येवरून प्रत्येकीं १००० लोकसंख्येला ९ एवढें प्रमाण पडलें. हें प्रमाण कमी नसलें, तरी अपेक्षेपेक्षा बरेंच कमी होतें. तेव्हां महारोग्यांचें मिरजगांव असें जें नांव या खेड्याला मिळालें आहे तें खरोखर सार्थ नाही.

**पायाचें किंवा हाताचें पंगुत्व** :— या वर्गांत अपघातामुळे किंवा रोगामुळे हातांना आलेलें थोटेंपण किंवा पायांना आलेलें लंगडेपण समाविष्ट केलें आहे. क्रमांक ११·१४ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे सहा केंद्रांतील एकूण पंगूंपैकी शेकडा १४ पंगू या वर्गांत मोडत होते. नालवार येथे तेथील एकूण पंगूंपैकी शेकडा २१ पंगु या वर्गांत येत होते. यांतील बहुतेक उदाहरणें लंगड्यांचीं होतीं किंवा पायाच्या पक्षघाताचीं होतीं. याशिवाय येथे ५ हत्तीपायाचींहि उदाहरणें होतीं. हातापायाच्या पंगुत्वांत नालवारच्या खालोखाल मिरजगांवचा क्रम लागला तरी मिरजगांवांत या तऱ्हेच्या पंगुत्वाचीं उदाहरणें जवळ जवळ नालवारएवढींच होतीं परंतु तीं बहुतेक हातांमधील पंगुत्वाचींच होतीं. मिठबाव येथे एकूण पंगूंपैकी शेकडा १० पंगु या वर्गांतील होते. येथे आजारामुळे पायांना पंगुत्व आल्याचीं उदाहरणें लक्षांत येण्याइतकीं होतीं.

वरील चर्चेवरून पाहणी केलेल्या केंद्रांमध्यें रोगराईच्या प्रमाणांत कसा भेद आहे, याची कल्पना येऊं शकेल. प्रत्येक केन्द्रांत ज्याप्रमाणे हवापाण्याच्या नैसर्गिक परिस्थितींतील फरक होते, त्याचप्रमाणे आहाराच्या संवयींमध्येंहि फरक होते. या कारणांमुळेहि आजारांच्या प्रमाणांत फरक होणें शक्य आहे. वेगवेगळ्या केंद्रांतील आहाराच्या संवयींसंबंधीची चर्चा शेवटच्या प्रकरणांत केली आहे. परंतु आहार व रोगटपणा यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला नाही. शारीरिक

अस्वास्थ्य व रोग उत्पन्न करणाऱ्या इतर कारणांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता हेंहि एक महत्त्वाचें कारण आहे. परंतु या बाबतींत पाहणींतल्या वेगवेगळया केंद्रांत फारसा फरक आढळला नाही.

घराभोवतालच्या व खेडयाच्या परिसरांतील स्वच्छतेचें प्रमाण जवळजवळ सगळयाच केंद्रांत कमी आढळलें. सांडपाण्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणें, पायखान्याची सोय करणें अशा ज्या स्वच्छतेच्या आवश्यक गोष्टी असतात, त्या सगळीकडेच अतिशय अपुऱ्या व असमाधानकारक होत्या. नद्यांचें व विहिरींचेंहि पाणी स्वच्छ राखण्यासाठी कसलीच व्यवस्था नसल्यामुळे तें नेहमी दूषित होत होतें. निरोगी जीवनासाठी या ज्या मूलभूत गोष्टी असतात, त्यांचा अभाव हा पाहणींतल्या सगळया केंद्रांतील लोकांच्या रोगटपणाला बऱ्याच प्रमाणांत कारणीभूत झाला होता. घरांची स्थितिहि स्वास्थ्याला हानिकारक अशीच होती. बऱ्याचशा घरांत हवा व उजेड यावा यासाठी एखादी खिडकी ठेवल्याचें उदाहरण क्वचित्च आढळलें. पावसाळयांत तर भोवतालचें पाणी वाहून जाण्यासाठी कांही सोय केली नसल्यामुळे घरांच्या मातीच्या भिंती व जमिनी पुष्कळदां ओल्या असत.

रोगप्रतिबंधासाठी जी दक्षता घ्यावी लागते तिचा अभाव आणि वैद्यकीय सोयींचा अभाव यांचाहि शरीरस्वास्थ्यावर साहजिकच पुष्कळ परिणाम होतो. बोरी येथे एकहि वैद्य किंवा डॉक्टर नव्हता. परंतु बोरीच्या लोकल बोर्डानें एक पेटंट औषधांची पेटी लोकांच्या उपयोगासाठी ठेवलेली होती. धानोरें येथे एक मिशन हॉस्पिटल होतें व तेथे अगदीच थोडी फी घेऊन औषधें दिलीं जात. मिरजगांव येथे लोकल बोर्डानें चालविलेलें हॉस्पिटल होतें व तेथेहि थोडी फी घेऊन सामान्य रोगांवरील औषधें दिलीं जात होतीं. परंतु जेथे इंजेक्शनें सुचविलीं जात किंवा इतर मोफत नसलेलीं औषधें सांगितलीं जात, तेथे तीं घेण्यासाठी खेडयांतील लोकांजवळ अनेकदां पैसे नसत. मिठबाव येथे ३ डॉक्टर होते. परंतु त्यांचा वैद्यकीय दर्जा उच्च नव्हता. नालवार येथे कसलीच वैद्यकीय मदत मिळण्याची सोय नव्हती. मुदलगी येथे एक डॉक्टर ठराविक मुदतीनें येऊन जात असे. यांच्याशिवाय प्रत्येक खेडयांत मंत्रांनी रोग बरे करणारे दोनतीन मांत्रिक किंवा पंचाक्षरी असत. पाहणींतील खेडयांतील लोक वर वर्णिलेल्या या वेगवेगळया उपायांचें आपलीं दुखणीं बरीं करण्यासाठी साह्य घेत होते.

या खेडयांत प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांची वैद्यकीय पात्रता सामान्यतः बरीच कमी होती. दुसरें असें की, आपल्या आजारावर इलाज करण्यासाठी लोक जेव्हां या डॉक्टरांकडे जात, तेव्हां मोफत मिळणारे इलाजच त्यांना हवे असत आणि आवश्यक त्या इलाजासाठी त्यांच्याजवळ पुरेसे पैसे नसत. अशा परिस्थितींत खासगी व्यवसाय करणारे डॉक्टर लोकांच्या खिशाला परवडणारे असेच इलाज, त्या इलाजांच्या उपयुक्ततेबद्दल स्वतःला शंका वाटत असतांहि, सुचवीत असत. उलटपक्षीं आपल्या आजारासाठी अवश्य असणाऱ्या उपायांसाठी खर्च करावा लागणाऱ्या पैशाला घाबरून, बाकीचे सर्व स्वस्त उपाय करूनहि रोग बरा झाला नाही की, मगच खेडेगांवचा माणूस डॉक्टरांकडे जाई.

आजारांवरील इलाज करतांना पैसा हा महत्त्वाचा निर्णायक घटक असला, तरीहि क्रमांक ११·१७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे घरगुती उपायांच्या खालोखाल खेडूत पुष्कळदां डॉक्टरकडे धांव घेत. फक्त धानोरें या केंद्रांत तेथील मिशन हॉस्पिटलमध्ये जवळ जवळ मोफत वैद्यकीय मदत मिळत असूनहि तेथे बहुसंख्येनें असणाऱ्या भिल्ल जमातींतील लोक ही वैद्यकीय मदत फारशी घेत नव्हते. या जमातींत प्रचलित असणाऱ्या औषधी मुळया व वनस्पतींचाच उपयोग हे भिल्ल करीत.

तक्ता क्रमांक ११·१७

**दुखण्यांवर केलेल्या उपायांप्रमाणे प्रौढ स्त्री-पुरुषांचें शेकडेवारींत विभाजन**

| केलेला उपाय | बोरी | | धानोरें | | मिरजगांव | | मिठबाव | | मुबलगी | | मालवार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| डॉक्टर | २८.१ | १२.३ | १७.५ | १६.४ | ७३.६ | ५३.६ | ५५.४ | ५१.६ | ६८.६ | २३.७ | ५२.१ | १२.१ | ५०.१ | २५.४ |
| पेटंट औषधें | २८.१ | १९.२ | ५.८ | १.९ | ०.४ | ७.७ | ३.७ | ५.७ | — | ७.२ | ०.५ | २.९ | ४.४ | ५.० |
| मांत्रिक | २.४ | २६.० | १६.० | २३.५ | ०.९ | २.३ | ०.५ | १.२ | २.३ | ३.३ | १.० | ४.४ | ४.२ | ५.४ |
| घरगुती उपाय किंवा इलाज नाहीं | ४१.४ | ४२.५ | ६०.७ | ५८.२ | २५.१ | ३६.४ | ४०.४ | ४१.५ | २९.१ | ६५.८ | ४६.४ | ८०.६ | ४१.३ | ६४.२ |
| एकूण १०० = | ८२ | ७३ | २०६ | २१३ | २३५ | २२० | २१३ | ५०६ | ८६ | ५९९ | १९२ | ११९० | १०१० | २८०१ |
| उपायांची माहिती दिली नाही | १ | १ | — | ४ | — | — | १ | ३९ | १ | ४ | — | २० | ३ | ६८ |

तक्ता क्रमांक ११·१८

दुखण्यांच्या उपायांवरील खर्चाप्रमाणे आजारी प्रौढ स्त्रीपुरुषांची शेकडेवारीत विभागणी

| उपायांवरील खर्च | बोरी |  | बालोरें |  | मिरजगांव |  | मिठबाव |  | मुबलगी |  | नालवार |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| उपाय केला नाही | १३.३ | २१.६ | १६.० | ३४.१ | ९.१ | १७.३ | १.४ | १०.५ | १६.१ | २९.२ | २०.९ | ६५.५ |
| मोफत उपाय | ४.८ | — | १.५ | २.८ | ११.७ | १८.२ | २.३ | ०.९ | ३.४ | १.८ | २.६ | २.० |
| १० रु. पेक्षा कमी | २२.९ | १८.९ | १४.१ | ८.३ | १८.६ | १९.५ | ७.९ | ११.४ | ९.२ | १३.६ | १५.६ | ५.६ |
| रु. १० ते रु. २० | ६.० | १२.२ | ७.३ | १३.८ | १८.६ | ९.१ | १६.४ | १६.९ | ८.१ | ४.६ | १३.० | ३.८ |
| २० रु. वर | ३०.१ | १६.२ | १३.६ | १३.८ | २८.२ | २०.० | ३३.७ | २९.७ | ५८.६ | १०.४ | ४६.९ | ६.१ |
| घरगुती उपचार किंवा खर्च दिला नाही | २२.९ | ३१.१ | ४७.५ | २७.२ | १३.८ | १५.९ | ३८.३ | ३०.६ | ४.६ | ४०.४ | १.० | १७.० |
| एकूण १०० = | ८३ | ७४ | २०६ | २१७ | २३१ | २२० | २१४ | ५४५ | ८७ | ६०३ | १९२ | १२१० |

## तक्ता क्रमांक ११·१९

### आजार निवारण्यासाठी झालेल्या खर्चाप्रमाणे आजारी मुलगे व मुली यांची शेकडेवारीत विभागणी

| उपचारासाठी झालेला खर्च | बोरी मुलगे | बोरी मुली | वालोरें मुलगे | वालोरें मुली | मिरजगाव मुलगे | मिरजगाव मुली | मिठबाव मुलगे | मिठबाव मुली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपचारच नाही | ३०.८ | ५८.१ | १८.७ | ६२.१ | १३.० | २७.८ | ७.६ | १६.० |
| मोफत उपचार | ३.८ | २.३ | ३.७ | ३.१ | १९.५ | २७.२ | ४.२ | २.३ |
| घरगुती उपचार | १५.४ | १६.३ | ५४.२ | १९.२ | ८.९ | ९.४ | २९.२ | २८.० |
| रु. १० ते रु. २० | ३.८ | — | ३.७ | ३.५ | १२.२ | ६.७ | २२.९ | १२.८ |
| २० रु. पेक्षा जास्त | ७.७ | ७.० | ४.६ | २.७ | १४.६ | ५.६ | १८.७ | १६.० |
| खर्च दिला नाही १० रु. पेक्षा कमी | ३८.५ | १६.३ | १५.१ | ९.४ | ३१.८ | २३.३ | १७.४ | २४.९ |
| एकूण १०० = | २६ | ४२ | २१९ | २५५ | १२४ | १८० | १४४ | २५३ |

परंतु इतर बहुतेक सर्व केंद्रांतील लोक खेड्यांत डॉक्टर असला, तर त्याचा फायदा करून घेत. क्रमांक ११·१७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे सामान्यपणे, स्त्रियांपेक्षा पुरुषच जास्त प्रमाणांत डॉक्टरकडे जात आणि पुरुषांपेक्षा स्त्रिया या अधिक प्रमाणांत मांत्रिकांकडे रोग बरा होण्यासाठी जात. परंतु बहुतेक केंद्रांत मांत्रिकांकडे जाणारांचें प्रमाण अतिशय कमी होतें, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. खेड्यांत स्त्रीडॉक्टर असत्या, तर स्त्रिया त्यांच्याकडे गेल्या असत्या हें शक्य आहे. परंतु स्त्रीडॉक्टर खेड्यांत नव्हत्या.

क्रमांक ११·१८ या तक्त्यामध्ये पाहणींतील खेड्यांत आजारांवरील उपचारांसाठी झालेल्या खर्चाचें विवरण दिलें आहे. यावरून दिसून येईल की, लोकांना दवाखान्यांतून मोफत मिळणाऱ्या वैद्यकीय उपचारांचें प्रमाण अतिशयच थोडें होतें. मिरजगांवखेरीज इतर खेड्यांत हें प्रमाण शेकडा ३ पेक्षाहि कमी होतें. मिरजगांव येथे मात्र शेकडा १२ पुरुषांना व शेकडा १८ स्त्रियांना दवाखान्यांतून मोफत उपचार मिळाले. धानोऱ्याशिवाय इतर सर्व केंद्रांत पुरुषांच्या उपचारांसाठी केलेला खर्च हा स्त्रियांच्या उपचारांसाठी केलेल्या खर्चापेक्षा नेहमीच जास्त झालेला दिसून येतो. एका वर्षांत उपचारांसाठी २० रुपयांपेक्षा अधिक खर्च करणाऱ्या पुरुषांचें प्रमाण शेकडा १४ ते ५९ एवढें होतें व स्त्रियांचें प्रमाण शेकडा ६ ते २९ एवढें होतें. क्रमांक ११·१९ या तक्त्यांत मुलांच्या आजारांवर केलेल्या खर्चाची माहिती दाखविण्यांत आली आहे. यावरून हें दिसून येईल की, रु. २० किंवा त्यापेक्षा जास्त खर्च आजारी मुलावर केल्याचीं उदाहरणें पुरुषांइतकीं जास्त आढळत नाहीत. तरीहि सर्व केंद्रांमध्ये मुलग्यांवर केलेला खर्च हा मुलींवरच्या खर्चापेक्षा अधिक होता.

आमच्या अन्वेषिकांना खेड्यांतील लोकांनी जी माहिती पुरवली, तिचें पृथक्करण करतां, वेगवेगळ्या खेड्यांतील आजारांचें स्वरूप व त्यांच्यावर केले जाणारे उपचार वरील प्रकारचे असल्याचें आम्हांला दिसून आलें. खेड्यांतील अस्वच्छ व रोगकारक परिस्थिति व शरीरपोषक अशा अन्नाचें अतिशय कमी प्रमाण यांच्यामुळे कोणत्याहि आजारापासून स्वतःचा बचाव करण्याची शक्ति किंवा प्रतिकारक्षमता खेड्यांतील लोकांमध्ये उरली नव्हती. पुढील प्रकरणांत याबद्दलचें विवेचन येईल.

# १२

# आहारविषयक संवयी

आम्ही पाहणी केलेल्या भागांत तेथील लोकांच्या पोषणाची व आहाराची पातळी कशी आहे, याचें निरीक्षण आम्हांला करावयाचें होतें. वेगवेगळ्या विभागांतील लोकांच्या आहाराच्या संवयी-मध्ये लक्षांत घेण्यासारखे कांही विशिष्ट फरक आहेत किंवा नाही हें अजमावावयाचें होतें. म्हणून पाहणींतल्या प्रत्येक केंद्रांत जें मध्यवर्ती खेडें होतें, त्यांतील लोकांच्या आहाराची आम्ही पाहणी केली. परंतु त्या त्या खेड्यांतील खाणेंपिणें व त्या खेड्यांतील लोकांचे आजार यांच्यांतील संबंध प्रस्थापित करण्याचा या पाहणीचा हेतु नव्हता. फक्त पाहणी केलेल्या भागांतील लोकांच्या पोषणाची पातळी अजमावावयाची होती. आहाराच्या पाहणीसाठी उपयोगांत आणलेली प्रश्नावलि पहिल्या प्रकरणाच्या शेवटीं दिलेली आहे.

या पाहणीसाठी प्रत्येक केंद्रांतील मध्यवर्ती खेड्यांतील शेकडा १० कुटुंबांची निवड नमुना म्हणून केली होती. अन्वेषिका सामान्यत: तीन प्रहरीं या निवडक घरीं जात व कुटुंबाला पुढील २४ तासांसाठी लागणारें पण थोडें अधिक धान्य व पीठ मोजून बाजूला काढून ठेवीत. लोकांच्या घरीं जाण्यासाठी तिसऱ्या प्रहराची निवड केली होती, कारण यावेळीं स्त्रियांना फुरसदीचा वेळ असतो. दुसऱ्या दिवशीं पुन्हा अन्वेषिका त्या घरीं जाई व मोजून ठेवलेल्या धान्यापैकी किती उरलें आहे किंवा अधिक लागलें असल्यास किती अधिक लागलें आहे, हें पाहून घेई. डाळी, भाजीपाला व जेवणांतील इतर पदार्थांच्या बाबतींत, दररोज प्रत्येक वस्तु किती लागते हें घरांतील बाईकडून माहीत करून घेऊन मग अन्वेषिका त्या पदार्थांबद्दलचा कुटुंबाच्या गरजेचा अंदाज करी. जेथे मोजून ठेवण्यासाठी धान्य किंवा पीठ नसे, तेथे दररोज कुटुंबाला अवश्य असणाऱ्या धान्याचा अंदाज त्या कुटुंबाची दररोजची मिळकत व त्या मिळकतींतून अन्नधान्यासाठी दररोज केलेला खर्च, यांच्यावरून करण्यांत येई. अशा प्रकारच्या कुटुंबांचें प्रमाण अर्थातच फारसें आढळलें नाही.

एका विशिष्ट दिवसाच्या जेवणासाठी लागणाऱ्या धान्याच्या अंदाजाच्या जोडीला पुढील आणखी माहिती गोळा केली. दूध, फळें, तेल, साखर, गूळ, इतर स्निग्ध पदार्थ, मासे व मांस इत्यादि प्रकारच्या पोषक खाद्यपदार्थांपैकी प्रत्येक पदार्थाची किंमत किती व प्रत्येक पदार्थ किती वेळां खाण्यांत येतो, इत्यादि सर्व गोष्टींसंबंधीची माहिती मिळविण्यांत आली. पिण्यासाठी दूध किती प्रमाणांत खर्च केलें जातें व इतर गोष्टींसाठी किती खर्च केलें जातें, याचीहि माहिती मिळविली. दररोजच्या सकाळच्या व संध्याकाळच्या जेवणांतील पदार्थांची माहिती ओळीने एकूण सात दिवसां-साठी अन्वेषिकेने गोळा केली. कारण त्यावरून लोकांच्या दररोजच्या जेवणांत कोणता फरक होई याची कल्पना येऊं शकत होती. ऋतूप्रमाणे जेवणाच्या पदार्थांत कोणता बदल केला जात असे, याचीहि माहिती अन्वेषिकांनी मिळविली. त्याचप्रमाणे उपासमारीसंबंधीचीहि वेगळीं टिपणें करण्यांत आलीं.

या पाहणीच्या वेळीं ज्यांना ज्यांना भेटी दिल्या, त्यांच्याकडून अन्वेषिकांना बराच त्रास सहन करावा लागला. या पाहणीच्या द्वारां गोळा करावयाच्या माहितीचें महत्त्व न समजल्यामुळे, आपल्या

खासगी गोष्टींवर हें अतिक्रमण आहे असें गृहिणींना वाटे. त्यामुळे अन्वेषिकेला त्यांचें मन वळविण्यास फार खटपट करावी लागे व मगच गृहिणी आपल्या घरचें दररोजचें धान्य मोजून ठेवूं देण्यास तयार होत. परंतु एवढें मन वळवूनहि तयार न होणाऱ्या गृहिणींकडून माहिती न घेण्याबद्दल अन्वेषिकांना सूचना दिल्या होत्या. कारण अशा गृहिणींकडून माहिती मिळविल्यास ती अविश्वसनीय ठरण्याचा संभव होता. निरनिराळ्या ज्या उपपाहण्या केल्या त्यांमध्ये आहाराच्या पाहणीचा क्रम शेवटचा असल्यामुळे ती सुरळीत पार पडेल अशी अपेक्षा होती. परंतु ही पाहणी शेवटीं केल्यामुळेच कांही प्रमाणांत ती त्रासदायक ठरली. कारण आहाराची पाहणी जेव्हां सुरू झाली, तेव्हां अगोदरच्या वेगवेगळ्या प्रकारच्या प्रश्नांनी स्त्रिया बेजार झालेल्या असल्यामुळे आणखी कांही माहिती देण्यास तयार त्या नव्हत्या.* परंतु अन्वेषिकेकडून वैद्यकीय दृष्टीने व इतर प्रकारांनी कांही कुटुंबांना बरीच मदत मिळाली असल्यामुळे अशा कुटुंबांत अन्वेषिकेला मज्जाव नव्हता. परिस्थितींतील या सर्व घटकांमुळे आहाराच्या प्रश्नावल्यांची संख्या अपेक्षेइतकी पूर्ण झाली नाही. क्रमांक १२·१ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे आहाराच्या पाहणीसाठी प्रत्येक केंद्रांतून निवडलेल्या कुटुंबांची संख्या व प्रत्यक्ष पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या, यांच्यांतील फरकावरून वरील गोष्ट सहज लक्षांत येईल. मुदलगी केंद्रांतील अन्वेषिकेच्या आजारामुळे, तेथील पाहणीचें काम स्थगित करावें लागलें. त्यामुळे तेथील आहाराच्या प्रश्नावल्यांची संख्या अगदी थोडी आहे. क्रमांक १२·१ या तक्त्यावरून हें दिसून येईल की, मुदलगीचें केंद्र वगळलें, तर एकूण निवडलेल्या कुटुंबांपैकी शेकडा २३ कुटुंबांतून माहिती मिळाली नाही. हीं कुटुंबें अशीं होतीं की, तेथे मन वळविण्याचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीचा कांहीच उपयोग झाला नसता. एकूण पाहणींत ३७३ कुटुंबांची म्हणजे एकूण निवडलेल्या कुटुंबांपैकी शेकडा ६८ कुटुंबांची आहाराची पाहणी केली. वगळाव्या लागलेल्या शेकडा ३२ कुटुंबांचा, आम्हांला फारशी माहिती नसलेला असा एखादा वेगळाच वर्ग राहून गेला असावा, व त्यामुळे पाहणी केलेल्या कुटुंबाविषयीं आमचा वेगळाच ग्रह बनला असावा, असें होणें शक्य आहे. विशेषतः मुदलगी येथे केवळ १६ कुटुंबांची पाहणी केली गेली असल्यामुळे या कुटुंबांच्या आहाराची पातळी अगदी वेगळी असलेली आढळली. याचें एक कारण असेंहि असेल की, पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे येथील लोकांची मिळकत बरी असल्यामुळे येथे एकंदर कुटुंबांच्या आहाराचें मानहि पुष्कळ बरें असावें. दुसरें एक कारण असें असावें की, माहिती देण्यास विरोध करणार नाहीत अशाच कुटुंबांची पाहणी येथील अन्वेषिकेने प्रथम केली. या अर्थाने विशिष्ट निवड

**तक्ता क्रमांक १२·१**

**आहाराच्या पाहणीसाठी निवडलेल्या कुटुंबाची संख्या व पाहणी करूं दिलेल्या कुटुंबांची संख्या**

| केंद्राचें नांव | निवडलेल्या कुटुंबांची संख्या | पाहणी करूं दिलेल्या कुटुंबांची संख्या |
|---|---|---|
| बोरी | ७१ | ६३ |
| घानोरें | ६९ | ५१ |
| मिरजगांव | ८० | ४७ |
| मिठबाव | ११३ | ९५ |
| मुदलगी | ८४ | १६ |
| नालवार | १३२ | १०१ |
| एकूण | ५४९ | ३७३ |

* एका घरीं तर कुटुंबप्रमुख म्हणाला, "आतां एक दिवस आमच्या घरांतल्या उंदरांची मोजदाद करावयास तुम्ही या. खरोखर आमच्या दृष्टीने अशी पाहणी उपयोगी ठरेल."

झाली असावी. हीं कुटुंबें एका विशिष्ट वर्गांत मोडणारीं होतीं. एवढी पाहणी झाल्यानंतर अन्वेषिका आजारी पडल्याने काम सोडून गेली. त्यामुळे ह्या गांवीं एका विशिष्ट वर्गांतील कुटुंबेंच अखेरच्या पाहणींत समाविष्ट झालेली असावी.

पाहणी करूं देणाऱ्या कांही कुटुंबांतून कांही कांही आहारांतील पदार्थांचा जो अंदाज दिला होता, तो विश्वसनीय वाटला नाही. म्हणून माहितीच्या अचूकपणाबद्दल जेथे शंका आली तेथे ती माहिती काढून टाकली. कधी कधी तर आहारांतील पदार्थांची सर्वच यादी या कारणासाठी रद्द करणें भाग पडलें. दुसरें असें की, पालेभाज्या किती खाण्यांत आल्या, त्याचा अंदाज वजनांत न देतां किंमतींत देण्यांत येई. मासळीच्या बाबतींतहि खाण्यांत आलेल्या मासळीचें वजन किती, याची माहिती मिळत नसे. मासळी विकत घेतलेली असली, तर मात्र तिची किंमत सांगितली जाई. पण बऱ्याचशा कुटुंबांत आपल्या खाण्यापुरती मासळी स्वतःच धरून आणलेली आढळली. त्यामुळे तिचें वजन व किंमत या दोहोंचीहि माहिती मिळूं शकली नाही. ही वस्तुस्थिति मुख्यतः मिठबाव येथे आढळली. कारण तेथील बहुतेक कुटुंबांत मासळी खाल्ली जात होती.

अशा अडचणी असूनहि सहा केंद्रांतील आहाराची पाहणी करतांना आम्ही जी माहिती मिळविली, तिच्यावरून त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या आहाराचे घटक कोणते होते, या गोष्टीवर प्रकाश पडल्यावाचून राहिला नाही. सहापैकी प्रत्येक केंद्रांत आहारांतील कांही महत्त्वाचे पदार्थ सरासरीने किती प्रमाणांत खाण्यांत येतात, याचें वर्णन पुढे देण्यांत येत आहे.

क्रमांक १२·२ या तक्त्यांत दैनिक आहारांतील महत्त्वाचे पदार्थ प्रत्येक प्रौढामागे किती प्रमाणांत खाण्यांत येतात, हें औंसांत दिलें आहे. आपल्या आहाराचें सामान्यतः आढळून येणारें स्वरूप म्हणजे धान्यांचा जास्त प्रमाणांत वापर व पौष्टिक पदार्थांचा जवळ जवळ अभाव—हें या तक्त्यावरून स्पष्ट दिसून येईल. यापुढे खाण्यांतील प्रत्येक पदार्थाचा स्वतंत्रपणे विचार केला आहे.

**तक्ता क्रमांक १२·२**

**दर प्रौढामागे वेगवेगळे खाद्यपदार्थ वापरण्याचें औंसांमध्ये प्रमाण**

| खाण्यांत आलेले पदार्थ | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| तांदुळ | १.१ | १.४ | ०.५ | १३.६ | ४.९ | १.३ |
| गहूं | २.० | १.२ | ०.९ | — | १.९ | ०.३ |
| ज्वारी, बाजरी किंवा मका | १५.२ | २१.४ | २१.९ | ८.४ | २०.९ | २१.२ |
| एकूण धान्यें | १८.३ | २५.० | २५.१ | २२.६ | २७.७ | २२.८ |
| डाळी | २.५ | २.३ | १.३ | ०.६ | १.९ | १.९ |
| पालेभाज्या व इतर भाज्या आणि मांसाहारांतील पदार्थ | १.४ | १.४ | ०.९ | ०.४ | ४.३ | ०.६ |
| मासे | — | — | — | ३.० | — | — |
| प्रत्येक प्रौढामागे एकूण वापर | २२.२ | २८.७ | २७.३ | २६.६ | ३३.९ | २५.३ |

**धान्यें** :—क्रमांक १२·२ या तक्त्यांत प्रत्येक प्रौढामागे सरासरीने खाण्यांत येणारें धान्य दाखविलें आहे व याची तांदुळ, गहूं व ज्वारी-बाजरी या धान्यांमध्ये विभागणी दाखविली आहे. साही केंद्रांत धान्याच्या वापराची एकूण सरासरी ही योग्य समजल्या जाणाऱ्या १४ औंसांपेक्षा—हें

प्रमाण न्यूट्रिशन अॅडव्हायजरी कमिटीने १९४४ मध्ये ठरविलें होतें—बरीच जास्त होती. या सरासरीचें प्रमाण बोरी येथे २२ औंस व मुदलगी येथे २८ औंस या दोन आंकड्यांमध्ये होतें. मुदलगी, धानोरें व मिरजगांव येथे हें प्रमाण इतर ३ केंद्रांपेक्षा जास्त होतें.

धान्यांमध्ये ज्वारी व बाजरी यांचेंच मुख्य प्रमाण होतें. तांदुळ व गहूं यांचा वापर मिठबाव व मुदलगी सोडल्यास इतर केंद्रांत फारच कमी प्रमाणांत होत असलेला आढळला. बोरीखेरीज इतर केंद्रांत गहूं खाणारीं कुटुंबें क्वचितच होतीं. बोरी येथे मात्र निवडलेल्या ६३ कुटुंबांपैकी १५ कुटुंबांनी गव्हाचा दररोज वापर होत असल्याचें सांगितलें. मिठबावला तांदुळ व मुदलगी येथे मका हें आहारांतील मुख्य धान्य होतें.

क्रमांक १२·३ या तक्त्यांत, पाहणी केलेल्या केंद्रांतील, प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत येणाऱ्या धान्यांच्या औंसामधील प्रमाणाप्रमाणे कुटुंबांची विभागणी केलेली आहे. खाण्यांत येणाऱ्या धान्याचें १० औंसांखालील प्रमाण हें फार कमी व ३६ औंसांवरील प्रमाण हें फार जास्त असल्यामुळे विश्वसनीय नसावें, असें गृहीत धरून उरलेल्या कुटुंबांतील प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत येणाऱ्या धान्याचें सरासरी प्रमाण, या तक्त्यांतील शेवटच्या ओळींत दाखविलें आहे.

**डाळी** :—डाळींत तूर, वाटाणा, हरभरा इत्यादि डाळी समाविष्ट आहेत. क्रमांक १२·२ या तक्त्यावरून डाळींच्या वापराचें प्रमाण एकाहि केंद्रांत समाधानकारक असलेलें आढळलें नाही. आवश्यक म्हणून सुचविल्या गेलेल्या ३ औंसांपेक्षा तें बरेंच कमी होतें. बोरी व धानोरें येथे मात्र हें प्रमाण २ औंसांपेक्षा थोडें जास्त आढळलें. उरलेल्या केंद्रांत तें २ औंसांपेक्षाहि कमी दिसून आलें. मिठबाव येथे तर तें विशेषच कमी आढळलें. मिठबावला ९५ कुटुंबांपैकी ५३ कुटुंबांत डाळी मुळीच खाण्यांत येत नव्हत्या. परंतु मिठबाव हा मासळी खाणारा विभाग असल्यामुळे भाज्यांची व डाळींची जागा तेथे मासळीने घेतली होती.

**भाज्या व मांसाहार** :—क्रमांक १२·२ या तक्त्यांत या वर्गांत पालेभाज्या, फळभाज्या व मासळीशिवाय मांसाहारांतील इतर पदार्थांचा समावेश होता. हे सर्व खाद्यपदार्थ एका वर्गात घालण्याचें कारण असें की, पाहणींतल्या बहुतेक कुटुंबांत एका प्रकारच्या पदार्थांऐवजी दुसऱ्या प्रकारचे पदार्थ खाण्यांत येत आणि या वर्गांतील दोन्ही प्रकारचे पदार्थ क्वचितच आहारांत एकत्र येत. उदाहरणार्थ, पाहणीच्या दिवशीं शेकडा ४ कुटुंबांच्याच खाण्यांत भाज्या व मांसाहार या दोहोंचा समावेश झालेला होता. क्रमांक १२·४ या तक्त्यावरून हें दिसून येईल की, पाहणींतील एकूण कुटुंबांत मांसाहारी म्हणून सांगितल्या गेलेल्या कुटुंबांचें प्रमाण बोरी व मुदलगी वगळल्यास सर्व केंद्रांत बरेंच मोठें होतें. परंतु क्रमांक १२·५ या तक्त्यावरून हें दिसेल की, मांसाहारी म्हणून सांगितल्या गेलेल्या परंतु भाज्या न खाणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण शेकडा ११ एवढें होतें. या तक्त्यावरून हेंहि दिसेल की, भाज्या व मांस हे दोन्हीहि न खाणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण शेकडा ४८ होतें; म्हणजे एकूण पाहणी केलेल्या कुटुंबांपैकी निम्म्या कुटुंबांच्या खाण्यांत फक्त धान्य व अगदी थोड्या डाळी एवढेंच येत होतें. एकूण शेकडा ३५ कुटुंबांत फळभाज्या किंवा पालेभाज्या खाण्यांत येत असल्याचें सांगण्यांत आलें. भाज्या खाणाऱ्या या शेकडा ३५ कुटुंबांत पालेभाज्या खाणाऱ्यांचें व फळभाज्या खाणाऱ्यांचें प्रमाण २ : ३ एवढें होतें.

पांचहि केंद्रांत भाज्या खाणाऱ्यांचें प्रमाण अतिशयच कमी होतें. मिठबाव, मिरजगांव व नालवार येथे हें १ औंसापेक्षासुद्धां कमी होतें. आणि मुदलगीखेरीज उरलेल्या केंद्रांत हें प्रमाण १ औंसापेक्षा थोडें जास्त होतें. मुदलगी येथे मात्र तें ४ औंस एवढें होतें. या खाद्यप्रकाराचा एकूण वापर आवश्यक म्हणून सुचविण्यांत आलेल्या १० औंसांच्या मानाने फारच कमी होता.

## तक्ता क्रमांक १२·३

### प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत आलेल्या एकूण धान्याप्रमाणे पाहणींतील कुटुंबांची विभागणी

| खाण्यांत आलेलें धान्य औंसांत | कुटुंबांची संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार | एकूण |
| १— ३ | — | — | — | — | — | — | — |
| ४— ६ | २ | — | — | ३ | — | — | ५ |
| ७— ९ | ७ | — | १ | ४ | — | १ | १३ |
| १०—१२ | ७ | १ | १ | १२ | — | २ | २३ |
| १३—१५ | ४ | २ | ३ | ४ | — | ७ | २० |
| १६—१८ | १३ | ८ | ३ | ९ | १ | १३ | ४७ |
| १९—२१ | ८ | ८ | ७ | ९ | २ | २२ | ५६ |
| २२—२४ | ७ | ६ | १० | ९ | २ | ७ | ४१ |
| २५—२७ | ६ | ४ | ८ | ९ | ४ | १५ | ४६ |
| २८—३० | ४ | ७ | ४ | ७ | — | १८ | ४० |
| ३१—३३ | १ | ४ | — | २ | १ | ४ | १२ |
| ३४—३६ | १ | ५ | २ | ८ | — | ६ | २२ |
| ३७—३९ | — | २ | २ | १ | १ | १ | ७ |
| ४०—४२ | — | १ | १ | ३ | १ | १ | ७ |
| ४३—४५ | — | — | २ | १ | — | २ | ५ |
| ४६—४८ | १ | — | १ | २ | — | — | ४ |
| ४९—५१ | — | — | — | — | — | — | — |
| ५२—५४ | — | — | — | १ | — | — | १ |
| ५५ व वरील | — | — | — | — | ३ | — | ३ |
| माहिती मिळाली नाही | २ | ३ | २ | ११ | १ | २ | २१ |
| एकूण | ६३ | ५१ | ४७ | ९५ | १६ | १०१ | ३७३ |
| दोन्ही टोकाचीं उदाहरणें वगळून धान्य खाण्याची सरासरी | १९.९ | २४.१ | २२.८ | २१.९ | २३.९ | २३.३ | २२.५ |

## तक्ता क्रमांक १२·४

### पाहणी केलेल्या केंद्रांतील मांसाहारी म्हणविणाऱ्या कुटुंबांची शेकडेवारी

| | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | ६३ | ५१ | ४७ | ९५ | १६ | १०१ | ३७३ |
| मांसाहारी कुटुंबांची शेकडेवारी | ४९.२ | ९६.१ | ६६.० | ९५.८ | १२.५ | ७२.० | ७३.० |

पाहणी केलेल्या केंद्रांत मांसाहार क्वचित्च केला जाई. मांसाहार महाग असल्यामुळे खेडुतांना तो परवडत नसे. क्वचित् जर नदीमधील स्वस्त मासळी मिळाली तरच ती खाण्यांत येई. क्रमांक १२·५ या तक्त्यांत मिठबावबद्दलची माहिती दिली नाही. कारण तेथे मासळी किती प्रमाणांत खाण्यांत येत होती, याची माहिती मिळाली नाही. तेथील एकूण शेकडा ७० कुटुंबांनी मासळी खाण्यांत येते म्हणून सांगितलें. परंतु त्यांच्या खाण्यांत येणारी मासळी ही खत करण्याच्याच योग्यतेची होती. चांगल्या प्रतीची मासळी विकून टाकण्यांत येई. मासळी खाण्याचें प्रमाण अंदाजें प्रत्येक मांसाहारी कुटुंबामागे अर्धा शेर होते; म्हणजे मांसाहार करणाऱ्या व न करणाऱ्या कुटुंबांत प्रत्येक प्रौढामागे ३ औंस एवढें हें प्रमाण पडलें.

**तक्ता क्रमांक १२·५**

**मिठबावखेरीज* पाहणी केलेल्या इतर केंद्रांतील भाज्या खाणारीं व मांसाहार करणारीं कुटुंबें**

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | पाले-भाज्या खाणारीं कुटुंबें | फळ-भाज्या खाणारीं कुटुंबें | फळ-पालेभाज्या खाणारीं कुटुंबें | मांसाहार करणारीं कुटुंबें | भाज्या व मांस न खाणारीं कुटुंबें | भाज्या व मांस खाणारीं कुटुंबें |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरी | ६३ | ४ | १६ | १ | ५ | ३६ | १ |
| धानोरें | ५१ | ३ | १० | — | १३ | १८ | ७ |
| मिरजगांव | ४७ | ४ | १२ | ३ | ३ | २५ | — |
| मुदलगी | १६ | — | ९ | १ | १ | ५ | — |
| नालवार | १०१ | २५ | १२ | — | १० | ५० | ४ |
| एकूण | २७८ | ३६ | ५९ | ५ | ३२ | १३४ | १२ |

*प्रतिवृत्तांत दिलेल्या कारणांसाठी मिठबाव वगळलें आहे.

दूध, गोडें तेल, तूप, साखर, गूळ, फळें यांच्यासारख्या खाद्यपदार्थांचा, प्रत्येक प्रौढामागे सरासरीनें वापर क्रमांक १२·२ या तक्त्यांत दाखविला नाही. कारण जवळ जवळ सगळयाच केंद्रांतील बऱ्याच कुटुंबांत वरील पदार्थांचा दररोज वापर मुळीच आढळला नाही. हे पदार्थ खाण्यांत येतात असें ज्या कुटुंबांनी सांगितलें, त्याहि कुटुंबांत त्यांचा वापर अतिशय थोडा होता. पुढे देण्यांत येणाऱ्या माहितीवरून हें स्पष्ट होईल.

या वस्तूंचा वापर प्रत्येक प्रौढामागे न देतां प्रत्येक कुटुंबामागे दिला आहे. यांपैकी प्रत्येक वस्तूच्या वापराबद्दल तपशीलवार माहिती पुढे दिली आहे.

**दूध** :—मुदलगीखेरीज जवळजवळ सर्व केंद्रांत दूध वापरांत न आणणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण बरेंच मोठें होतें. मुदलगी येथे मात्र दररोज दूध आहारांत येत असल्याचें सर्व कुटुंबांनी सांगितलें. धानोरें व नालवार येथे शेकडा ६० कुटुंबांनी दररोज दूध आहारांत येत नसल्याचें सांगितलें. मिरजगांव येथे शेकडा ९ कुटुंबांनीच दररोज दुधाचा वापर नसल्याचें सांगितलें. क्रमांक १२·६ या तक्त्यांत यासंबंधीची माहिती दिली आहे. प्रत्येक कुटुंबामागे दररोज दुधाच्या वापराचें प्रमाण एकंदरीनें अतिशयच कमी आढळलें. मुदलगी येथे तें सर्वांत जास्त म्हणजे कुटुंबामागे २८ औंस एवढें आढळलें. नंतर मिरजगांवचा क्रम लागतो. तेथे प्रत्येक कुटुंबामागे १९ औंस दुधाचें प्रमाण आढळलें. उरलेल्या

केंद्रांत कुटुंबामागे हें प्रमाण, धानोरे येथे ४ औंस ते बोरी येथे १६ औंस यांच्या दरम्यान असलेलें दिसलें. प्रत्येक प्रौढामागे आवश्यक समजलें गेलेलें दुधाचें प्रमाण १० औंस आहे.

**तक्ता क्रमांक १२·६**

**पाहणी केलेल्या केंद्रांत प्रत्येक कुटुंबामागे दूध वापरण्याचें प्रमाण**

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | दररोज वापर करणारीं कुटुंबें संख्या | दररोज वापर करणारीं कुटुंबें शेकडेवारी | आठवड्यांत वापर करणारीं कुटुंबें संख्या | आठवड्यांत वापर करणारीं कुटुंबें शेकडेवारी | वापरणाऱ्या कुटुंबांची दररोजच्या वापराची औंसांत सरासरी | सर्व कुटुंबांमागे दररोजच्या वापराची औंसांत सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरी | ६३ | ५० | ७९.४ | २ | ३.१ | २०.२ | १६.० |
| धानोरें | ५१ | २० | ३९.२ | २० | ३९.२ | १०.४ | ४.० |
| मिरजगांव | ४७ | ४३ | ९१.५ | १ | २.१ | २१.२ | १९.४ |
| मिठबाव | ९५ | ७० | ७३.७ | २ | २.६ | ८.६ | ६.४ |
| मुदलगी | १६ | १६ | १००.० | — | — | २८.४ | २८.४ |
| नालवार | १०१ | ४२ | ४१.६ | १० | ९.९ | १९.८ | ८.२ |
| एकूण | ३७३ | २४१ | ६४.६ | ३५ | ७४.० | १६.७ | १२.३ |

क्रमांक १२·७ या तक्त्यांत दाखविल्याप्रमाणे बोरी व मिरजगांव येथील निम्म्या कुटुंबांनी आणि इतर केंद्रांतील तीन-चतुर्थांशापेक्षा अधिक कुटुंबांनी मुलांना किंवा प्रौढांना पिण्यासाठी दुधाचा वापर केला जात नाही असें सांगितलें. या तक्त्यावरून हेंहि दिसून येईल की, मुलांच्या पिण्यापेक्षा प्रौढांच्या चहासाठीच दूध वापरलें जात होतें. मुलांच्या पिण्यासाठी दूध वापरलें जात असल्याचें ज्या कुटुंबांनी सांगितलें, त्याहि कुटुंबांत दुधाच्या वापराचें सरासरी प्रमाण फार कमी होतें. क्रमांक १२·६ या तक्त्यांत प्रत्येक कुटुंबामागे सरासरीनें वापरण्यांत आलेल्या दुधाचें जें प्रमाण दाखविलें आहे, त्यावरून हें स्पष्ट होईल. ज्या कुटुंबांजवळ दुभत्या गाईम्हशी होत्या, त्या कुटुंबांत दुधाचा वापर होत होता. पण तेथेंहि बरेंच दूध विकलें जात असे. इतर कुटुंबांत २ पैशांपासून २ आण्यांपर्यंत चहाला जेमतेम पुरेल एवढेंच दूध घेतलें जाई. जवळपासच्या शहरांपेक्षा या खेड्यांत दूध मुळीच स्वस्त नव्हतें. तेथेहि दर शेराला ८ ते १० आणे असाच भाव होता.

**तूप व लोणी** :—मुदलगीखेरीज इतर सर्व केंद्रांत शेकडा ९० हून अधिक कुटुंबांत तुपाचा किंवा लोण्याचा वापर दररोजच्या आहारांत मुळीच आढळला नाही. मुदलगी येथे मात्र १५ पैकी ८ कुटुंबांनी तूप-लोण्याचा दररोज वापर होत असल्याचें सांगितलें. एकूण सर्व केंद्रांत मिळून लोण्या-तुपाच्या वापराची प्रत्येक कुटुंबाची सरासरी एक औंसापेक्षाहि कमी भरली. वनस्पति तुपाचा वापर तर खेड्यांत जवळजवळ माहीतच नव्हता. तेथील शेकडा ८५ कुटुंबांनी या तुपाचा दररोज वापर होत नसल्याचेंच सांगितलें. मिरजगांव येथे मात्र कांही कुटुंबांनी या तुपाचा वापर करीत असल्याचें सांगितलें. या तुपाचा वापर शहरांतच जास्त होत असतो. वनस्पति तुपाचा वापर एकूण इतक्या कमी प्रमाणांत होता की, त्याच्याबद्दल कांही लिहिण्याची गरज नाही. क्रमांक १२·८ या तक्त्यांत तुपालोण्याच्या वापराबद्दलची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक १२·७

पाहणी केलेल्या क्षेत्रांतील पिण्यासाठीं किंवा चहासाठीं दूध वापरणारीं कुटुंबें

| | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| **पिण्यासाठी दुधाचा वापर** | | | | | | |
| दररोज दूध न पिणारीं कुटुंबें | ३३ | ४५ | २२ | ८३ | ११ | ९१ |
| दररोज दूध पिणारीं कुटुंबें | २८ | ५ | २१ | ७ | ५ | १० |
| याबद्दल माहिती न देणारीं कुटुंबें | २ | १ | ४ | ५ | — | — |
| **चहासाठी दुधाचा वापर** | | | | | | |
| दररोज १ छटाकापेक्षा कमी दूध खर्चणारीं कुटुंबें | ९ | २ | — | १४ | ५ | — |
| दररोज १ छटाकापेक्षा अधिक दूध खर्चणारीं कुटुंबें | ४० | १७ | ३३ | ४२ | ११ | ३७ |
| कधीकधी वापर करणारीं कुटुंबें | १ | — | ३ | — | — | ३ |

तक्ता क्रमांक १२·८

पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक कुटुंबामागें तूप, लोणी व वनस्पति तूप वापरण्याचें प्रमाण

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | दररोज न वापरणारीं कुटुंबें | | आठवड्यांतहि न वापरणारीं कुटुंबें | | दररोज वापरणारीं कुटुंबें | दर-रोजच्या वापराची सरासरी | सर्व कुटुंबामागे दर-रोजच्या वापराची सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | | छटाकांत | छटाकांत |
| बोरी | ६३ | ५७ | ९०.५ | ५० | ७९.४ | ६ | २.५ | ०.२ |
| धानोरें | ५१ | ४९ | ९६.१ | ४७ | ९२.२ | २ | २.५ | ०.१ |
| मिरजगांव | ४७ | ४५ | ९५.७ | २८ | ५९.६ | २ | १.५ | ०.१ |
| मिठबाव | ९५ | ९२ | ९६.८ | ९० | ९४.७ | ३ | ०.३ | — |
| मुदलगी | १६ | ९ | ५६.२ | ६ | ३७.५ | ७ | ०.८ | ०.४ |
| नालवार | १०१ | ८८ | ८७.१ | ६४ | ६३.४ | १३ | १.७ | ०.२ |
| एकूण | ३७३ | ३४० | ९१.२ | २८५ | ७६.४ | ३३ | १.६ | ०.१ |

**खाण्याचें गोडें तेल** :— खाण्याच्या तेलांत मुख्यतः तिळाचें तेल व करडईचें तेल यांचा समावेश होता. पाहणीच्या क्षेत्रांतील लोकांना स्निग्ध पदार्थांचा पुरवठा मुख्यतः याचा पदार्थांतून होत होता. सगळ्या केंद्रांतील बहुसंख्य कुटुंबांनी दररोजच्या आहारांत या तेलाचा वापर होत असल्याचें सांगितलें. मिरजगांवमध्ये मात्र अंदाजें $\frac{1}{3}$ कुटुंबांनी तेलाचा वापर दररोज होत नसल्याचें सांगितलें. प्रत्येक कुटुंबाच्या तेलाच्या वापराची सरासरी धानोऱ्यास सर्वांत जास्त म्हणजे ४ औंस होती. इतर केंद्रांत

ही सरासरी १.२ ते २.४ औंस यांच्या दरम्यान होती. क्रमांक १२·९ या तक्त्यांत यासंबंधीची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १२·९**

**पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक कुटुंबामागे गोडें तेल वापरण्याचें प्रमाण**

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | दररोज खाणारीं कुटुंबें संख्या | दररोज खाणारीं कुटुंबें शेकडेवारी | आठवड्यांतहि न खाणारीं कुटुंबें संख्या | आठवड्यांतहि न खाणारीं कुटुंबें शेकडेवारी | खाणाऱ्या कुटुंबांचा दररोजचा सरासरी वापर छटाकांत | एकूण कुटुंबामागे दररोजचा सरासरी वापर छटाकांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरी | ६३ | ५९ | ९३.८ | २ | ३.१ | १.१ | १.० |
| धानोरें | ५१ | ५१ | १००.० | — | — | २.० | २.० |
| मिरजगांव | ४७ | ३० | ६६.७ | — | — | १.८ | १.१ |
| मिठबाव | ९५ | ८१ | ८५.७ | १२ | १२.४ | ०.७ | ०.६ |
| मुदलगी | १६ | १४ | ८७.५ | २ | १२.५ | १.० | ०.९ |
| नालवार | १०१ | ९१ | ९०.१ | ४ | ४.० | ०.९ | ०.८ |
| एकूण | ३७३ | ३२६ | ८७.४ | २० | ५.४ | १.१ | १.० |

**साखर व गूळ** :— पाहणीच्या क्षेत्रांतील खेड्यांत साखरेचा वापर फारसा आढळला नाही. विशेषत: धानोरें, नालवार व मिठबाव येथील शेकडा ६० पेक्षा अधिक कुटुंबांनी दररोज साखरेचा वापर करीत नसल्याचें सांगितलें. बोरी व मुदलगी येथे शेकडा २५ कुटुंबांनीहि दररोज साखर लागत नसल्याचें सांगितलें. फक्त मिरजगांव येथे मात्र बहुसंख्य कुटुंबांनी दररोज साखरेचा वापर होत असल्याचें सांगितलें. खेडे विभागांत सामान्यत: साखर क्वचित्च आढळे व गूळहि सणावारीं खाण्यांत येई. मिरजगांव व मुदलगी येथे साखरेच्या वापराचें कुटुंबामागे प्रमाण अनुक्रमें ६ आणि ५ औंस असें होतें. इतर केंद्रांत मात्र हें प्रमाण १ ते ३ औंसांच्या दरम्यान होतें. क्रमांक १२·१० या तक्त्यांत यासंबंधीची माहिती दिली आहे.

मुदलगी येथील सर्व कुटुंबांनी व मिठबाव येथील शेकडा ८५ कुटुंबांनी गुळाचा दररोज वापर करीत असल्याचें सांगितलें. इतर केंद्रांत गुळाचा वापर क्वचित्च होई. कुटुंबामागे वापराचें सरासरी प्रमाण मुदलगी येथे ७ औंस व मिठबाव येथे ४ औंस होतें. इतर केंद्रांत तें धानोऱ्यास व नालवारला १ औंसाहून कमी तें मिरजगांव व बोरी येथे १.५ औंस यांच्या दरम्यान होतें.

**अंडीं व कोंबडीं** :— क्रमांक १२·११ या तक्त्यांत अंडीं व कोंबडीं यांच्या वापराची माहिती दिली आहे. दररोज अंडीं खाणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण शेकडा ४ पेक्षा कमी होतें आणि आठवड्यांत एकदां अंडीं खाणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण शेकडा ७ पेक्षा कमी होतें. कोंबडीं खाण्यांत येत असल्याची माहिती कोणीच दिली नाही.

**फळें** :—पाहणींतल्या सर्व विभागांत दररोज फळांचा वापर हा माहीतच नव्हता. कांही ऋतूंत मिळणारीं स्वस्त व विपुल फळें क्वचित् खाल्लीं जात. उदाहरणार्थ, मिठबाव येथे स्वस्त असणारे आंबे उन्हाळ्यांत खाण्यांत येत. इतर केंद्रांत मात्र फळें क्वचित्च खाल्लीं जात.

## तक्ता क्रमांक १२·१०

### पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक कुटुंबामागे साखर वापरण्याचें प्रमाण

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | दररोज न वापरणारीं कुटुंबें | | आठवड्यांतहि न वापरणारीं कुटुंबें | | वापरणारीं कुटुंबें | वापरणाऱ्या कुटुंबांच्या दररोजच्या वापराची सरासरी छटाकांत | एकूण कुटुंबांमागे दररोजच्या वापराची सरासरी छटाकांत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | | | |
| बोरी | ६३ | १७ | २७.० | १७ | २७.० | ४६ | २.० | १.५ |
| घानोरें | ५१ | ३२ | ६२.७ | १३ | २५.५ | १९ | ३.० | १.० |
| मिरजगांव | ४७ | ५ | १०.६ | २ | ४.३ | ४२ | ३.० | २.७ |
| मिठबाव | ९५ | ५४ | ५६.८ | ५४ | ५६.८ | ४१ | २.३ | १.० |
| मुदलगी | १६ | ४ | २५.० | १ | ६.२ | १२ | ३.१ | २.३ |
| नालवार | १०१ | ७० | ६९.३ | ५० | ४९.५ | ३१ | १.९ | ०.६ |
| एकूण | ३७३ | १८२ | ४८.८ | १३७ | ३६.७ | १९१ | २.४ | १.२ |

## तक्ता क्रमांक १२·११

### पाहणी केलेल्या केंद्रांत कुटुंबामागे खाण्यांत येणारीं अंडीं व कोंबड्या

| केंद्र | पाहणी केलेल्या कुटुंबांची संख्या | दररोज खाणाऱ्यांची संख्या | | आठवड्यांत खाणाऱ्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|
| | | अंडीं | कोंबड्या | अंडीं | कोंबड्या |
| बोरी | ६३ | १ | — | १ | १ |
| घानोरें | ५१ | — | — | ३ | १ |
| मिरजगांव | ४७ | ३ | — | ८ | — |
| मिठबाव | ९५ | ८ | — | १० | ६ |
| मुदलगी | १६ | — | — | १ | १ |
| नालवार | १०१ | २ | — | २ | २ |
| एकूण | ३७३ | १४ | — | २५ | ११ |

वरील वर्णनावरून पाहणीच्या क्षेत्रांतील कुटुंबांच्या आहाराचें स्वरूप लक्षांत येईल. परंतु या आहारांत पोषक अंश किती प्रमाणांत होता, हें स्थूलमानानें तरी सांगितल्याशिवाय हें वर्णन पूर्ण होणार नाही. जी स्थूल स्वरूपाची माहिती आम्हांला मिळाली, तिच्यावरून या बाबतींत अधिक सूक्ष्म पृथक्करण करतां येणार नाही. परंतु स्थूल मानानें आहारांतील पोषक अंश किती होता, याची साधारण कल्पना येण्यासाठी आम्ही पुढे आहारांतील पोषक अंश कॅलरीमध्ये देत आहोंत व

त्यांतील प्रोटीनचें प्रमाणहि देत आहोंत. हें देत असतांना आहारांतील पदार्थांची प्रत व शिजवण्याच्या पद्धतीमुळे उत्पन्न होणारी पोषक अंशाची घट, या गोष्टी हिशोबांत घेतल्या नाहीत. क्रमांक १२·१२ या तक्त्यांत आहारांतील वेगवेगळ्या पदार्थांची कॅलरींतील किंमत, तसेंच त्यांतील प्रोटीनचें प्रमाण हें आधारासाठी देण्यांत येत आहे.

**तक्ता क्रमांक १२·१२**

**विविध खाद्य पदार्थांमधील कॅलरी व प्रोटीन यांचें प्रमाण**

| आहारांतील पदार्थ | प्रत्येक औंसामधील कॅलरींची किंमत | प्रत्येक औंसामधील प्रोटीनचें ग्रॅममध्ये प्रमाण |
|---|---|---|
| **धान्यें** | | |
| तांदुळ | १०० | २.४ |
| गहूं | ९८ | ३.४ |
| बाजरी | १०२ | ३.३ |
| ज्वारी | १०१ | ३.० |
| सरासरी | १०१.५ | ३.२ |
| **डाळी** | | |
| मसुराची डाळ | ९८ | ७.१ |
| तुरीची डाळ | ९५ | ६.३ |
| सरासरी | ९६.५ | ६.७ |
| **पालेभाज्या व फळभाज्या** | | |
| मेथी | १९ | १.४ |
| पालक | ९ | ०.५ |
| माठ | १३ | १.४ |
| वांगीं | ३४ | १.३ |
| कांदे | ५६ | ०.४ |
| बटाटे | ९९ | ०.५ |
| सरासरी | ३८.३ | ०.९ |
| मासे | २६ | ५.७ |

*मूळ : "हेल्थ बुलेटिन नं. २३" ऐकरॉइड (४थी आवृत्ति १९५१).

क्रमांक १२·१३ या तक्त्यांत पाहणी केलेल्या सर्व केंद्रांतील दैनिक आहारांतील धान्यें, डाळी, भाज्या व मासळी यांची कॅलरींत किंमत दिली आहे. या तक्त्यावरून दिसून येईल की, प्रत्येक प्रौढाच्या आहाराची कॅलरींतील किंमत ही बोरी येथें सर्वांत कमी म्हणजे २१०० व मुदलगी येथे सर्वांत जास्त म्हणजे ३१०० एवढी होती. या दोन मर्यादांत इतर केंद्रांमधील आहाराची कॅलरींतली किंमत होती. सामान्यपणे मुदलगी व धानोरें येथे प्रत्येक प्रौढामागे कॅलरींचें प्रमाण इतर केंद्रांच्या मानानें जास्त होतें.

क्रमांक १२·१४ या तक्त्यांत पाहणीच्या केंद्रांतील कुटुंबांत दररोजच्या आहारांतील धान्यें, डाळी, भाज्या व मासळी यांच्यांतील प्रोटीनचा अंश किती आहे हें दाखविलें आहे. या तक्त्यावरून

लक्षांत येईल की, वेगवेगळचा केंद्रांमधल्या आहारांतल्या प्रोटीनचें प्रमाण कॅलरींतील प्रमाणाप्रमाणेच सामान्यतः होतें. मुदलगी व धानोरें येथील आहारांत इतर केंद्रांच्या मानाने प्रोटीनचें प्रमाण अधिक होतें. बोरी व मिठबाव येथे आहारांतील प्रोटीनचें प्रमाण बरेंच कमी होतें.

**तक्ता क्रमांक १२·१३**

**पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक प्रौढामागे खाण्यांत येणाऱ्या विविध पदार्थांची कॅलरींत किंमत**

| खाण्याचा पदार्थ | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| तांदुळ | ११०.० | १४१.० | ५०.० | १३७१.० | ४९३.० | १३४.० |
| गहूं | १९३.१ | ११८.६ | ८७.२ | ४.९ | १८९.१ | ३१.४ |
| ज्वारी, बाजरी अथवा मका | १५७४.३ | २१६७.० | २२२५.९ | ८५१.६ | २११८.३ | २१४७.७ |
| डाळी | २३८.४ | २१५.२ | १२८.४ | ६८.५ | १८५.३ | १८१.४ |
| भाज्या | ५३.६ | ५३.६ | ३४.५ | १५.३ | १६४.७ | २३.० |
| मासे | — | — | — | ७८.० | — | — |
| एकूण | २१६९.४ | २६९५.४ | २५२६.० | २३८९.३ | ३१५०.४ | २५१७.५ |

**तक्ता क्रमांक १२·१४**

**पाहणी केलेल्या केंद्रांतील प्रत्येक प्रौढामागे प्रोटीनचें ग्रॅममध्ये प्रमाण**

| आहारांतील पदार्थ | बोरी | धानोरें | मिरजगांव | मिठबाव | मुदलगी | नालवार |
|---|---|---|---|---|---|---|
| तांदुळ | २.६ | ३.४ | १.२ | ३२.९ | ११.८ | ३.२ |
| गहूं | ६.७ | ४.१ | ३.० | ०.२ | ६.६ | १.१ |
| ज्वारी, बाजरी किंवा मका | ४८.९ | ६७.२ | ६९.१ | २६.४ | ६५.७ | ६६.६ |
| डाळी | १६.५ | १४.९ | ८.९ | ४.८ | १२.९ | १२.६ |
| पालेभाज्या | १.३ | १.३ | ०.८ | ०.४ | ३.९ | ०.५ |
| मासे | — | — | — | १७.१ | — | — |
| एकूण | ७६.० | ९०.९ | ८३.० | ८१.८ | १००.९ | ८४.० |

साधारण प्रौढ पुरुषाला ८२ ग्रॅम प्रोटीन दरदिवशीं लागतें असा अंदाज केला जातो. या अंदाजाप्रमाणे बोरीशिवाय इतर सर्व केंद्रांत प्रोटीनचें प्रमाण समाधानकारक असलेलें दिसतें. मुदलगी व धानोरें येथे हें प्रमाण विशेष चांगलें आढळतें. याचा अर्थ हा की, पाहणींतील केंद्रांतील सर्वसामान्य माणसाचा आहार प्रोटीनमध्ये कमी पडत नव्हता. पण यांत सर्वसामान्य परिस्थिती-पेक्षा कांही वेगळें आहे असें नाही. डॉ. व्ही. एन्. पटवर्धन यांनी 'न्युट्रिशन इन् इंडिया' या पुस्तकांत

हिंदुस्थानांतील आहारांतल्या प्रोटीनच्या प्रमाणाची जी चर्चा केली आहे, तिच्यावरून पाहणींतील खेड्यांची परिस्थिति कांही विशेष वेगळी आहे असें मानण्याचें कारण दिसत नाही.

आतांपर्यंतच्या चर्चेवरून पाहणींतील लोकांचा आहार कसा आहे याची कल्पना येऊं शकेल. या आहारांतील स्थूल विशेषांचेंच आम्ही वर्णन केलें आहे. आहारांतील व्हिटॅमिनचें, स्निग्धतेचें किंवा खनिज सत्वाचें प्रमाण काय आहे याचा अंदाज आम्ही केला नाही. आतां यापुढे पाहणीच्या केंद्रांत उपासमारीचीं जीं उदाहरणें आढळलीं, त्यांचें वर्णन करीत आहोंत.

नेहमीच्या उपासमारीची व कांही कालावधीच्या उपासमारीचीं उदाहरणें जवळजवळ सगळ्या केंद्रांत आढळलीं. परंतु मिठबाव येथें पाहणींतील ९५ कुटुंबांपैकी ४३ कुटुंबांनी नेहमीच उपासमार होत असल्याचें सांगितलें आणि ६ कुटुंबांनी कांही कांही ऋतूंत उपासमार होत असल्याचें सांगितलें. या उपासमारीचा काळ १ ते ९ महिन्यांपर्यंत कमी अधिक असे. १३ कुटुंबांनी उपासमार होत असल्याचेंहि सांगितलें आणि अगोदर प्रत्येक प्रौढामागे दररोज २१ औंस आहारांत येतात असेंहि सांगितलें होतें. याला कारण मिठबाव येथील आहारांत तांदुळाचें प्रमाणच अतिशय असल्यामुळे आणि तांदुळाची पोषक व रक्षक शक्ति बरीच कमी असल्यामुळे माणशीं बऱ्याच अधिक प्रमाणांत तांदुळ खाणें अवश्य असावें.

उपासमारीच्या उदाहरणांचा विचार करतांना उपासमारीची आम्ही स्पष्ट अशी व्याख्या ठरवली नव्हती. उपासमार होते असें ज्यांनी सांगितलें, त्यांचें तें म्हणणें आम्ही तसेंच मान्य केलें. परंतु ही माहिती इतर प्रकारांनी मात्र आम्ही पारखून घेतली. मिठबाव येथे उपासमार सर्वसामान्य असल्यामुळे ज्यांनी उपासमार होते असें सांगितलें त्यांचीं उदाहरणें इतर कुटुंबाहून वेगळीं काढलीं. तेथे पाहणींत निवडलेल्या ९५ कुटुंबांपैकी ४३ कुटुंबांत उपासमार होत होती. या उपाशांपैकी शेकडा २५ कुटुंबांत १० औंसांपेक्षा कमी धान्य आहारांत होतें. आणखी शेकडा २५ कुटुंबांत १० ते १९ औंसांपर्यंत धान्य आहारांत येत होतें. उरलेल्या बहुतेक कुटुंबांत २७ औंसांपेक्षा कमी धान्य आहारांत येत होतें. उपासमार न होणाऱ्या कुटुंबांपैकी शेकडा २५ कुटुंबांत १५ ते २० औंस धान्याचा आहार, इतर शेकडा २५ कुटुंबांत २० ते २६ औंस धान्याचा आहार आणि उरलेल्या शेकडा ५० कुटुंबांत २६ ते ४० औंस धान्याचा आहार असल्याचें सांगण्यांत आलें होतें. मिठबावच्या उपाशी कुटुंबांसंबंधी कांही तपशील पुढे दिला आहे.

मिठबाव येथे पाहणी केलेल्या कुटुंबांपैकी ५४ कुटुंबांचें वार्षिक उत्पन्न ३०० रुपयांच्या खाली होतें. या कुटुंबांपैकी ३२ कुटुंबांनी नेहमीच उपासमार होत असल्याचें सांगितलें. मिठबाव येथील कामकरी कुटुंबांत उपासमार ही नेहमीची होती. कारण उत्पन्नाचें कोणतेंच शाश्वतीचें साधन त्यांना उपलब्ध नव्हतें. शेतमजुरीवर अवलंबून राहणारीं ५ कुटुंबें व इतर मजुरीवर अवलंबणारें १ कुटुंब नेहमी उपासमारीनें गांजलेले असे. स्वतःची शेती करणाऱ्या कुटुंबांतहि उपासमार आढळली. शेती करणाऱ्या ३० कुटुंबांपैकी १७ कुटुंबांनी नेहमीची उपासमार व एका कुटुंबाने मधून-मधून उपासमार होत असल्याचें सांगितलें. मिठबाव येथील शेती ही तिच्यावर अवलंबणाऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी बरीच अपुरी आहे याचें हें सूचक आहे.

मिठबावच्या खालोखाल नालवार येथे अनेक उपाशी कुटुंबें आढळलीं. पाहणी केलेल्या एकूण १०१ कुटुंबांपैकी १३ कुटुंबांनी नेहमीची उपासमार व ३० कुटुंबांनी मधूनमधून उपासमार होत असल्याचें सांगितलें.

धानोरें येथे हंगामी उपासमारीचीं १२ उदाहरणें व नेहमीच्या उपासमारीचीं २ उदाहरणें आढळलीं. या केंद्रांत शेतमजुरीवर अवलंबणाऱ्या १० कुटुंबांपैकी ८ कुटुंबांनी उपाशी राहत असल्याचें सांगितलें. बोरी येथे हंगामी उपासमारीचीं ३ व नेहमीच्या उपासमारीचें १ उदाहरण होतें. मिरजगांव व मुदलगी येथे मात्र उपासमारीचें एकेकच उदाहरण आढळलें.

आहारांतील फरकासंबंधी जी माहिती आम्ही गोळा केली, तिच्यावरून प्रत्येक केंद्रांतील आहाराचा तोचतोपणा स्पष्ट दिसून आला. सकाळ-संध्याकाळ भाकरी व फरक म्हणूनहि भाकरी असाच कंटाळवाणा आहार सर्वत्र दिसून आला.